नवनाथ बाळकृष्ण तांडेल

द ब्राइट फ्युचर

दि ब्राईट फ्युचर

नवनाथ बाळकृष्ण तांडेल

ई साहित्य प्रतिष्ठान

दि ब्राईट फ्युचर (कादंबरी)

लेखक: नवनाथ बाळकृष्ण तांडेल

पिंपळ परिसर, मु. पो. -सातपाटी, ता. जि. पालघर.

पिन. ४०१४०५.

महाराष्ट्र.

भ्रमणध्वनी:८०८७८१०१८०.

ईमेल: navnathtandel19@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:
ई साहित्य प्रतिष्ठान
ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे, महाराष्ट्र, भारत
400604
www. esahity. com
esahity@gmail. com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : २० ऑगस्ट २०६

©esahity Pratishthan®2026

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनोगत

शालेय जीवनापासून वाचन-लेखन करण्याचा आवड निर्माण झाली. शाळेच्या निबंध स्पर्धेत भाग घेऊन विविध विषयांवर निबंध लिहू लागलो. पुढे मुंबईतील विविध वाचनालयातर्फे घेण्यात येणाऱ्या कथा स्पर्धेत भाग घेत राहिलो. कधी उत्तेजनार्थ तर कधी तृतीय क्रमांक मिळत गेला. त्यातून लेखनाची प्रेरणा मिळत गेली. एका बाजूला वाचन सुरू होते तर दुसऱ्या बाजूला जे सुचत होते ते कागदावर उतरवत गेलो. महाविद्यालयीन काळ अत्यंत खडतर गेल्याने लेखनावर लक्ष देता आले नाही.

त्यानंतर डहाणू स्थित अनुताई वाघ यांचे शिष्य श्री. दिलीप पाटीलसर यांच्या 'अपंग मित्र' या मासिकात लेख आणि कथा लिहू लागलो. डहाणूचेच पत्रकार श्री. प्रविण दवणेजी आपल्या 'आजचा तटरक्षक' दिवाळी अंकात माझे साहित्य छापू लागले. त्यातून उत्साह वाढला. मुलूंड येथील संपादक श्री. अमोल सरतांडेल यांचे 'दर्यावर्दी' मासिक, माहीम, मुंबई येथील श्री. पंढरीनाथ तामोरे यांचे 'दर्याचा राजा' मासिक, जूहू येथील श्री. किरण राऊत यांचे 'चालना' मासिक, वसई येथील श्री. अरूण घायवट यांचे 'तुषार'दिवाळी अंक, विरार येथील श्री. उमाकांत वाघ यांचे 'साहित्य संघम' दिवाळी अंक तसेच 'आपला वार्ताहर' वर्तमानपत्र यांत आणि महाराष्ट्रातील इतर प्रासंगिक नियतकालिकात माझे लेख, कथा, कविता,

नाट्य प्रसिद्ध होत राहिले. या सर्व मासिकाच्या संपादकांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. लेखनात सुधारणा होत राहिली.

'सागरकन्या' २००३ साली लिहिली होती. छोट्या छोट्या हास्य नाटिका लिहिल्या होत्या. 'तुषार' दिवाळी अंकाने त्या छापल्या. बक्षीस देऊन त्यांचा गौरवही केला. आजचा तटरक्षकचे संपादक श्री. प्रविण दवणेजी यांच्या प्रेरणेने 'वास्तव' हा चारोळी संग्रह २०१३ साली प्रसिद्ध झाला. त्यांतर साहित्य आणखी दर्जेदार व्हावे म्हणून प्रयत्न करीत राहिलो.

विज्ञान-मानवी जीवनाचा एक महत्वपूर्ण असा अविभाज्य घटक.विज्ञान म्हणजे विशेष असे ज्ञान.तत्वज्ञानाच्या सखोल विचारधारेला जेव्हा प्रयोगशीलतेचा आधार मिळाला तेव्हा विज्ञान आकारास आले.

बालपणापासून शालेय जीवनातून माझ्यात विज्ञानाची आवड निर्माण होत गेली.शरीरातील निरनिराळे अवयव,त्यांचे गुंतागुंतीचे कार्य, त्यांतील समन्वय,अणु-रेणू, रसायनांची जडणघडण, मूलद्रव्यांचे एकत्रीकरणातून घडणारे विविध चमत्कार, किरणोत्सर्ग,खगोल, धूमकेतू,ग्रह-तारे, विश्वाची निर्मिती, पसारा,जीवनाचे कोठेही फुलणे-फळणे ह्यांचा अभ्यास करताना चाट पडायला व्हायचे.इतर विषयातून मिळणारे सुधारणावादी विचार हा वैज्ञानिक दृष्टिकोन आणखी बळकट करायचा.

माझ्यात वैज्ञानिक दृष्टिकोन पेरणारे विज्ञान शिक्षक श्री.टीअम नाईक सर, श्री.महाबळसर, श्री.कुंभार सर(सामाजिक जाणिवा देणारे) यांचा प्रामुख्याने उल्लेख करेन.त्यानंतरच्या आयुष्यात विविध वर्तमानपत्रे, पुस्तके यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणखी वृद्धिंगत केला.स्वार्थी लोक मनुष्याच्या कमकुवत मनाचा गैरफायदा घेऊन त्यांच्यात पद्धतशीरपणे

अंधश्रद्धा पेरून स्वतः ची दुकानदारी कशी चालवितात हे पाहून-ऐकून चिड येऊ लागली. त्यामुळे मी स्वतः कधी आयुष्यात अंधश्रद्धा पाळलेली नाही.

मी विविध नियतकालिकेत दिवाळी अंकात साहित्य द्यायचो. यापैकी 'चालना' मासिकासाठी मी 'अवकाशयात्रा' नावाची कथा लिहिली होती. ही कथा मासिकाचे संपादक श्री.किरण राऊत सरांना एवढी आवडली की ते या कथेचे उत्तेजनार्थ पारितोषिक देण्याकरिता जूहू (मुंबई) येथून माझ्या घरी आले होते. तेव्हा ते म्हणाले होते,"तू २१ व्या शतकातील आहे पण तुझे विचार २५ व्या शतकातील आहेत." त्यांच्या या वक्तव्याने मी प्रेरणा घेऊन विज्ञानावर आधारित कादंबरी लिहिण्याचा प्रण केला.आणि दोन - तीन वर्षांच्या परिश्रमातून ही ' दि ब्राईट फ्युचर' ही कादंबरी अस्तित्वात आली.

या कादंबरीत मी मानवी जीवनाच्या विविध समस्या विज्ञानाच्या मदतीने कशा पद्धतीने सोडवता येऊ शकतात याचे विवेचन केले आहे.त्याच वेळी त्याचा दुरूपयोगही होणार नाही यावरही भर दिला आहे.या कादंबरीचा मुख्य गाभा विज्ञान आणि मानव हाच आहे.सर्व मानवजातीचे कल्याण ही माझी तीव्र इच्छा इथे मी कादंबरीच्या रूपात व्यक्त केली आहे.यात मी विविध मानवोपयोगी वैज्ञानिक शोधांची कल्पना मांडल्या आहेत.त्याच्या बऱ्या वापराबरोबरच दुष्परिणाम काय होऊ शकतात हा विचार देखील मांडला आहे.या अनंत ब्रह्मांडात आपण एकटे नाहीत,यावर माझा विश्वास आहे.विश्वात इतरत्रही सजीवसृष्टी आहे,तिचा तपास येणाऱ्या काळात नक्कीच लागेल असा विश्वास आहे.म्हणून मी मंगळावरील मानव आणि अन्ड्रामेंडा या जवळच्या आकाशगंगेतील सॅट-९ या काल्पनिक ग्रहावरील जीवसृष्टीची कल्पना केली आहे.त्यांच्या वेगवेगळ्या भाषा थोडक्यात देण्याचा प्रयत्न केला आहे.मंगळावरील भाषेसाठी 'म'च्या

भाषेचा उपयोग केला आहे. मराठी शब्द उलट लिहून प्रत्येकाच्या सुरूवातीला 'म' हा उपसर्ग म्हणून घेतला आहे.सॅट-९ या ग्रहावरील भाषा ही स्थानिक तरुण- तरूणी कोड भाषेसाठी वापरतात ती घेतली आहे.ही भाषा वाचताना नक्कीच गंमत वाटेल.

ही कादंबरी लवकरात लवकर प्रसिद्ध होण्यासाठी तत्पर असलेले ई - साहित्याचे श्री.सुनीळ सामंत सर आणि पूर्ण ई - साहित्य टीमचा मी अत्यंत ऋणी आहे.अपेक्षा आहे वाचकांना ही कादंबरी नक्कीच आवडेल.

आगामी काळात अनेक साहित्यिक प्रकल्प पूर्ण करण्याचा मानस आहे. त्यात मला जी महाराष्ट्रभरातून अनेक मान्यवराची विविध पत्रे आली आहेत, त्यांचा संग्रह छापायचा आहे. तसेच मी दोन्ही पायांनी दिव्यांग असूनही एकट्याने किंवा इतरांच्या संगतीत दूरदूरचा जो प्रवास केला आहे, ते प्रवासवर्णन प्रसिद्ध करण्याचा विचार आहे. त्यापुढे जाऊन शालेय जीवनाच्या आठवणी लिहिण्याचा विचार आहे. विविध नियतकालिकात जे लेख प्रसिद्ध झालेत तेही प्रसिद्ध करू इच्छितो. आधुनिक विक्रम-वेताळच्या कथाही लिहायला घेतल्या आहेत. थोडक्यात, लेखन भरपूर आहे. आता जसे सुचत जाईल तसे ते कागदावर उतरत जाईल. एक मात्र खरे की या साहित्य निर्मितीतून निखळ आनंद मिळत राहिला आहे. पुढेही मिळत राहिल आणि जीवन जगण्यास प्रोत्साहन देत राहिल याची खात्री आहे.

लेखक:

श्री. नवनाथ बाळकृष्ण तांडेल

पिंपळ परिसर, मु. पो. -सातपाटी, ता. जि. पालघर.

नवनाथजी तांडेल यांची पहिली प्रकाशित कादंबरी.

वाचण्यासाठी www.esahity.com ला भेट द्या



.... अर्पण पत्रिका.... .....

हजारो, शेकडो वर्षांपासून विश्वभरात सागरकिनारी वस्ती करून दर्या-सागरावर राज्य करणाऱ्या तमाम कोळी बांधवांना समर्पित.

दि ब्राईट फ्युचर

(१)

आश्चर्याचा धक्का

जुलैचा महिना चालू असलेला. कधी नव्हे ते गेल्या चार-पाच वर्षाच्या सरासरीपेक्षा पाऊस जास्तच बरसत होता. 'सामाजिक वनीकरणामुळे वनांची संख्या वाढून पावसाच्या प्रमाणात वाढ झाली की काय? किंवा अलनिनोचा प्रभाव?' सुमितने विचार केला.

गेले दोन दिवस पावसाने कहर केलेला. सागरकिनाऱ्यालगतचा परिसर होता म्हणून. एखाद्या नदीकाठचा प्रदेश असता तर एव्हाना दोन तासात वाहून जाऊन तेथे भयाण स्मशान झाले असते. अर्थात, सागरकिनारीही कमी त्रास झालेला नव्हता. तुफान वाऱ्याने झोपड्या उडून गेल्या होत्या. काही घरांची कौले उडाली होती. रस्त्यावरची वाळू पावसाच्या पाण्याबरोबर खाडीत जाऊन खडक उघडे पडले होते. त्यावरून चालणे मुश्किल होत होते. सागराच्या अजस्त्र लाटांनी कुठचा कुठचा वाहून आणलेला कचरा किनाऱ्यावर साचलेला होता. सातपूर सारखे मासेमारीत अग्रेसर कोळीवाडा या भयाण पावसात हीनदीन दिसत होता.

आता एकविसाव्या शतकात सागराचे प्रदूषणही भयंकर झालेले. प्रदूषणाची कारणेही अनेक. कारणे काहीही असोत, सागराचे प्रदूषण

झाले हे निश्चित. बाकी सातपूरकरांच्या भौतिक, धार्मिक, सामाजिक जीवनात बराच फरक पडलेला. परंतु आर्थिक परिस्थिती मात्र फारसा फरक पडलेला नव्हता. पावसाळ्यात कोळीवाड्याचे तोंडाचे पाणीच पळते. गरीब असेल तर खाडी-खाजणात थोडीफार मासेमारी करून, शेतात मजूरी करून गुजरान करतो. धनिक असेल तर दागिने गहाण ठेवेल नि पावसाळा काढेल. मासेमारी हंगाम कधी सुरू होतोय, असे दोन्ही वर्गाला झालेले.

सुमित विचार करीत होता. तो गरीब परिवारातील पंचवीस वर्षीय तरुण होता. विज्ञान शाखेची बी. एस्सी. पदवी घेतलेला. मातापित्यांच्या कृपेने शिकला. पण नोकरी काही केल्या मिळत नव्हती. बाप इतरांच्या बोटीत खलाशी होता. खांद्यावर पाण्याचे ड्रम, बर्फाचे खडे नि मावऱ्याच्या पाट्या वाहून कंबरेत वाकलेला. आई उन्हातान्हात मासळी विक्री करून काळवंडलेली. थोरली बहीण सरू तालुक्याला औद्योगिक विभागात कामाला जायची. जेमतेम सात-आठ हजार पगार यायचा. छोटा अमेय हा देखील सुट्टीत खपून घराला आर्थिक हातभार लावायचा. सुमित काहीही करीत नव्हता. आजवर कुटुंबाची कोणतीही जबाबदारी त्याने पार पाडलेली नव्हती. उलट आईबाबांकडे,बहीण-भावाकडे पैशांसाठी हात पसरलेला. या चौघांच्या जीवावर त्याने भरपूर मौजमजा केली होती. आता मात्र त्याचे कर्तव्य त्याला टोचत होते. आईबापांसाठी, भावा-बहीणीसाठी काही करावे असे त्याला प्रकर्षाने वाटू लागले होते. बऱ्याच ठिकाणी त्याने कामासाठी प्रयत्न केले होते. त्याच्या प्रयत्नाला समाधानकारक यश

येत नव्हते. त्याची चिंता वाढत होती. पारंपरिक मासेमारी व्यवसायात प्रवेश करावा असेही त्याला वाटले. मात्र एवढे शिक्षण घेतले त्याचे काय?

सुमितच्या घरात पैशांची नेहमी नड असायची. आईबाप खपायचे. बहीण-भाऊ काम करायचे. तरीही पैसा पुरायचा नाही. सुमितचा खर्चच जास्त होता. त्याने बेफिकिरपणे मौजमजेत पैसे उडवले. घरच्यांच्या कष्टाची त्याला कदर नव्हती. घरात खर्चाला पैसे आहेत की नाही, रेशनसामान आहे की नाही, याचा त्याने कधीच विचार केलेला नव्हता. आता मात्र त्याला परिस्थितीचा झळ बसू लागली होती.

पावसाळा म्हणजे जणू दुष्काळात तेरावा महिनाच. घरात खायला काही नाही. बहिण-भाऊ जसेतसे कामाला गेलेले. मायबाप खाडीत गेलेले. थोडीफार मासळी, शिंपली, कालवे भेटले तर रात्रीच्या जेवणाचा खर्च तरी सुटेल. सुमित मात्र घरात बसून होता. त्याचे शिक्षण त्याला असे त्याच्या मते हलके काम करू देत नव्हते. शिक्षणाची प्रतिष्ठा आड येत होती. दुपारी जे मिळाले ते दोन घास पोटात ढकलून खिडकी जवळच्या खाटेवर पडून राहिला. संध्याकाळपर्यंत तेथेच बसून राहिला. घरात त्याच्याशिवाय अन्य कोणीही नव्हते. संध्याकाळ झालेली. बाहेर अंधार पडून येऊ लागला होता. त्याचे मन उद्विग्न झाले होते. निरिच्छेने भरून गेले होते ते. खिडकीतून येणारी-जाणारी माणसे बघून तो विटून गेला.

गोधडी गुंडाळून ठेवली. हात-पाय-तोंड धुतले. चहा मिळण्याची शक्यता नव्हती. शर्ट चढवून तो बाहेर पडला. दार बाहेरून लावले. तो बंदरावरच्या वाटेवर लागला.

पाऊस रिमझिम पडत होता. पावसाने कोळीवाड्यातील रस्त्यांची दैना करून ठेवली होती. कुठे खड्डे पडलेले. तेथे डबके साचलेले. कुठे रस्ता धुवून गेलेला. कुत्र्या-मांजरांनी वाटेत घाण करून ठेवलेली. त्यात मोकाट गुरांनी भर घातलेली. एके ठिकाणी पडलेला कचरा पाहवत नव्हता. तो वाटेत आलेला. वाटेतून जाताना किळस वाटत होता.

सुमित हे सर्व टाळून बंदरावर आला. तेथे एक जुने पडके घर होते. आताही आभाळ गळत होते. सुमित निराश होऊन त्या पडक्या घराच्या पायरीवर बसला. रिमझिम पावसात भिजत होता तो. परिसर निर्जन. तेथे या अशा वातावरणात कोणी यायची शाश्वती नव्हती. घराच्या बाजूला वीटांचे छोटेसे एकपदरी कुंपण होते. त्यात पाणी साचलेले. अधूनमधून गवत वाढलेले दिसत होते. सुमित आपल्या नशिबाला कोसत तेथे कुढत बसलेला होता आणि तेथे त्याच्याच वयाचा एक तरुण अचानकपणे प्रकट झाला. उंचपुरा. तंदुरुस्त. बलदंड. तेजस्वी. डोळ्यात देशसेवाच नव्हे तर मानवसेवा करण्याचे उत्तुंग इच्छाशक्ती असलेला. त्याचे नाव मानव.

"काय भाऊ, निराश दिसताय?काही समस्या?" मानवने आपुलकीने विचारले.

"शिकलोय. कामधंदा नाही. घरात पैशाची चणचण आहे. बघवत नाही. आईबाप कष्ट करतात. लहान बहीण-भाऊ काम करतात. मी काहीच करत नाही. वाईट वाटते. " तोंडावरचे पाणी पुसत सुमित म्हणाला.

"माझ्या सोबत काम करणार?" मानवने ऑफर देत विचारले.

"हो करेन. चांगले असेल तर वाटेल ते करेन. पण मला काम द्या." सुमित आशेने उभा राहत म्हणाला.

"काम खूप महत्त्वाचे आहे. भरपूर गुप्तता पाळावी लागेल. जीव गेला तरी कामाचे रहस्य कोणालाही सांगायचे नाही. यात काम हे सर्वस्व असेल. त्या पुढे कुटुंब, मित्र, समाज, भावभावना या कशाला महत्त्व नाही. मान्य आहे?" मानवने अट पुढे केली.

"मला सर्व अटी मान्य आहेत. मला फक्त काम हवे आहे. " सुमित निश्चयाने म्हणाला.

"ठिक आहे तर. चल माझ्या सोबत. " मानव त्याला वाटेच्या कुंपणाकडे घेऊन गेला.

"तो वीटेच्या एका कोपऱ्यात खड्डा दिसतो ना! तेथे आहे या विश्वातील सर्वात मोठी आणि सर्वात सूक्ष्म कार्यशाळा. " मानवने निर्देशित केलेल्या ठिकाणी बघताना सुमितच्या मस्तिष्काला काहीच आकलन होत नव्हते.

"तेथे? त्या एवढ्याशा भागात?" त्याने गोंधळून विचारले.

"मग. नवल वाटते ना! चल दाखवतो. डोळे मिट. "

सुमितने डोळे मिटले. मानवने डाव्या मनगटातील घड्याळ सदृश वस्तूचे बटण दाबले. त्या बरोबर दोघे पाण्यात पडले. त्यांना हे एक फूटाच्या डबक्यातील पाणी एखाद्या विशाल जलाशयासारखे वाटले. त्यात वाढलेले गवत जणू ताडामाडाचे वृक्षच वाटू लागले आणि कुंपणाच्या वीटा जणू चौफेर पसरलेली टेकडीच.

सुमितच्या नाकातोंडात पाणी शिरायला लागले तेव्हा तो मानवच्या मागे पोहत पोहत त्या गुफेजवळ गेला. मघाशी वीटेच्या कोपऱ्यातील एखाद्या झुरळाचे बीळ वाटावे, असा तो खड्डा आता एका मोठ्या गुफेसारखा वाटत होता. दोघे पाण्यातून बाहेर पडले. समोर अंधार त्यांच्या स्वागताला उभे होते.

सुमितने पाहिले. पडक्या घरासमोरील ते छोटेसे कुंपण विशालकाय पर्वताशी स्पर्धा करीत होते. त्याचे डोके चक्रावून गेले. "हे काय आहे, सर्व?"

"हाच तर चमत्कार आहे. जे दिसते, ते नसते. जे असते, ते दिसत नाही. जेव्हा हे आपल्या आकलनाच्या पलीकडे जाते, तेव्हा त्याला आपण चमत्कार नाव देऊन मोकळे होतो. "

"पण हे अचानक सर्व मोठे कसे झाले?"

"हे मोठे झालेले नाही. आपण सूक्ष्म झालो आहोत. मघाशी मी या डाव्या मनगटावरील गॅझेटचे बटण दाबले आणि आपण कल्पनातीत सूक्ष्म झालो. " मानवने स्पष्टीकरण दिले.

"पण का?"

"कारण आपली भव्यदिव्य कार्यशाळा या कुंपणाच्या खाली सूक्ष्म रूपात आहे. तेथे शेकडो माणसे काम करताहेत. " मानवचे बोलणे सुमितच्या डोक्यावरून जात होते.

"खरे वाटत नाही ना! चल दाखवतो. "

सुमित मानवच्या मागे अंधारात निघून गेला. अंधारातच दोन-तीन दरवाजे ओलांडून ते पुढे गेले. चौथा दरवाजा उघडला तेव्हा समोर उजेड दिसला. समोर अर्धवर्तुळाकृती कक्षा होती. तेथे सिनेमा थिएटरमध्ये असतात तसे मोठे काचेचे पडदे होते. दहा ते बारा असावेत. प्रत्येक पडद्यावर वेगवेगळे दृश्य दिसत होते.

"हे नियंत्रण कक्ष आहे. " मानव सांगू लागला, "इथून संपूर्ण विश्वावर लक्ष ठेवले जाते. विश्वात कुठे काय घडणार आहे, याचा पत्ता घटना घडण्यापूर्वीच लागतो. इथे पूर्णपणे या कार्याला समर्पित केलेले शंभर व्यक्ती कार्यरत आहेत. प्रत्येकासाठी स्वतंत्र खोली आहे. एक कार्यशाळा आहे. एक प्रयोगशाळा आहे. तुझ्यासारख्या तरूण तडफदार माणसांची या कार्याला गरज आहे. प्रत्येकाला बारा तास काम करावे लागते. प्रसंगी यापेक्षा जास्तही. पन्नास हजार रुपये वेतन त्यांना दिले जाते. इथे कुणी लहान-मोठा नाही. आपल्याला विश्वाची अनेक रहस्ये उलगडायची आहेत. मानवाच्या, इतर जीवांच्या समस्या कायमच्या दूर करायच्या आहेत. त्याकरिता विज्ञानाचा भक्कम आधार घ्यायचा आहे. "

सुमितला जे ऐकतोय, ते पूर्ण अपरिचित आणि नवीन होते. त्याला असे काही असेल हे सहज पटण्यासारखे नव्हते. त्याने विचारले, "ही संकल्पना कुणाची?हे सर्व बनविले कुणी?"

"ती सात लोकं आहेत. कोण आहेत? कुठे राहतात? याचा इथे कोणालाही ठावठिकाणा नाही. जणू पृथ्वीचे सात खंडच म्हणा ना त्यांना. पण त्यांचा उद्देश मात्र उदात्त आहे. विश्वाचे कल्याण. तेही बुद्धीच्या कसोटीवर पारखून. हवेत बाण सोडून नाही. "

"ही कार्यशाळा किती मोठी आहे?"

"दोनशे खोल्या, नियंत्रण कक्ष, कार्यशाळा, प्रयोगशाळा, सभागृह, मोकळे मैदान मिळून ही कार्यशाळा आहे. हे पडक्या घरासमोरील वीटेचे छोटेसे कुंपण पूर्णपणे सुरक्षित ठिकाण असून पुढची पन्नास वर्षे तरी या पडक्या घराकडे कुणी ढुंकूनही पाहणार नाही. म्हणून या घरासमोरील छोट्याशा कुंपणाच्या पायाखाली ही कार्यशाळा बनविण्यात आली. जितकी सूक्ष्म,तितकीच विशाल. "

सुमितला एकावर एक आश्चर्याचे धक्के बसत होते. असे काही असू शकते, याचे त्याला नवल वाटू लागले. त्याला याबद्दल अधिक जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली.

"आपण आलो तोच एकमेव दरवाजा आहे का, येथे येण्याचा?"

"नाही. इथे यायला दरवाजा असा नाहीच. आम्ही जेथे जातो, तेथे दरवाजा तयार करतो. तात्पुरत्या स्वरुपात. त्याचे कार्य संपले की तो दरवाजा बंद करतो. आता आपण जेथून आत आलो, तो दरवाजा

आता कायमचा बंद झाला. पुढे आवश्यकता पडेल तेथून दरवाजा करू. " मानव स्पष्टीकरण देत सांगत होता.

"आणि ही कार्यशाळा एकमेव नाही बरे का! अशीच एक कार्यशाळा सागराच्या मध्येही आहे आणि एक कार्यशाळा वर आकाशातही आहे. जल, स्थल, आकाश या तिन्ही ठिकाणी संशोधनासाठी ह्या कार्यशाळा उभारण्यात आल्या आहेत. "

"एवढे सर्व करायला पैसा किती लागला असेल?" सुमितने विचारले.

"इथे पैसा महत्वाचा नाही. इच्छाशक्ती महत्वाची आहे. नेमके सूत्र महत्त्वाचे आहे. निसर्गातील कोणत्याही गोष्टीचे मर्म सूक्ष्मात असते. कोणतीही गोष्ट प्रथम सूक्ष्मात घडते. नंतर ती स्थूळात दिसून येते. आपण स्वतः सूक्ष्मात विश्व आणि विश्वात सूक्ष्म आहोत. आपल्यात सुद्धा पूर्ण विश्व सामावलेले आहे. बस, याच तंत्राचा वापर करून ह्या कार्यशाळा बनविण्यात आल्या आहेत. असे बघायला गेले तर ही कार्यशाळा चटईक्षेत्राच्या एवढीपण नाही. पण तसे बघायला गेले तर शंभर एकर जागेत आहे. आहे ना गंमत! " मानवाच्या या वक्तव्यावर सुमित भारावून गेला.

" चल आता माझ्या सोबत. " मानव त्याला नियंत्रण कक्षाच्या बाहेर घेऊन गेला. त्या ठिकाणी शहरातील हॉटेलात दोन्ही बाजूंना असतात, तशा खोल्या होत्या. पैकी एका खोलीत मानव सुमितला घेऊन गेला. ती आठ बाय दहाची खोली होती. झोपायला एक पलंग. एक छोटे टेबल. एक दूरदर्शनसंच. बाकी चौफेर भिंतीत खण होते.

"हे पलंग विश्रांतीसाठी. हे टेबल जेवणासाठी तसेच इतर कामाकरिता आणि हा दूरदर्शनसंच या कार्यशाळेत कुठे काय चालले आहे, हे बघण्यासाठी आहे. तुला भूक लागली की हवे त्या पदार्थाचे नाव इथे कीबोर्डच्या मदतीने मराठीत टाईप करायचे. पंधरा मिनिटात ती वस्तू गरमागरम या बाजूला खणात येते. ज्या खणात ती येते, तेथे सूचना दिवा पेटतो. बोल, तुझ्याकरिता काय मागवू?"

"एक कप चहा आणि गरमागरम कांदेभजी." सुमित काहीतरी खायला नक्की मिळेल या आशेने म्हणाला.

मानव दूरदर्शनसंचाच्या समोर गेला. ते सुरू केले. दोन बश्या कांदेभजी आणि दोन कप चहा असे टाईप केले. निरोप स्वयंपाकगृहात पाठविला.

"आता पंधरा मिनिटे थांब. ऑर्डर येईल. "

दोघे पलंगावर बसले. मानव सुमितला कार्यशाळेची गुपिते सांगत होता. खरोखरच पंधरा मिनिटात भजी व चहा आली. ते खाता खाता दोघांच्या खगोलशास्त्रावरील चर्चा झडल्या.

आपण आपले आयुष्य या कार्यासाठी वेचावे असा ठाम निश्चय सुमितने केला. एक कल्पनातीत निश्चय.

(२)

सूचना फलकाचे रहस्य

सुमित कार्यशाळेतून परतल्यावर काही दिवसांनी स्वातंत्र्यदिनी देशाच्या प्रत्येक रेल्वेस्थानकात, बसस्थानकात आणि विमानतळावर सिनेमाच्या पडद्याइतका मोठा प्लॅस्टिकचा पांढराशुभ्र पडदा दोन खांबावर उभा असलेला आढळून आला. त्यावर स्थानिक भाषेत खालील प्रमाणे संदेश होता.

"सर्व भारतवासियांना आमचा स्नेहपूर्ण नमस्कार. आम्ही या देशाचे नागरिक असून आपल्या देशाच्या सर्व समस्या मुळासह उपटून काढण्याचा विडा उचलला आहे. विज्ञानाच्या चुकीच्या वापरामुळे ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत, त्या विज्ञानाच्याच सहाय्याने आम्ही सोडवून देऊ. सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, राजकीय, पर्यावरणीय ज्या समस्या आहेत, त्यावर आम्ही विज्ञानाच्या मदतीने तोडगा शोधून काढला आहे. आम्ही तमाम भारतीयांना सुखी, समृद्ध, वैभवसंपन्न करण्याचा पण केला आहे. आमची सर्व भारतीयांकडून एकच अपेक्षा आहे की तुम्ही आम्हाला सहकार्य करा. आम्ही सांगू तसे करा. आम्ही एकेक करून समस्या सोडविण्यासाठी हाती घेऊ. त्यावर उपाय मांडू. तुम्ही आम्हाला सहयोग द्या. बघा, तुम्ही-आम्ही मिळून या भारताचे नंदनवन बनवू. सुराज्य आणू. जयहिंद! "

प्रथमतः ही पडद्याची भानगड काय आहे? हेच कोणाला कळेना. भारतीय जनतेच्या मनात मिश्र भावना निर्माण झाल्या. "ही नवीन भानगड काय आहे?" असे जो तो म्हणू लागला. कुणी म्हणाले, "बघू या, हे काय करतात ते. "

प्रशासकीय पातळीवरील यंत्रणेला हे घातपाताचे लक्षण वाटले. प्रत्येक उपग्रह वाहिन्यांवर हीच बातमी होती. हे सूचना फलक जनतेत गोंधळाची परिस्थिती निर्माण करू शकेल या भयास्तव प्रशासनाने हे फलक त्वरीत हटविण्याची कारवाई सुरू केली. सातपूरच्या नाक्यावरील फलक काढण्यासाठी पंचायतीचे कर्मचारी गोळा झाले. फलक खांबाशी एकसंध होता. खोलता येऊ शकणारा नव्हता. म्हणून फलक तोडण्याचा निर्णय झाला. दगडांनी प्रहार केला गेला. हातोड्यांनी घाव केले गले. फलक काही केल्या फुटेना. सर्व प्रयत्न विफल झाले. शेवटी फलक खांबासहित जमिनीतून उखडून काढण्याचे ठरले. परंतु खांबही उखडता आला नाही. हे काहीतरी अद्भुत शक्ती असल्याची जाणीव सर्वांना झाली. हा फलक तोडण्याचा नाद सोडून देण्यात आला.

सामान्य जनता, राजकारणी,प्रशासन यंत्रणा आणि शास्त्रज्ञांची मती गुंग करणारी आणि संभ्रमात टाकणारी ही घटना होती. ''हिऱ्यापेक्षा कठीण पदार्थ कोणता आला? हे फलक लावणारे कोण? ही सूचना लिहिणारे कोण? एका रात्रीत संपूर्ण देशाच्या बसस्थानक, रेल्वेस्थानक आणि विमानतळावर अशी सूचना स्थानिक भाषेत असलेले फलक कोणी लावले?कुणी पाहिले कसे नाही?हे कसे शक्य

झाले?हे जादू आहे की चमत्कार आहे?विज्ञानाची करामत आहे की परग्रहवासियांचे कारस्थान? दहशतवाद्यांचे

कृत्य तर असे असूच शकत नाही. ते फक्त मोडणे जाणतात. मग हे कृत्य कुणाचे?'' लाखो करोडो देशवासियांत तर्कवितर्क लढविले जात होते.

प्रशासन या फलकावर लक्ष देऊन होती. सर्वांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला होता. सामान्य जनता मात्र ही सूचना वाचण्यासाठी फलकाभोवती गर्दी करीत होती. हा हा म्हणता बातमी संपूर्ण विश्वात पसरली. अमेरिकेने भारताच्या संरक्षण मंत्र्याला दूरध्वनी करून या बद्दल विचारणा केली. मंत्री महोदयांनी याचे जमेल तसं उत्तर दिले. "लक्ष ठेवा. " असे अमेरिकेने सूचित केले आणि स्वतः ची सुरक्षा व्यवस्था कडक केली. तेथे चीन, जपान, इंग्लंड, फ्रान्स आदी देशांतही संरक्षण व्यवस्थेत वाढ करण्यात आली. फलकावरील सूचना चिंताजनक नव्हती. पण एका रात्रीत संपूर्ण देशात फलक लागला गेला कसा?ही चिंताजनक बाब होती.

हा दिवस खळबळजनक ठरला.

(३)

नवा ऊर्जा प्रवाह

काही दिवस शांत गेले. सूचना फलकावर काहीही बदल जाणवला नाही. संपूर्ण देशात कोणतीही अप्रिय घटनाही घडली नाही. जनता आणि शासन भ्रमात पडले होते. या सूचना फलकाचा अर्थ तरी काय घ्यायचा?हे कुणा माथेफिरूचे काम तर नव्हे?परंतु संपूर्ण देशात असे फलक होते. फलक अभेद्य, अक्षय होते. त्यामुळे हे माथेफिरूचे काम असणे शक्य नव्हते. याला दहशतवादी कारवाया म्हणावे तर तेही शक्य नव्हते. सूचना विधायक कार्याची होती. कल्याणाची होती. समस्या निवारण्याची होती. मग हे कार्य कुणाचे?उत्तर मिळत नव्हते.

विकृत मानसिकता असलेल्या लोकांनी मोठमोठे दगड मारून हे फलक तोडण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्यानेही ते तुटले नाही आणि पाच सप्टेंबरच्या शिक्षकदिनी फलकावरची सूचना बदललेली आढळली. ही सूचना देशभरातील गावातील सरपंचांना उद्देशून होती.

"सरपंच साहेब, नमस्कार! वीज भारनियमनाने तुम्ही हैराण झाला असाल. वेळी-अवेळी कधीही लाईट जाते. जनता अंधारात राहते. हे तुमच्याशी बघवत नसेल. तर एक काम करा. या वीज भारनियमनाच्या समस्येवर आम्ही शासनाच्या मदतीने ठोस आणि कायमस्वरूपी उपाय देत नाहीत, तोपर्यंत तुम्ही असे करा. एक वीजेची

तार आणा. त्याचे एक टोक या फलकाच्या प्लगमध्ये लावा. दुसरे टोक जवळच्या घरातील विद्युत परिपथाला जोडून घ्या. मग एकेक करत पुढे ही मालिका शेवटच्या घरापर्यंत जाऊ द्या. जेव्हा जेव्हा वीज वितरण कंपनीची वीज उपलब्ध नसेल ,तेव्हा तेव्हा यातून विद्युतपुरवठा तुमच्या संपूर्ण गावाला होत जाईल. गाव अखंड उजेडात राहील. अंधाराचा नाश व्हावा हीच आमची अपेक्षा आहे. जयहिंद!"

सूचना वाचून सातपूरच्या सरपंचाला प्रश्न पडला की आता काय करावे?सूचना तर चांगली होती. फायद्याची होती. पण घाई करण्यात फायदा नव्हता. त्याने सभासदांना याबाबत विचारणा केली. कुणी होकार दिला तर कुणी आशंका घेतली. निर्णय लागेना. शेवटी सरपंचाने वरील अधिका-यांकडे विचारणा केला. वरील अधिकारी भडकले ,"उगाच विषाची परीक्षा घेऊ नका. त्या फलकावर काहीही सूचना येवो, तेथे लक्ष देऊ नका. "

सरपंचाला काही बोलवेना.

त्याच दिवशी सायंकाळी सोसाट्याचा वारा सुटला. कोळीवाड्याच्या वेशीवर झाडे पडली. वीजवाहक तारा तुटून पडल्या. सातपूर गावाचा विद्युतपुरवठा खंडित झाला. सुमित एक तार घेऊन बाहेर पडला. इतर कोणी हे धाडस करणार नाही, हे त्याला ठाऊक होते. नाक्यावरच्या फलकाजवळ तो गेला. त्याने फलकाच्या प्लगमध्ये तार टाकली. दुसरे टोक जवळच्या घरातील परिपथाला जोडले आणि चमत्कार झाला. विद्युतप्रवाह सुरू झाला. क्षणात गाव उजेडात आला. आसपासच्या लोकांनी सुमितला धन्यवाद दिले . तुफानी

वादळवाऱ्यात जेथे आसपासची गावे अंधारात निपचित पडलेली होती, तेथे सातपूर गाव उजेडात न्हाऊन निघत होते.

या घटनेवर कोणाचाही विश्वास बसत नव्हता. ही बातमी गुप्त ठेवण्याचा प्रयत्न झाला. परंतु ही बातमी महाराष्ट्रभर पसरलीच. इतर ठिकाणच्या नागरिकांनीही फलकाला विद्युततारा जोडल्या. गावागावातील वीजेच्या लपंडावाची सुट्टी झाली. हा हा म्हणता संपूर्ण देशात हा प्रयोग सफल झाला. एवढेच नव्हे तर ज्या ज्या गावांत वीजपुरवठा नव्हता, तेथेही वीज गेली. विनामूल्य गेली. काही समाज सेवकांनी स्वखर्चातून तारा आणून खेडेगावात वीजपुरवठा करून दिला. देशभरातील छोटे छोटे पाडे उजळून निघाले. सामान्य गोरगरीब जनतेने त्या फलकवाल्यांना तोंडभरून आशीर्वाद दिला. आता खरे सुराज्य येणार याची प्रचिती सामान्य जनतेला येऊ लागली.

परंतु काहींनी या फलकांविरूद्ध शंका उपस्थित केली. "हे काय आहे याची पूर्ण शहानिशा झाल्याखेरीज ह्याला हात लावला येणार नाही. ही फलकाची वीज कशापासून तयार करतात हे आपल्याला ठाऊक नाही. कदाचित ही वीज आपल्याकरिता हानिकारक अशा पदार्थापासून आणि प्रक्रियेपासून बनविली जात असावी. शिवाय अशी फुकट वीज देऊन ते जे कुणी आहेत ते तुम्हांला गुलाम बनवतील याचे भय देखील आहे. "

पण काहींना हे पटले, काहींना पटले नाही.

गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी फलकावर सूचना आली. ती होतकरू तरुणांसाठी होती.

"आमच्या देशातील सर्व तरूण-तरूणींना नमस्कार. ज्यांच्याकडे रोजगार नाही, नोकरीधंदा नाही, ज्यांची देशासाठी काहीही करायची तयारी आहे, घाणीत हात घालायची तयारी आहे अशाच तरूण-तरूणींनी अर्ज करावेत. अर्जासोबत तुमचा बॅंकखाते क्रमांक द्यावे. तुम्हाला महिना वीस हजार रुपये वेतन मिळेल. तो तुमच्या बॅंक खात्यात जमा होईल. महिन्याला फक्त दहा-बारा दिवस काम असेल. देशासाठी आमच्याशी जोडले जा. अर्ज करा. फलकाच्या बाजूच्या पेटीत अर्ज टाका. व्यायाम करायला सुरुवात करा. भर उन्हात कष्ट करण्याची तयारी ठेवा. जयहिंद!"

सूचना तरूणांत उत्साह निर्माण करणारी होती. पगार तर पगार, सोबत देशसेवाही करता येणार होती. देशासाठी वाटेल ते करण्याची त्यांची तयारी होती, त्यांनी पटापट अर्ज केले. देशभरातून या आगळ्यावेगळ्या नोकरीकरिता भरभरून प्रतिसाद मिळाला.

कार्यशाळेत पत्रांचा हा ढिग पडलेला पाहून मानव आणि सुमितला हर्ष वाटला. "आपल्या देशात राष्ट्रासाठी कार्य करणाऱ्या तरूणांची कमतरता नाही. हे बघ, या काही अर्जात पगाराची अपेक्षाही केलेली नाही. मुंबई, पुणे, पटना, दिल्ली, जम्मू, अमृतसर, तिरुअनंतपुरम, चेन्नई, इंफाळ, कोलकाता, सुरत, भोपाळ, इटानगर, दार्जीलिंग, पहेलगाम इ. शहरी भागातून तसेच खेडेगावातूनही लाखो तरूण-तरूणींचे अर्ज कार्यशाळेत जमा झालेले आहेत." मानव हर्षभरित होऊन म्हणाला.

"पण या इतक्या प्रचंड संख्येने असलेल्या तरुणवर्गाला काम काय देणार?" सुमितने आशंका घेतली.

"भरपूर काम आहे आपल्याकडे. केवळ आपल्याच्याने एवढे भव्य कार्य होणार नाही. यासाठी लाखो हातांची आवश्यकता आहे. संपूर्ण देशात एकाच वेळी एकच कार्य हाती घ्यायचे. ते वेळेत पूर्ण करण्यासाठी ह्यांची गरज आहेच. "

"आता मला काय करायचे आहे?" सुमितने विचारले.

"तू आता तुझ्या घरातच सौरऊर्जेवर चालणाऱ्या विद्युतघटाच्या वितरणाचे काम सुरू कर. सौरसंकलक काचा इथून घेऊन जात जा. विद्युतघट सुद्धा इथूनच घे. सौरसंकलक बसविण्यासाठी लोखंडी आधारक ग्राहकांना बनवून घ्यायला सांग. कमी पैशात आपण हे सौरसंकलकाची विक्री करू. यातून येणारा पैसा या तरूणांचा पगार देण्यासाठी वापरता येईल. तुझा-माझा पगार सुद्धा यातूनच निघेल. " मानव माहिती देत होता.

सुमितला स्वतः बरोबर विश्वाच्या कल्याणाचे हे काम कधी सुरू करतो असे होऊन गेले. काळोख्या रात्रीच त्याने दहा सौरघट, संकलक काचा घरी आणून ठेवले. घरात सर्वांना योजना समजावून दिली. योजना सर्वांना पसंत पडली. पण तरीही शंका ही होतीच. चांगल्या कार्याला शंका या यायच्याच. वडिलांनी विचारले, "हे उपकरण रात्री आणि पावसाळ्यात कसे काम करेल?"

"बाबा, हे काय असेतसे उपकरण नाही. कित्येक वर्षाच्या मेहनतीने तज्ज्ञ लोकांनी बनविलेले उपकरण आहे हे. रात्रीच्या

चांदण्यांच्या उजेडातही सौरघट भरत जातो. पावसाळ्यात दिवसाचा उजेडच संपणार नाही. हे सौरघट भरायला सूर्य नव्हे तर सर्याची किरणे हवी आहेत. चंद्र नव्हे तर चंद्राची किरणे हवी आहेत. तारे नव्हे तर ता-यांचा उजेड हवा आहे. एवढेच नव्हे तर रात्री आपण घरात, बाहेर जे दिवे लावू, त्यावर सुद्धा हे सौरघट भरत जातील. आहे की नाही मजेदार फायदेशीर वस्तू!"

"होय रे. खूपच उपयुक्त वस्तू आहे ही. पण लोक विश्वास करतील?" वडिलांनी जनमताचा अंदाज वर्तविला.

"नक्कीच विश्वास करतील. हे उपकरण पहिले आपण बसवू. याची वीज पहिले आपण वापरू. नंतर लोक वापरायला सुरुवात करतील. झुंबड पडेल, नुसती झुंबड. आहात कुठे?" सुमित आशावाद व्यक्त करीत म्हणाला.

सुमितने कारखान्यातून सौरसंकलक घरावर बसविण्यासाठी लोखंडी जाळ्यांचा आधारक बनवून घेतला. अशा प्रकारचे आधारक फॅब्रिकेशन कारखानदार प्रथमच बनवित होता. त्याने याचा उपयोग विचारला.

"घरावर सौरसंकलक बसविण्यासाठी आहे. " पुढे सुमितने थोडक्यात सौरघटाचे वर्णन आणि उपयोग सांगितला. "आज मी हा एकच आधारक बनवून घेतला आहे. काही दिवसात पूर्ण गाव तुमच्याकडून असले आधारक बनवून घ्यायला येईल. तुम्हाला कामातून उसंत मिळणार नाही. "

"स्वप्ने दाखवू नकोस. तिही शेखचिल्लीची. असे कधी होईल का?मी सौर उपकरणे पाहिली नाहीत का? असे जर झाले तर मग देशाला वाहत्या पाण्यावर, कोळसा जाळून, नैसर्गिक वायू जाळून, अणुशक्ती वापरून वीज निर्माण करायलाच नको. सर्व विद्युत कंपन्या, विद्युतनिर्मिती केंद्रे, अणुशक्ती केंद्रे बंद करावी लागतील. लाखो लोक बेरोजगार होतील. " कारखानदार कुत्सितपणे म्हणाला.

"काका, या जगात, विश्वाच्या फायद्याची जी गोष्ट असते ना, ती पहिल्यांदा कुणालाही पटत नाही. असे काही सांगणारा जगाच्या दृष्टीने मूर्ख ठरतो. पण नंतर जगाला सत्याचा प्रत्यय येतोच. राहिली गोष्ट विद्युतकेंद्रे बंद झाल्यावर बेरोजगार होणाऱ्या लोकांची. त्यांच्याकरिता आमच्याकडे अनेक योजना आहेत. त्याही ठोस. भरपूर लाभ देणाऱ्या. पुढे हे सर्व शासनाच्या ताब्यात दिले जाईल. आमचे कार्य जरा वेगळ्या धाटणीचे आहे. खाजगी पातळीवर योजना कार्यान्वित करा आणि देशाला सूपूर्त करा. आपण लावलेल्या शोधाचा देशाच्या प्रत्येक नागरिकाला लाभ व्हायला हवा. या संस्थेचा उद्देशच तसा आहे.

देशाच्या विविध भागात शासकीय पातळीवर या पद्धतीने वीज निर्मिती केली जाणार आहे. या सर्व केंद्रावर हे सौरसंकलक आणि सौरविद्युतघट निर्मिती केली जाईल. कर्मचा-यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट सर्व कर्मचारी आणखी सुरक्षित होतील. त्यांची चिंता नको. पण ही केंद्रे बंद झाल्याने प्रदूषण कितीतरी पटीने कमी होईल, याचा विचार करा. हे सौरसंकलक कायमस्वरूपी वीचेचा स्त्रोत आहे. "

"बघू. "कारखानदाराने सुमितचे बोलणे हवेत उडवले. सुमितला त्याचा राग आला नाही.

सुमितने घराच्या एका कोपऱ्यावर आधारक बसविला. संकलक काचा त्यावर घट्ट बसविल्या. घराच्या आत एका फळीवर सौरघट बसविला. विद्युततारा आणून संकलक आणि घट जोडले. घटातून तार घरातील विद्यूतपरिमंडळाला जोडली. थोडा वेळ वाट पाहिली. हळूहळू घरातील दिवे पेटले. सुमितला आनंद गगनात मावेना. हे दृश्य बघायला सुमितचे शेजारी गर्दी करून गोळा झाले होते. त्यांनी 'याचि देही याचि डोळा' ही सौरऊर्जा पाहिली. तिचे कार्य पाहिले.

"आम्ही नक्की घेऊ हे सौरघट. फक्त दहा-पंधरा दिवस थांबा. " शेजारी असे म्हणून निघून गेले. हे दहा-पंधरा दिवस सौरघट दिवसरात्र कसे कार्य करते, हे बघण्यासाठी आहे, हे सुमितने जाणले. तो गप्प राहिला.

सातपूरच्या सरपंचाला आणि इतर सभासदांना सौरघटाचे महत्त्व पटले. त्यांनी पटापट स्वतः च्या घरावर सौरसंकलक आणि सौरघट बसवून घेतले. ही योजना संपूर्ण गावात जावी म्हणून एक विशेष ग्रामसभा आयोजित केली. सरपंचाने थोडक्यात सौरउर्जेचे स्वरूप आणि महत्त्व विशद केले. सुमित बोलायला उभी राहिला.

"आमची एक कार्यशाळा आहे. तेथे भारतातील तज्ज्ञ शास्त्रज्ञ कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या सर्वांची आर्थिक, सामाजिक, भौतिक, पर्यावरणीय ज्या काही समस्या आहेत, त्या दूर करण्याचा पण केलाय. ऊर्जा संकट ही आपल्या सर्वांची पहिली समस्या आहे. त्यावर सौर

ऊर्जा हाच एकमेव ठोस उपाय आहे. सौरशक्ती प्रचंड आहे. अक्षय आहे. आपण संपून जाऊ पण ती संपणार नाही. तीच ऊर्जेचा खरा स्त्रोत आहे. म्हणून या शास्त्रज्ञांनी सौर ऊर्जेवर आधारित हे उपकरण बनवले आहे. तिन्ही बाजूस मुख असलेले हे एक लोखंडी आधारक असते. ते घरावर बसवायचे. त्यावर ही काचेची तीन संकलक बसवायचे. आपल्या घरातील वीजेच्या वापरानुसार दोन-तीन घट बसवू शकतात. हे घट कोणत्याही प्रकारच्या उजेडात भरतात. याची किंमत फक्त दहा हजार रुपये आहे. गॅरंटी पाच वर्षे. टिकाऊ. वादळवारा या कशानेही खराब न होणारे हे उपकरण आहे. कृत्रिम नासधुसीचा थोडा धोका आहे. तुमच्या घरातील टिव्ही, फ्रिज, कॉम्प्युटर यापेक्षा स्वस्त आहे. मस्त आहे. पाच वर्षासाठी दहा हजार रुपये गुंतवणूक अतीशय फायद्याची आहे. वीजेचा खर्च नाही. वीजभारनियमन नाही. हवी तेवढी वापरा. कोणालाही वापरायला द्या. लाईटनिंग करा. वीज संपणार नाही. शॉक बसण्याचा धोका नाही. पूर्णपणे सुरक्षित आहे. आताच घ्या. पूर्ण देशात ह्याला मागणी आहे. अर्थात, ज्यांना हे उपकरण घेणे परवडणारे नाही,त्यांनी निराश होऊ नये. येणाऱ्या काळात विशाल प्रमाणात शासकीय पातळीवर अशा प्रकारे वीज उत्पादन केले जाईल. शासनाला तसे प्रकल्प आम्ही तयार करून देणार आहोत.

ज्याला सुमितचे म्हणणे पटले आणि ज्यांची दहा हजार रुपये खर्च करण्याची ऐपत होती, त्यांनी पटापट सौरघट खरेदी केले. ज्यांना नाही पटले, ते सुमितवर हसत राहिले. कमीत कमी वीस जणांनी

सौरघटासाठी नोंद केली. सुमितला हे पुरेसे होते. ही सुरूवात होती. एका ऊर्जेच्या क्रांतीची. अक्षय अशा ऊर्जेच्या क्रांतीची. दिवाळीपर्यंत पूर्ण सातपूर गाव सौर ऊर्जेने गजबजून गेले. गल्ली-गल्ली, रस्ते-रस्ते उजेडात आले. गावातून अंधार हद्दपार झाला. किनारपट्टीही उजळून निघाली. ग्रामपंचायतीने वाटेवाटेवर, किनाऱ्यावर, स्मशानात, बागेत, शाळेत, सर्वत्र दिव्यांची सोय केली. सातपूरात बहुतेकांनी सौरघट घेतल्याने प्रत्येक घराच्यावर सौर संकलक पॅनल दिसू लागले. गरीबांना सूचना फलकावाटे तात्पुरता स्वरूपात वीज देण्याची पंचायतीने सोय केली. काही महिन्यात सर्वांनाच अत्यल्प दरात वीज शासनातर्फे उपलब्ध होणार होतीच.

"आमच्या देशाची ऊर्जेची गरज अशी आपोआप भागवली जात असेल तर आम्हाला ते हवेच आहे. " असे उद्गार ऊर्जा मंत्र्याने काढले. अर्थातच या सर्वामागचे खरे सूत्रधार ते सात अज्ञात व्यक्तीच होते.

सुमित आपल्या प्रत्येक सौरघटाच्या विक्रीतून दोनशे रुपये कर दर महिन्याला सरकार दरबारी भरायचा. शासनाची तिजोरी भरू लागली. शासन निश्चिंत होते. शासनाला आता नव्याने पारंपारिक पद्धतीने ऊर्जा निर्माण करायची आवश्यकता राहणार नव्हती. शासन सुद्धा ह्या सौरघटाची विक्री करू लागले. देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळू लागला. प्रत्येक तालुक्यात शासनाची सौरघट विक्री केंद्रे उभी राहिली. सुमितच्या केंद्राकडून शासन हे सौरघट खरेदी करून जनतेला वितरित करू लागले. देश अल्पावधीतच अक्षय ऊर्जेच्या उजेडात येऊ लागला. पारंपरिक ऊर्जेचा वापर हळूहळू बंद होऊ लागला.

अणुभट्ट्या, औष्णिक ऊर्जा, जलविद्युत केंद्रे नव्याने उभारण्याचे संकट आता पूर्णपणे टळलेले होते. भारतसरकारला कळून चुकले होते की या विश्वात महासत्ताक बनायचे असेल तर ऊर्जेच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण व्हायला पाहिजे. अपारंपारिक ऊर्जास्त्रोतावर आत्मनिर्भर बनायला हवे. प्रत्येक घरात, प्रत्येक कारखान्यात, प्रत्येक शेतात, प्रत्येक वनात वीज जायला पाहिजे. सौर उर्जेच्या माध्यमातून ही वीज कानाकोपऱ्यात जाऊ लागली. ऊर्जा संकट टळू लागले. देश झगमगू लागले. .

(४)

रस्ता झाला चकाचक

देशाच्या प्रत्येक सूचनाफलकावर उत्साह वाढविणारी आणखी एक सूचना झळकू लागली.

“देशातील तमाम तरुणवर्गाला नमस्कार. देशासाठी वाटेल ते करायला सिद्ध असणाऱ्या ज्या ज्या युवकांनी-युवतींनी अर्ज केले आहेत, त्यांच्याकरिता ही सूचना आहे. काही दिवसांनी तुमच्या-आमच्या प्रमुख रस्त्यांवर रस्ते बांधणीचे साहित्य येऊन पडेल. आपल्याला आम्ही निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या देखरेखीखाली हे रस्ते पक्के बनविण्याचे कार्य करायचे आहे. कार्य एकाच वेळी सर्व ठिकाणी सुरू होईल. त्या दिवशी सर्व रस्ते वाहतुकीस बंद ठेवावे लागतील. दिनांक इथे जाहीर केली जाईल. तुम्ही कामासाठी तयार रहा. या ठिकाणी एक बाब लक्षात असू द्यावी की देशाची सेवा हे फक्त शासकीय काम नाही. त्यात प्रत्येक नागरिकाचा सहभागही तितकाच महत्त्वाचा आहे. म्हणून प्रातिनिधिक स्वरूपात आपण एकत्रितपणे काही रस्त्याची कामे करू. नंतरच्या काळात शासन नेहमीप्रमाणे हे कार्य करेल. जेथे शासनाला शक्य होणार नाही, तेथे आपले हात राबतील. ”

सूचना वाचून नागरिकांनी समाधान व्यक्त केले. आता तरी पक्के,स्वच्छ रस्ते बघायला मिळतील. त्यावर खड्डे नसणार. वाहने जास्त खडबड करणार नाहीत. या अपेक्षेने नागरिक खूश होते.

परंतु काहींना यात गौडबंगाल वाटू लागले. त्यांनी ओरड केली. “हे काय भलते सलते? कोणतरी उठतो. देशसेवेच्या नावाने काय काय करतो. सौर ऊर्जा काय आणतो, रस्ते बांधणीचे काम काय करतो. ”

अन्य काही मग त्यांना समजावित म्हणाले,”देशात एखादी गोष्ट सर्वांच्या भल्यासाठी होत असेल तर त्याला विरोध करू नये. उलट पूर्ण सहकार्य करावे. ”

सूचनाफलकावर सूचना आली.

“ देशाच्या सर्व नागरिकांनी हे समजून घ्यावे की आपल्या देशाला विश्वात महासत्ताक बनविण्यासाठी आम्ही हे विधायक कार्य करत आहोत. तुम्ही जाणताच की खराब सडकेमुळे देशाची प्रतिमा खराब होते आहे. आम्ही पन्नास वर्षे टिकणारे सडक बांधणार आहोत. शासनही याबाबत कटीबद्ध आहे. सर्वांनी आम्हाला सोबत करावे ही विनंती. या कार्यातून कोणाचेही काहीही नुकसान होणार नाही. प्रत्येक नागरिकाचा लाभ म्हणजे देशाची प्रगतीच नव्हे का? ही देशसेवा आहे. आपण देशासाठी मिळून काम करू या. ”

नंतर सूचनाफलकावर काहीही सूचना आली नाही परंतु सुमितला पत्र आले. पत्रात कामाची पूर्ण रूपरेखा विशद करण्यात आली होती. तालुक्यापासून ते सातपूर गावापर्यंत रस्ते बनविण्याचे साहित्य येऊन पडले. सातपूर गावातील गल्ली बोळ्यात तसेच मुख्य

वाटेवरही साहित्य येऊन पडले. एके दिवशी सुमितने सर्व तरूण-तरूणींची सभा घेतली. काम समजावून दिले.

दिवाळीच्या सात दिवसापूर्वी रात्रीच्या दहा वाजता सर्व तरूण-तरूणी तालुका ते सातपूरच्या वाटेवर उभी राहिले. फावडे घमेले घेतले. दोन्ही दिशेने रस्ता बंद करण्यात आला. सुमितने सूचना दिली. आसपासच्या विहिरीचे पाणी, त्यात खडी, रेती कालवून त्यात ‘ विश्वकल्याण’ संघटनेच्या वैज्ञानिकांनी बनवलेले विशिष्ट प्रकारचे रसायन मिसळले गेले. एका बाजूला रस्ता फोडण्याचे काम सुरू झाले तर दुसऱ्या बाजूने त्या रस्त्याचे नवीनीकरण सुरू झाले. वाटेवरचा उंचसखलपणा नष्ट करण्यात येऊ लागला. रस्त्याची रूंदी वाढविण्यात आली. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पावसाचे पाणी जमिनीत जाण्यासाठी वीस- वीस फूट खोल खड्डे करण्यात आले. हे खड्डे यंत्राद्वारे पाडण्यात आले. त्यावर त्वरीत लोखंडी झाकण ठेवले गेले. रस्त्याच्या मधोमध विभाजक करण्यात आला. तालुक्यात जेथे गटार रस्त्यावर वाहते, तेथे सांडपाण्याची व्यवस्था सुरळीत करण्यात आली. पदपथ सुधारण्यात आला. तरूण-तरूणी उत्साहाने काम करीत होते. त्यांच्यावर कुणी नियंत्रक नव्हता. कुणी सूचक नव्हता. खडी, रेती, पाणी, सिमेंट आणि रसायन योग्य रितीने मिसळून रस्ता बांधला जात होता. एक तरुण व्यक्ती एक यंत्र घेऊन पाण्याच्या निचऱ्यासाठी खड्डे पाडण्याचे काम करत होता.

प्रचंड गतीने हे काम सुरू झाले. शेकडो हात सौर ऊर्जेच्या उजेडात खपत होते. पंधरा ते वीस दगडदाबक यंत्र स्वतः शासनाने

पुरवलेले. त्यात रसायन मिसळल्याने ती दगडं चांगल्या प्रकारे दाबली गेली होती. कितीही अवजड वाहन त्यावरून गेले किंवा पुराचे जोरदार पाणी त्यावरून गेले तरी ती दगडं न एका बाजूला दाबली जाणार होती न वाहून जाणार होती. त्या रसायनामुळे सर्व दगडी सांधले जाऊन एकसंध होणार होते. त्यामुळे रस्ता कमीत कमी पन्नास वर्षे तरी टिकण्याची शाश्वती निर्माण झाली होती.

रात्री तीन वाजता काम संपले. उरलेले साहित्य उचलून सातपूर गावात नेले गेले. तेथेही हे काम हाती घेतले जाणार होते. काही तरुण पंचवीस पंचवीस फूटावर पहारा देत उभे राहिले. कोणी नुकताच बनवलेला रस्ता खराब करू नये म्हणून ही खबरदारी होती. सकाळी सहा वाजता रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. त्या वाटेवरून जाताना वाहनचालकांना विदेशात आल्यासारखे वाटू लागले. रेडिअमचे पट्टे, सूचनाफलक, विभाजक, मुलायम रस्ते, वळणावर, शाळेजवळ गतिरोध, रस्त्याच्या दोन्ही बाजूला सायकल स्वारांसाठी छोटीशी वेगळी मार्गिका, त्याला लागूनच पदपथ. सर्व कसे कल्पनातीत होते. गावातून तालुक्याला वाहनाने जा, सायकल घेऊन जा किंवा पायी जा, सुरक्षितपणे ये-जा करता येऊ शकणार होते. विभाजनामुळे ओव्हरटेक जवळजवळ बंद झाला होता. एकमेकांच्या मागूनच गाड्या जातील अशी रस्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.

हेच कार्य पूर्ण देशात सुरू झाले. थोडे विश्वकल्याणतर्फे तर बाकी शासनामार्फत. खेडोपाडीचे रस्ते झगमगू लागले. दुर्गम भागात रस्ते तयार होऊ लागले. खेडी एकमेकांना आणि तालुक्याला,

जिल्ह्याला जोडली जाऊ लागली. पूरग्रस्त भागात,डोंगराळ भागात, जेथे रस्त्यांची दुरवस्था असते, तेथे आणखी जोर देऊन रस्ते बनविले जाऊ लागले. रस्त्यावरून एक वेळ पाणी जाईल पण रस्ता वाहून जाणार नाही. डोंगराळ भागात भूस्खलनाने रस्ता कोसळणार नाही याची पूर्ण दक्षता घेतली जाऊ लागली.

(५)

प्रामाणिक युग

एकीकडे अक्षय ऊर्जा म्हणून सौर ऊर्जेचा वापर देशभरात मोठ्या प्रमाणात होऊ लागला होता. दुसरीकडे शहर, गाव, खेडे, रानवाटा, नदी, खाडीवरील पूल या सर्व ठिकाणचे रस्ते मजबूत आणि टिकाऊ झाले होते. यामुळे सुमित आणि मंडळी प्रसिद्धी झोतात आली होती. या सर्व घडामोडीमागे खरे सात अज्ञात सूत्रधार तर देशभरात चर्चेचा विषय झाले होते. गरीब-श्रीमंत सर्वांच्या मुखातून त्यांच्यासाठी स्तुतीसुमने निघत होती.

“हेच खरे दान! याला म्हणतात दान. हीच खरी सेवा. जनसेवा हीच ईश्वरसेवा. जनतेच्या रूपातील माणसातल्या देवाची सेवा करणे हेच खरे श्रेष्ठ दान. ही माणसे नव्हे, ईश्वर आहेत. ” असे देशभरात त्या सात अज्ञात व्यक्तींबद्दल बोलणे जाऊ लागले.

अर्थातच या चांगल्या घडामोडीची वाईट प्रतिक्रियाही उमटू लागली. रस्ते बांधणीचे काम घेणारे कंत्राटदार, वीजनिर्मिती करणाऱ्या खाजगी कंपन्या यांचे मात्र नुकसान झाले होते. कमिशनखोरी बंद झाली होती. त्यामुळे यांचा विश्वकल्याणवाल्यांवर रोष होता. पण ते आता काहीही करू शकत नव्हते. शासनाचा पूर्ण पाठिंबा विश्वकल्याणवाल्यांना आहे म्हटल्यावर बाकी काय करणार?

“देशभरात गेल्या तीन-चार महिन्यात सौर ऊर्जा उपकरणांचा खप प्रचंड वाढला आहे. रस्ते टकाटक झाले. आम्ही काय करायचे?कटोरा घेऊन भीक मागायची का आम्ही?” त्यांच्या चर्चेत असा राग व्यक्त होऊ लागला.

“पूर्ण शासन त्या सात अज्ञात लोकांच्या बाजूला आहे म्हटल्यावर आपण तरी काय करू शकतो?. त्या सात अज्ञात लोकांचे नेटवर्क खूप बळकट आहे. यांनी देशाच्या तिजोरीत दोन हजार करोड रुपये भरले. इंकमटॅक्सपेक्षा कित्येक पटीने जास्त. ” चर्चेत दुसरा थोडे खेद प्रकट करीत माहिती देत म्हणाला.

“अरे, देशाची तिजोरी भरली. पण आपल्या तिजोरीचे काय? ती भरायची बंद झाली आहे. ” तिसरा रोष दाखवित म्हणाला.

“ आपली तिजोरी भरण्याचे थांबले नाही पाहिजे. काहीही करा. आमिषे दाखवा पण मुख्य मुख्य लोकांना आपल्या बाजूला वळवून घेता येईल तर बघा. ” चौथा उपाय सूचवित म्हणाला.

“शक्य नाही. सध्याची वेळ प्रामाणिक जणांसाठी अनुकूल आहे. आपण शांत राहून उत्पन्नाचे इतर मार्ग अवलंबल्या पाहिजे. ” आणखी एकजण सुज्ञपणाचे विचार मांडत म्हणाला.

सर्वांना तो पटला देखील.

काही दिवसांनी संसदेत एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. संरक्षणमंत्री रशिद शेख यांनी एक ऐतिहासिक घोषणा केली. “मला या संसदेला आणि तमाम देशवासीयांना सांगताना आनंद होतो आहे

की भारत सरकारने आपली संरक्षण यंत्रणा मजबूत करण्याचा निर्णय घेतला आहे. हा असा निर्णय आहे की ज्यात एका दगडात अनेक पक्षी मारले जातील. हा बहुउद्देशीय निर्णय आहे. सर्वप्रथम देशातील सर्वच्या सर्व बेरोजगार तरुणांना फौजेत दाखल केले जाईल. त्यांना वेतन आणि इतर सर्व सुविधा दिल्या जातील. सैनिकी प्रशिक्षणासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात येईल. शस्त्रास्त्र निर्मितीचे दोन अत्याधुनिक कारखाने उभी करण्यात येतील. त्या ठिकाणी एकाहून एक शस्त्रास्त्र निर्मिती केली जाईल. परदेशातून शस्त्रास्त्रे खरेदी केली जाणार नाही. याबाबत आपण आत्मनिर्भर बनू. प्रत्येक शंभर किलोमीटरला एक सैनिकी तळ असेल. प्रत्येक दहा किलोमीटरला दोन सैनिक आळीपाळीने तैनात असतील. महामार्ग, सागरीमार्ग, नद्या, सागर, जंगल, गाव, खेडी, शहर या प्रत्येक ठिकाणी पाच- पाच किलोमीटरला सैनिक चोवीस तास पहारा देत राहतील. त्यांच्या सोबत पोलीसयंत्रणाही कार्यरत असेल. देशाची सर्व सीमा सैनिकी पहाऱ्याने आणि अत्याधुनिक यंत्रणेने बंदिस्त केला जाईल. आता बस झाले. एकही दहशतवादी भारताच्या सीमेत प्रवेश करू शकणार नाही. अंतर्गत देशद्रोही देखील शोधून काढून ठेचून काढण्यात येईल. ”

संरक्षण मंत्र्यांच्या या वक्तव्यावर संसदेत टाळ्या पडल्या. पण विरोधी पक्षाच्या एका मंत्राने आशंका घेतली. “निर्णय तर उत्तम आहे. पण या करिता पैसा कोठून आणणार, सरकार?”

“हा पैसा ते सात अज्ञात लोक देणार आहेत. त्यांना सौरघट देशाविदेशात विक्री करून भरपूर पैसा मिळतो. तो ते संरक्षण यंत्रणा मजबूत करण्यासाठी देणार आहेत. ” संरक्षण मंत्र्याने उत्तर दिले.

“ही सात लोक उत्पन्न कर देतात की नाही?” पुन्हा एक आशंका आली.

“पूर्ण कर भरतात ते. गेल्या सहा महिन्यात त्यांनी पंचवीस हजार करोड रुपये कर भरला आहे. शिवाय त्यांचा सगळा पैसा ते संरक्षण कार्यासाठी देणार आहेत. ” अर्थमंत्री शिवनारायण यांनी स्पष्ट केले.

“पण अशाने आपल्या अर्थव्यवस्थेवरील परिणाम तर नाही ना होणार?” आणखी एक आशंका एका विरोधी पक्ष नेत्याने घेतली.

“नाही. आपल्या अर्थव्यवस्थेवर ह्याचा काडीचाही परिणाम होणार नाही. झालाच परिणाम तर अर्थव्यवस्था मजबूत होईल. ” अर्थमंत्री म्हणाले.

पुढे प्रधानमंत्री बोलण्यास उभे राहिले.

“मी यासोबत आणखी एक घोषणा करू इच्छितो. आपल्या देशाचा जेवढा काळा पैसा विदेशात आहे, तो परत भारतात आणला जाईल. या संदर्भात प्रक्रिया सुरू झाली आहे. सर्व विदेशी बँकांना पत्र पाठविले आहे. काही बँकांनी पैसे परत करण्याचे मान्य केले आहे. इतर बँकांचे मन वळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. हा सर्व पैसा भारतातील गरीबांसाठी खर्च केला जाईल. प्रत्येक गरीबाला एक छोटे घर, शिक्षण, आरोग्य, रोजगार यांची सोय दिली जाईल. जे तरूण

सैन्यात भरती होऊ शकत नाही त्यांच्या रोजगारासाठी हा पैसा लावला जाईल. ”

प्रधानमंत्र्यांच्या या वक्तव्यावर प्रचंड टाळ्या पडल्या.

“पण महोदय, सैन्य भरती सक्तीची करावी. अन्यथा चैनीची सवय झालेले तरूण सैन्यात भरती होणार नाहीत. विदेशी पैशाची वाट पाहत बसतील. ” एका मंत्र्याने शंका उपस्थित केली.

“आपले म्हणणे बरोबर आहे. पण मला आपल्या देशाच्या तरूणावर विश्वास आहे. ते देशसेवेसाठी सैन्यात नक्कीच भरती होतील. त्यांच्यावर सक्ती करण्याची आवश्यकता नाही. भारतीय तरूण काही लेचेपेचे नाहीत. ”

प्रधानमंत्र्यांच्या स्पष्टीकरणावर संसदेने समाधान व्यक्त केले. आता या देशात खऱ्या अर्थाने काहीतरी विधायक घडायला सुरूवात झालीय असे वाटू लागले. आता भारताला महासत्ताक बनण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. अमेरिका दबाव टाकण्याचा प्रयत्न करेल. पाकिस्तान, चीन वळवळ करतील. त्यांचापण उपाय आहे भारताकडे.

आता मात्र सैन्यबळ वाढवण्यावरून आंतरराष्ट्रीय दबाव येईल त्याचा सामना देश कसा करेल हे पाहणे बाकी होते.

(६)

आदर्श प्रतिज्ञा

पुढच्याच दिवशी देशभरातील बसस्थानके,रेल्वे स्थानके, विमानतळे, बाजार, मॉल येथील फलकांवर सूचना झळकली. “तमाम देशबांधवांना जयहिंद! ही सूचना आहे सर्व तरुणांसाठी. देशाकरिता काहीतरी करू इच्छिणा-यांसाठी. आजच जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन सैन्यदलात भरती व्हा. देशाची सेवा करा. तुम्हाला तुमच्या बँक खात्यात वीस हजार रुपये वेतन जमा केले जाईल. इतर सोयीसुविधाही दिल्या जातील. पगारवाढही मिळेल. आर्थिक बाजूची काळजी करू नका. देशाचा विचार करा. देशाचे रक्षक बना. सैनिक व्हा. बेरोजगार आणि अकृतिशील राहू नका. कुणाचेही गुलाम होऊ नका. देशाचे सेवक व्हा. खालील प्रतिज्ञा सर्वांनी म्हणा.

प्रतिज्ञा

हे भारतभूमी,

मी तुझा एक सच्चा नागरिक, स्वमस्तकावर हस्त ठेऊन जाणीवपूर्वक अशी प्रतिज्ञा करतो की मी या क्षणापासून तुला विश्वात महासत्ताक राष्ट्र बनविण्याचा ध्यास घेऊन त्या दृष्टीने प्रत्येक क्षण वेचिन. मला जाणीव आहे की मी कुणी नेता-अभिनेता नव्हे. मी कुणी उद्योगपती अथवा समाजसेवक नव्हे. नसे मी सर्वसामान्य. मी नसे महात्मा. मी फक्त आहे या तुझा, अर्थात, भारतभूचा नागरिक. देशाचा

विकास म्हणजे माझा विकास. म्हणून जे जे काही मला माझ्या देशात नको आहे, ते ते मी माझ्या जीवनातून काढून टाकीन. मी स्वतः भ्रष्टाचार करणार नाही. लबाडी करणार नाही. हेराफेरी करणार नाही. माझ्या देशवासियांची फसवणूक होईल अशा कोणत्याही वस्तू अथवा सेवेची विक्री करणार नाही. अंधश्रद्धेला मूठमाती देऊन विज्ञानाची कास धरीन. माझ्या आणि माझ्या देशवासियांच्या आरोग्याला घातक ठरणाऱ्या कोणत्याही वस्तूचे उत्पादन अथवा वापर करणार नाही. मी प्रदूषण करणार नाही. पर्यावरण बिघडवणार नाही. घाण करणार नाही. माझ्या देशाच्या विकासाच्या आड जे जे काही येते ते ते मी करणार नाही. इतरांनाही करू देणार नाही. या क्षणापासून विशुद्ध ज्ञान हीच माझी देवता असेल तर मानवता हा माझा धर्म असेल. कर्तव्य हीच माझी उपासना असेल. राष्ट्रगीत हाच माझा मंत्र असेल. विषारी सापांना ठेचून काढणे हीच माझी विदेश तथा अंतर्गत नीती असेल. राजकारण, समाजकारण, अध्याय, शिक्षण, आरोग्य हा माझा धंदा नसेल तर सेवा असेल. माझा कोणी शत्रू नसेल. माझे सर्वच मित्र असतील. असेलच शत्रू तर मानवतेचे शत्रू तेच माझे शत्रू असतील. सत्तेचे, संपत्तीचे, उत्पादनाचे, वितरणाचे, विकासाचे, उपभोगाचे विकेंद्रीकरण तसेच दारिद्र्याचे उच्चाटन हीच माझी अर्थनीती असेल. हजारो वर्षांपासून भारतमातेच्या देहात शिरलेले जात, धर्म, पंथ, स्वार्थांधता, धर्मांधता यांचे विषाणू भारतमातेला पोखरत आहेत. त्यांचा बंदोबस्त प्रेम आणि मानवतेच्या माध्यमातून मी नक्कीच करीन. मी कोणाचा गुलाम नसेल. केवळ भारतमातेचा सेवक असेल.

देशाविदेशात माझा असा धाक बसवेन की कुणीही वाकड्या नजरेने माझ्या भारतमातेकडे बघण्याची हिंमत करणार नाही. माझ्या प्रत्येक वाक्याची सुरूवात 'जयहिंद'असेल. प्रत्येक सकाळची सुरूवात 'जयहिंद'असेल. प्रत्येक झोपेचा आरंभ 'जयहिंद'असेल. प्रत्येक कामाची सुरुवात 'जयहिंद'असेल. भारतमाते, तुला कोटी कोटी प्रणाम. जयहिंद! जयहिंद!!जयहिंद!!!

आई फक्त तुझेच मूल

भारतीय

ही प्रतिज्ञा सर्व भारतीयांना आवडली. सर्वांनी ती वहीत लिहून घेतली. तरूण-तरूणी सैन्यात भरती होण्यासाठी रांगा लावून राहिले. तरूणांना तालुका पातळीवर सैनिक शिक्षण देण्याला सुरूवात झाली.

विदेशमंत्री परदेशातला पैसा भारतात आणण्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावून झटू लागले. सरकारच्या या दोन निर्णयाचा जनतेने मनापासून स्वागत केले. देशाच्या सुरक्षिततेला महत्त्व तर द्यायचेच होते तर दुसऱ्या बाजूला देशातील बेरोजगारी दूर करायची होती. एका योजनेत दोन उद्देश सफल होणार तर परदेशी बँकात असलेल्या भारतीय पैशातून दारिद्रय निर्मूलनाची सरकारची योजना सर्वांनी शिरोधार्य उचलली. ही बाब आंतरराष्ट्रीय पातळीवर लपली गेली नाही. विशेषतः जंबो सैन्यभरतीचा भारताने घेतलेला निर्णय पाकिस्तान, बांगलादेश, चीन करिता पोटदुखी ठरला. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरून या निर्णयावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेनेही याबाबत जाब विचारला. यावर विदेशमंत्र्यांनी मार्मिक

उत्तर दिले. “हा आमचा अंतर्गत तसेच सीमा सुरक्षिततेचा प्रश्न आहे. त्या दृष्टीकोनातून हे लष्करी सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न आहे. आम्ही शस्त्रास्त्र निर्मिती सध्या तरी करीत नाहीत. सीमेपलीकडून होणारी घुसखोरी, तस्करी रोखून दहशतवाद्यांचा कायमचा बंदोबस्त करणे हा आमचा उद्देश आहे. आम्हाला कोण्या देशावर हल्ला करायचा नाही किंवा कुरापत काढायची नाही. म्हणून आम्ही ना नाटोचे सदस्यत्व स्वीकारले ना सेस्टोचे. आम्ही स्वातंत्र्यापासून अलिप्ततावादी आहोत. आम्ही भारतीयांनी गेल्या एक लाख वर्षात कोणत्याही देशावर हल्ला केलेला नाही. कोणताही प्रदेश बळकावलेला नाही. तेव्हा आमच्या शेजा-यांनी याबाबत निश्चिंत रहावे. ”

या उत्तराने चीन, पाकिस्तान, बांगलादेश या देशांचे समाधान झाले नाही. भारताने आपले लष्करी सामर्थ्य वाढवू नये म्हणून अमेरिकेच्या खांद्यावरून हे दोन्ही देश बंदूक चालवू पाहत होते. अमेरिकेने भारतावर दबाव टाकायला सुरूवात केली. भारत मात्र त्यांच्या पुढ्यात झुकला नाही. अमेरिकेने आंतरराष्ट्रीय समूहापुढे भारताशी असहकार करण्याचे आवाहन केले. इतर देशांनी या आवाहनाला फारसा प्रतिसाद दिला नाही.

“सीमेची रक्षा करणे हे प्रत्येक देशाचे कर्तव्य असते. भारत तेच करीत आहे. भारत कधीही शेजारील राष्ट्रावर विनाकारण हल्ला करणार नाही. तेव्हा चीन, पाकिस्तान आणि बांग्लादेशने गप्प राहणेच श्रेयस्कर आहे. यामुळे चीनची कुरघोडी कमी होईल आणि पाकिस्तान, बांगलादेश या देशांचा भारतात घुसखोरी करण्याचा, दहशतवाद्यांचा

मार्ग बंद होईल म्हणून यांची तडफड चालू आहे असे म्हणावे का आम्ही?" आंतरराष्ट्रीय समूहांनी आपले सडेतोड समर्थन भारताला दिले. भारताची बाजू मजबूत झाली. पाकिस्तान, चीन, बांगलादेश हे चर्फडत राहिले. अमेरिकाही दबकून राहिली. आंतरराष्ट्रीय समूहापुढे आपला दबदबा कमी होईल असे भय अमेरिकेला वाटू लागले. भारत महासत्ताक बनण्याच्या दिशेने वाटचाल करू लागले आहे. हे असेच चालले तर आपले महत्त्व कमी होईल अशी चिंता अमेरिकेला वाटू लागली.

(७)

अवकाश यात्रा

जानेवारीत थंडीचा जोर वाढला आणि सातपूर गावातील सूचना फलकावर एक सूचना दिसून आली. “फक्त ५०००/₹ भरा आणि अवकाशयात्रा करा. अधिक माहितीसाठी तुमच्या गावाच्या प्रतिनिधी सुमितशी संपर्क साधा. ”

गावातील बरीच लोकं अवकाशयात्रा करायला उत्सुक होती. त्यांना ब्रह्मांड काय आहे? ते कसे दिसते? हे जाणून घ्यायची जिज्ञासा उत्पन्न झाली. ज्यांना जमले त्यांनी त्वरित सुमितला गाठले. ५०००/₹ भरले. हा अवकाशयात्रेचा प्रवास कसा होईल याचा खुलासा मागितला. सुमित स्पष्ट करीत म्हणाला, “आमच्या कार्यशाळेत एक असे यान तयार करण्यात आले आहे की ज्यात कोणताही जीव काही क्षण बसला तरी त्याची निर्वातात किंवा इतर वातावरणात सुद्धा काही काळ जगण्याची क्षमता प्राप्त करतो. या यानाची गती आहे मिनिटाला ४२००किलोमीटर. हे यान आपल्या सूर्यमालेतील सर्व ग्रहावर तर जाईलच, परंतु आपल्या आकाशगंगेत आणि शेजारच्या अन्ड्रामेंडा आकाशगंगेत ही विचरण करू शकेल. याचा फायदा असा होईल की आपल्याला विश्वाची रहस्ये उलगडू लागतील. इतर ग्रहावर सजीवसृष्टी आहे का? याचा शोध घेता येईल. शिवाय विश्वाचे अफाट सामर्थ्य जाणून घेता येईल. या मोहिमेचा उद्देश एकच आहे की मनुष्याने अंधश्रद्धा सोडून विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारावा. दैववाद सोडून

द्यावा. सृष्टीचे नियम ओळखावेत. निसर्गाचा चमत्कार पहावा. या अफाट ब्रम्हांडाच्या तुलनेत आपण किती शुद्र आहोत हे कळेल. मी श्रेष्ठ की तो श्रेष्ठ हा वाद राहणार नाही. ”

ठरल्याप्रमाणे २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनी रात्री दहाच्या पूर्वीच समुद्र काठचे मैदान लोकांनी भरून गेले. मैदानाच्या मोकळ्या भागात यान उभे होते. यानाच्या तळाची बाजू वगळता इतर बाजूला शक्तिशाली काचा होत्या. पारदर्शक काचेमुळे आतून बाहेरचे तर बाहेरून आतले दृश्य दिसत होते. यानाचा आकार एखाद्या पैलू पाडलेल्या हिऱ्यासारख्या होता. आत पन्नास माणसे बसण्याची आसनक्षमता होती. सुमित हे यान दोन दिवसांपूर्वी कुणाच्याही नकळत घेऊन आला होता. हा क्षण टिपण्यासाठी वेगवेगळ्या वाहिन्यांचे पत्रकार, छायाचित्रकार आपापले कॅमेरे घेऊन सज्ज होते. दूरदर्शनवर हा क्षण चालू (लाईव्ह) दाखविला जात होता.

दहा वाजले आणि सुमित पुढे सरसावला. त्याने यानाजवळचे एक कळ (बटण) दाबली. त्याबरोबर दार उघडले गेले. बाजूच्या काचेच्या पडद्यावर त्याने हाताच्या पंजाची ओळख दिली. दारात उभे राहून त्याने सूचना केली.

“ज्यांची आजच्या प्रवासासाठी निवड झाली आहे, त्यांनी रांगेत यावे. या काचेवर आपले हात ठेवून ओळख द्यावी आणि यानात बसावे. ”

सूचनेबरहूकूम उत्सुक प्रवासी आपली ओळख देऊन यानात जाऊन बसू लागले. पन्नास प्रवासी बसून झाल्यावर सुमित उपस्थित

गर्दीला म्हणाला, “ मित्रांनो, आता आम्ही अवकाशयात्रेला निघतो. चंद्रावर आणि मंगळावर जायचे आहे. पहाटेपर्यंत परतू आम्ही. ”

सुमित आत जाताच यानाचे दार बंद झाले. सुमित चालकाच्या आसनावर स्थानापन्न झाला. पुढच्या काही क्षणात इंजिन सुरु झाले. हळूहळू आकाशाकडे झेपावले. क्षणात ते आकाशात उडाले. यानात सर्वत्र आत-बाहेर कॅमेरे बसवलेले होते. त्यांची जोडणी वाहिन्यांशी केलेली होती. त्यामुळे घरबसल्या केबलवर यानाच्या आत-बाहेरच्या हालचाली दिसू लागल्या.

यान दिसेनासे झाले. गर्दी आपापल्या घरी पांगली. घरात घोंगडी घेऊन मस्तपैकी यानाच्या हालचाली दूरदर्शनच्या पडद्यावर पाहू लागले. यान अनंत अशा काळ्याकभिन्न अशा अवकाशात चंद्राच्या दिशेने झेपावत होते.

आणि जवळपास दीड तासात चंद्र जवळ आला. २,८४०००किमी अंतर यानाने ८० मिनिटांत पार केले. चंद्राच्या पृष्ठभागावरील पर्वत, पठारे, जमीन दिसू लागले. यानाने चांद्रभूमीवर यशस्वीपणे उतरण केले.

यानाच्या प्रकाशात चांद्रभूमी तेजस्वीपणे चकाकू लागली. दार उघडून सुमित आणि आकाशयात्री चांद्रभूमीवर अवतरीत झाले. चालताना शरीर हलके होऊन हवेत उडत असल्याचा त्यांना अनुभव येऊ लागला. ते जवळच्या पर्वताकडे निघालेच होते की त्यांना तेथे काही अंतरावर मानवाची पाऊले दिसली. याबरोबर एकाने विचारले,

“इथे चंद्रावर मानव नाही. मग ही पाऊले यापूर्वी इथे येऊन गेलेल्या मानवाचीच आहेत ना? “

“होय. ही नील आर्मस्ट्रॉंग आणि एडविन बझ आल्ड्रिन यांची पाऊले आहेत ती. २६ जुलै १९६९ रोजी ते चंद्रावर ते चंद्रावर आले होते. तसेच इतर अवकाशयात्री येथे येऊन गेले. त्यांचीही पाऊले आहेत. तसेच अमेरिका, रशिया, चीन यांच्या चांद्रमोहिमा झाल्या आहेत. आपल्या प्रिय भारताच्या मोहिमाही इथे राबवल्या गेल्यात. आपले एक चांद्रयान तर या चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर आहे. इथे हवा नसल्याने त्यांच्या पाऊलखुणा जसेच्या तसे आहेत. राहू द्या तशीच ती. मानवाच्या एका फार मोठ्या यशाची ती गमक आहेत. ती पुसता कामा नये. ”

सर्वांनी आपापल्या भ्रमणध्वनीवर त्या पावलांचे छायाचित्रे घेतली. सर्व प्रवासी मनसोक्तपणे चांद्रभूमीवर फिरू लागले. चंद्राच्या क्षितिजावर निळीशार पृथ्वी उडवताना दिसू लागली. कुणीतरी उत्साहाने ओरडले, “ती बघा पृथ्वी. आपली पृथ्वी. ”

“ती पृथ्वी आहे?” एकाने विचारले.

“होय. ती पृथ्वी आहे. आपण राहतो ती पृथ्वी. किती छान दिसते नाही?”

जिज्ञासूंनी पाश्वभूमीवर पृथ्वी दिसेल असे स्वतः चे छायाचित्रे काढून घेतली.

“अरे सुमित, इथे हवा नाही. मग आपण जीवंत कसे?शिवाय आपला आवाज एकमेकांना कसा ऐकू येतो?” एका यात्रीने उचित असा प्रश्न विचारला.

“यानात बसल्याने आपल्या शरीराला काही काळ निर्वातात राहण्याची क्षमता प्राप्त झाली आहे हे मी निघतानाच सांगितले होते. शिवाय आपण यानाच्या गुरुत्वाकर्षणाच्या कवेत असल्याने त्याचा प्रभाव आपल्यावरील पडतो आहे. या यानाची रचनाच तशी करण्यात आली आहे. म्हणून आपण एकमेकांना ऐकू शकतो. ” सुमितने स्पष्ट केले.

सर्व अवकाशयात्री समोरच्या पृथ्वीकडे बघू लागले. आपली पृथ्वी. एकमेव पृथ्वी. किती छान दिसतेय.

“चला निघू या. पटापट यानात बसा. आपल्याला आता मंगळावर जायचे आहे. ” सुमितने सूचना दिल्याबरोबर प्रवासी यानात जाऊन बसले. यान मंगळाच्या दिशेने झेपावले.

चौफेर दाट अंधारातून वाट काढीत यान मंगळाच्या दिशेने जाऊ लागले. यान निर्वात कापत निघाले. समोरचा लालसर ठिपका हळूहळू विशाल होताना दिसू लागला. वीस तासांच्या प्रवासाने यान मंगळावर पोहचले. यावेळी मंगळ पृथ्वीच्या जवळ असल्याने हे चंद्र ते मंगळ ५. ५६ कोटी किमी अंतर एवढ्या कमी वेळात पार करता आले. एक भला मोठा लालसर फुगा हवा भरल्यामुळे फुगला जावा तसे मंगळभूमी जवळ येताना वाटू लागले. लालभडक धुरांच्या ढगांतून यान मंगळभूमीवर अवतरीत झाले.

सर्वत्र अंधार दाटलेला. वर आकाश चांदण्यांनी भरून गेलेले. प्रवासी सुमितच्या मागे मंगळावर फिरू लागले. मंगळभूमी हुबेहूब पृथ्वीसारखीच होती. तेथील माती, खडक, डोंगर. एकसारखे. काहीही फरक नाही. फरक होता तो वनस्पतीचा. झाडे सदृश जीव दिसत होते पण ती झाडे नव्हती.

प्रवासी समोरच्या छोट्याशा टेकडीवर निघाले. वाटेत त्यांना एक छोटेसे यान दिसले.

"सुमित, हे काय आहे रे?"एकाने विचारले.

" हे पाथफाइंडर. नासाने १९९७ साली पृथ्वीवरून या मंगळावर पाठविलेले होते. चांगली कामगिरी बजावली याने. बरे झाले सापडला. जाताना हे आपण पृथ्वीवर घेऊन जाऊ. आठवण म्हणून. तसे क्यरिऑसिटी आणि इतर रोवरही इथे असतील. "

सुमितसह प्रवासी जवळच्या छोट्याशा टेकडीवर चढले. टेकडीच्या पलीकडे काहीशा अंतरावर सपाट मैदानात मानवसदृश वस्ती दिसली.

"सुमित ते काय आहे रे?" एकाने विचारले.

"ती इथल्या मानवाची वस्ती आहे. " सुमितने रहस्याचा स्फोट केला.

मानवाची वस्ती? आपल्या सारखेच मानव आहेत तेथे?" सर्वांच्या तोंडून आश्चर्यकारक उद्गार निघाले.

"हो तर. ती आपल्या सारख्याच मानवाची वस्ती आहे. " सुमितने दुजोरा दिला.

“मग हे एवढे रोवर इथे आले. छोटा हेलिकॉप्टर इथे उडवला गेला. त्यांना का दिसली नाही ही वस्ती?” एकाने रास्त प्रश्न विचारला.

“कारण ते सर्व निर्जन आणि दुर्गम भागात उतरले होते. बघा या भागात इतर रोवर दिसतात का? आपल्याला दिसलेला रोवर डोंगराच्या पायथ्याशी आहे. ते हे डोंगर ओलांडून इथे येऊ शकले नाही. म्हणून त्यांना ही वस्ती दिसलेली नसावी. आमच्या संस्थेच्या अवकाशस्थ प्रयोगशाळेने ही वस्ती आधीच शोधून काढली होती. त्याची संपूर्ण सेटिंग या यानात केली आहे. म्हणून आपण इथवर पोहोचलो आहोत. ” मानवाच्या या स्पष्टीकरणाने सर्वांचे समाधान झाले.

“असं होय. मग चल तेथे जाऊ. त्यांना भेटू. ” एकजण घाईघाईने म्हणाला.

“अजिबात नाही. तेथे जायचे नाही. ही त्यांची विश्रांतीची वेळ आहे. कदाचित आपल्यामुळे ते अस्वस्थ होऊ शकतात. आपल्याला पाहून ते भिऊ शकतात किंवा त्यांना पाहून आपण घाबरू शकतात. ” सुमित स्पष्ट करीत म्हणाला.

“ ए चल ना रे सुमित. ” एक तरुण हट्ट करू लागला.

“का ते? का जायचे तेथे?”

“मला येथील मुली पहायच्या आहेत. मला धरतीवर कोणी मुली देत नाहीत रे. ” तो तरुण गयावया करीत म्हणाला.

“का रे बाबा, आंतरग्रहीय विवाह करण्याचा मनसुबा दिसतो तुझा. तुझ्या घरी चालेल का मंगळावरची मुलगी. ” सुमितने विचारले.

“का चालणार नाही? आंतरजातीय विवाह चालतात. आंतरराष्ट्रीय विवाह चालतात. तर मग आंतरग्रहीय विवाह का चालणार नाही?”तरूण निग्रहाने म्हणाला.

“ अरे, पण हे मंगळ आहे. आपल्या पृथ्वीवर पत्रिकेत मंगळ असेल तर मुलीशी कुणीही विवाहास तयार होत नाही. इथे तर तू मंगळग्रहावरची मुलगी करु इच्छितो. ” सुमित त्याला आढ्यात घेत म्हणाला.

“अरे, सुमित. मंगळ म्हणजे पवित्र. या पवित्र ग्रहावरची मुलगी पवित्रच असणार ना?” तरूणपण चतुराईने म्हणाला.

“नंतर पुन्हा येऊ ना तेव्हा आपण यांच्याशी भेट घेऊ. तेव्हा बघू तुझ्यासाठी मुलगी. चला आता परत निघू या. जास्त वेळ इथे राहता कामा नये. ”

“का रे? काही त्रास होईल का?”

“नाही. त्रास तर होणार नाही. पण ही आपली पहिली वेळ आहे अवकाशात विचरण करण्याची. तेव्हा सावधानता ही कोठेही बाळगलीच पाहिजे. चला निघू या. ”

प्रवाशांची मंगळावरून परतण्याची इच्छा नव्हती. निरिच्छेनेच ते यानात जाऊन बसले. यानाने पृथ्वीच्या दिशेने झेप घेतली. सोबत पाथफाइंडर घेतले. हा क्षण पृथ्वीवरून आठशे कोटी लोकांनी उपग्रह वाहिन्यांवर याचि डोळा पाहिला. डोळे तृप्त झाले

(८)

नद्यांची जोडणी

सातपूरप्रमाणेच देशातील प्रत्येक खेड्यात, शहरात रस्ते बांधणीचे काम सुरू झाले होते. गाव, खेडे, शहर एकमेकांना चांगल्या रस्त्यांनी जोडले जाऊ लागले. सौर घटकामुळे हे सर्व रस्ते चमकू लागले. भारतात अंधाराचा जणू पराजय होऊ लागला होता. त्यात सैन्य भरतीमुळे देशवासीयांना स्फुरण चढू लागले होते. त्यात भर पडली ती अवकाश यात्रामुळे. सौरघट विक्रीमुळे आणि अवकाशयात्रेमुळे भरपूर पैसा जमू लागला. तो सर्व रस्ते बांधणी आणि सौरघट निर्मितीसाठी तसेच इतर विधायक कामासाठी वापरला जाऊ लागला.

फेब्रुवारीच्या पहिल्याच आठवड्यात सूचनाफलकावर सूचना झळकली. "स्वयंसेवकांनी त्वरीत सुमित आणि मानव तसेच इतर संघटकांशी संपर्क साधावा. " त्यानंतर प्रत्येक गावातील, प्रत्येक शहरातील सुमित आणि कंपनीचे तरूण-तरूणी सहा महिने गायब झाले. कुठे गेले? त्यांचे काय झाले? कोणालाही कळेना. त्यांच्या बँक खात्यावर दरमहा पगार जमा होत होता. म्हणजे ते कोणत्याही गुप्त कामासाठी गेले असावेत असा सर्वांनी अंदाज बांधला. आणि मग अचानक सर्व तरुण-तरूणी हजर झाले.

"आम्ही या सहा महिन्यात देशभरातील सर्व लहान-मोठ्या नद्या जमिनीखालून मोठाले पाईपलाईन टाकून एकमेकांना जोडल्या आहेत. आता पावसाला सुरूवातही झाली आहे. जर कुठे पूर आला तर ते

पाणी जमिनीखालून दुष्काळग्रस्त भागात पाठविले जाईल. नद्यांचे जे पाणी नाहक समुद्रात वाहून जाते, ते राजस्थानसारख्या वाळवंटी भागात वळविले जाईल. पूर्ण भारताचे नंदनवन केले जाईल. कुठेही अती किंवा कमी पाण्याची समस्या राहणार नाही. शेती, कारखाने, बांधकाम यांना भरपूर पाणी उपलब्ध होणार आहे. तेव्हा पाण्याची कोणी चिंता करू नये. मात्र पाणी जपून वापरावेत. पाण्याचे प्रदुषण करू नये. ”

सामान्य जनतेला ही सूचना वाचून खूपच मोठा आश्चर्याचा धक्का बसला. “जमिनीखालून पाईपलाईन टाकली. आपल्याला पत्ता कसा लागला नाही?” एकाने विचारले.

“कसा पत्ता लागेल?ते जमिनीखाली खूप खोलवर केले गेले असेल. रेल्वे स्टेशनवर नाही का, भुयारी मार्ग बनवितात? वरून गाडी जाते. कोणाला कळते का की खालून भुयारी मार्गाचे काम चालू आहे म्हणून?तसेच हे आहे. ” दुसऱ्याने स्पष्टीकरण दिले.

“हं. बरे झाले. आता पाण्याची चिंता मिटली. कुठे पूर यायला नको. कुठे दुष्काळ पडायला नको. ” जनतेने आशावाद व्यक्त केला.

पण पर्यावरणवाद्यांनी नकार घंटा वाजवली. त्यांना हे काही पचनी पडले नाही. निसर्गावर कुरघोडी करून आपण पर्यावरणाचा समतोल बिघडतो हा त्यांचा सूर होता. अर्थात, विश्वकल्याणवाल्यांकडे याचेही वैज्ञानिक उत्तर होतेच. पर्यावरणाला हानी पोहचवून केलेला विकास त्यांनाही नकोच होता. नदीजोड प्रकल्प राबविताना त्यांनी पर्यावरणाचा विचार नक्कीच केला असेल असे सर्वांना खात्रीने वाटले.

(९)

पूरावर नियंत्रण

जुलैच्या पावसाने जोर धरला आणि आसामात नेहमीप्रमाणे अतीवृष्टीची आपत्ती ओढवली. तुफान वारा आणि पावसाच्या माऱ्यापुढे आसामचे बहुतांश जिल्हे कोलमडून पडू लागले. सर्व नद्या धोक्याची पातळी ओलांडून वाहू लागल्या. भयंकर पूर येणाचा धोका निश्चित झाला. वरिष्ठ अधिका-यांनी आसामच्या मुख्यमंत्र्यांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून दिले. मुख्यमंत्र्यानी तातडीने ही बाब प्रधानमंत्र्यांच्या कानी घातली. त्यांचा आदेश येताच आसामच्या सर्व पूरग्रस्त नद्यांचे पाणी पंजाब, हरियाणा, राजस्थान या दिशेने तसेच महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागात वळविण्यात आले. शेकडो शासकीय कर्मचारी आणि हजारो स्वयंसेवक आसामात पूरनियंत्रणावर लक्ष ठेवून होते. भूमिगत पाईपलाईनद्वारा हे अतीचे पाणी देशाच्या विविध भागाकडे जाऊ लागले. देशाच्या एका भागात जनता पूर परिस्थितीशी लढत होती तर इतर भागात त्याच पूराच्या पाण्याचा वापर करून दैनंदिन कामे पार पडली जात होती. शेती, उद्योग, बांधकाम तसेच घरगुती उपयोगाला ते पाणी मिळू लागले.

आसामची नैसर्गिक आपत्ती नियंत्रणात आली. सर्व देशवासियांनी समाधान व्यक्त केले. शासनाबरोबरच त्या सात अज्ञात

लोकांनी भूमिगत पाईपलाईन टाकून देशभरातल्या नद्या एकमेकांना जोडल्या होत्या,त्यांचे खूपच कौतुक होऊ लागले. जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच ही घटना घडली होती. एके ठिकाणी अती पावसामुळे जनता बेजार झालेली नव्हती तर दुसरीकडे दुष्काळग्रस्त परिस्थिती ओढवलेले नव्हती. आता देश खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम होणार याची शाश्वती मिळालेली होती.

शेकडो कार्यकर्ते,सैन्यबळ आसामच्या पूनर्वसनाच्या कार्याला लागले. पूरपरिस्थितीमुळे बाधीत जनतेला त्यांनी त्वरीत हवी ती मदत पोहोचवायला सुरूवात केली. अन्न, वस्त्र, निवारा योग्य ठिकाणी उपलब्ध करून दिला गेला. पूरात बुडून जाणाऱ्या मनुष्य आणि प्राण्यांना वाचवले गेले. या पूरात वित्तहानी थोडीफार झाली. परंतु जीवीतहानी अजिबात होऊ दिली नाही. एकजूट होऊन केलेल्या सामूहिक कार्याची ती परिणती होती. एकतेची शक्ती काय करू शकते हे स्वयंसेवक आणि सैन्यबळाने करून दाखवले होते.

पूरावर नियंत्रण मिळविल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तातडीने आपत्कालीन बैठक बोलावली. मुख्यमंत्री सभेला उद्देशून म्हणाले,"खरोखरच हा एक अभूतपूर्व क्षण आहे. आपण पूरावर नियंत्रण मिळवू शकलो ही विज्ञानाची फार मोठी झेप म्हणावी लागेल. परंतु आपल्याकडे ही पूरस्थिती नेहमीच उद्भवते. यावर आपण यश मिळवूच. पण या पूरामुळे जनतेचे जे हाल होतात ते पाहवत नाही. मी त्या सात अज्ञात लोकांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधून या विषयी सविस्तर चर्चा करू इच्छितो. त्यांना सांगून आपण वादळी क्षेत्रात, पूर

क्षेत्रात तसेच भूकंप क्षेत्रात टिकाऊ घरं बनवून घेऊ. अशी घरं जी सर्व आपत्ती सहन करू शकतील. जेणेकरून नैसर्गिक आपत्तीचा जनतेला रोष होणार नाही. याबाबत आपलं काय मत आहे?"

सर्व मंत्रीमंडळाने आणि सर्व पक्षीय मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांच्या या विचाराला अनुमोदन दिले. "चांगला विचार आहे. आपण नक्कीच त्यांची भेट घ्यावी. "

मराठवाडा, विदर्भ या भागात पावसाने अद्याप कृपादृष्टी दाखविलेली नव्हती. गेल्या कित्येक वर्षात हा भाग दुष्काळाने पिडीत होता. शेती करणे दुरापास्त झाले होते. प्यायला पाणी टॅकरने पुरवावे लागत असे. पण नद्या एकमेकांना जोडल्यामुळे तेथील नद्या तुडुंब भरून वाहू लागल्या. पाऊसपाणी नाही तरी नद्या ओसंडून वाहू लागल्या. शेतीला पाट मिळाला. प्यायला पाणी मिळाले. हा भाग टॅकरमुक्त झाला. पाणीमय झाला. सर्वांनी शासनाला आणि विशेषतः त्या सात अज्ञात मानवतावादी लोकांचे आणि त्यांच्या संघाला भरभरून दुवा दिला. ही भारतीय इतिहासातील पहिलीच वेळ होती की जनतेनी शासनाची स्तुती केली होती. पण याचे खरे श्रेय मानव आणि त्याच्या टीमला जाते. त्याच्या संघाने जगाच्या नकळत जमिनीखाली दगडाची भक्कम पाईपलाईन टाकून देशभरातल्या नद्या जोडल्या होत्या. इतर देशांनीही हा आदर्श घेतला.

(१०)

परग्रहावरील संदेश

मानव आपल्या नियंत्रण कक्षात समोरच्या पडद्यावर लक्ष ठेऊन होता. त्याचे काम अवकाशात अवधान देणे हे होते. कानाला हेअरफोन लाऊन तो अवकाशातील हालचालीवर लक्ष ठेऊन होता. अवकाशात होणारे आवाज श्रवण करीत होता. त्याच्या संशोधन संस्थेकडून अवकाशात वेगवेगळ्या ग्रहावर संदेश पाठविलेले होते. त्यांची पूर्ण खात्री होती की या अफाट विश्वात कोठेतरी जीवसृष्टी असावी. मंगळावर जीवसृष्टीची साक्ष प्रत्यक्ष पाहून झाली होती. आता इतर ग्रहांवरच्या जीवांचा शोध चालू होता. इतर दूरच्या ग्रहावर प्रगत-अप्रगत जीवसृष्टी असावी असा वैज्ञानिकांचा कयास होता. जर प्रगत सृष्टी असेल, आपल्या मानवापेक्षा पुढारलेले जीव असतील तर ते शास्त्रज्ञांकरिता दुग्धशर्करा योगासारखे होते आणि जरी अप्रगत जीव असतील तरी तेही नसे कमी. या विश्वात आपण एकटे नाहीत याचा सोक्षमोक्ष पूर्णतः करता येऊ शकतो. शिवाय विश्वाचे अनेक रहस्ये उलगडता येईल म्हणून इतर ग्रहांवर मानवांकडून जीवसंशोधन चालू होते. वैज्ञानिकांनी एक विद्युतलहरीयुक्त संदेश तयार केला होता. तो अवकाशात दूरदूरच्या ग्रहापर्यंत प्रक्षेपित केला होता. कधीतरी, कुठेतरी हा संदेश ग्रहण केला जाईल अशी पूर्ण खात्री वैज्ञानिकांना होती. गेली कित्येक वर्षे ते हा संदेश परग्रहवासियांकडून पकडले जाण्याची प्रतिक्षा करून होते. तरीही परिणाम मात्र निघत नव्हता. पण

मानव आणि संघाचे कर्तव्यनिष्ठ कर्मचारी निराश होणारे नव्हते. त्यांच्या कामात 'होईलच' या संकल्पनेला महत्त्व होते. निराशा, अपयश याला थारा नव्हता. ते गाफिल राहत नव्हते. यश आता मिळेल या खात्रीने प्रत्येकक्षणी जागरूकतेने काम करीत होते.

मानवने तुळशी,आले आणि औषधी वनस्पतीयुक्त चहा मागवली. हे पेय विषरहीत, आरोग्यवर्धक आणि उत्साह देणारे होते.

मानव एकाग्रतेने समोरच्या संगणकाच्या पडद्यावर बारीक लक्ष ठेवून होता. कानाने बारीकसा आवाजही तो ऐकू शकत होता. अचानक अवकाशात त्याला हालचाल जाणवली. अवकाशात सूर्यकिरणासारखे परंतु सागराच्या लाटेप्रमाणे काही विद्युतचुंबकीय लहरी दूरच्या कोणत्यातरी ग्रहावरून प्रक्षेपित होताना दिसली. ती पृथ्वीवर आली. त्याच्या केंद्राने ती ग्रहण केली. मानवला तो संदेश ऐकू आला.

"हेसनस,हेसनस,मीसमी असमॅनडरा आसकाशगसगंगे मसमधून ससमॅट -९ यासमा ग्रहामहरावरमरून ओसमेगा बोरमोलतोयस आसमाहे. मासमाहा ससमंदेश पोसमोसतो आसमाहे कासमा?"

संदेश ऐकून मानव उसळलाच. विशेष म्हणजे त्याला संदेश आकलन झाला. त्याने त्वरीत प्रत्युत्तर दिले.

"होसमोय मसमला ससमंदेश मिसमिळतोसमस. "

“कोसमोणत्या ग्रसमरावरून आसमाहात तुसमुमी?” संदेश पाठविणाऱ्याने विचारले.

मानवने पूर्ण खात्री करून घेतली की संदेश नक्की अवकाशातून येतोय. त्याला कोणताही संशय उरला नाही. संदेश अवकाशातूनच येत होता. पृथ्वीवरील किंवा मानवनिर्मित कोणत्याही स्त्रोतापासून तो येत नव्हता. त्यामुळे आपल्या ग्रहाची माहिती द्यायला काहीच हरकत नव्हती. मानव म्हणाला,

“पृसमिथवी. मिसमिलकी वेसमे आसमाकाश गंसगंगेच्या डासमाव्या कोसमोपऱ्यात आसमापची सूसरयमासमाला हासमाहे. त्या सूररस तासमाऱ्या पासमासून तिसमिसरी गसमरह पृसमिथवी आसमाहे. तिसमिथून मीसमी बोसमोलतोय. ”

हे ऐकून पलीकडून संदेश पाठविणारा जीव खूप आनंदीत झाला असावा. त्याच्या बोलण्यातून हे स्पष्टपणे मानवला जाणवले. तो सांगू लागला,”मसमला खूसमूप आसमानंद झासमाला आसमाहे कीसमी तुसमुमच्या पसमरर्यंत मासमाझा ससमंदेश गेसमेला. मीसमी तुसमुमी पासमाठविलेला ससमंदेश गसमरण केसमेला. त्यासमाचा असमभ्यास केसमेला. आसमासच्या येसमेथील दुसबिरणीतूसमधून पुसमृथवीचे निसमिरिक्षण केसमेले. ससमंगणकावर पुसमृथवीच्यासमा प्रसमतिमा मिसमिळून खासमात्री कसमरून घेतसमेतली कीसमी तुसमुमी घासमातक नासमाहीत. नसमंतर हेसमे ससमंदेश तुसमूमच्या पसमरयंत पासमाठविसमिले आसमाहेत. ”

हे समोरच्या जीवाचे वक्तव्य ऐकून मानवाच्या आनंदाला पारावार राहिला नाही. आपण अवकाशात पाठविलेला संदेश शेवटी कोणीतरी ग्रहण केला होता. वर्षानुवर्षे करत आलेल्या प्रयत्नांना यश आले होते. सर्वात महत्वाचे म्हणजे त्या ग्रहावरील जीवांची भाषा आपल्याला समजत आहे. आजवर मानवाने अवकाश संशोधन क्षेत्रात मिळविलेल्या इतर कोणत्याही यशापेक्षा हे एक श्रेष्ठतम यश होते.

मानवने त्या समोरच्या जीवाशी संभाषण चालू ठेवले. त्याच्या ग्रहाची आणखी माहिती विचारली. त्यातून मानवाला 'दुसऱ्या दुनियेचे' रहस्य उलगडले गेले. आपल्या आकाशगंगेच्या जवळ अंड्रामेंडा नावाची एक आकाशगंगा आहे. त्या आकाशगंगेच्या उजव्या कोपऱ्यातील तारा मंडळात एक ग्रहमालिका आहे. त्यातील सर्वात मोठा ग्रह सॅट-९ असा आहे. त्याचे आकारमान आपल्या पृथ्वीपेक्षा सातपट मोठे होते. तेथे हवापाणी तसेच इतर आवश्यक घटक पृथ्वीप्रमाणेच होते. वनस्पती उंचच उंच होत्या. नैसर्गिक ऊर्जास्त्रोत भरपूर होते. इतर जीव आणि मनुष्य पृथ्वीसमानच होते पण थोडाबहुत फरक होता. तेथील मनुष्याची उंची आठफूट होती. सर्व पृथ्वीसारखेच परंतु आकाराने मोठे. अर्थात, तेथील तंत्रज्ञानही पृथ्वीच्या पन्नास पट पुढे होते. जणू सॅट-९ हा पृथ्वीचा वडील भाऊच असावा. ओमेगा नावाच्या तेथील कुशल वैज्ञानिकाने ही माहिती मानवला दिली. तो सॅट-९ या ग्रहावरचा सर्वश्रेष्ठ शास्त्रज्ञ होता. वय केवळ चाळीस वर्षे. हुशार. बुद्धीमान. त्याने पृथ्वीवरून पाठविलेला संदेश ग्रहण केला होता. त्याचा अर्थ आपल्या वरिष्ठांना समजावून दिला होता. पृथ्वीचा

दुर्बिणीतून आणि संगणकावर अभ्यास करून पृथ्वीवासिय आपल्यासाठी घातक नाहीत,उलट मैत्रीयोग्य आहेत याची खात्री पटवून दिली होती. म्हणून वरिष्ठांनी त्याला उलट संदेश पाठविण्याची परवानगी दिली होती. त्याच्या प्रयत्नांना यश आले होते. अर्थात,सॅट-९ वरील जीवांना आपणच या अनंत ब्रह्मांडात एकमेव आहोत असा अभिमान होता. ओमेगाने तो आता निरर्थक ठरविला होता. ओमेगाने थेट मानवला निमंत्रण दिले.

"तूसमू मासमाझ्या ग्रसमहावर येसमे. तुसमुमच्या सास्वगताला आसमामी तसमयार आसमाहोत. तुसमुमाला भेसमेटायला आसमामी उसमुस्तूक आसमाहोत. लसमवकर येसमे. आसमामी वासमाट बसमघत आसमाहोत. ससमरव ससमॅट-९ वासमासियाकसमडून यासमा ओसमेगा कसमडून तुसमुला निसमिमंत्रण. येसमे. नसमंतर बोसमोलू. "

एवढे बोलून ओमेगाने संदेश बंद केला.

मानवने हे आपले संभाषण संगणकावर नोंदवून ठेवले. तो त्वरीत वरिष्ठांना ही आनंदाची बातमी देण्यात आतूर झाला. त्याने त्वरीत वरिष्ठांना संपर्क साधला. "यूरेका,यूरेका. आपण जिंकलो. दुसरे विश्व सापडले. "

संपूर्ण विश्वात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली.

(११)

कचऱ्यापासून गॅस निर्मिती

सुमित आपल्या सहकाऱ्यांसह गावाबाहेरील मोकळ्या जागेत कसल्याशा कामात गुंग झालेला होता. त्यांनी एक भला मोठा खड्डा जमिनीत खणून काढला. काही दिवसांत त्याच्याभोवती मोठमोठ्या शिळा येऊन पडल्या. विद्युतकरवतीने त्यांनी त्या शिळा चौरसाकृती कापून घेतल्या. सिमेंट,काळा गूळ चुना आणि मॅग्नेशियम,आर्यन,प्लॉस्टर

ऑफ पॅरिस आणि इतर आधुनिक रसायने मिसळून बांधकामाला सुरुवात केली. शिळेवर शिळा उभी राहू लागली. एका मोठ्या हौदेसारखी ती झाली. त्याला आतून नंतर वीटांचे बांधकाम करण्यात आले. जागोजागी काही यंत्रे बसविण्यात आली. वरून स्लॅब टाकून ते बंद केले गेले. त्याच्यावर पुन्हा बांधकाम झाले.

सुमित आणि कंपनीचे काय चालले आहे हे गावकऱ्यांना कळेना. ते सुमितला आणि सहका-यांना याबद्दल विचारू लागले.

"कळेलच तुम्हाला. तूर्त काम होऊ द्या. हवे तर तुम्ही मदत करा आम्हाला. "एवढे बोलून सुमित कामाला लागला होता. अर्थातच त्याला मदतीला कोणीही गावकरी येत नव्हते. "पगारावर माणसे लावलेत ना. मग आम्ही मोफतची मदत का म्हणून करावी?" जो तो आपसात कुजबूजू लागला. काहींनी तर सुमितला स्पष्ट सांगितले,"

तुम्ही पगार घेता. मग हे काम तुम्हीच केले पाहिजे. आम्हाला कशाला फुकटचे गोवता?"

सुमित स्मित हसत त्यांना म्हणाला,"बरोबर आहे तुमचे म्हणणे. पण आम्ही पगार मिळतो म्हणून काम करीत नाहीत. आम्ही काम करतो म्हणून आम्हाला पगार मिळतो. पगार मिळते म्हणून प्रामाणिकपणे सगळे काम करीत असते तर जग कधीच सुधारले असते. कोणतेही कामे शिल्लक राहिली नसती. झटकेपट कामे झाली असती. सर्व समस्येचे निराकरण कधीच झाले असते. हे सार्वजनिक कार्य आहे. इथे आम्ही कचऱ्यापासून गॅस निर्मितीचा प्लाँट टाकित आहोत. आपल्या गावात रोजचा एवढा कचरा तयार होतो. रोगराई पसरते. गाव अस्वच्छ दिसते. घाणेरडे दिसते. बाहेरगावची लोक येऊन नाक मुरडतात. आपल्या लोकांना ही घाण करायची सवय. आपल्या घरातील कचरा थेट रस्त्यावर नेऊन टाकतात. तुम्ही आम्हीच हे. दुसरे कोणी नाही. गाव बकाल करून टाकलाय. या प्लाँटमुळे कचऱ्याची समस्या कायमची दूर होणार आहे. याच कचऱ्यापासून आपले अन्न शिजवणार आहे. सध्या देशात गॅसची टंचाई आहे. आपण या प्लाँटच्या मदतीने इथेच गॅस उत्पादन करणार. इथेच टाक्या भरणार. दोन-तीनशे रूपयात तुम्हाला-आम्हाला तो हवा तेव्हा उपलब्ध होणार. आहे ना गंमत! कमवा आणि खा. कचरा करा आणि गॅस भरा. किती मस्त योजना आहे ना! तेव्हा अशा समाजाच्या, तुमच्या-आमच्या फायद्याच्या योजनेला तुम्ही- आम्ही हातबोट लावले तर काय बिघडते? प्रत्येक गोष्ट पगारासाठी आणि पैशासाठी केली जात नाही. समाजाचे आपण काही देणे लागतो, याचाही माणसाने विचार करावा. आमचे वरिष्ठ ते सात अज्ञात लोक कशासाठी एवढे कष्ट करतात? दिवसरात्र खपतात. एवढा पैसा ओततात. शेकडो शास्त्रज्ञ त्यांच्यासाठी कष्टत

आहेत. हजारो-लाखो हात काम करीत आहेत. कशासाठी हे? केवळ पगार मिळतो म्हणून? नाही. समाजासाठी, देशासाठी काहीतरी ठोस करावे या ध्येयाने प्रेरित ही माणसे आहेत. केवळ आणि केवळ माणसाचे भले व्हावे याकरिता झटणारी ही माणसे आहेत. त्यांच्या कार्यात तुम्ही-आम्ही सहकार्य केले तर ते चांगलेच आहे ना! कष्ट करून कोणी मरत नाही. उलट जास्त जगतो. हाडे मजबूत होतात. रक्ताभिसरण सुलभ होते. जेवण पचते. भूक चांगली लागते. गाढ झोप लागते. भूकंप आला तरी उठणार नाही अशी समाधानाची झोप लागते."

सुमितचे बोलणे ऐकून गावकऱ्यांच्या माना खाली गेल्या. ते चुपचाप सुमितला सहाय्य करू लागले.

कामाने गती घेतली. महिन्याभरात एक सुंदर प्लाँट उभा राहिला. गावातील तरूणांनी गावातील सगळा कचरा त्यात आणून टाकला. पाणी ओतले. काही रसायने त्यात मिसळली. काही तासांत मिथेन वायू तयार झाला. गावात ज्यांच्या घरी गॅस टाक्या रिकाम्या होत्या, त्या मागवण्यात आल्या. मिथेन वायू द्रवीभूत करून टाक्यांत भरण्यात आला. तेथेच शेगडी पेटवून बघितली गेली. योजना सफल झाली. सर्वांनी टाळ्या वाजवून, उड्या मारून आनंद व्यक्त केला.

एका दगडात दोन पक्षी मारणारी ही योजना खरोखरच अद्भुत होती. एकीकडे रोजच्या रोज गावातील तसेच परिसरातील कचरा उचलला जाणार होता. तर दुसरीकडे त्याच कचऱ्यापासून गॅस निर्मिती होऊ लागली. तो गॅस त्वरीत कमी दरात उपलब्ध होऊ लागला. तोही चोवीस तासांत कधीही. कच-यांमुळे होणारी रोगराई आटोक्यात

आली. लोक स्वतः कचरा फ्लॅटमध्ये आणून टाकू लागले. लोकांना चांगल्या सवयी लागल्या. पर्यावरणाची होणारी हानी थांबली. गॅस स्वस्त मिळू लागला. त्यामुळे गरीबांनाही परवडू लागला. गरीब माणसेही चार-पाचजण मिळून मिळून गॅस खरेदी करू लागले. त्यांना ते सोईचे झाले. कापली जाणारी झाडे वाचली. लाकडांसाठी कोणी झाडे कापेनाशी झाली. ही बहुउद्देशीय योजना प्रत्येक गावात राबवायला सुरुवात झाली. शासनाला आता विदेशातून मोठ्या प्रमाणात गॅस खरेदी करण्याची आवश्यकता राहिली नाही. घरगुती वापरासाठीच्या गॅसची आता स्थानिक पातळीवर सोय झाली होती. गॅस उत्पादनात भारत स्वावलंबी होऊ लागला. आता वाहनेही वायूवर चालणारी निघू लागली. त्यामुळे पेट्रोल-डिझेलला मागणी कमी झाली. परिणामी भारताची कच्च्या तेलाची आयात घटली. अर्थातच महागाई स्थिर झाली. काहीकाही भागात कमी झाली. हा सर्व त्या शेकडो परिश्रम घेणाऱ्या शास्त्रज्ञांच्या कष्टाचा प्रताप होता. त्यांना प्रेरित करणाऱ्या त्या सात अज्ञात लोकांना संकल्प होता. त्यांना मदत करणाऱ्या त्या लाखो लोकांचा तो प्रतिक आहे. देश स्वावलंबी व्हायच्या दिशेने अग्रेसर झाला. वीज,गॅस, ऊर्जा, कचरा,रस्ते, पाणी, पर्यावरण, बेकारी या सर्व समस्येवर ठोस उपाय मिळाल्याने ह्या समस्या आता राहिल्याच नाहीत. अर्थात,विदेशियांच्या डोळ्यांत हे खूपू लागले.

(१२)

स्त्री अर्भक

कचऱ्यापासून गॅस निर्मितीचा प्रकल्प संपूर्ण भारतात सुरू झाल्यापासून देशातून कचऱ्याची समस्या मुळासकट उपटून निघाली होती. उरकिड्यावर चरणाऱ्या जनावरांची पंचाईत झाली होती. त्या सर्वांकरिता शासनाने गुरेरक्षक दल निर्माण करून त्यांच्या हाती या बेवारस गुरांची जबाबदारी सोपवली होती. तर कचऱ्यात प्लॅस्टिक,काच,लोखंड वेचून पोट भरणा-यांचा धंदा बंद झाला होता. अर्थात,तो कचरा गोळा करून प्लाँटमध्ये नेऊन देण्याचे काम त्यांनाच कायमस्वरूपी दिले गेले होते. देशाचा प्रत्येक रस्ता, प्रत्येक गल्ली, प्रत्येक मोकळा भाग कचरामुक्त झाला होता. याचा गैरधंदा करणा-यांना फरक पडू लागला होता. देशात काही ठिकाणी स्त्री अर्भकाची हत्या होत होती. असे स्त्री अर्भक कचराकुंडीत टाकले जाते. आता कचरा नसल्याने असे स्त्री अर्भक वाटेवर टाकलेले दृष्टीपथास येऊ लागले. एकविसाव्या शतकातील भारतात हे पुरूष अर्भकाचे जतन आणि स्त्री अर्भकाची चाललेली विटंबना चाललेली पाहून सुज्ञ लोकांची काळीजे पिळवटून निघू लागली. चर्फडू लागली. का हा स्त्री-पुरूष भेदभाव केला जातो? निसर्गतः दोघेही आपापल्या परीने उत्तम आहेत. मग का स्त्रीचा घात केला जातो?

स्त्रीला कटकट समजणाऱ्या एका प्रांताच्या वाटेवर असे दोन - तीन ठिकाणी स्त्री अर्भक आढळून आले आणि पोलीसांसहित

प्रशासन यंत्रणा खडबडून जागी झाली. प्रसुतीगृहावर आणि सोनोग्राफी केंद्रांवर धाडी पडू लागल्या. पोलीसांच्या हाती काहीच धागेदोरे लागत नव्हते. महिन्याकाठी स्त्री अर्भक कुठे ना कुठे पडलेले दिसायचे. अगदी पद्धतशीरपणे ह्या कोवळ्या स्त्री देहाची विल्हेवाट लावली जात होती. पोलीसांनी आपली यंत्रणा कडक केली. सोनोग्राफी केंद्रांवर कडक नजर ठेवली. परंतु काहीच हाती लागत नव्हते.

एका सुखवस्तू कुटुंबातील एक जोडपे एका सोनोग्राफी केंद्रांवर आले. डॉक्टरबरोबर गुप्त खलबते झाली. त्या गर्भवती स्त्रीला सोनोग्राफी यंत्रावर झोपविण्यात आले. पण हे काय? यंत्र चालेना. डॉक्टरांनी खूप प्रयत्न केला. त्या स्त्रीला बाजूला घेतले. यंत्र चालू लागले. पुन्हा ठेवता यंत्र ठप्प! ही काय भानगड आहे?

असाच प्रकार देशात गैरधंदा करणाऱ्या सर्व दवाखान्यात होऊ लागले. या ठराविक दवाखान्यातील सोनोग्राफी यंत्र कधीमध्ये बंद पडते ही बातमी प्रसारमाध्यमांच्या हाती लागली. देशभर प्रसारित झाली. बातमी ऐकताच आरोग्यमंत्र्यांनी गृहमंत्र्याबरोबर सभा आयोजित केली.

"स्त्रियांचे गर्भपात करणारे, स्त्री अर्भक ठार करून इतरत्र फेकून देणारी हीच ती इस्पितळे आहेत, ज्यांच्या आपण शोधात होतो. हे सर्व त्या सात अज्ञात लोकांच्या वैज्ञानिक यंत्रणेचा कमाल आहे. त्यांनी संपूर्ण देशातील दवाखान्यात उपग्रह तंत्रज्ञानामार्फत गुप्त यंत्रणा जोडली आहे. प्रत्येक मशीन काय करते, ते यांना कळते. मग ते या

मशीनला बंद पाडतात जर चुकीचे काही होताना आढळले तर. म्हणूनच या ठराविक दवाखान्यातील सोनोग्राफी यंत्रणा बंद पडली आहे. ते गर्भलिंग निदान नक्कीच करीत करीत आहेत. शिवाय स्त्री अर्भकाची हत्याही करीत आहेत. त्यांच्यावर आता कारवाई होणे आहे." आरोग्यमंत्र्यांनी मूळ मुद्द्याला हात घातला.

"व्वा! छान! आता आला उंट पहाडाखाली. आता गर्भलिंग निदान कोणीही करणार नाही. " दुसरा मंत्री हर्षभरीत झाला.

" हे फार उत्तम झाले! पण आता यांच्यावर त्वरीत कारवाई झाली पाहिजे. "

"हो. मी कमिशनरला सूचना दिल्या आहेत. आता एव्हाना त्या दवाखान्यावर धाडी पडल्या असतील. डॉक्टर,नर्स,वॉर्डबॉय, सहायक, प्रशासन कोणा कोणालाही सोडले जाणार नाही. सर्वांची चौकशी होईल. दोषी आढळल्यास कडक कारवाई होईल. " आरोग्यमंत्री सांगत होते.

" यामुळे आता गर्भलिंग निदान करून गर्भातच स्त्रीची हत्या कोणी करणार नाही. पण आपल्याकडे स्त्री जन्मानंतर तिला लगेच ठार केले जाते. त्याचे काय?" दुसऱ्या मंत्र्यांनी विचारले.

"त्यावरही उपाययोजना केली जाईल. "

"मी म्हणतो,अशा घटना घडण्यापूर्वीच रोखायच्या असतील तर बक्षीस जाहीर करावे. अशा प्रकारच्या स्त्री अर्भकाची हत्या करू पाहणाऱ्यांची माहिती देणाऱ्यास एक लक्ष रुपये बक्षीस जाहीर करा.

शिवाय असा प्रकार रोखू पाहणा-यांसही बक्षीस ठेवा. बक्षीसा खातर तरी लोक अशा घटनेची पोलीसांना माहिती देतील. " त्या मंत्र्यांनी सुचवले.

"तुमची सूचना स्वागतार्ह आहे. त्यावर नक्कीच विचार करू. पण या स्त्री देहाच्या विटंबनेमागची जी मानसिकता आहे, ती बदलणे सर्वात महत्वाचे आहे. त्यादृष्टीने जनजागृती करणे महत्त्वाचे आहे. रोजरोज, चोवीस तास सतत आपल्याकडील समाजमनावर स्त्रियांचे महत्त्व पटवून देणाऱ्या कार्यक्रमांची आखणी करायला हवी. या कामी उपग्रह वाहिन्या, चित्रपट थिएटर, इंटरनेट, वर्तमानपत्रे यांचा चांगला वापर करता येईल. "आरोग्यमंत्री समाजमाध्यमाचे महत्त्व विशद व्यक्त करीत म्हणाले.

"हो मलाही तसेच वाटते. मी आताच तमाम मालिका निर्मात्यांना स्त्रियांचे महत्त्व सांगणाऱ्या कार्यक्रमांची निर्मिती करा असे निवेदन करणार आहे. जाहिराती,लघूपट यांचीही निर्मिती आपण करवून घेऊ. " सांस्कृतिक मंत्री म्हणाले.

"त्या सात लोकांची काय भूमिका असेल याबाबत?" एका मंत्र्याने विचारले.

"नक्कीच पूरक भूमिका असेल त्यांची. पण आपण केवळ त्यांच्यावर अवलंबून राहू नये. आपलेही काही कर्तव्य आहे की नाही? चांगल्या गोष्टीची सुरुवात आपल्यापासूनच व्हायला हवी. "आरोग्यमंत्री म्हणाले.

“महोदय,स्त्रियांवर इतर प्रकारेही अत्याचार होतात. यासाठी आपण काय करू शकतो?” आणखी एका मंत्र्यांनी विचारले.

“ असे बलात्कार, विनयभंग, हुंडाबळी, शारीरिक व मानसिक त्रास, हेळसांड, मानहानी अशा वेगवेगळ्या गुन्ह्यांसाठी कडक कारवाईसाठी मसूदा तयार करण्यात आला आहे. त्यात दोन महिन्यांत निकाल, प्रत्यक्ष दोषींना त्वरीत फाशीची शिक्षा, अप्रत्यक्ष दोषींना पंचवीस वर्षे तुरूंगवास असे दंड आहेत. निकाल लागल्यानंतर पुन्हा एक संधी प्रतिपक्षाला देण्यात येईल. काही कजाग स्त्रियांकडून या कायद्याचा गैरवापर होऊ शकतो. म्हणून तिसऱ्या महिन्यात पुन्हा खटला चालेल. त्यात स्त्री कायद्याचा गैरवापर करते असे आढळल्यास तिला वीस वर्षांची शिक्षा. पण खरोखरच स्त्री पिडित असेल तर प्रतिपक्षाची फाशीची शिक्षा कायम. राष्ट्रपतींकडेही दया मागण्याचा अधिकार नाही. ”कायदेमंत्री मसूद्याची माहिती देत म्हणाले.

“मसूदा छान आहे. संसदेत आणा तो. त्यावर साधकबाधक चर्चा व्हायला हवी. पण मला असे वाटते, कायदे करून समाज सुधारणा होत नाही. त्यासाठी गरज आहे मानसिकता बदलण्याची. मला वाटते, विविध प्रसारमाध्यमांतून जे जे वाईट, घाणेरडे प्रसारित होत आहे, ते सर्व बंद व्हायला हवेत. मनावर चांगले संस्कार व्हायला हवेत. शाळा,महाविद्यालये,

विद्यापीठे या क्षेत्रात मने सक्षम बनविण्यावर भर देण्यात येईल. तसेच सुसंस्कार करणाऱ्या व्याख्यातांना याबाबत पाचारण करण्यात येईल. ” प्रधानमंत्री म्हणाले.

"त्या सात लोकांची टीम काय करते ते पाहू या. "एक मंत्री बोलले आणि त्यांचा फोन वाजला. त्यांनी फोन उचलला. "जयहिंद! कोण? हरिया. काय म्हणतो? मी आजोबा झालो. मला नातं झाली. हरिया, फार मोठा कार्यक्रम घरी करू या बारशाच्या दिवशी. प्रसारमाध्यमांना बोलवू. एक लक्ष्मी आपल्या घरी आलीय. तिचे स्वागत धूमधडाक्यात व्हायला हवे. "त्यांनी फोन ठेवला.

"अभिनंदन महोदय. तुम्ही आजोबा झालात. "सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

"अहो, मी आजोबा झालो म्हणून अभिनंदन करू नका. माझ्या घरात स्त्री अर्भक जन्माला आली म्हणून अभिनंदन करा. मी व माझे कुटुंब तिचे धुमधडाक्यात स्वागत करू. साऱ्या जगाला ओरडून सांगू. स्त्रीचे स्वागत करा. एक शक्ती आपल्या घरी जन्माला आली आहे. आपल्या सारख्या जबाबदार लोकांनीच सर्व अनिष्ट प्रथा,रूढी बंद करायला हव्यात. मागे झाले ते झाले. आता नाही. आता प्रत्येक स्त्री वाचली पाहिजे. आपल्या देशाचे लिंग गुणोत्तर पुढे नेऊ. " या वक्तव्यावर सर्वांनी टाळ्या वाजवल्या.

दुसऱ्याच दिवशी प्रत्येक राज्यांच्या प्रत्येक रेल्वे स्थानकावरील, बसस्थानकावरील, विमानतळावरील सूचनाफलकावर पुढील सूचना दिसू लागली.

"समस्त देशवासिय, जयहिंद. या क्षणापासून स्त्रियांना वाचवा. तिचा जन्म रोखू नका. स्त्रियांवर अत्याचार करू पाहणाऱ्या, जन्मतः तिला ठार करू पाहणाऱ्या,गर्भातच तिची हत्या करू पाहणाऱ्यावर

आमचे बारीक लक्ष आहे. आमची माणसं प्रत्येक गल्लीत, प्रत्येक मोहल्ल्यात तैनात आहेत. ते अशा गैरप्रकारांना हुडकून काढतील. स्त्रियांची छेडछाड, विनयभंग, बलात्कार करू पाहणाऱ्यांचे हयगय केली जाणार नाही.. स्त्री अर्भकाची हत्या करू पाहणाऱ्या कुटुंबांना आणि डाॅक्टरांना आयुष्यभर तुरुंगात सडत रहावे लागेल.. त्यांना फाशी देण्यात येईल. ही वेळ येऊ देऊ नका. त्यापेक्षा आपल्या आयाबहिणींची लाज राखा. बेटी वाचवा आणि ही सूचना देशाच्या सर्वच लोकांसाठी आहे बरं का. ”

सूचना खरोखरच भयप्रद होती,अपराधी मानसिकता असलेल्यांसाठी. त्या सात अज्ञात लोकांनी सूचना दिली म्हणजे बोलतात तसे ते नक्कीच करतील. काही दिवस शांततेत पार पडले. एकीकडे दवाखान्यावर धाडी टाकून दोषींवर कारवाई सुरू झाली. दुसरीकडे ही सूचना देशाच्या संदिग्ध भागात काही लोकांना जड जाऊ लागली. याला न जुमानता एके ठिकाणी लग्नात हुंड्यासाठी वराकडील मंडळी अडून बसली.

“हुंडा द्या. अन्यथा आम्ही जातो. ” वरपिता अडून बसला.

“आता काय हवे? पाच लाख रुपये दिले. पाच तोळे सोने दिले. प्लॅट घेऊन दिला. आता द्यायला आमच्याकडे काहीही नाही. ”वधूपिता गयावया करू लागला.

“भिकारी कुठले? पैसे नाहीत तर आधीच सांगायचे होते ना. आमच्या मुलाकरिता मुलींची काय कमी आहे? एकसे एक मिळतील. ” वरमाता तावातावाने म्हणाली.

आपल्या वडीलांची ही मानहानी वधूला सहन झाले नाही. ती चिडली. तिने भर मंडपात आदळ आपट केला. "माझ्या पित्याला भिकारी म्हणता? तुम्हीच खरे भिकारी आहेत. ए पोरा, चुपचाप माझ्याशी लग्न करतोस का बोल? मलाही पोरांची कमतरता नाहीये. आता कोणीही तयार होईल माझ्याशी विवाह करायला. तेही हुंडा न घेता. कोणत्या युगात राहतो रे तू? स्वतः ला विकायला निघाला आहेस या लग्नाच्या बाजारात? तुला लाज कशी नाही वाटत?बांगड्या भर. "

वधूचा हा रौद्र अवतार पाहून वर टरकला. वरपक्षाची मंडळी घाबरली.

"या अशा असभ्य पोरीशी आम्ही माझ्या पोराचे लग्न करणार नाहीत. " वरपिता चाचपडत म्हणाला.

"ए , तूझ्या पोराची लायकी नाही माझ्याशी लग्न करायची. मीच नाकारते त्याला. आणि हो,माझे पाच लाख रुपये, फ्लॅटची चावी आणि कागदपत्रे,हा लग्नाचा खर्च आताच्या आता परत करा. इथेच या ठिकाणी. अन्यथा मी सात अज्ञात लोकांच्या माणसांना आता बोलावते. ते इथे या मंडपात हजर आहेत. माझ्या एका इशाऱ्याची वाट पाहत आहेत. "

वधूचे हे शब्द अंगावर थरकाप उडविणारे होते. वरपक्ष घेतलेले पाच लाख रुपये, फ्लॅटची किल्ली आणि कागदपत्रे आणि इतर सर्व खर्च देऊन पळताभुई झाला. तेथे त्या वधूचा वर्गमित्र लग्नासाठी आलेला होता. त्याची तिच्यावर इच्छा होतीच. त्याचे मातापिताही तेथे मंडपात होते. त्यांनी लग्नाला मंजुरी दिली. विनाहुंडा आनंदात दोघांचा

विवाह पार पडला. एक अनिष्ट प्रथा तरूणांनी हिंमत केल्याने मोडीत निघाली. त्या सात अज्ञात लोकांनी विज्ञानाबरोबर समाजसुधारणेतही दबदबा निर्माण केला. ही बातमी देशभर पसरली आणि चमत्कार झाला. त्या प्रसंगांनंतर कुठेही स्त्रियांवर अत्याचार झाले नाही. कुठेही स्त्री अर्भक आढळले नाही. हुंडा घेऊन विवाह झाला नाही. हुंडाबळी गेला नाही.

(१३)

वृक्षारोपणास सुरूवात

सात अज्ञात लोकांच्या विश्वकल्याण संस्थेच्या सर्व शास्त्रज्ञांची बैठक त्यांच्या सागरतळाशी असलेल्या खास केंद्रांवर भरली होती. यात भारताचे एक से एक प्रतिभावंत, बुद्धीमान शास्त्रज्ञ हजर होते. त्यांनी आपले आयुष्य पूर्णपणे या कार्यासाठीच समर्पित केले होते. त्यांचे वेतन त्यांच्या बायकापोरांच्या आणि मातापित्यांच्या बँक खात्यात दर महिन्याच्या एक तारखेला जमा होत होते. घरी काही समस्या उद्भवली की विश्वकल्याण संस्थेची इतर मंडळी समक्ष जाऊन ती सोडवत असत. मग महिन्या-दोन महिन्यात हे शास्त्रज्ञ आळीपाळीने एखाद्या दिवसासाठी घरी जाऊन येत असत. आजवर देशासाठी लोकांनी प्राणाहुती दिली. संसाराची नासाडी करून घेतली. विश्वकल्याण संस्थेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची अशी अवस्था होऊ दिली जाणार नव्हती. घरादाराचा त्याग करावा लागतो पण कामापुरता. प्राणाहुती देण्याची आवश्यकता नाही. तर वेळेची,परिश्रमाची, जिद्द, चिकाटीची आवश्यकता होती. कारण प्राण गमावून लढाई जिंकली जात नाही तर समस्येवर हल्लाबोल करून लढाई जिंकली जाते.

शक्तीवर्धक पेय पिऊन झाल्यावर सभेचे अध्यक्ष रमाकांत बोलायला उभे राहिले. "सर्वप्रथम सर्वांना जयहिंद! आजच्या सभेचा विषय पर्यावरण संरक्षण हा आहे. आपण सर्व जाणताच की आजच्या घडीला वाढत्या प्रदूषणामुळे पर्यावरणाची हानी किती झाली आहे ते.

यावर एकच उपाय म्हणजे वृक्षारोपण, हे आपण जाणताच. आपण सर्वांनी यावर भरपूर संशोधन केले आहे. आता वेळ आली आहे ते करून दाखविण्याची. ”

रमाकांत पुढे बोलू लागले,”या सभेनंतर आपणा सर्वांना संबंध भारतात आपापल्या ठरवून दिलेल्या क्षेत्रात जायचे आहे. मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करायचे आहे. एकफूट सुद्धा जागा रिकामी राहता कामा नये. हे रसायन आपण कठीण परिश्रमाने तयार केले आहे. ”

सर्वांचे लक्ष त्या काचेच्या बाटलीकडे वेधू लागले.

“यातील एक थेंब झाडाच्या मुळाशी टाकून वरून पुरेसे पाणी टाकले की ते वृक्ष त्याच्या जातीनुसार, आकारानुसार एका वर्षाच्या आत पूर्ण वाढेल. त्यामुळे वर्षभरातच आपण भारताच्या या भूमीवर हरितपट्टा चढवू शकू. आपली सर्व माणसे कामाला लावायची.

शहर,गाव आणि वस्तीच्या क्षेत्रात त्यांना सावली देणारे,फळे, फुले, लाकूडफाटा देणारे वृक्ष लागवड करावी लागेल. मोकळ्या जागेत, शासकीय जागा असो वा खाजगी जागा, तेथे आंबा,वड, पिंपळ,चिंच, अर्जुन,साग,फणस इत्यादी मोठ्ठाली झाडे लावावी लागतील. ” रमाकांतने थांबून श्वास घेतला.

राष्ट्रीय महामार्गालगत प्रत्येक शंभर मीटर अंतरावर दोन्ही बाजूला अशा मोठमोठ्या वृक्षांची लागवड करायची आहे. रेल्वेलाईनही सोडायची नाही. पण रस्त्याच्या कडेपासून आणि रेल्वेलाईनपासून पंचवीस -तीस फूट आत ती झाडे लावावी लागतील. आपली माणसे

जाऊन खड्डे खणतील. त्याचवेळी इतर माणसे झाडाची रोपं आणि फांद्या आणतील. इतर माणसं पाण्याची सोय करतील. दोघे-तिघे या रसायनाचा एकेक थेंब त्या खड्ड्यात टाकत जातील. एका वर्षात संपूर्ण भारतात नुसती आंब्याचीच दहाचा विसावा घात एवढी वृक्षसंख्या व्हायला हवी. ”

“होय सर, नक्की होईल. एका वर्षात झाडे आपले पूर्णत्व प्राप्त करणार म्हणजे भारतात पर्यावरणाचे नंदनवन नक्की होईल. ” दुसरा शास्त्रज्ञ अखिलेश म्हणाला.

“एवढ्या प्रचंड प्रमाणात वाढलेल्या वृक्षांमुळे हवेचे प्रदूषण किती कमी होईल! कल्पनाच करवत नाही. अगदी प्राचीन डायनासोर युगात गेल्यासारखे वाटेल. ”तिसरा शास्त्रज्ञ गुंडाप्पा म्हणाला.

नक्कीच. हे सर्व वृक्ष पर्यावरणातील सर्व विषारी वायू शोषून घेतील. ऑक्सिजनचे प्रमाण वाढेल. आजारपण कमी होतील. ”रमाकांत म्हणाला.

“पण सर, आपल्या या प्रकल्पाचा जलप्रदूषण दूर करण्यास काही उपयोग होईल का?”शास्त्रज्ञ विवेकने विचारले.

“हो नक्कीच. हा प्रकल्प सागरातील आणि इतर जलाशयातील वनस्पती करिताही आहे. उलटपक्षी आपल्या या प्रकल्पापासून जलवनस्पतीची क्षमता वाढणार. पाण्यातील विषारी वायू, विषारी घन पदार्थ ते शोषून त्याचे साध्या घटकांत रूपांतर करून घेतली आणि मग वर्षभरातच जलाशयही प्रदूषण मुक्त होतील. ”रमाकांत म्हणाले.

“मग सर, यामुळे मुजोर कारखानदार आणि बेजबाबदार संस्था आणि व्यक्ती शेफारतील. वाटेल तशी घाण पाण्यात सोडतील. ” चौथ्या शास्त्रज्ञाने शंका घेतली.

“तुमची शंका रास्त आहे. पण आपण प्रदूषणासाठी हे उपाय केले आहेत असे जाहीर करायचेच नाही ना! उलट प्रदूषण नियंत्रणाचे कायदे शासनाला कडक करायला लावायचे. शासनाची कडक नजर त्यावर राहील. आयत्यावर भेटते म्हटल्यावर लबाड माणसे त्याचा वाईट वापर करणारच. ” रमाकांत शंका समाधान करीत म्हणाला.

“पण सर, या एवढ्या वृक्षांची मुळे जमिनीत जाऊन आपल्या इमारतींना, रस्त्यांना,लोहमार्गांना नुकसान तर पोहचणार नाहीस ना?” आणखी एक शंका उपस्थित झाली.

“नाही. अजिबात नाही. ही मूळे क्रॉक्रिट आणि खडप फोडून जाणार नाहीत. तर त्यांना वळसा घालून जातील. त्याबद्दल चिंता करण्याचे कारण नाही. ” रमाकांत याच्या आश्वत करण्याने सर्वांना हायसे वाटले.

चहा झाला आणि सभा संपली. दुपारपर्यंत देशातील प्रत्येक शहरातील मोकळ्या जागेवर खड्डे खणण्यास सुरूवात झाली. इतर मंडळी कलमे, रोपे आणि फांद्या आणायला गेले. कोणी पाण्याच्या व्यवस्थेला लागले. विश्वकल्याण संस्थेच्या या नव्या प्रकल्पाचे काम पाहून जनताही या कार्यात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

सुमितने आपल्या माणसांना सोबत घेऊन गावाच्या बाहेरील मोकळ्या जागेत सुरूच्या वृक्षांची लागवड सुरू केली. त्यांना गावकरी सहाय्य करीत होते. शंभर-दोनशे हात काम करीत हजारो खड्डे पाडत होते. त्याचवेळी काही सहकारी सुरूची रोपे आणायला गेली होती. कोणी कुंपण घालण्यात मग्न होते. सीमेचे खांब गाडले जात होते. चार

कूपनलिका तज्ज्ञ जमिनीच्या चार कोपऱ्यात कूपनलिका खणण्याच्या कामात गडले होते. सुमित त्यांना सूचना देत स्वतः हातभार लावत होता.

पुढच्या चार -पाच तासांत कुंपणाची एकेक बाजू तयार होत गेली. खड्ड्यात शेकडो रोपे लावली गेली. सुमितने पाच-पाच फुटांच्या अंतरावर हे खड्डे बनवून घेतले होते. प्रत्येक खड्ड्यात रोप लावताच त्यात पाणी टाकले जात होते. सुमित दोन थेंब जीवनरसाचे त्यात टाकत होता. नंतर इतर माणसे ते खड्डे बुजवित होते. प्रत्येक रोप मिनिटामिनिटाला वाढू लागले होते.

दुपारपर्यंत शेकडो हातांनी कुंपण पूर्ण केले. दहा हजार सुरूची झाडे लावली गेली. चार कोपऱ्यात चार कुपनलिका खोदून झाल्या. मोटर बसविण्यात आले. जवळच्या कचऱ्यापासून गॅस निर्मिती केंद्रातून गॅस घेऊन त्यावर मोटर सुरू करण्यात आले.

दुपारी काम संपले. काम करणा-यांना ग्रामपंचायतीने मिष्टान्न भोजनाची व्यवस्था केली होती. भर उन्हात कष्ट केल्यामुळे सर्वांना कडकडून भूक लागलेली. उघड्या भागात, खुल्या आकाशाखाली श्रम केल्यामुळे सर्व नसा मोकळ्या झाल्या होत्या. हाडे हलकी झाली होती. ज्यांना डोकेदुखी, गॅसेस,असिडिटिचा त्रास होता,तो त्रासही दूर झाला होता. सर्वांनी मौजमस्ती करीत भरपेट जेवण घेतले. मानवाने मानवासाठी एकत्र झटले की किती सुख मिळते हे त्यांच्या शिवाय अन्य कोणाला कळणार?

(१४)

मंगळवासिय

सुमित आणखी पन्नास माणसं घेऊन दुसऱ्या अवकाश यात्रेला निघाला. अजय नावाचा एक तरुण पुन्हा सोबत होता. रात्री दहाच्या सुमारास त्याच्या यानानं सातपूर सागर किनाऱ्यावरून उड्डाण केलं. या प्रवासात मंगळग्रहाचे दर्शन तसेच तेथील रहिवाशांशी परिचय हा मुख्य भाग होता. वेळ उरलाच तर गुरूची एक परिक्रमा पूर्ण करायची होती.

अवकाशाबद्दल कुतूहल असलेल्या प्रवाशांना या यात्रेचा प्रारंभ खूपच उत्तेजना देणारा ठरला. आपण अवकाशात संचार करतोय आणि काही तासांतच मंगळावर जाणार, तेथील मानवांशी बोलणार हा विचारच प्रत्येक अवकाशयात्रीला अवर्णनीय आनंद देणारा होता. प्रत्येकजण डोळे उघडे ठेवून यातून चौफेर दिसणाऱ्या अवकाशावर लक्ष ठेवून होते. काळ्याकुट्ट ईथर नावाच्या त्या अंधारातून त्यांचा प्रवास सुरू होता. वरखाली, मागेपुढे चौफेर चांदण्या दिसत होत्या. अधूनमधून उल्कापिंडे वाहत येताना दिसत होते. सगळं कसं एकदम अद्भुत!

नेहमीप्रमाणे या मंगळप्रवासाचे चालू चित्रिकरण दूरदर्शनवर सुरू होते. ज्यांना मंगळ प्रवासाला जाता आले नाही, ते घरी बसल्या या प्रवासाचा आनंद घेत होते. यानातले, यांनाबाहेर सर्व त्यांना

दूरदर्शनच्या पडद्यावर दिसत होते. पूर्ण विश्वच ह्या अवकाश प्रवासाची मजा घेत होते.

मंगळाची कक्षा जवळ आली तशी सर्वांच्या ह्रदयाची धडधड वाढू लागली. मंगळावर जात आहोत,मंगळावर पाय ठेवायला मिळणार, काही क्षणात मंगळावर संचार करू, तेथील जीवसृष्टीची ओळख करून घेऊ, तेथील मानवाशी बोलू, काय बोलू? कसं बोलू? कसा असेल हा संवाद? या विचारांनी त्यांची ह्यदये उचंबळून येत होती आणि यानानं लालसर धुराच्या लोटात प्रवेश केला. लाल वातावरणातून ते जाऊ लागले. काहीच दिसेना. सर्व दिशा तांबड्या रूधीरात झाकोळल्या गेल्या.

पुढच्या काही सेकंदात मंगळाची धरती दिसू लागली. डोंगर-दऱ्या स्पष्ट दिसू लागल्या. यानानं मोकळ्या मैदानात उतरण केलं. तेथे अपेक्षेप्रमाणे रात्र होती. परिसर निर्जन होता. दूरदूरपर्यंत चिटपाखरूही दिसत नव्हतं. सुमितनं यान बंद केलं. मागं वळून तो प्रवाशांना म्हणाला,"आता आपण बाहेर पडणार आहोत. लक्षात ठेवा, इथल्या कोणत्याही पदार्थाला हात लावायचा नाही. येथील मानवाला ते आवडणार नाही. सावध आणि स्थिर रहावे. येथील मानव आपल्याला बघून भीतील किंवा आपण त्यांना बघून भिण्याची शक्यता आहे. "

सुमितनं एकदा बाहेर लक्ष टाकलं. कळ थांबून दार उघडलं. सर्व प्रवासी बाहेर पडले. सुमित शेवटी बाहेर पडला. दार बंद केलं.

"हं चला. त्या तेथे टेकडीच्या पलीकडे मानववस्ती आहे. तेथे जाऊ या. लक्षात ठेवा. आपण त्यांची भाषा जाणत नाही. "

अवकाशयात्री समोरच्या टेकडीच्या दिशेने चालू लागले. वाळूत मागच्या वेळेला आलेल्या मानवाच्या पावलांचे ठसे दिसत होते. मंगळाच्या चंद्राच्या उजेडात तसेच यानाच्या उजेडात हे यात्री समोरची ती छोटीशी टेकडी चढून गेले. टेकडी खडकाची होती. पायथ्याशी वाळू. टेकडीवर पोहचताच त्यांना वस्ती दिसली.

"ती बघा मानववस्ती. आता आपण तेथे जाऊ या. "

सुमितच्या म्हणण्याचा अवकाश,यात्रींनी खालच्या दिशेने प्रवास सुरु केला. काही मिनिटांत त्यांची टेकडी उतरून झाली. आता ते मैदानी भागात आले. वस्तीच्या दिशेने चालताना अजय,जो सहप्रवासी होता,तो सुमितला चेष्टेच्या सुरात म्हणाला,"कधी एकदाचा या मानववस्तीत जातोय असं झालंय. "

"का रे? एवढी उत्सुकता कशाला?" सुमितने विचारले.

"अरे सुमित, मला विवाह करायचा आहे. आपल्या पृथ्वीवर कोणीही मला लग्नासाठी मुलगी देत नाही. तेव्हा इथली एखादी मुलगी पसंत करतो आणि लावतो लग्न. "अजयनं आपला विचार व्यक्त केला.

"अरे व्वा! मंगळावरचा जावई व्हायची इच्छा दिसते तुझी. विचार चांगला आहे. मला वाटते, इथे आपल्या पृथ्वीसारख्याच सुंदर मुली असाव्यात. पण यार पृथ्वीवर पत्रिकेत मंगळ असला की त्या मुलीशी कोणीही लग्न करायला धजत नाही. अशा परिस्थितीत या मंगळ ग्रहावरची मुलगी चालेल का पृथ्वीवर?" सुमितने त्याला कात्रीत पकडले. तोही हुशार होता. हजरजबाबी होता. त्यानं पटकन उत्तर

दिलं, “हे मी तुला मागच्या फेरीत सांगितले नव्हते का? का चालणार नाही? मागच्या वेळेस तुला जे उत्तर दिले तेच आताही देतो. आपल्या पृथ्वीवर आंतरजातीय विवाह चालतो. आंतरराज्यीय विवाह चालतो. आंतरराष्ट्रीय विवाह चालतो तर आंतरग्रहीय विवाह का चालणार नाही? नक्कीच चालेल. चालेल काय,धावेल म्हण. रातोरात मी जगातील प्रत्येक व्यक्तीच्या चर्चेत जाईल. जेथे तेथे माझीच चर्चा. ”अजय स्वप्नात हरवल्या सारखा बोलत होता.

“म्हणजे तुला प्रसिद्ध होण्यासाठी लग्न करायचे आहे तर?”

“तसं नाही. मला लग्न करायचेच आहे. ”

ते वस्तीजवळ आले. वस्तीजवळ झाडे झुडपे होती. पृथ्वीवरच्या वृक्षांसारखीच पण उंच आणि राठ. पृथ्वीवरच्या कु-हाडीने सहज न कापली जाणारी. वस्ती पक्क्या घरांची होती. ती घरं मंगळावरची नैसर्गिक संसाधने वापरून बनविण्यात आलेली होती. धरतीवरच्या घरासारखीच ती होती. थोडाबहुत फरक रचनेत, बांधकाम साहित्यात , बांधकाम पद्धतीत होता.

सुमितसह अवकाशयात्री मंगळवस्तीत शिरले. रात्रीची वस्ती गाढ झोपी गेलेली. तेथे रात्रीची ज्याला पाहिल त्याला भूंकणारी कुत्री नव्हती. त्या वस्तीला कोणी संरक्षण देणारा पहारेकरीही नव्हता.

“बघा, हे मंगळवासी किती सुखी आहेत! पहारेकरी नाही. पोलीसांची आवश्यकता नाही. कसलीही चिंता नाही. आपल्या पृथ्वीवर सुद्धा असे सुखाचे दिवस आपल्याला आणायचे आहेत. प्रत्येकाला सुखाची झोप मिळायला हवी. प्रत्येकाला पुरेशी भूक

लागायला हवी. पोटाला अन्न मिळायला हवे. खाल्लेले अन्न शरीराला लागायला हवे. " सुमित यात्रींना म्हणाला.

"सुमित, कोणालातरी हाक मारून उठव ना! तुला येते का यांची भाषा?" एकाने सुचवले.

"हो येते ना! आता उठवतो बघ. "सुमित एका घराच्या दारात गेला. दारात थाप मारीत बोलू लागला,"मणीको मतहेआ मका मतराघ? ममी मथ्वीपृ मसीवा महेआ. मम्हीआ मलाम्हातु मलायाटाभे मलोआ मतहेआ. "

सुमितचा आवाज ऐकून आत कोणीतरी उठले. दार उघडले गेले आणि..... तो क्षण आला. संपूर्ण विश्वाच्या इतिहासातील पहिला क्षण! सुवर्ण क्षण! दोन भिन्न ग्रहवासिय एकमेकांच्या समोर होते. दोघेही मानव. या सृष्टीतील एक जीव. वातावरणानुसार किंचित शरीर ठेवणीत,बांध्यात फरक. जसा फरक वाळवंटातील,बर्फाळ प्रदेशातील, दलदलीच्या प्रदेशातील, वनातील,मैदानी भागातील, डोंगरातील मानवात असतो तसाच फरक या दोन ग्रहवासियांत होता.

तो मंगळवासिय सुमितला पाहून भ्यायला. सुमितच्या हे लक्षात आले. तो हात जोडून म्हणाला,"मऊभी मकान. मम्हीआ मलाम्हातु मलायटाभे मयलोआ. मसत्रा मलायद्या मव्हेन. "

सुमितला आपली भाषा येतेय आणि वर त्यानं हात जोडलेत म्हणजेच नक्कीच तो हानीकारक नाही. हे त्या मंगळवासियाने पाहिले. त्यानं दारातून बाहेर डोकावून पाहिले. बाहेर आणखी पन्नास माणसं उभी असलेली दिसली.

. तो सुमितला म्हणाला," मपृथ्वी मयसिवा मतहा मततादजो मनकूऐ मतोहो. "

"महो. मम्हीआ मपृथ्वी मचयसिवा मतहोआ. "

त्याला आनंद झाला. तो ओरडला,"मठाऊ मठाऊ. मपृथ्वी मयसिवा मलाल्याआ मलायटाभे मतलेआ. मरत्कामच मलाझा. " त्याच्या ओरडण्याने त्याच्या घरातील माणसं जागी झाली. खूप भयभीत झाली. त्यांच्या आयुष्यात मध्यरात्री असे गडबडून जागं व्हायची ही त्यांची पहिलीच वेळ होती. त्यात सुमित आणि सहकाऱ्यांना पाहून त्यांच्या भयात वृध्दी झाली.

"मीऊभी मकान. मते मलेपआ मरीजाशे मतहेआ. मथ्वीपृ मनरूव मतलेआ. " मंगळवासिने आपल्या परिवारास आश्वस्त केलं आणि तेव्हा त्यांचं भय कमी झालं. पण गोंधळ मात्र होता.

"मलाम्हाआ मतरीत्व मनघूनि मणेजा महेआ. मणपआ मरहेबा मनार्वांस मटूभे. "सुमितनं सुचवलं आणि ते कुटुंब बाहेर आले. त्यांच्याकुटुंब प्रमुखाने जोरजोरात हाका मारायला सुरुवात केली. " मथ्वीपृ मयसिवा मलेआ. मथ्वीपृ मयसिवा मलेआ. "

त्याचा आवाज ऐकून ती वस्ती जागी झाली. घरापुढील अंगणात गोळा झाली. त्यांचे लक्ष स्वकीयांकडे गेलेच परंतु त्या परकीयांकडेही गेले.

"मचहे मका मते मतीरध मयसीवा?" एकाने विचारले.

"महो मचहे मते. "

पूर्ण वस्ती सुमित आणि मंडळींना एकटक पाहू लागली. क्षणभर शांतता पसरली. दोन्हीही मानव समूह एकमेकांना डोळे फाडून पाहत होते. आजवर इतर ग्रहांवर जीव आहेत हे ऐकून होतो. आज प्रत्यक्ष बघायला मिळाले. जगाच्या इतिहासातील हा अती महत्वाचा क्षण होता.

“सुमित,आमचा विश्वासच बसत नाही रे. आपल्यासारखीच माणसं. भाषा वगळता काहीच फरक नाही. ” सुमित सोबत आलेल्यापैकी एकजण आश्चर्य व्यक्त करत म्हणाला.

“हो तर . आहे ना चमत्कार. हे विश्व अथांग आहे. अनेक आश्चर्यांनी भरलेले आहे. त्यातील हे एक आश्चर्य. ” सुमित सर्वांना उद्देशून म्हणाला.

“ए सुमित, बाकीच्या ग्रहांवर सुद्धा माणसं असतील का?” एकाने विचारले. यांचे बोलणे मंगळवासियांना कळले असावे. त्यापैकी एक म्हणाला,”अहो,मरतइ मरवहाग्र मलखिदे मवजीस महेआ. मल्यापआ महीखेरसा मणिआ महीळेरानि मतहेआ. ”

“मलाम्हातु मम्हीआ मतोलबो मते मसेक मलेजमस?” सुमित ने विचारले. यावर मंगळवासियाने त्वरीत उत्तर दिले,” मही मचीयादह्य मषाभा महेआ. ”

सुमितच्या चेहऱ्यावर हास्य उमटले. त्याने विचारले,”मम्हीतु मचढेवए मतहाआ मका? मकीबा मवजी मतहीना मका?”

“मतहेआ मना! मनथूइ मरदू. मच्यामआ मचखेरसा मवजी मतहेआ. महा मळरागडों मगभा महेआ. ”

त्याचे शब्द ऐकून सुमितचा चेहरा खिळला. इतर मानव आणि जीव आहेत म्हटल्यावर मंगळावर पुष्कळशी जीवसृष्टी आहे हे सिद्ध झाले. त्याने पुन्हा विचारले,” मम्हीतु मततखा मयका? मतापि मयका? “

“मलथीये मचीतीस्पनव मनेपा,मलेफु,मळेफ,मडखो, मयाबी,मतोखा. मलज मतोपि. ”त्याने उत्तर दिले.

“मलज? मठेकु महेआ मलज? मवाखदा. मलायप्या मद्या. ” सुमित अधीर होऊन विचारता झाला. याबरोबर त्या मानवरूपी मंगळवासियाची मुलगी धावत घरात गेली. एका मातीपासून बनविलेल्या भांड्यात पाणी आणले. सुमितने अधीर होऊन भांडे हातात घेतले. सोबत आलेल्या सर्वांना दाखवले. ”बघा, हे पाणी आहे. मंगळावरचे पाणी. ”

सर्व अवकाशयात्री दुसऱ्या आश्चर्याचा सामना करीत होते. त्यांना मंगळावरच्या मानवानंतर मंगळावरचे पाणी बघायला मिळत होते. जो तो स्वतः च्या हातात भांडे घेऊन पाणी बघू लागले. त्यांची धांदल बघून मंगळवासियांना हसू आले. ”अरे सुमित, हे तर आपल्या पाण्यासारखेच पाणी आहे रे. पण याची चव कशी असेल?”

“मी पिऊन बघतो. ” सुमित भांडे हातात घेऊन म्हणाला.

“अरे नको. पिऊ नकोस. तुला काही झाले मग? “ एकजण भीतभीत म्हणाला.

“काही होत नाही. पाणीच आहे हे. ”

सुमितने निर्धाराने भांडे ओठाला लावले. गटागट पाणी प्यायला. पृथ्वीवासिय- मंगळवासिय त्याच्याकडे एकटक पाहू लागले. सुमितने भांडे रिकामी केले.

“व्वा! छान चव आहे! इथून थोडं पाणी पृथ्वीवर घेऊन जाऊ या अभ्यासाला. ”

सुमितला काहीही विपरीत झाले नाही. सर्वांना आनंद झाला.

“अरे सुमित, इथे वस्ती वस्ती करणे सोपे आहे तर. ”एकजण म्हणाला.

“नाही. हे वाटतं तितकं सोपं नाही. आपण यानात बसलो होतो म्हणून इथल्या वातावरणात जगण्याची क्षमता आपल्याला प्राप्त झाली आहे. प्रत्यक्षात राहण्यायोग्य परिस्थिती नाही. आपल्यासाठी पृथ्वी आहे. यांच्यासाठी मंगळ. हा एकमेकांच्या ग्रहांवर राहण्यायोग्य शरीर तयार केले तर ते शक्य आहे. भविष्यात ते आपण करूच. ”

सुमितने मंगळवासियांकडे वळून विचारले,”महे मलज मनठूको मतानआ?”

“मत्या मथेति मरपूरभ मलज महेआ. ”

त्याने दाखवलेल्या दिशेकडे सुमितची नजर गेली. पलीकडे पाणी होते. वस्तीकडून मात्र दिसत नव्हते.

सुमितने सर्वांना एकत्र समूहात उभे केले. मंगळवासियांना खाली बसवले. त्यांच्या मागे पृथ्वीवासिय उभे केले. स्वत: ही त्यात जाऊन उभा राहिला. हातातील रिमोट कंट्रोलने समोर उभ्या केलेल्या

कॅमेऱ्याची कळ दाबताच पटापट चार-पाच फोटो काढले गेले. मंगळवासिय बघतच राहिले. त्यातील दोन फोटोंची प्रिंट काढून त्यांच्याकडे देऊन सुमित म्हणाला,"महे मत्या मच्यारदू मनावांनमा मद्या. मवेणाम्ह मथ्वीपृ मयसिवा मचामाप्रे मशदेसं मनऊघे मलेआ मतेहो. मन्हापु मलतीये. "

सुमितने त्या वस्ती भोवती काही शक्तीशाली कॅमेरे बसवले. त्या मंगळवासियांसोबत जाऊन एक कॅमेरा जलस्रोताभोवतीच्या एका जवळच्या वृक्षावर बसविला.

"मम्हीआ मच्याया मनेतीदम मथ्वीपृ मनायांसिवा महे मर्वस मवूखदा. मनांत्या मरवळागमं मपाणी मव मवजी मष्टीसृ महेआ महे मलटेप. "

सुमितने यानात जाऊन एक मोबाईल संदेश ग्रहण करणारी डीश आणली. उंच अशा डोंगरावर घट्ट बसवली. मंगळवासियांच्या हातात एक अत्याधुनिक मोबाईल देऊन सांगितले,"मत्या मनावांनमा मगासां,मया वस्तूव मरमोस मभेऊ मनहूरा महा मनटब मबादा. मम्हीतु मशीच्यामआ मलूबो मलतीकश. "

सुमितने आपल्या सोबत मंगळावरचे पाणी, अन्न आणि अन्य वस्तू घेतल्या. प्रेमाची भेट म्हणून त्यांना गुलाब पुष्पे,श्रीखंडाचे डबे, काही चॉकलेट्स दिल्या. त्यांनी मंगळवासियांचा निरोप घेतला. मोबाईलचे बटन दाबायची आठवण करून दिली. सर्व यात्री यानात जाऊन बसले. यानाने मंगळाच्या पृष्ठभागावरून आकाशात उड्डाण

केले. तोपर्यंत त्यांना मंगळावर चार तास झाले होते. या मंगळयात्रेणे सर्वजण भारावून गेले होते.

“खरंच यार मंगळावर सजीव आहेत. मानव आहेत. नवल वाटते. इतर ग्रहांवर देखील असतील काय?” एकाने विचारले.

“हो इतर ग्रहांवर सुद्धा आहेत. दुसऱ्या आकाशगंगेतील एका ग्रहावरच्या जीवाशी आपला संपर्क झाला आहे. पुढची यात्रा तेथेच आहे. तूर्तास या मंगळवासियांशी संबंध वाढवू. एकमेकांच्या ग्रहांवर येण्या- जाण्याची, राहण्याची अनुकूलता प्रस्थापित करू. सूर्यमालेतील तीन व चार क्रमांकाचे हे दोघे भाऊ एकत्र आले की फार मोठे यश मिळविण्यासारखे होईल. ” सुमित म्हणाला,” त्यांच्या वस्तीत लावलेल्या कॅमेऱ्याच्या मदतीने मंगळावरच्या हालचाली पाहता येईल. तेथील पाण्याचे स्त्रोत आपल्या धरतीवरून पाहता येईल. मोबाईल दिलेला आहे आहे त्यांना. तेथील प्रगत लोक आपल्याशी संपर्क कधी साधतात असे झालेय. ”

“अरे सुमित, असे वाटतंय की आपण मंगळावर नव्हे तर कोठेतरी एखाद्या पृथ्वीवरच्या खेड्यात जाऊन आलोय. किती साधर्म्य होते तेथील आणि येथील परिस्थितीत!” अजय उत्साहित होत म्हणाला.

“खरंच आपल्या आयुष्यातील हा एक सुवर्णक्षण आहे. मोठ्या मुश्कीलीने महाराष्ट्राबाहेर जायला मिळते. आपला भारत देश कसा आहे? हे संपूर्ण आयुष्यात बघायला मिळत नाही. तेथे विदेश काय बघायला मिळेल? अशा परिस्थितीत थोड्याशा पैशाच्या मोबदल्यात

दुसऱ्या ग्रहावर जायला मिळाले. तेथील जीव पहायला मिळाले. हे सर्व अद्भुत आहे. " एक यात्री उत्तेजित होऊन म्हणाला.

"हे विश्व स्वत: एक अद्भुत आहे. अनेक रहस्यांनी भरलेले आहे. मंगळवारी हा त्याचा छोटासा नमुना होता. अजून असे अनेक रहस्ये आपल्या पुढ्यात उलगडी जाणार आहेत. लक्ष ठेवा. विज्ञानाच्या प्रगतीवर लक्ष ठेवा. मन खुश होईल. आनंदाने भरून जाईल. " सुमित म्हणाला.

यान धरतीच्या दिशेने निघाले.

सुमित विचार चक्रात गढून गेला. 'खरंच मंगळावर प्रगत माणसं असतील का? आपल्यासारखी शहरात आधुनिक पद्धतीच्या इमारतीत राहत असतील काय? त्यांच्याकडे आपल्या सारखीच अवकाश याने असतील काय? तेही अवकाश मोहिमा आखत असतील काय? तेही इतर ग्रहांवर गेले असतील काय? ते कधी पृथ्वीवर आले असतील काय? त्याचा अवकाश मोहिमेचा उद्देश काय असेल?'

(१५)

आढावा बैठक

सुमितच्या मंगळवारीने 'विश्वकल्याण' संघटनेची लोकप्रियता खूपच वाढू लागली होती. ज्याच्या- त्याच्या मुखात मंगळवारीचाच विषय होता. विश्वातल्या प्रत्येक मानवाने ही मंगळवारी दूरचित्रवाहीणीवर पाहिली होती. आताही नित्य पाहत आहेत. सुमितने खूप मोठे कार्य केले होते. त्याने मंगळग्रहावर मोक्याच्या ठिकाणी कॅमेरे बसवलेले होते. त्याच्या माध्यमातून मंगळावरची प्रत्येक घटना, तेथील दिवसरात्र, तेथील मानवाचे राहणीमान, तेथील पाण्याचे स्रोत हे सर्व रोज दूरचित्रवाहीणीवर दाखवले जात होते. अती शहाण्या काहींना हे पटत नव्हते. हे सर्व त्यांना खोटं वाटायचे. हे मंगळ नसून पृथ्वीवरचेच एखादे ठिकाण असून येथीलच माणसांना घेऊन हे मंगळवारीचे नाटक रचण्यात आले आहे, असे ते वावडी उठवू लागले. परंतु बहुसंख्य जनता विश्वकल्याण संघटनेच्या बाजूला होती. त्यांना विश्वकल्याणाच्या प्रत्येक कृतीवर विश्वास होता.

एकीकडे भारतात या मंगळवारीबद्दल जल्लोष होत होता. दुसरीकडे काही पोटदुखी माणसं याचा विरोध करत होती. या मंगळवारी चे श्रेय आपल्याला न मिळाल्याने चीन, अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, नेदरलँड्स सारखे देश आतून

जळफळाट करत होते. ही मंगळवारी सत्य होती हे त्यांना माहीत होते परंतु भारताला हे श्रेय गेले म्हणून त्यांचा तीळपापड होत होता. त्यांनीआपापल्या परीने भारताच्या होत असलेल्या या प्रगतीला रोखण्याचा वीडा उचलला. योजना बनवल्या जाऊ लागल्या. गुप्तहेर कामाला लागले. परंतु त्या सात अज्ञात लोकांची संपर्क यंत्रणा एवढी सक्षम होती की त्यांना क्षणात या देशांच्या कारवाईचा माग लागला.

या संदर्भात गेल्या दोन- तीन वर्षांत केलेल्या कामाचा आढावा घेण्यासाठी सर्व प्रतिनिधींची सभा अवकाशातील गुप्त केंद्रांवर भरली होती. त्यावर दूरचित्रवाहीणीच्या माध्यमातून ते सात अज्ञात लोक लक्ष ठेवून होते. सभा मानवाच्या अध्यक्षतेखाली भरलेली होती. मानव बोलू लागला," आपल्या या विश्वकल्याणाच्या कार्याला तीन वर्षे पूर्ण झाली. या तीन वर्षांत आपण बरीच कामे केली. बऱ्याच समस्या मूळासहीत उपटून काढल्या. आता यापुढे आणखी तोडीसतोड कार्य हाती घेणे आहे. तत्पूर्वी झालेल्या कामाचा आढावा घेऊ या. कुठे काही त्रुटी राहिल्या आहेत का? याचा शोध घेता येईल. सुमित, प्रथम तू सुरुवात कर. "

सुमित उभा राहिला. " आपण प्रथम सौर ऊर्जेचा प्रचार सुरू केला. सौर ऊर्जेवर चालणारी यंत्रे विकसित करून ती विक्रीस काढली. जनतेने ती खरेदी केली. आपापल्या घरात बसवली. वीजेच्या खपाची, वीजेच्या टंचाईची समस्या कायमची दूर झाली. आज जवळपास भारतातील बारा करोड परिवारात ही सौरऊर्जा वापरली जाते. विदेशातही मागणी वाढली. विदेशात दोन कोटी संचाचा खप झाला.

अद्याप खप चालू आहे. या सौरऊर्जा प्रकल्पामुळे औष्णिक विद्युत केंद्रे, जलविद्युत केंद्रे आणि अणु विद्युत केंद्रे बंद झाली. त्याऐवजी शासनाच्या मार्फत मोठ्या प्रमाणात सौरऊर्जा निर्मित वीज वापरत होते. पर्यावरणाचे प्रदूषण थांबले. परिस्थितीकीय संतुलन राखले जाऊ लागले. प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या पात्रतेनुसार काम देण्यात आले. दिवसाचे सोळा तास काम. आठ तास विश्रांती. घरी फक्त महिन्यातून एकदा जायला परवानगी देण्यात आली. त्यामुळे एक प्रकारची शिस्त लागली. कामे जलद होऊ लागली. प्रत्येकाला भरपूर पगार मिळू लागला. तो त्यांच्या बँक खात्यात जमा होऊ लागला. बॅकेचे व्यवहार वाढले. बॅकेच्या शाखा वाढल्या. चोवीस तास तीनशे पासष्ट दिवस सेवा देणाऱ्या बँका निघाल्या. साहजिकच रोजगार वाढला. कर्मचारी वाढले. म्हणजेच कोणीही बेकार राहिले नाही. मिळकत भरपूर वाढली. पर्यावरणाचे संवर्धन झाले. पण एक गंभीर समस्या निर्माण झाली. अणुभट्ट्या बंद झाल्या. मात्र त्यातील घातक किरणोत्सारी पदार्थ,तो अणुकचरा, त्या भट्ट्या हे सर्व तसेच पडून आहे. ते मानवास आणि पर्यावरणास घातक आहे. ते कधीही आपल्या घात करू शकते. "

"हो ठाऊक आहे. "मानव म्हणाला,"त्याचाही बंदोबस्त करण्यासाठी आपले शास्त्रज्ञ धडपडताहेत. नव्वद टक्के काम पूर्ण झाले आहे. मला वाटते एक दोन महिन्यांत ते पूर्ण होईल. मग त्याचीही विल्हेवाट लावली जाईल. त्यानंतर कोणीही विश्वास ठेवणार नाही की कधीकाळी आपल्याकडे अणुभट्ट्या होत्या म्हणून. तूर्तास त्यांची निगा राखली पाहिजे. तेथे पहारा असतो ना?" मानवने विचारले.

"होय सर. आपल्या भारत सरकारचे लष्कर पहारा देत आहेत. त्याला बाहेरून आपली माणसं संरक्षण देत आहेत. शिवाय चोवीस तास उपग्रहांच्या माध्यमातून आपण त्यावर लक्ष ठेवून आहोत. " चॅटर्जी म्हणाला.

"उत्तम! आता पुढचं तुम्ही सांगा,खान. " मानव म्हणाला.

खान उभा राहिला. "सर, नंतर आपण गावोगावी,शहरोशहरी पक्के रस्ते बांधण्याचा प्रकल्प हाती घेतला. सिमेंट आणि खडी मध्ये आपण तयार केलेले रसायन मिश्रित केल्याने बांधकाम एवढे मजबूत झाले की पन्नास वर्षे त्या रस्त्यांना बघायला नको. एवढेच नव्हे तर त्याखाली पाण्याची,गॅसची,इंटरनेटची, संगणकाची, केबल टाकून घेतली. पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरावे म्हणून प्रत्येक रस्त्यावर वीस-वीस फुटांवर एक फूट व्यासाची शंभर फूट खोल विहीरी बनवल्या. त्यांच्या माध्यमातून रस्त्यावरचे सारे पाणी जमिनीत जाऊ लागले. पावसाच्या पाण्याचा निचरा होऊ लागला. "

"छान! पुढचं गुडाप्पा तुम्ही सांगा. "

गुंडाप्पा उभी राहिला. "सर, मग आपण जलप्रदूषण रोखण्याची योजना आखली. शहरातील सांडपाणी शुद्ध करून कशा रीतीने जलस्त्रोतात सोडता येईल हे पाहिले. तशी यंत्रणा निर्माण करून कार्यान्वित केली. प्रत्येक सोसायटीचा, प्रत्येक कारखान्यांचा सांडपाणी शुद्ध होते आहे. तेच पाणी पुन्हा वापरले जाते. उरलेली घाण घनरूपात असल्याने गाडून टाकली जाते. सागर, नद्या दूषित होण्यापासून वाचू लागल्या. "

गुंडाप्पाचे बोलणे संपल्यावर के. राजन बोलण्यास उभा राहिला. "सर, त्यानंतर आपण भारतातील सर्व लहान मोठ्या नद्या मोठमोठे भूमिगत पाइपलाइन टाकून एकमेकांना जोडल्या. त्यामुळे पूरावर नियंत्रण मिळविता आले तर दुष्काळग्रस्त भागात पाणी देता आले. विदर्भ, मराठवाडा, राजस्थान तसेच इतर नेहमी दुष्काळग्रस्त राहणाऱ्या भागात नंदनवन फुलविता आले. आता खेडी ओस पडत नाहीत. शेतीला चौफेर बारमाही पाणी मिळते. जनता पाण्याच्या बाबतीत सुखी झाली. "

"हा, आता व्यंकट तुम्ही बोला. "मानवने व्यंकटला उठवले.

"सर, जलप्रदूषणानंतर आपण वायूप्रदूषणावर उपाय योजले. देशातील प्रत्येक रिकामा कोपरा हिरवाईने भरून काढला. आवश्यकतेनुसार छोट्या छोट्या गवतापासून ते वड, पिंपळ सारख्या मोठ्या वृक्षापर्यंत लागवड केली. असल्या नव्याने बनविलेल्या रसायनामुळे झाडे त्वरीत मोठी होऊ लागली. गाव,शहर,पाडा, कसबा, रस्ते, रेल्वेमार्ग,हवाईमार्ग जेथे जेथे म्हणून रिकामी जागा होती तेथे झाडे लावून ती वाढवली. देशातील सर्व महामार्गालगत तर दोन्ही बाजूला आंबा, चिंच,वड, पिंपळ अशी डेरेदार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. याचा परिणाम असा झाला की कारखाने, वाहने यातून निघणाऱ्या घातक वायूंचे नियंत्रण झाले. पर्यावरण शुद्ध झाले. पाऊस वेळेवर आणि पुरेसा पडू लागला. आपण या जैवतंत्रज्ञानाचा वापर करून जलवनस्पतीचेही संवर्धन केले. ज्या वनस्पती पाण्यातील दूषितपणा घालवितात,त्यांची पाण्यात लागवड करून वाढ केली.

समुद्रकिनारी व नद्यांच्या किनारी जेथे शहर आणि गाव आहे, जेथे पाणी जास्त दूषित होते, तेथे ह्या वनस्पती उत्तमरीत्या कार्य पार पाडू लागल्या आहेत. जलप्रदूषणही आता आटोक्यात आहे. "

मानवच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमडले. तो बोलू लागला," आता आपल्याला मुंबई, दिल्ली, कोलकाता, चेन्नई या महानगरांना जोडणाऱ्या महामार्गावर वड, आंबा, चिंच, पिंपळ, अशा डेरेदार वृक्षांची नव्याने लागवड करायची आहे. प्रत्येक वीस किमी अंतरावर एक असा महाकाय वृक्ष असेल ज्याची उंची हजार फूट,ज्याचा घेर शंभर फूट असेल. त्याच्या मजबूत खोडातून वाहने जाण्यासाठी रस्ता बनवायचा. वाहने त्याच्या खोडातून येजा करतील. विचार करा. हे दृश्य किती विलोभनीय असेल. असे महाकाय वृक्ष पर्यावरण किती साफ करतील! शुद्ध करतील! कितीतरी पक्ष्यांना आधार देतील. हवा थंड ठेवतील. सृष्टीचे सौंदर्य वाढेल. हे वृक्ष आपल्याला डारनॉसॉरस युगाची आठवण देतील. "

मानव भविष्यात हरवल्यासारखा झाला. क्षणभरच. पुन्हा भानावर येऊन म्हणाला," आपण कचऱ्यापासून गॅस निर्मितीची योजना आखली. एका दगडात बरेच पक्षी मेले. शहरातील, गावातील सर्व घाण निघून गेली. वस्त्या चकाचक झाल्या. गॅसची टंचाई दूर झाली. प्रत्येकाला वाजवी दरात हवे तेवढे गॅस मिळू लागला. वाहनधारकांनी आपली वाहने गॅसवर केली. डिझेल- पेट्रोलचा खप वाचला. देशाला कच्च्या तेलाची आयात कमी करावी लागली. त्यामुळे महागाई नियंत्रणात राहीली. या खनिज तेलाची बचत होऊ लागली.

अद्याप पन्नास टक्के गॅस वापर झालेला आहे. बाकी होईल हळूहळू. यानंतर आपण सामाजिक क्षेत्रात काम करू लागलो. स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी सर्व इस्पितळावर नजर ठेवून दिली. सोनोग्राफी यंत्राचा गैरवापर करणाऱ्याला शासन केले. अनेक ठिकाणी विशेष जनजागृती मोहीम राबवली. स्त्रियांचे महत्त्व पटवून दिले. स्त्रियांचा मान राखण्यास शिकवले. परिणामी स्त्री भ्रूणहत्या रोखली गेली. लोक कन्येचे जतन करू लागले. या क्षेत्रात आपल्याला आणखी कार्य करायचे आहे. विशेष म्हणजे आपण चांद्रमोहिम आखली. मंगळवारी केली. सामान्य लोकांना तेथे नेले. याचि देही याची डोळा जगाला विश्वात इतरत्र जीवसृष्टी आहे हे सिद्ध करून दाखवले. या सर्व कामांत लाखो करोडोंनी रोजगार मिळाला. शिस्तीत काम करण्याची सवय निर्माण झाली.

आणि हो, आपण मिळवलेल्या नफ्यातून भारत सरकारला भरपूर कर दिला. त्यातून भारत सरकारने आपले संरक्षण दल सुसज्ज केले. लाखो तरूण सैन्यात भरती झाले. मुंबईच्या कुलाब्यापासून भारताच्या सीमेवर फिरून पुन्हा त्या कुलाब्यापर्यंत प्रत्येक दहा किमीच्या क्षेत्रात दहा शस्त्रधारी सैन्य चोवीस तास पहारा देत आहेत. डोंगर,दऱ्या, नद्या, वाळवंट,सागर या सर्वच क्षेत्रात आपले सैन्य पहारा देऊन आहेत. अती दुर्गम भागातही सैन्य आहे. जंगलातही सैन्य तळ ठोकून आहे. त्यांच्याजवळ अत्याधुनिक संगणक यंत्रणा, भ्रमणध्वनी, त्वरीत रसद पुरविणारी यंत्रणा, वैद्यकीय मदत देणारी यंत्रणा आहे.

त्यामुळे आपण आता सर्व बाजूंनी सुरक्षित झालो आहोत. " परमार मध्येच म्हणाला.

"पण सर, या आपल्या प्रगतीमुळे स्वतः ला महासत्ताक म्हणवून घेणारे देश आणि महासत्ताकाच्या स्पर्धेत असणारे देश खूप चिडलेत. यूनोमध्ये आपल्यावर ते आगपाखड करीत आहेत. " कुलदीप सिंह चिंतीत होऊन म्हणाला.

"करू दे त्यांना आगपाखड. भारत महासत्ताक होता. महासत्ताक होईल. सांस्कृतिकदृष्ट्या वैज्ञानिक. आर्थिकदृट्या. आपला शेवटचा उद्देश तरी काय आहे? केवळ भारताची उन्नती नव्हे तर मानवाची उन्नती. मानवाच्या, या पृथ्वीच्या सर्व समस्या दूर करणे हा आपला खरा उद्देश आहे. पन्नास टक्के काम पूर्ण झाले आहे. बाकी काम शिल्लक आहे. " मानव शांत मुद्रेने म्हणाला.

"सर,आपली पुढची योजना काय आहे?" चंद्राने विचारले.

"दहशतवाद, आरोग्य, शिक्षण,महिलांचे हित, शिस्त, भ्रष्टाचार निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन,विज्ञानाचा पुरस्कार, वैश्विक बंधुता,चंद्रावर वस्ती, मंगळवारी गुरू,शनि यांच्या चंद्रावर वारी आणि अर्थातच सॅट-९ या ओमेगाच्या ग्रहावर दुसऱ्या आकाशगंगेत जाणे ही आपली पुढची कामं आहेत. तुम्ही तयार आहेत ना?" मानवने सर्वांना आवाहन केले.

"होय आम्ही तयार आहोत. "सर्वजण एका सुरात म्हणाले

(१६)

पाठिंबा मिळाला

अल्पावधीतच वैज्ञानिक क्षेत्रात भारताने घेतलेल्या उत्तुंग झेपेमुळे जगातील इतर देशांचे जळफळाट करणे साहजिकच होते. युनोच्या आमसभेत भारताची सर्व बाजूंनी कोंडी करण्याचा काही मोजक्या देशांनी प्रयत्न केला. अमेरिकेला आपले महासत्ताक हे पद जाण्याचे भय होते. जगावरचे आपले नियंत्रण त्यांना गमवायचे नव्हते. तंत्रज्ञानात आजवर अग्रेसर म्हणून मिरविणारे जपान, चीन, फ्रान्स व इतर युरोपीय देश गप्प कसे राहतील? भारताची शस्त्रसज्जता, संरक्षण दलात केलेली वाढ पाकिस्तान, चीन, बांगलादेश यांना खुपसत होती. त्यांनी तर युनोच्या सभेत भारतावर शस्त्र कपातीची मागणी केली. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री अब्दुल कादीर टेबल आपटून बोलला,"भारताची शस्त्रनिर्मिती बंद करायला लावावी. त्यांचे सैन्यबळ कपात करावी. हे आपल्या सर्वांसाठी धोक्याचे आहे. यामुळे तिसरे महायुद्ध भडकण्याची शक्यता आहे. "

अब्दुल कादीरच्या या मागणीला चीनसहित इतर देशांनी पाठिंबा दिला. तेव्हा भारताचे परराष्ट्रमंत्री उत्तम डांबरे म्हणाले,"मानवाचा इतिहास सुरू झाल्यापासून आजवर असे कधीच बघायला किंवा ऐकायला नाही मिळाले की भारतामुळे किंवा भारतीय नागरिकांमुळे युद्ध भडकले. भारताने आजवरच्या इतिहासात स्वतः हून कोणत्याही देशावर जाणूनबुजून हल्ला केलेला नाही आणि करणारही नाही. भारत

हा शांतताप्रिय देश आहे. त्याला युद्ध नकोस. वाद नकोय. अशांती नकोय. भारताला प्रेम हवे आहे. आपुलकी हवीय. बंधुता हवीय. सबब,भारतामुळे तिसरे महायुद्ध भडकेल अशी हाकाटी कोणी करू नये. मागील दोन महायुद्धे कोणामुळे पेटली आणि आणि तिसरे महायुद्ध कोणामुळे होऊ शकते हे पूर्ण विश्व जाणते. तेव्हा कृपया भारतावर आरोप करू नयेत. "

भारतीय परराष्ट्रमंत्र्यांचा हा टोला अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, जपान, इटली, तुर्कस्तान, पाकिस्तान, बांगलादेश इत्यादी देशांच्या प्रतिनिधींच्या जिव्हारी लागला. विशेषत: जर्मनी, इटली आणि अमेरिका यांचे परराष्ट्रमंत्री खजिल झाले.

"ते काही नाही. आंतरराष्ट्रीय संकेत तुम्हाला पाळायलाच हवेत. तुम्ही शस्त्रास्त्र निर्मिती बंद करायला हवी. सैन्यकपात करायलाच हवी. " पाकिस्तानचा परराष्ट्रमंत्री अब्दुल कादीर याने जोर धरला.

"हे पहा,आपले किंवा आपल्या देशाचे रक्षण करणे हे प्रत्येक राष्ट्राचे नैतिक कर्तव्य आणि अधिकार आहे. आम्ही आमच्या अंतर्गत व बाह्य सुरक्षिततेसाठी ही शस्त्रास्त्र निर्मिती करतो आहे. सैन्यबळ वाढवले आहे. कोण्या देशाची कुरघोडी करण्यासाठी नाही. सध्या आमचा देश बाहेरून येणाऱ्या दहशतवाद्यांमुळे आणि अंतर्गत फुटिरवाद्यांमुळे चिंतीत आहे. त्यांचा बंदोबस्त करायला हवा. आजवर खूप सहन केलंय. पण आता नाही. म्हणून ही तजवीज आहे. "

क्षणभर शांतता. त्यानंतर युनोचे अध्यक्ष डोनाल्ड बेंजामिन म्हणाले,"तुम्हाला असे म्हणून तुमची जागतिक जबाबदारी झटकता

येणार नाही. तुम्हाला शस्त्रास्त्र निर्मिती बंद करायला हवी. शिवाय तुम्ही विज्ञानाचा जो दुरुपयोग चालविला आहे तोही बंद करा. गेल्या तीन वर्षांत पूर्ण जगाची अर्थव्यवस्था तुमच्या त्या विज्ञानाच्या दुरूपयोगामुळे कोलमडून गेली आहे. "

भारतीय परराष्ट्रमंत्री शांत होते. ते पुन्हा बोलण्यात उभे राहिले. "महोदय, तुम्ही आम्हास शस्त्रास्त्र निर्मिती बंद करायला सांगतात. अमेरिकेला सांगू शकता का? आहे का तुमच्यात तेवढी हिंमत? ते दहशतवादी, त्यांना शस्त्रास्त्र कोण पुरवतो? कोठून येतात त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रास्त्रे? त्याकरीता पैसा तरी कोठून येतो? ज्यांची मानसिकता अजून मध्ययुगीन आहे ते काय विज्ञानाची कास धरतील? विज्ञानाचा उपयोग करतील? तेही भल्यासाठी? छे! बोलूच नका. विज्ञानाचा दुरूपयोग कोणी केला आणि कोण करतंय हे पूर्ण विश्व जाणून आहे. माझा भारत देश हा विज्ञानाचा दुरुपयोग कधीच करणार नाही. आम्ही जे कार्य हाती ते केवळ आमच्या भारतापुरता मर्यादित नाही. अपितु संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी आहे. राहिला अर्थव्यवस्था कोलमडण्याचा प्रश्न तर हे निश्चित व्हावे की नक्की कोणाची अर्थव्यवस्था कोसळली आहे? जगाची की बहुराष्ट्रीय कंपन्यांची?"

उत्तम डांबरेंच्या या प्रश्नावर यूनोचा सचिव हिलरी संतापला. तो रागावून म्हणाला," शेवटी ते एकच आहे ना! अनेक देश मिळून तयार केलेल्या कंपन्या तोट्यात गेल्यावर संपूर्ण विश्वाची अर्थव्यवस्था

डगमगेल ना! कित्येक देशात मंदी आलीय. ही मंदी जागतिक पातळी गाठू शकते. "

परराष्ट्रमंत्री म्हणाले," जागतिक मंदीवर आमच्याकडे ठोस उपाययोजना उपलब्ध आहे. त्याबाबत तुम्ही चिंता करू नये. भारताचीच नव्हे तर संपूर्ण जगाची मंदी आम्ही दूर करू. फक्त तुमची आम्हाला साथ हवी. "

"तुम्ही आंतरराष्ट्रीय नितीनियम पाळणार आहात की नाही?" अध्यक्षाने निर्वाणीचा प्रश्न विचारला.

"हो निश्चितच. आंतरराष्ट्रीय नितीनियम पाळण्यात आम्ही वचनबद्ध आहोत परंतु जे नितीनियम विशिष्ट देशाच्या फायद्याचे आहेत नि आमच्या राष्ट्रीय अस्मितेला बाधक ठरतात ते आम्हाला मान्य नाहीत. "

"याचा परिणाम काय होईल याचा विचार करा. तुम्हाला वाळीत टाकले जाऊ शकते. तुमचा बहिष्कार केला जाऊ शकतो. " चीनचा प्रवक्ता दमदाटीच्या भाषेत म्हणाला.

"जशी तुमची इच्छा. पण हे सर्व करण्यापूर्वी खूप विचार करावा. भारताची लोकसंख्या दीडशे करोड आहे. पूर्ण विश्वात भारतासारखी प्रचंड मोठी बाजारपेठ अन्यत्र कुठेही नाही. ही बाजारपेठ ज्यांना गमवायची आहे त्यांनी खुशाल भारतावर बहिष्कार टाकावा. आम्हाला काहीच हरकत नाही. आम्हाला आता फक्त पृथ्वीच नव्हे तर मंगळावरची माणसंही मदतीला आहेत. ऍन्ड्रमेंडा आकाशगेगेतील सॅट-९ या ग्रहावरील मानव आमच्या सोबत आहेत. आम्ही एकटे नाहीत.

तेव्हा साधकबाधक विचार तुम्ही करावा. आम्ही सर्वांकडे प्रेमाने पाहतो. सर्वांकडे मैत्रीचा हात पुढे करतो. आम्ही प्रगती करतो आणि करणारच. तुम्हालाही प्रगतीस सहाय्य करू. कृपया आमची प्रगती रोखण्याचा यत्न करू नये. हे तुमच्या -आमच्या सर्वांच्याच हिताचे आहे. आम्ही भारतीय सदैव विश्व कल्याणासाठी कटिबद्ध आहोत. त्या सात अज्ञात लोकांनी विश्वकल्याण संघटनेमार्फत जे कार्य हाती घेतले आहे ते स्तुत्य आहे. भारत सरकारचा त्याला पूर्ण पाठिंबा आहे. त्यात कोणत्याही प्रकारे मानवाला, पर्यावरणाला किंवा कोणत्याही देशाला हानी नाही आहे. उलट कल्याणच कल्याण आहे.

मी तर म्हणेन की आमच्या भारताला वाद, विवाह,कलह, संघर्ष, युद्ध नको आहे. त्यातून कोणाचे भले झाले आहे? उलट आपण विज्ञानाची कास धरून वैश्विक बंधुत्व जोपासू या. पृथ्वीवरचे प्रत्येक खंड म्हणजे एक पाडा मानू या. ही पृथ्वी म्हणजे एक खेडे मानू या. आपण एक होऊ या. आता एक होण्याची वेळ आली आहे. हे अफाट विश्व आपल्याला खुणावते आहे. निरनिराळ्या आकाशगंगा न्हाऊन घेण्यासाठी बोलावत आहे. ग्रहतारे आपल्या स्वागताला उत्सुक आहेत. आपण एक होऊन या विश्वात संचार करू या. विश्वाची रहस्ये उलगडून या. मानवाच्या कल्याणासाठी आपण एकत्रितपणे बरेच कार्य करू या. "

रशियाचे प्रतिनिधी बोल्सेत्वेचे मनोगताने सुखावला झाले. ज्या अमेरिकेने शितयुद्ध काळात डावपेच खेळून सोव्हिएत संघाचे तुकडे करून त्याला महासत्ताक होण्यापासून रोखले, ज्या अमेरिकेने

अफगाणिस्तान, इराक,इराण यांची वाताहत केली, तिला टक्कर देणारा भारत निर्माण झाला. भारताला पाठिंबा देऊन अमेरिकेच्या काटा दूर करायचा हा विचार त्याच्या मनात येऊन गेला.

"आम्ही भारताबरोबर आहेत. " रशिया, श्रीलंका, भूतान, तिबेट, इंडोनेशिया, इराण,इराक आदी देशांच्या प्रतिनिधींनी भारताला पाठिंबा दिला.

(१७)

स्त्रियांचा मानसन्मान

भारताची वैज्ञानिक प्रगती अमेरिका, चीन, पाकिस्तान, बांगलादेश यांना नको होती. ते आंतरराष्ट्रीय स्तरावर काही ना काही दबाव तंत्र वापरून भारताला रोखण्याचा नक्कीच प्रयत्न करणार हे भारताच्या प्रत्येक नागरिकाला कळले होते. अर्थात, त्या सात अज्ञात लोकांनी यावर नक्कीच काहीतरी उपाययोजना केली असावी असा त्यांचा विश्वासही झाला.

इथे देशाच्या प्रत्येक बसस्थानक, रेल्वेस्थानक, विमानतळ, ढाबा, हॉटेल , नाक्यावर असलेल्या फलकावर सूचना दिसू लागली.

"सर्व भारतीयांना आमचा जय हिंद! सर्वांना सूचित येते की विश्वात महासत्ताक होण्याची पात्रता असलेल्या भागात देशात स्त्रियांच्या मानसन्मानाचे रक्षण केले जात नाही. हे किती लाजीरवाणी गोष्ट आहे. छेडछाड, विनयभंग, अती प्रसंगी, घरगुती छळ, हुंडाबळी, लैंगिक छळ, इत्यादी मार्गाने भारतात स्त्रियांचा अपमान केला जातोय. हे भारताला भूषणावह नाही. आमची सर्व भारतीयांना विनंती असेल की या क्षणापासून प्रत्येक स्त्री -पुरूष एकमेकांचा सन्मान करतील. स्त्रियांचा सन्मान केला जाईल. स्त्रियांना घरात, समाजात, कार्यालयात, कामाच्या ठिकाणी पूर्ण स्वातंत्र्य दिले जाईल. या क्षणापासून कोणी हुंडा घेणार नाही. देणार नाही. बालविवाह कुठे होत

असतील तर बंद व्हावेत. स्त्रीभ्रूणहत्या,बालिकांची हत्या बंद व्हायला हवी. स्त्रिया इतक्या निर्भय व्हायला हव्यात की त्यांना स्वतः चेही भय वाटता कामा नये. जर कोणी या सूचनांचे पालन करताना हयगय करील त्याचा पृथ्वीवर जगण्याचा हक्क रद्द केला जाईल. शिक्षा म्हणून थेट दुसऱ्या ग्रहावर कायमचे पाठवले जाईल. जे कोणी स्त्रियांचा कोणत्याही प्रकारे छळ करील, त्यांच्याविरोधात समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा. त्यांना शासन करण्यात पोलीस यंत्रणेला सहकार्य करावे. प्रत्येक स्त्रीचे आपण अंगरक्षक व्हायला हवे. आपल्या घरातही स्त्री आहे याचा प्रत्येक पुरूषाने भान ठेवायला हवे. अर्थात, संविधानाने दिलेल्या स्वातंत्र्याचा स्त्रिया गैरवापर करणार नाहीत अशी प्रत्येक स्त्री कडून अपेक्षा आहे. जर कोणी स्त्री या स्वातंत्र्याचा,सवलतीचा गैरवापर करताना आढळून आली तर तिच्या विरूद्धही कडूक कारवाई करण्यात येईल. प्रत्येक स्त्री -पुरूषाने एकमेकांचा सन्मान हा केलाच पाहिजे. तेव्हाच समाजात समानता येईल. हे आपले कर्तव्यच आहे. "

सूचना चांगली होती. परंतु काहींना त्यात हूकूमशाहीचे सूर ऐकू आले. काही पुरूष म्हणू लागले," स्त्रियांना स्वातंत्र्य द्या म्हणे. असे केले तर स्त्रिया वाटेल ते करतील. कुटुंबसंस्था समाजसंस्था कोलमडून पडतील. विज्ञान घेऊन आलेत तर विज्ञानातच डोकं घाला,म्हणावे यांना. आमच्या घरात डोकाऊ नये. आम्ही यांचे गुलाम नव्हेत, असे फतवे ऐकायला. "

यावर सुज्ञ माणसं प्रतिसाद देऊ लागले," तुम्ही जो विचार करता तो चुकीचा आहे. ही सूचना आपल्या भल्यासाठीच आहे. स्त्री आणि पुरुष या दोघांशिवाय कुटुंबसंस्था पूर्ण होत नाही. समाजसंस्था,शासन, धर्म हे सुद्धा स्त्री आणि पुरूषाशिवाय अपूर्णच आहेत. अशा वेळी पुरूषाला भरपूर मान आणि स्त्रियांना चाकरासारखी वागणूक ही असमानता खरं म्हणजे कुटुंबसंस्था उध्वस्त करीत आली आहे. आपल्या दु:खाला आणि अधोगतीला एक ठोस कारण हेही आहे की आपल्या घरात, समाजात स्त्री -पुरूष समानता नाही. स्त्रियांना मान नाही. जेथे स्त्रियांचा मान राखला जात नाही,ते कुटुंब,तो समाज, ते राष्ट्र लयास जाते हे ठाऊक आहे ना. "

"पण अशी मोकळीक दिली तर स्त्रिया व्यभिचार करतील. मर्यादा सोडून वागतील. पुरूषांना वरचढ होतील. स्त्री ही वेल आहे. पुरूष हा वृक्ष आहे. तिने वृक्षाच्या आधारानेच वाढायला हवे. " अज्ञानी सुजाणाला म्हणाला.

"हा मूर्खपणाचा विचार आहे. उलट स्त्रियांना जेवढी मोकळीक मिळेल,तेवढी त्यांची शारीरिक व मानसिक शक्ती वाढेल. ती अधिक जोमाने कुटुंबाचा सांभाळ करेल. समाजाचे नाव उज्वल करेल. स्त्री वेल आणि पुरुष वृक्ष हा मध्ययुगीन विचार सोडून द्या. तसे जर असते ना तर नवरे बायकांच्या कमाईवर जगले नसते. आजच्या बहुसंख्य भारतीय कुटुंबात नवऱ्याला बायको पोसते हे दृश्य बघायला मिळते. आहेत कुठे? मध्ययुगात की अश्मयुगात? बाबा आदमच्या जमान्याच्या वार्ता करू नका. हे नवे युग आहे. आपली माणसं दुसऱ्या ग्रहावर

गेलीत. तेथील संस्कृती पाहिलीत. काही दिवसांनी ती माणसं इथे येतील. आपण तेथे जातील. इथल्या स्त्रियांची दयनीय अवस्था पाहून त्यांच्या पृथ्वीबद्दल काय भावना निर्माण होतील?" सुज्ञ माणूस समजावून म्हणाला.

"पण स्त्रियांना मोकळीक देऊन काय झाले, पाहिले ना? त्याचा दुरूपयोगच झाला आहे. फॅशनच्या नावाखाली त्या काय करतात? स्वतः च्या सुखासाठी मातापिता, परिवार काही बघत नाहीत ते. " अज्ञानी खेदाने म्हणाला.

"अहो, खरं आहे ते. काही स्त्रिया ताल सोडून वागतात हे मान्य. पण त्यांच्यासाठीही त्या सूचनेत बंधने घातली आहेतच ना! स्वातंत्र्याचा अर्थ स्वैराचार नव्हे. संध्याकाळ झाली की पक्षी सर्व टाकून घरट्यात परत येतात. म्हणून सुरक्षित राहतात. मर्यादेचे बंधन हे सर्वांना पाळावेच लागले. स्वतंत्र्यात कसंही वागून कसं चालेल? खरं म्हणजे स्त्रियांना संपूर्ण सुरक्षित वातावरण आपण पुरूषांनीच द्यायला हवे. "सुज्ञ माणसाने त्याचे खांदे थोपटले.

"बरोबर म्हणता तुम्ही. माझंच चुकलं. आपण स्त्री -पुरूषांनी एकमेकांचा सन्मान करायलाच हवा. हे दोन्ही संसाररूपी वाहनाची दोन चाकं आहेत. दोघांना सारखेच महत्त्व दिले गेले तर कौटुंबिक आणि सामाजिक समस्यांचे निराकरण होऊ शकेल. "अज्ञ माणूस ज्ञानाचे शब्द बोलला.

. "आता कसं बोललात! कायद्याने सर्वच काही बदलत नाही. मनापासून सर्व चांगल्या बाबींचा स्वीकार केल्याने परिवर्तन घडून येते.

विश्वकल्याण संघटनेचे कर्मचारी प्रत्येक ठिकाणी स्त्री रक्षणार्थ पहारा देऊन उभे आहेत. चला आपण त्यांना हातभार लाऊ या. स्त्रियांचे रक्षण करू या. त्यांचा मानसन्मान करू या. सर्वत्र नंदनवन फुलवू या. "

"चला स्त्रियांच्या रक्षणार्थ या क्षणापासून प्रत्येक पुरुष प्रतिज्ञाबद्ध आहे. " दोघे निघाले. त्यांना सूचनेचे महत्त्व पटले होते. सर्वांना पटू लागले. स्त्रियांना कायद्यापेक्षा मोठा आधार झाला.

(१८)

आत्मरक्षा महत्वाची

सूचना वाचून देशभरातील स्त्रियांनी तर मोठा जल्लोष केला. आता खऱ्या अर्थाने स्त्रिया निर्भय बनतील अशी आशाच नव्हे तर विश्वासही देशभरातील स्त्रियांना वाटू लागला. सूचनेचा परिणाम त्याच दिवसापासून जाणवू लागला होता. शासकीय तसेच खासगी आस्थापनात काम करणाऱ्या स्त्रियांशी त्यांचे वरिष्ठ, सहकारी स्त्री-पुरूष अदबीने वागायला लागले. स्त्री कर्मचाऱ्यांचे काही चुकलं तर मधुर वाणीत त्या चुका दाखवू लागले. त्यामुळे या कार्यालयीन कामकाज करणाऱ्या स्त्रियांचे कामातील दडपण नाहीसे झाले. त्या निर्भय होऊन काम करू लागल्या. त्यांच्या चुका कमी होऊन कामाची गुणवत्ता वाढीस लागली. कार्यालय जणू एखादी मोकळी बागच वाटू लागली.

ज्या कामकरी स्त्रिया होत्या, ज्या दुकानात हॉटेलात,बांधकामात, कारखान्यात छोटी मोठी कामं करीत होत्या, त्याही सुरक्षित झाल्या. त्यांचं मालक,त्यांचे वरिष्ठ, मुकादम त्यांच्याशी अगदी घरगुती बहिण- भावासारखे वर्तणूक करू लागले. कामाचा ताण कमी झाला. खेळीमेळीने गुणवत्तापूर्ण कामं होऊ लागली.

शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थीनी बिनधास्तपणे इतर विद्यार्थ्यांसह,शिक्षकांसह वावरू लागल्या. गृहिणींना घरात पुरूष मंडळींकडून आपुलकीची वागणूक मिळू लागली. विवाह समारंभ विना हुंड्याने पार पडू लागल्या. विवाह मुलीच्या घरी न करता मुलाच्या घरी करू लागले. वधूपित्याला खर्चाचं ओझं पडू नये हा उद्देश. स्त्रीभ्रूणहत्या थांबल्या होत्या. सोनोग्राफी फक्त शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीनेच होऊ लागल्या.

देशभरातील महिलांनी त्या सात अज्ञात लोकांना दुवा दिला. त्यांचे काल्पनिक तस्बीर बनवून भाऊबीज केली. त्यांना ओवाळले.

तरीही देशातील काही असे प्रांत होते जे सुधारायला मागत नव्हते. त्यांच्या लेखी स्त्रिया म्हणजे उपभोग्य वस्तू. त्यांच्याशी काय अदबीने वागायचे? त्यांना काय स्वतंत्र द्यावे? त्यांना पायातले चपलेसारखी दासी बनवून ठेवावी. त्यांचा फक्त उपभोग घ्यायचा. ही सूचनांची भानगड त्यांच्या पचनी पडली नाही. त्यांनी उघड याचा विरोध केला.

"अरे,कोण हे विश्वकल्याणवाले? लपून छपून आज्ञा देतात. समोर या. दाखवतो तुम्हाला. म्हणे, स्त्रियांचा सन्मान करावा. " असं दिल्लीच्या काही भागातील गुंड प्रवृत्तीची माणसं म्हणू लागली. त्या भागातील काही महाविद्यालयीन तरुणी बिनधास्त होऊन वाटेतून जात होत्या. या चार-पाच जणांनी त्यांची वाट अडवली.

"कोठे निघालात? शिकून काय करणार आहेत? समाजाचा उद्धार,घरादाराचा उद्धार की देशाचा उद्धार? देशाचा उद्धार करायला आम्ही आहोत की. "

त्या गुंडांच्या या अशा वागण्याने मुली गोंधळून गेल्या. तरी एकजण हिंमत करून म्हणाली,"मुकाट्याने आमची वाट सोड. सूचना वाचली नाही का?"

"सूचनेची ऐसी की तैसी. सूचनेला आम्ही भीक घालीत नाही. कोण आमचे वाकडे करणार? सर्व आमचेच आहे. "ते त्या मुलीची छेडछाड करू लागले. मुली बिथरल्या. किंचाळू लागल्या. तोच दहा शस्त्रधारी सुरक्षा पथक तेथे हजर झाले. त्या पाच जणांचा त्यांनी चांगला समाचार घेतला. पक्का चोप दिला त्यांना.

"काय रे गुंडांनो, लोकांच्या आया बहीणी म्हणजे रस्त्यावर पडलेल्या वाटतात काय रे तुम्हाला? चला पोलीस स्थानकात. तेथेही चांगली धुलाई करू तुमची. "

त्यातला एकजण स्वतः ला सावरीत म्हणाला, "मारा,जेवढे मारायचे आहे तेवढे मारा. पोलीसात आम्हाला देऊन काय होणार? दोन दिवसांत बाहेर येणार. मग यांना कोण वाचवणार?कोणाकोणाला रे वाचविणार तुम्ही? आम्ही लाखोंनी आहोत. करोडोंनी आहोत. तुम्ही कमी पडतील. " तो राक्षसी हास्य हसायला लागला. मुली भयभीत झाल्या. सुरक्षा रक्षक दुसऱ्याला म्हणाला, "अरे हा बरोबर बोलतोय. यांना पोलीसांत देऊन काय फायदा? हे सुटून येतील. या पोरींना पुन्हा

त्रास देतील. त्यापेक्षा यांना आपल्या केंद्रांवर नेऊ या. तेथून यांना चंद्रावर किंवा मंगळावर तडीपार करता येईल. "

"हो. बरोबर आहे. " दुसरा सुरक्षा रक्षक म्हणाला, "चंद्रावर पाठविणे हीच उत्तम शिक्षा आहे. हवा नाही. पाणी नाही. कोणीच नाही. एकटेच तेथे राजासारखे राहतील. "

"मंगळावर तर तेथील रानटी मानव यांना भाजून खातील. अत्यंत क्रूर आहेत म्हणे ते. " तिसरा सुरक्षा रक्षक म्हणाला.

यांची चर्चा ऐकून ते गुंड भयभीत झाले. गयावया करू लागले. "आम्हाला चंद्रावर किंवा मंगळावर नको. पोलीसस्थानकात न्या. "

"आणि सुटून आल्यावर पुन्हा या मुलींना त्रास देतील. त्याचे काय?"

"नाही, आम्ही याच काय कोणत्याही मुलीला त्रास देणार नाही. आम्हाला क्षमा करा. " ते पाया पडू लागले.

"ठीक आहे. चला तर. पोलीस स्टेशनला. " सुरक्षा रक्षक त्यांना घेऊन गेले. दोन-तीन मागे राहिले. ते मुलींना म्हणाले, "तुम्ही स्वतःचे रक्षण करायला शिका. असे किती दिवस पुरूषांच्या सहाऱ्याने जगणार? स्वतः च्या मानसन्मानाचे रक्षण करायला तुम्ही शिकले पाहिजे. आम्ही तर आहोतच. स्वत,:चा बचाव करायला शिका. या अशा दुष्ट प्रवृत्तीला वेळीच ठेचून काढा. एका दोघांना अद्दल घडविली की बाकीचे आपोआप ठिकाणावर येतील बघा. स्त्री शक्तीची त्यांना जाण करून द्या. "

"तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. " एक तरूणी म्हणाली, "आता आम्ही स्त्रिया जागरूक झालो आहोत. आम्ही स्वतः ला एवढे मजबूत करू की आमचे तर रक्षण करूच पण इतरांचेही रक्षण करू. "

"आता कसं बोललात. अशी हिंमत पाहिजे. काळजी घ्या. " एवढे बोलून सुरक्षा रक्षक निघून गेले. टि. व्ही. चॅनेलने दिवसभर ही बातमी दाखवली. धडा घेणाऱ्यांनी धडा घेतला. पोलीसांनी त्या गुंडांना दोन दिवस चांगला चोप दिला. केस बनवली नाही. ताकिद देऊन त्यांना सोडून दिले. ते बाहेर पडताच दिसेल ती मुलगी त्यांच्याविरोधात ओरड करू लागली. जनता त्यांची धुलाई करून पुन्हा पोलीसांच्या हवाली करू लागली. पुन्हा पोलीसांचा मार. बाहेर पडले की पुन्हा तेच. मुलींनी, सामान्य जनतेने त्या गुंडांचे बाहेर पडणे मुश्कील करून टाकले होते. देशभर ही बातमी पसरली आणि बाकीचे टवाळखोर,रोडरोमियो, गुंड प्रवृत्तीची माणसं सावध झाली. आपली अशी अवस्था होऊ नये म्हणून स्त्रियांच्या मुलींच्या वाटेला जाणे त्यांनी सोडून दिले. स्त्रिया,मुली दिसल्या की मान खाली घालून ते जाऊ लागले.

हा सर्व प्रकार घडत होता तरी अद्याप काही जण सुधारायला मागत नव्हते. महाराष्ट्राच्या एका भागात मुली बघायला आलेल्या वर पित्याने वधू पित्याकडे हुंड्याची मागणी केली. वधूपिता गोंधळून गेला. "हे काय म्हणता तुम्ही? सूचना वाचली नाही का?"

"सूचनेचे काय घेऊन बसलात? वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा तोडायची नसते. कोणालाही न कळता हा व्यवहार करायचा. कोण काय करणार आहे? सर्व चालतं. " वरपिता म्हणाला.

"नाही. मला हुंडा देणे मान्य नाही. " वधूपित्याने नकार दिला.

"नीट विचार करा. असा मुलगा मिळणार नाही. डॉक्टर आहे. आम्हाला जास्त काही नको. एक वॅन, क्लिनिक उघडण्यासाठी थोडे पैसे. बघा मुलगी सुखी राहील. " वरपिता जोर देऊन म्हणाला.

एवढा वेळ हुंड्याबद्दल चुपचाप ऐकून घेणारी मुलगी भडकली. ताडकन उभी राहून वरपित्याला म्हणाली, "मला असल्या फालतू मुलाशी लग्न करायचे नाही,जो स्वतः ची विक्री करू इच्छितो हुंड्यासाठी. चला निघा इथून. "

तिचा चंडीचा अवतार पाहून मुलगाही भडकला. "मला नकार देतेस? मला नकार देणे तुला महागात पडेल. बाहेर तुझी आम्ही एवढी बदनामी करू की इतर कोणीही तुझ्याशी विवाह करण्यासाठी तयार होणार नाही. "

"असं? माझी बदनामी करणार? मुली म्हणजे कचरा वाटतोय का तुम्हाला? थांब मुलीची ताकद दाखवते. " तिनं पटकन भ्रमणध्वनी केला. सुरक्षा रक्षक पटकन हजर झाले. "बोला काय समस्या आहे?"

"ही फडतूस माणसं आमच्याकडे हुंडा मागतात. लग्नाला नकार दिला तर बदनामी करणार म्हणे. "मुलगी तक्रार देत म्हणाला.

"हुंडा पायजे का? चला देतो. "

सुरक्षा रक्षकांनी सर्वांना धरून नेले. बातमी देशभर पसरली. हुंडा मागणा-यांची सुरक्षा रक्षक आणि जनतेने चांगलीच जिरवली. जन्माची अद्दल घडवली. पुनरपी कोणीही हुंडा मागताना दहा वेळा विचार करेल. या प्रकारांनी समाजात स्त्रियांबद्दल भयामुळे का असेना चांगला परिणाम दिसू लागला. परंतु चंबळच्या खोऱ्यात राहणाऱ्या डाकूंना कोण सुधारणार? त्या पंचवीस डाकूंच्या चमूचा म्होरक्या होता सैतानसिंग. एक दिवस तो आपल्या साथीदारांना म्हणाला,"आपण या पहाडांत रानटी प्राण्यांसारखे राहतो. आपल्यापेक्षा ते संसारी पुरुष बरे. त्यांच्या बायका असतात. रोज त्यांची मजा असते. मदीरा बरोबर मदिराक्षीची चव त्यांना मिळते. आपल्याला काय मिळते? रोजची मदीरा. मजा नाही. आज रात्री जवळच्या गावात डाका घालू या. लूटीबरोबर स्त्रियाही आणू या. बरेच दिवस झाले मदिराक्षीची चव नाही घेतली. "

बाकीच्या साथीदारांना हेच हवे होते. ते सरदारची आज्ञा मिळताच रात्रीच्या प्रहरी घोड्यावर स्वार होऊन गावाच्या दिशेने निघाले. पण दुर्देव त्यांचे आणि सुदैव स्त्रियांचे की काही अंतरावरच सुरक्षा रक्षकांनी त्यांना पाहिले. गोळीबार झाला. दहा डाकू मारले गेले. जे निसटून गेले त्यांना पुढच्या तीन किमीच्या दौडीत पुन्हा दुसऱ्या सुरक्षा रक्षकांशी सामना झाला. तेथेही गोळीबार झाला. पुन्हा दहा डाकू मारले गेले. उरलेले डाकू आणि त्यांचा म्होरक्या वाट मिळेल तिथे पळू लागले.

"सरदार, हे कोण आहेत? पोलीस आहेत की मिलीटरीवाले आहेत? आपल्यावर पाळत ठेवून आहोत वाटतं. पण आपल्याला पकडायचे सोडून थेट ढगात पाठवितात. ही काय भानगड आहे?" घोड्यावर दौडत दौडत एक डाकू म्हणाला.

"मलाही काही कळत नाही. सरकारची काहीतरी नवीन चाल आहे ही. आधी आपला जीव वाचवू. नंतर बघून घेऊ सर्वांना. "

ते दौडत राहिले. दहा किमीची दौड झाली आणि पुन्हा एक सुरक्षा रक्षकांची छावणी लागली. पुन्हा गोळीबार झाला. यावेळी दरोडेखो-यांच्या गोळ्या संपल्या. सुरक्षा रक्षकांनी त्यांना ताब्यात घेतले. केंद्रावर दूरध्वनी केला. "जय हिंद! वीस डाकू मागच्या चौकीवर मारले गेले. पाच हाती लागलेत. काय करू? तुरूंगात आणू?"

पलीकडून आज्ञा आली, "नको. त्यांना आणू नका. तुरूंगात जागा नाही. त्यांना पोसणे सरकारला परवडणारही नाही. शिवाय त्यांचे इतर साथीदार तुरूंगावर हल्ला करून त्यांना सोडवून नेतील. त्यापेक्षा तुम्हाला योग्य वाटेल ते करा. "

निर्णय सुरक्षा रक्षकांचा होता. त्यांनी त्या पाच डाकूंना कंठस्नान घातले. ही बातमी देखील दूरदर्शनच्या माध्यमातून देशभर पसरली. आज या विश्वकल्याण संघाच्या सुरक्षा रक्षकांमुळे स्त्रिया किती सुरक्षित झाल्यात याचे समाधान वाटले.

दुसऱ्या दिवशी फलकावर सूचना आली.

"आम्ही पोलीसांच्या आणि सैन्याच्या बरोबरीने काम करून स्त्रियांना आणि प्रत्येक नागरिकाला सुरक्षा पुरवूच. पण दमदाटी करून,मार देऊन आणि कायदे करून समाज सुधारणा होत नसते. त्याला आवश्यकता असते विधायक कार्याची. विशेष अशा ज्ञानाची. तुम्ही तुमचे, तुमच्या कुटुंबाचे मन परिवर्तन करा. बालपणापासून स्त्रियांबद्दल मुलांच्या मनात पवित्र भावाची पेरणी करा. मुलांवर चांगले संस्कार करा. समाजासाठी तनमनधनाने झटणारे असे कितीतरी समाजसुधारक आहेत,त्यांचे मार्गदर्शन घ्या. मन परिवर्तनाशिवाय समाज परिवर्तन होणार नाही. त्याला प्रयोगशाळेतील विज्ञान उपयोगाचे नाही. त्याला मनोविज्ञान हवं आहे. चांगले संस्कार,चांगले विचार,चांगली संस्कृती हे आहे मनाचे विज्ञान. याची कास धरा. समाज बदला. आम्ही आपल्या परीने कार्य करूच. दुष्ट माणसं नव्हे तर दुष्ट प्रवृत्ती बदलायला हवी. तुम्ही आपण मिळून. "

(१९)

दहशतवाद्यांचा खातमा

काश्मीर खोऱ्यात दहशतवादी कारवायांना जोर वाढू लागला. दहशतवाद्यांचा म्होरक्या हाफिज सईद याला भारताची प्रगती टोचत होती. भारताला नेस्तनाबूत करणे हे त्याचे अंतिम ध्येय होते. त्यासाठी तो आणि त्याचे साथीदार वाटेल ते करायला तयार होते. वीस हजार भरकटलेल्या तरूणांना या काश्मीर खोऱ्यात दहशतीचे प्रशिक्षण दिले जात होते. अनवर हा सच्चेदिलवाला खुदाचा नेक बंदा होता. त्याला हे असले मारकाटीचे प्रकार पसंत नव्हते. पण घरच्या गरिबीमुळे त्याला ह्या संघटनेत सहभागी व्हावे लागले. आईबाप मिळेल ती कामं करून पोट भरायची. अनवरला काहीच कामधंदा नव्हता. काश्मीर

खोऱ्यात कामं कमीच. सरकार पर्यटनाचा विकास करू पाहत होती. मात्र दहशतवादी येनकेन प्रकारचे हे होऊन देत नव्हते. त्याला कामांसाठी इस्लामाबादेत कामाकरीता जाण्याचा इरादा होता. एका परिचिताने पैशाची लालूच दाखवून त्याला दहशतवादी कारवायांना उद्युक्त केले.

"तू चल आमच्या संघटनेत. काम कर. शहीद झालाय तर जन्नत मिळेल. तुझ्या घरच्यांना लाखो रुपये देऊ. त्यांचा सांभाळ करु. त्यांना काहीच कमी पडणार नाही. या नेक कामात आम्हाला साथ देणा-यांचा योगक्षेम आम्ही चालवू. "

पैशाच्या मोहापायी अनवर दहशतवादी संघटनेत सामील झाला. रोज प्रार्थना झाल्यावर हाफिज सईद त्यांना भडकाऊ भाषण देई. "माझ्या शूरवीरांनो, पेटून ऊठा. तुटून पडा भारतावर. जमिनीवरून जा. पाण्यातून जा. आकाशातून जा. भारतवासियांची पक्की जिरवा. तेथे काफिरांचं राज्य आहे. त्यांनी आपल्यावर अन्याय केला आहे. आपण मूळचे भारतीय. त्यांनी आपल्याला रेगिस्थानमध्ये मरायला पाठवले. भारत ही जन्नतभूमी आहे. त्यातील काश्मीर म्हणजे जन्नतचा मुकूटमणी. आपली लढाई आपल्या हक्कासाठी आहे. काश्मीरसाठी आणि संपूर्ण भारतासाठी आहे. भारतावर राज्य करण्याचा अधिकार केवळ आपला आहे. तेव्हा ऊठा. तेथे जा. दिसेल त्याला मारा. जीव घ्या सर्वांचा. आपली सध्याची योजना आहे तेथील बंद पडलेल्या तारापूर, ट्रॉम्बे व इतर दहा अणुभट्ट्यावर विमाने धडकवायची. वर्ड ट्रेड सेंटर पेक्षा मोठा हल्ला करायचा. किरणोत्सर्गामुळे भारत क्षणात नामशेष होईल. दीडशे करोड लोकांचा त्यांना अभिमान आहे ना. तो अभिमान चूर चूर करू या. " सर्व दहशतवाद्यांनी बंदुका वर करून एक जोरदार नारा दिला.

. या भाषणातील काही गोष्टी अनवरला पटल्या नाहीत. तो आपल्या साथीदाराला म्हणाला,"लोकांना मारून जन्नत कशी काय रे मिळते? ज्यांनी आपलं काहीही वाईट केलेलं नाही,ज्यांच्याशी आपले काही देणंघेणं नाही, त्यांना मारून जन्नत कशी बरी भेटते?"

साथीदार म्हणाला," ही हक्काची लढाई आहे. धर्मयुद्ध आहे. धर्मासाठी लढताना जन्नत मिळतेच. "

"मग या आपल्या आका लोकांना जन्नत नको काय? ते आपल्याला मरायला -मारायला पाठवतात. ते स्वतः का जात नाहीत? असं जर लोकांचा जीव घेऊन जन्नत मिळत असती तर पहिले तेच जायला हवे होते. त्यांची प्रेरणा घेऊन बाकीचेही तसेच वागले असते. " अनवर म्हणाला.

"हे बघ. जास्त शहाणपणाच्या गोष्टी करू नकोस त्या भारतीयांसारखे. जेवढं सांगितलं जातंय तेवढंच करायचं. बाकी डोकं खपवायचं नाही. जन्नत मिळेल की नाही हा भाग निराळा. आपल्या घरच्यांना लाखो रुपये मिळतील. त्यांचा सांभाळ करतील ही माणसं. " साथीदार म्हणाला.

"एखादा पुरावा आहे का की ह्यांनी आजवर शहीद झालेल्या आपल्या लोकांच्या कुटुंबियांना सांभाळले म्हणून? त्यांना पैसे दिले म्हणून? उलट त्यांना त्रास दिला असेल तर? आपली माँ- बहन ह्यांच्या ताब्यात देऊन आपण जन्नतच्या आशेने मरायला का जावे रे?"

अनवरच्या ज्ञानाच्या गोष्टी साथीदाराच्या पचनी पडत नव्हत्या. "मला वाटतं, तुला सबक व्यवस्थित पाठ झालेला नाही. तुझ्यावर त्या भारतीय हवामानाचा परिणाम झालेला दिसतोय. मुकाट्याने सांगतात तसं करायचं. आता यातून बाहेर पडायला मार्ग नाही. मृत्यूच यातून बाहेर काढेल. "

अनवरचे संवेदनशील मन त्याला टोचू लागले. हा भ्रम आहे. हे योग्य नाही. पण तो फसला होता. काहीच करू शकत नव्हता. तो वाहत गेला. दहशतवाद्यांच्या प्रवाहात.

इथे दहशतवादी समझोता एक्स्प्रेसच्या माध्यमातून, बसमधून, विमानातून भारतात शिरले. गुपचूप शस्त्रास्त्रेही नेली. काही दिवस विमानतळ, बसस्थानक, रेल्वेस्थानक यांची त्यांनी टेहळणी केली. या कामी काही भारतीय गद्दारांनी त्यांना मदत केली.

दिवस ठरला १५/८. भारताचा स्वातंत्र्यदिन. दहशतवाद्यांचे पहिले लक्ष बंद पडलेल्या अणुभट्ट्या होत्या. त्या अणुभट्ट्यावर विमाने धडकवायची. प्रचंड नुकसान करायचं. अनवर, जो यांच्यासोबत भारतात आला होता, त्याला हे काही पटलं नाही. तो साथीदाराला म्हणाला, " हे योग्य नाही. अणुभट्ट्या फुटल्या तर किरणोत्सर्गामुळे फक्त भारतालाच धोका नाही तर आपल्या पाकिस्तानलाही धोका आहे. तारापूरपासून पाकिस्तान आहेच किती दूर? आपली माणसंही गोत्यात येतील. "

"तुझं डोकं चालवू नकोस. आपला आका जे सांगतो,तेच काळ्या दगडावरची रेघ आहे. " साथीदारानं अनवरचं तोंड बंद केलं.

ठरल्याप्रमाणे पाच ते सहा दहशतवादी वेगवेगळ्या ठिकाणाहून विमानात बसले. मुंबईहून नागपूरला निघालेल्या विमानात अनवर होता. त्याला शंका आली. एवढ्या संख्येने दहशतवादी भारतात घुसले पण भारतीय गुप्तहेर खात्याला त्याचा सुगावा कसा लागला नाही? आश्चर्याची बाब म्हणजे विमानतळावर त्यांचे सामान नीट तपासले गेले नाही. दहशतवाली खुश होते. भारतीय सुरक्षा यंत्रणेच्या बेजबाबदारपणावर. पण अनवरला कळून चुकले की आपणच मूर्ख बनवले जात आहोत.

विमानानं उड्डाण केल्यानंतर पंधरा मिनिटांत दहशतवाद्यांनी विमान ताब्यात घेतले. वैमानिकांना ठार केले. विमानात मोजून पंच्याहत्तर प्रवासी होते. दहशतवादी त्यांच्यावर बंदूका रोखून उभे राहिले. प्रवाशांनी मात्र हू की चू केलं नाही. निमूट बसून राहिले. अनवरला हेही खटकले की प्रवाशांच्या चेहऱ्यावर चिंतेची जराही लकेर नव्हती. जणू काही झालंच नाही अशी आविर्भावात ते होते. कोणी गाणी ऐकत होता. कोणी पुस्तक वाचत होते. कोणी झोप घेत होते.

दोघे दहशतवादी वैमानिक कक्षेकडे गेले. विमान मुंबईच्या बाहेर निघून गेले होते. त्यांना ते फिरवून ट्रॉम्बेच्या अणुभट्ट्यावर न्यायचे होते. परंतु त्यांना विमानावर नियंत्रण मिळविता येईना. ते स्वयंवैमानिकाच्या ताब्यात होते. नाही म्हणायला विमान १८० अंशातून वळले खरे. पण ते मुंबईच्या दिशेने न जाता गुजरातच्या दिशेने निघाले. त्यांनी भयभीत होऊन पाकिस्तानात बसलेल्या आपल्या म्होरक्याला फोन लावला. "जनाब, विमान स्वयंनियंत्रित आहे. ते गुजरातच्या दिशेने निघालेय. आम्ही काय करावं?"

"चिंता कशाला करता? ट्रॉम्बे नाहीतर तारापूर आहेच ना. "हाफिज सईद म्हणाला.

"पण विमान आमच्या ताब्यात येत नाही. उलट असं वाटतंय की तेच आम्हाला कोठेतरी घेऊन जात आहे. "

"मग असं करा. पॅरॅशुट लाऊन उड्या टाका. " हाफिज सईदची बोलती बंद झाली. विमानातील दहशतवादी पॅरॅशुट शोधू लागले. ते काही मिळाले नाही. त्यांची काळजी वाढली. रागाने दिसेल त्या

प्रवाशांवर ते गोळ्या झाडू लागले. त्यांचा बाहेर पडण्याचा मार्ग बंद झाला होता.

विमान पाकव्याप्त काश्मीरमध्ये जेथे दहशतवादी केंद्रे होती, तेथे जाऊन आदळले. एकच हल्लाकोळ माजला. प्रचंड स्फोट झाला. केंद्रावर अनेक स्फोटके होती. क्षणात त्यांचा भडका उडाला. दहशतवादी केंद्रांवर आगडोंब उसळला. हाफिज सईद तेथेच होता. हे काय चाललंय, त्याला कळेना. तोच दहा मिनिटांनी दुसरे विमान येऊन धडकले. पुन्हा कानठळ्या बसणारा स्फोट झाला. कचऱ्यागत दहशतवादी केंद्र जळू लागली. दहशतवाद्यांची पळता भुई झाली. पण पळणार तरी कोठे? त्यांनी पाच विमानावर कब्जा करण्याचे ठरविले होते. ती पाचची पाच विमाने येऊन त्यांच्या दहशतवादी केंद्रांवर येऊन धडकली. त्यांचे वीस हजार दहशतवादी क्षणात मातीत मिसळून गेले. करोडो रूपयांची स्फोटके,अस्त्रे अग्नीच्या स्वाधीन झाली. अग्नीनं एखाद्या अधाशा प्राण्यासारखा त्यांचा फडशा पाडला.

हाफिज सईद जखमी झाला होता. त्याच्या डोळ्यांदेखत त्याची मायानगरी जळून खाक झाली होती. काय करावे हे त्याला सुचेना. तोच त्याला फोन खणखणला. "कोण बोलतोय?"

"जय हिंद! हाफिज सईद. कशी वाटली आमची आतिषबाजी?"

"काफिरो, हे सर्व तुमची कारनामे तर. " सईद संतापला.

"नाही, आम्ही काही केलं नाही. तूच तुझ्या केंद्राला आग लावलीय. विमानं ताब्यात कोणी घेतली? तू. अणुभट्ट्याकडे नेणारा कोण होतास? तू. आम्ही फक्त त्या विमानाला दिशा दिली. तुमच्या

केंद्राची. एका क्षणात पाच विमानाच्या मोबदल्यात एकही माणसाचा जीव न गमावता तुमची वीस हजाराची फौज, दारूगोळा कसा नेस्तनाबूत केला. पाहिले ना!"

"कंबखक्तो, मी तुम्हाला सोडणार नाही. पण यात तुम्ही विमानात बसलेली तुमची माणसंही मारलीच ना! मूर्ख कुठले" हाफिज सईद रागारागाने म्हणाला.

"हाफिज सईद, मूर्ख आम्ही की तू? त्या विमानात तुझी माणसं वगळता अन्य कोणीही नव्हते. आम्ही दशमितीय तंत्राद्वारे माणसाची विमानात आभासी प्रतिमा तयार केली. मुळात ही माणसं नव्हतीच. केवळ प्रतिकृती होती. विज्ञानाचा एक आविष्कार होता. तुमची माणसं आमच्या जाळ्यात फसली. तुमचाच डाव तुमच्यावर उलटवला. हाफिज,जो दुसऱ्यांसाठी खड्डा करतो,तो एक दिवस त्याच खड्ड्यात पडतो. "

हाफिज सईद रागाने थरथर कापू लागला. मग त्यानं राक्षसी हास्य केलं. तो म्हणू लागला. "मी पुन्हा माणसं गोळा करीन. जन्नतसाठी मरायला -मारायला तयार असलेल्या मूर्ख माणसांची विश्वात कमतरता नाही. यावेळी एक लाख जिहादीनिशी मी भारतावर चौफेर हल्ले करीन. "

"हाफिज, हे विसरू नकोस, आकाशातील आमच्या केंद्रातून आम्ही तुझ्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवून होतो आणि आहोत. एक लाख माणसं जमा करून भारतावर हल्ले करायला तू जीवंत तर रहायला हवा ना. " पलीकडून आवाज आला.

. "म्हणजे?" हाफिजला समजलं नाही.

. "आम्ही तुझ्यावर लक्ष ठेवू शकतो. तुझे सर्व मनसुबे उधळू शकतो तर तुला नाही का ठार करू शकत? ज्या हजारों लोकांचे आजवर तू प्राण घेतलेस,त्यांची तुला हाय लागलेय. तू मरणार. कुत्र्याच्या मौतीनं मरणार. तुला जहन्नूमही नसिब होणार नाही. " आवाज बंद झाला.

हाफिज पळू लागला. सोबत अंगरक्षक होते. तेही घायाळ होते. अचानक आकाशातून एक प्रचंड असा अग्नीचा गोळा खाली आला. भूमीवर पडला. क्षणात हाफिज आणि साथीदारांनी जळून राख झाली.

घडल्या प्रकाराची पूर्ण चित्रफित करण्यात आली होती. पुढच्याच क्षणी ती विविध वाहिन्यांवर दाखवली जाऊ लागली. विश्वकल्याण संघाच्या त्या सात अज्ञात लोकांनी विज्ञानाच्या मदतीने दशमितीय तंत्र वापरून कशा पद्धतीने दहशतवाद्यांचा खात्मा केला हे भारतीय जनतेबरोबर संपूर्ण विश्व दूरदर्शनवर तहानभूक विसरून बघू लागला. विज्ञानाचा चांगला उपयोग करावा तर भारतीयांनीच. त्याबरोबर अणुभट्ट्या निकाली काढण्याची चर्चा होऊ लागली. विश्वकल्याण जवळ त्याचेही उत्तर होते. पर्याय होताच.

(२०)

त्वरीत उपचार

चेन्नईचा रामास्वामी हा सुरूवातीपासूनच विश्वकल्याण संघटनेशी संलग्न होता. आज्ञेबरहूकूम अनेक कार्य उत्तमरित्या पार पाडली होती. चेन्नईच्य एका कस्ब्याचा तो प्रमुख होता. सौरऊर्जा, कचरा व्यवस्थापन, गॅस निर्मिती,वृक्ष लागवड, प्रदूषण, रस्ते बांधणी इत्यादी क्षेत्रात त्यांनं संघटनेत अनेक कामे तळमळीने केलेली होती. आता त्याच्यावर त्याच्या कसब्याच्या आरोग्याची जबाबदारी टाकण्यात आली होती. गावाच्या हम रस्त्यावर वृक्षांच्या सान्निध्यात त्यानं नैसर्गिक घटक वापरून झोपडीवजा दवाखाना उघडला. त्यात अद्ययावत संगणक तपासणी यंत्र, सोनोग्राफी यंत्र स्थापित केले. बाहेर पाटी लावली.

'विश्वकल्याण आरोग्यधाम इस्पितळ. कोणत्याही आजारावर त्वरीत हमखास उपाय. महागडे उपचार,उपचारास दिरंगाई, मानसिक व आर्थिक ताण यापासून मुक्ती मिळवा. मोठ्या आजाराचा उपचार खर्च फक्त पाच हजार रुपये. छोट्या ओपीडी करिता फक्त दहा रुपये. वेळ सकाळी सात ते दुपारी बारा. सायंकाळी चार ते रात्री नऊ. गंभीर परिस्थितीत उपचार दिवसभरात कधीही केले जाईल. टीप- कठोर

पथ्य पाळण्याची तयारी असणाऱ्यांनीच यावे. इतरांनी येऊ नये. उपचारापूर्वी पैसे आणि करारपत्र लिहून घेतले जाईल. '

विश्वकल्याण संघटनेचा दवाखाना म्हणजे काहीतरी आरोग्यविषयक भव्यदिव्य असणार, म्हणून ही भली मोठी रांग लागली तेथे. गरीब-श्रीमंत हा भेदभाव न करता सगळ्या प्रकारच्या रूग्णांवर एकाच शुल्कात उपचार करण्यास रामास्वामीनं सुरुवात केली.

एके दिवशी रामास्वामी रात्रीचा विश्रांती घेत होता. तोच एका रूग्णाचे नातेवाईक धावत पळत त्याला बोलवायला आले. "साहेब, लवकर चला. माझ्या भावाला हृदयविकाराचा झटका आला आहे. आम्ही त्याला तुमच्या दवाखान्याजवळ नेलं आहे. "

"ठीक आहे चला. " रामास्वामी अंगावरील वस्त्रानिशी त्यांच्या सोबत दवाखान्यात गेला. तेथे रूग्णासहित त्याचे इतर बरेच नातेवाईक गोळा झालेले. रामस्वामीनं दार उघडले.

"सर्वांनी कृपया शांत रहा. तुमच्यामुळे रूग्ण उगाच धास्तावतो. "

रूग्णाला मेजावर झोपवले गेले. त्यापूर्वी रामास्वामीनं रूग्णाच्या नातेवाईकांनी स्वतः हून दिलेले पाच हजार रुपये घेतले. करारपत्रावर रूग्णाच्या सर्व नातेवाईकांच्या सह्या घेतल्या. एक प्रत त्यांना दिली.

"हा करार नीट वाचा. यात जे काही लिहिले आहे, ते तुमच्यावर बंधनकारक असेल. "

"आम्ही वाचतो. पण अगोदर उपचार तरी करा. "पत्नी अधीर होऊन म्हणाली.

"तुम्ही शांत रहा बघू. तुमच्या पतीला काही होत नाहीये. "

रामास्वामी रूग्णांवर गेला. सोबत रूग्णाची पत्नी, दोघं भाऊ आणि मुलं होती.

"जीभ बाहेर काढा. "रामास्वामी रूग्णाला म्हणाला.

त्याने जीभ बाहेर काढताच रामास्वामीनं एका छोट्याशा कुपीतून पाण्यासारख्या औषधाचे दोन थेंब त्याच्या जीभेवर टाकले आणि पुढच्याच क्षणात रूग्ण ठणठणीत बरा झाला.

अहो डॉक्टर साहेब , खरंच तुम्ही चमत्कार केला हो. मी पूर्ण बरा झालो. माझा त्रास गेला. "रूग्ण समाधान व्यक्त करीत म्हणाला.

"मी फक्त तुमचा त्रास बंद केलाय. आजार अद्याप गेलेला नाही. हे काय बोलायचा भात आणि बोलायची कढी नाही. "रामस्वामी रूग्णाला शांत करीत म्हणाला.

"म्हणजे? हे बरे झाले नाही म्हणता?" त्याच्या पत्नीने थरकापत विचारले.

"नाही. अद्याप उपचार बाकी आहे. " चला इथं बसा. "

रुग्ण खुर्चीत बसला. रामास्वामीनं त्याचे एक बोट हाती घेतले. त्यावर हवाबंद पाकिटातून काढलेली सुई टोचली. रक्त बाहेर आलं. त्याचे काही थेंब काचपट्टीवर घेतले. ती काचपट्टी एका विशिष्ट अशा उपकरणात ठेवली. काही मिनिटांत संगणकावर त्याचे विश्लेषण आले.

"हे बघा, तुमचं सध्याचं वय साठ वर्षे, तीन महिने ,बारा दिवस आहे. तुम्ही मास -मटन- मच्छी भरपूर खाता. मद्य भरपूर पिता. खूप अनावश्यक बडबड करता. खूप चिडचिड करता.. चिडले की मारझोडीवर येता. आतापर्यंत तुम्ही जी काही वाईट कृत्ये केली आहेत,त्याची सल तुमच्या मनात आहे. ती चूक तुम्हाला सलत आहे. बरोबर का?" रामास्वामीनं विचारले.

"तुम्हाला कसं ठाऊक?" रुग्ण अचंबित झाला.

"तुमच्या रक्ताने संगणकाला सांगितले. संगणक आपल्याला सांगतोय. हे बघा, स्पष्ट दिसतेय यावर. "

सगळेजण संगणकावर बघू लागले. तेथे विशिष्ट अशी आकडेवारी दिसत होती. बाजूला ह्रदयाची आकृती होती. त्याला किती क्षती पोहोचलीय त्याचे प्रमाणही बाजूला दिलेले होते.

" हे पहा. तुम्हाला कमीत कमी शंभर वर्षे निरोगी जीवन जगायचे आहे काय?"

"हो नक्कीच. " रुग्णानं होकार दिला.

"तर मी जी पथ्ये सांगतो,त्याचे पालन करा. अती मास-मटनाच्या सेवनाने आणि मद्यपानामुळे तुमचे हृदय साठ टक्के कमजोर झाले आहे. या पहिल्या डोसाने ते वीस टक्के बरे झाले. अजून दोन डोसात ते पूर्ण बरे होईल. सोबत तुम्हाला कठीण पथ्ये पाळावी लागतील. "रामास्वामीनं सक्त ताकीद दिली.

"सांगा, मी सर्व पाळायला तयार आहे. " रुग्णाने त्वरीत संमती दर्शवली.

"तर ऐका. घराच्या बाहेरचे कोणतेही पदार्थ खायचे नाही. शाकाहारी-मासाहारी जे काही खाल ते घरीच शिजवलेले असावे. प्रमाणात. तळलेले पदार्थ वर्ज्य. नशा आणणारी सर्व मद्ये बंद करावी लागतील. पहाटे पाच वाजता उठून तीन किमीची पायपीट करावी लागेल. रात्री दहाच्या आत झोपावे लागेल. जवळपास जायला वाहन वापरायचे नाही. दिवसभर मानसिक - शारीरिक कष्ट करावीत. रात्री थकून झोप यायला हवी. चुकीची कोणतीही कामे करू नका. मागे ज्या चुका केल्या त्याचं प्रायश्चित्त घ्या. समाजसेवा करा. गरजूंना शक्य तेवढी मदत करा. शांत रहा. फालतूची बडबड करू नका. शक्य तेवढे मौन पाळा. *मौन ही शक्ती आहे* चांगले ग्रंथ वाचा. चांगल्या संगतीत बसा. चांगल्या सवयी लावून घ्या. सहा महिन्यात तुम्ही पूर्ण बरे होतील. त्यानंतर तुम्ही घरचं काहीही खाऊ शकता. मात्र आयुष्यभर मद्य वर्ज्य आहे. बाहेरचं खाणं कायमचं बंद. उपाशी रहावं लागलं तरी हरकत नाही. उलट ते उत्तमच होईल. " रामास्वामीची लांबलचक पथ्ये ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले. अशी पथ्ये त्यांनी कधीही ऐकलेली नव्हती. पण रुग्ण बरा होण्यास अधीर झाला होता. तो म्हणाला," साहेब, मी सर्व पथ्ये आयुष्यभर पाळायला तयार आहे. "

"उत्तम! तुमच्याकडून हीच अपेक्षा आहे. पण हो, एक लक्षात ठेवा. पूर्ण बरे झाल्यानंतरही मद्य घ्यायची नाही. घराबाहेरचे म्हणजे हॉटेलचे,गाडीवरचे काहीही खायचं नाही. जीभेला ते लागलं की तुम्ही

जागेवर खलास. मग मी जबाबदार राहणार नाही. या करारात तेच लिहिले आहे. मद्य जीभेला लागले की पुढे जे होईल त्याला तुम्ही आणि कुटुंबिय जबाबदार असतील. मी नाही. या रुग्णाचे नातेवाईक म्हणून याची खबरदारी घेणे हे तुमचे कर्तव्य आहे. "

"हो डॉक्टर साहेब. आम्ही प्रकर्षाने हे लक्षात ठेऊ. " सर्वांनी मान्यता दिली.

"तर मी कमीत कमी शंभर वर्षे जगण्याची शाश्वती देतो. त्याच्यावरही जाऊ शकते. एक विनंती आहे. कृपया कोणालाही त्रास देऊ नका. उलट सर्वांना मदत करा. स्वार्थी बनू नका. आपला स्वार्थ इतरांच्या हिताच्या आड येत नाही तोपर्यंत ठिक आहे. समाजासाठी काहीतरी करा. विश्वकल्याणाचे ते सात अज्ञात लोक कसं अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी झटत आहेत तसेच तुम्हीही शक्य तेवढे समाजासाठी करा. समाजासाठी कार्य केले की समाधान मिळते. मन हलकं होतं. कोणताही आजार होत नाही. " रामास्वामी पोटतिडकीने म्हणाला.

"तुमचा प्रत्येक शब्द आम्ही ह्रदयात साठवून ठेवलाय. तुम्ही सांगतात तसेच वागू. इतरांनाही हा संदेश देऊ. स्वत:ही आजारी पडणार नाही. इतरांनाही आजारांपासून दूर राहण्यास सांगू. " रुग्णाची पत्नी म्हणाली.

सर्वांच्या मुखावर समाधानाचे हास्य उमटले.

(२१)

मधला मार्ग

विश्वकल्याण संघटनेच्या या नव्याने सुरू करण्यात आलेल्या कमीत कमी खर्चात त्वरीत औषधोपचारामुळे पूर्ण वैद्यकीय क्षेत्र ढवळून निघाले. ऍलोपॅथीक, होमिओपॅथिक,युनानी, आयुर्वेदिक,अक्युपंक्चर,चुंबकचिकित्सा, निसर्गोपचार इत्यादी क्षेत्रात काम करणारे सर्व वैद्यकीय समाज खवळून उठले. त्यांनी या औषध उपचाराबद्दल विरोध दर्शवला. सरकार दरबारी मोर्चे काढले. हा उपचार बंद करण्याची मागणी केली. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत एक डॉक्टर म्हणाला," या उपचारपद्धतीमुळे आमचे कार्यक्षेत्र पूर्ण कोलमडून जाईल. प्रचलीत वैद्यकीय व्यवस्था बंद होईल. सुशिक्षित बेकारांची संख्या वाढून त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल. सर्व दवाखाने बंद करावे लागतील. भारताची अर्थव्यवस्था डबघाईस जाईल. "

"पण जनतेचे आरोग्य कमीत कमी पैशात सुधारत असेल तर ते तुम्हाला का नको?" वृत्तनिवेदकाने विचारले.

"जनतेचे आरोग्य हेच आमचे ब्रीद आहे. जनता निरोगी रहावी याबाबत दुमत नाही. पण हा उपचार व्यवहार्य नाही. फक्त पाच हजार रूपयात गरीब-श्रीमंत सर्वावर हा उपचार होऊ लागला तर त्याचा

अर्थव्यवस्थेवर, सामाजिक क्षेत्रात खूप मोठा अनिष्ट परिणाम दिसून येईल. "

शासनाने डॉक्टरांचे म्हणणे मान्य करत विश्वकल्याण संघटनेशी याबाबत चर्चा करण्याचे अभिवचन दिले. मानवशी संपर्क साधून शासनाने सविस्तर चर्चा केली. मानवनेही यावर तोडगा निघेपर्यंत तुर्त हा उपचार बंद करण्याची विनंती आपल्या वरिष्ठांना करण्यात येईल अशी ग्वाही दिली.

चर्चेचे फलित निघाले. विश्वकल्याण संघटनेने आपला औषधोपचार त्वरीत बंद केला. त्यांचे डॉक्टर देशभर उपचार करीनासे झाले. ते आज्ञेनुसार इतर कार्यात गढून गेले. जनता मात्र झाल्या प्रकाराने खूप खवळली. डॉक्टरांच्या नावाने खडे फोडायला लागली.

"पण मी म्हणतो, हे विश्वकल्याणवाले कोणालाही भीत नाहीत. मग इथे माघार कशी घेतली?" अनेकजण कसे प्रश्न विचारू लागले.

"या मागे नक्कीच त्यांचा काही उद्देश असेल. असेच ते माघार घेणार नाहीत. त्यांचे माघार घेणेही योग्य दिसते. ते अखिल मानवजातीचे कल्याण करणार आहेत. कोणाचेही नुकसान ते करणार नाहीत. " मग जाणकार असं उत्तर देई.

काही दिवसांनी सूचना फलकावर सूचना आली.

"तमाम जनतेला आमचा जयहिंद. आमच्या औषध उपचाराला आपण चांगला प्रतिसाद दिलात. त्याबद्दल धन्यवाद! आमचा उद्देश जनतेचा प्रतिसाद बघणे हा एवढाच होता. तो सफल झाला. वैद्यकीय

क्षेत्र कोलमडून पडू नये म्हणून आम्ही हा उपचार बंद केला. हे औषध आता फक्त जीवघेण्या आजारावर सर्व रुग्णालयात उपलब्ध होईल. आजारानुसार त्याचे शुल्क घेतले जाईल. या औषधाचे नाव आहे *त्रेलोक्य रसायन*. या विश्वात जेवढे म्हणून औषधी वनस्पती आहेत, त्यांच्यापासून हे बनविण्यात आले आहे. दोन थेंब तुमचे सर्व रोग नाहीसे करतात. विश्वास ठेवा. तुमच्या ऐपतीनुसार आणि आजारानुसार हे औषध तुम्हाला देण्यात येईल. नेहमीसारखा करार लिहून द्यावा लागेल. हा सर्व पैसा शासनाकडे जाईल. शासन त्याचा उपयोग रोजगार निर्मिती, गरीबी निर्मूलन व दर्जेदार शिक्षण यावर खर्च करेल. शासन म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपण जनताच आहोत. आपण खर्च केलेला पैसा फिरून आपल्याकडेच येईल. या उपचाराचा जास्तीत जास्त खर्च शेवटी फक्त पाच हजारच असणार आहे. पाच हजारात घरातला टीव्ही येत नाही. फ्रीज येत नाही. तेच पाच हजार रूपयात येणारे दोन थेंब जीवन वाचवितात. आपल्या देशाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी हा मार्ग पत्करावा लागतो आहे. आपली अर्थव्यवस्था पूर्ण विश्वात मजबूत व्हायला पाहिजे. तरच आपण महासत्ताक बनू. आता आणखी एक उपचार पद्धती तुम्हाला सांगतो आहे. तो पूर्णतः मोफत आहे. स्वत:च करायचा आहे. याकरिता पैसा नव्हे वेळ खर्च करावी लागते.

आपणास ठाऊक आहे का? नव्वद टक्के आजार मनोकायिक असतात. मुळात आपल्याला काहीच झालेले नसते. रोजच्या जीवनातील ताणतणाव, स्पर्धा, भविष्याची चिंता, वाईट विचार,

हेवेदावे, वायफळ बडबड, मद्यपान,वाईट सवयी, अती हाव,इतरांचे नुकसान करण्याची वृत्ती, स्वार्थ साधण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची वृत्ती, अत्याधिक भोगलालसा मानसाला आजारी पाडते. मग निद्रानाश, चक्कर येणे, भीती,भूक मंदावणे, अपचन,मधूमेह, ह्रदय विकार, डोकेदुखी, अंगदुखी, थरकाप, आत्मविश्वासाचा अभाव असे तनमानसिक आजार वाईट सवयी आणि वाईट विचारांमुळे निर्माण होतात. जर तुम्हाला खरोखरच निरोगी रहायचे असेल तर चांगले विचार करा. चांगल्या सवयी अंगीकारा. सर्वांवर प्रेम करा. सर्वांना मदत करा. इतरांच्या सुख-दु:खात सहभागी व्हा. कोणाचेही नुकसान करू नका. अती हाव करू नका. अती स्वार्थ बरा नाही. सर्वांचे हित ते आपले हित हे लक्षात ठेवा. पवित्र विचारच तुम्हाला निरोगी ठेवतील. पापी विचार तुमचा घात करतील.

मन साफ तर सर्व साफ हे तत्त्व लक्षात ठेवा. रोग होणारच नाही याची काळजी घ्या. आम्ही त्रैलोक्य रसायन नावाच्या औषधाच्या फक्त दोन हजार कुपी बनविल्या आहेत. ते औषध फक्त अती गंभीर जीवघेण्या आजारांवरच दिले जाईल. तेव्हा त्याच्या भरोशावर न राहता आपले आरोग्य जपा.

यापुढे प्रत्येक गावातील शासकीय रुग्णालयात आम्ही असे यंत्र देऊ ज्यांच्या मदतीने कमीत कमी खर्चात रक्ततपासणी, सोनोग्राफी,एक्स-रे, सीटी स्कॅन,एम आर,ईसीजी ह्या सर्व सोई असतील. हे यंत्र माणसाचं वय,शरीराच्या हानीचे प्रमाण,कारणे शोधून देते. त्याच्या मदतीने डॉक्टरांना उपाययोजना करणे सोपे जाईल.

आशा आहे आपण देशवासिय आमच्या या सूचनांचे पालन करतील. धन्यवाद. "

या सूचनेबद्दल जनतेच्या संमिश्र भावना होत्या. कोणी म्हणे," पैसेवाल्यांपुढे ही संघटना झुकली की काय? म्हणून स्वस्तात मिळणारे औषधोपचार बंद करून हे उपदेशाचे डोस पाजत आहेत?" कोणी म्हणे," त्यांनी जे केले ते योग्यच केले. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत व्हायला असे करणे आवश्यक होते. नाहीतरी गरीबांना शासकीय रुग्णालयात मोफत आणि कमीत कमी खर्चात हाच औषधोपचार होतो आहे ना!"

हळूहळू जनतेने सूचनेचे गांभीर्य स्विकारले. त्यांना ते पटू लागले. औषधोपचार नेहमीप्रमाणे होऊ लागला. प्रत्येक गावात, प्रत्येक पाड्यात, शासकीय रुग्णालयात औषध देण्याच्या कामाला गती आली. जी रूग्णालये यापूर्वीच होती, त्यांना अद्यावत करण्यात येऊ लागली. मोठमोठ्या रूग्णालयात अत्याधुनिक यंत्रणा ठेवण्यात येऊ लागली. एवढेच नव्हे तर महामार्गावर आणि रेल्वेलाईनपासून पन्नास किलोमीटरच्या परिसरात एक सुसज्ज रुग्णालय बांधण्याचा संकल्प झाला. *आरोग्यम धनसंपदा* हे ब्रीदवाक्य सूचना फलकावर झळकू लागले. जनतेच्या मुखावर ओघळू लागले.

आपल्या केंद्रांवर मानव आणि इतर सहकारी या मुद्द्यावर चर्चा करीत होते. मानव सांगत होता. "आरोग्याच्या बाबतीत जनतेला निर्व्यसनी करणे ही बाब खूपच कष्टप्रद आहे. जनतेला निर्व्यसनी करण्यासाठी त्यांचा ताण कमी करावा लागेल. त्यांना जीवन

जगण्याचा नवा दृष्टिकोन शिकवावा लागेल. समाधानी राहण्यास प्रेरित करावे लागेल. तसेच जनतेत व्यसनाच्या बाबतीत प्रतिष्ठेच्या ज्या भ्रामक कल्पना शिरल्या आहेत, त्या दूर कराव्या लागतील. याकरिता लोकशिक्षणावर भर द्यावा लागेल. चला आता समाजशास्त्राला हात घालू या. "

सर्वांनी पुढच्या कार्यासाठी तत्परता दर्शवली.

(२२)

पुन्हा एकदा मंगळवारी

सुमित मंगळग्रहावर जाऊन आल्यापासून तेथील मानवांच्या दूरध्वनीची आतुरतेने वाट पाहत होता. तेथे लावलेल्या छायाचित्रणयंत्रणेद्वारे त्याला तेथील त्यांनी भेट दिलेल्या भागाचे दृष्य संगणकावर दिसत होते. तेथील मानवांची हालचाल, तेथील पाणी हे सर्व तो उत्सुकतेने पाहत होता. इथे पृथ्वीवर काही लोकांनी त्याची मंगळवारीच खोटी ठरवलेली होती. काही शास्त्रज्ञ म्हणू लागले की हे सर्व खोटं आहे. खरं म्हणजे सुमितनं परतताना मंगळावरचा पाथफाईंडर पृथ्वीवर परत आणले होते. तरीही त्यांना खोटं ठरविण्यात येत होते. म्हणून तो दूरध्वनीची आतुरतेने वाट पाहत होता. उपग्रहवाहिन्या दिवसातून एकदा जनतेला मंगळ दर्शन करून देत होते आणि कधी फोन येणार किंवा येणारच नाही? असा खोचक प्रश्नही विचारत होते.

सुमित तहानभूक विसरून आपल्याच विचारात मग्न होता आणि त्याच्या प्रतिक्षेचा अंत झाला. त्याच्या अपेक्षेप्रमाणे त्याला मंगळग्रहावरून दूरध्वनी आला.

"हेसनस,हेसनस. मम्हीआ मचेरवळागम मसीवाहिर मतलबो मतहोआ. "पलीकडून आवाज आला.

"ममी मतमिसु मयतोलबो मसीवाथ्वीपृ. मडेकच्यामतु मनवूये मलोगे मतोहो. "सुमित उत्तेजित होऊन म्हणाला.

"महो. मचेमतु महे मर्कपसं मत्रयं मलाम्हाआ मलेळामि. मचरखरोख मया मतश्वावि मरतई मरवहाग्र मवनमा मतहेआ महे मनकूऐ मरेब मलेटवा. मम्हीआ मडेकच्यामतु मल्यागे मकत्येकी मकातश मनसूपा मनवूये मतोजा. मणप मलथीते मचेवानमा मनर्शद मधीक मलेझा महीना. मम्हीतु मरत मटथे मच्यामआ मतर्यंप मनवूये मच्यामआ मनासांणमा मनटूभे मतलागे. मम्हीआ मसीवाळगमं मलाम्हातु मन्हापु मसण्याटभे मकत्सुउ मतहोआ. मलाबो मधीक मताये?" पलीकडून थेट निमंत्रण मिळाले.

"मच्यामआ मशीष्ठांरीव मर्चाच मरूक मनि मचगेल मवूये. "सुमितने प्रतिसाद दिला.

"मया मक्कीन मया. मम्हीआ मचीमतु मटवा मयतोहपा. "मंगळवासियांनी निरोप देऊन दूरध्वनी बंद केला.

सुमितने हा सर्व संवाद मुद्रित केला होता. तो त्यानं वरिष्ठांना पाठविला. वरिष्ठ पातळीवर त्यावर चर्चा घडली. पुन्हा एकदा मंगळवारी करायचा निर्णय झाला.

प्रसारमाध्यमांद्वारे ही बातमी जगभर पसरली. सारे विश्व श्वास रोखून बसले. थेट मंगळग्रहावरून धरतीशी संपर्क साधला गेला होता. मागच्या वेळी तेथील रानटी मानव पाहिली. आता आधुनिक पद्धतीचे जीवन जगणारी, शहरात राहणारी, विज्ञानाचा वापर करणारी,

कदाचित पृथ्वीपेक्षा तंत्रज्ञानात पुढे असणारी ही मानवजात पहायला मिळणार म्हणून सारे विश्व आनंदात होते.

यावेळी अवकाशयानात सुमित, मानव,त्यांचे इतर सहकारी,भारत सरकारचे विदेश मंत्री इत्यादी मंडळी होती. मंगळवासियांकरिता त्यांनी पृथ्वीवरचे बरेच उपहार सोबत घेतले. एक दिवस निश्चित करून त्यांनी मंगळवासियांना कळविले. "मम्हीआ मद्याउ मयतोये. मकनेती मनीसांता मचूहपो. मचच्यार्वीपू मणीकाठी मम्हीआ मरूतउ. मम्हीतु मथेते मवेया. "

"महो. मया. मम्हीआ मथेते मच्यामआ महसनासशाप्र मरजह महूरा. " पलीकडून उत्तर मिळाले.

यान अवकाशात झेपावले. जवळपासच्या जनतेनी यांचि देही याची डोळा यानाला मंगळाच्या दिशेने जाताना पाहिले तर बाकीच्यांनी घरी दूरदर्शनच्या पडद्यावर हा क्षण अनुभवला. पूर्ण भारतात रस्त्यावर शुकशुकाट होता. जो-तो दूरदर्शन समोर खिळून बसलेला. परदेशातही हा क्षण अनुभवला जात होता. यानाच्या आतबाहेर काय चालले आहे याची त्यांना प्रत्यक्ष पाहणी करता येत होती. संभाषण ऐकता येत होते.

आणि यान मंगळभूमीवर अवतीर्ण झाले. यानातील अवकाशयात्रींसाठी हा एक श्वास रोखून ठेवणारा क्षण होता. मागील भेटीत ते फक्त पृथ्वीवासिय होते. नंतर जाऊन त्यांनी मंगळावरील रानटी मानवांची मैत्री केली होती. यावेळी मात्र तेथे मंगळभूमीचे सर्व प्रकारचे मानव उपस्थित होते. गावातील, शहरातील,साधे जीवन जगणारे, आधुनिक पद्धतीने जगणारे,अंग झाकण्यापुरते कपडे

वापरणारे तर आधुनिक पोशाख घातलेले असे सर्व प्रकारचे मानव तेथे उपस्थित होते.

पृथ्वी आणि मंगळ या दोन ग्रहांवरच्या मानवात किंचितसा रूप रंगात फरक होता. बाकी ते मानवासारखेच मानव होते. सुमित, मानव, सहकारी आणि परराष्ट्रमंत्री यानातून मंगळभूमीवर अवतीर्ण झाले. मंगळावरील मानवांनी त्यांचे स्वागत केले. "मया मचमतु मतगस्वा महेआ. मच्यामआ मरवळागमं. "

दोन्ही हात हातात घेऊन एकमेकांचे स्वागत करण्याची तेथील पद्धत होती.

"मलाम्हातु मनटूभे मलाम्हाआ मपखू मदनंआ मलाझा. " परराष्ट्रमंत्र्यांचा संदेश सुमितने त्यांना कळविला.

"महीलाम्हाआ मदनंआ मलाझा महेआ. "समोरच्या व्यक्तीने प्रतिसाद दिला. नंतर त्यानं दोन्ही हात जोडले. "ममी मसेअ मलेकऐ महेआ मकी मम्हीतु मयसिवाथ्वीपृ मन्हीदो मतहा मनडूजो मचेकांमेकए मतगस्वा मततारक. "

"महो,मलात्या मरस्कामन मतताणम्ह. मही मयतिरभा मतध्तप महेआ. मरतइ मचीशांदे मळ्यागवेगवे मतीद्धप मतहेआ. "सुमित म्हणाला.

"मलाच, मच्यामआ मचीरवळागमं मचीवात्तहम मणेकाठी महूपा मया. मरतनं मनजभो मरूक. मचेमआ मथ्यतिरादआ मवेराकास्वी मही मम्रन मतीनंवि. " त्यांच्या प्रमुखाने म्हटले.

"मतुरंप मम्हीआ मस्तजा मळका मथेई महूरा मतकश महीना. मया मतनाया मरवल्यासब मलाम्हाआ मजी मक्तीश मप्तप्रा मलीझा मती मतदीर्याम महेआ. महीका मनेळाका मती मतष्ठापुसं मरणाये. "मानवनं आपली मर्यादा सांगितली.

"महीका मतकरह महीना. मच्यामआ मतनाहवा मसाब. मलाम्हातु मथेई महूरा मचेण्याकश मथ्यर्मसा मप्तप्रा मलईहो. "मंगळवासियांचा इतर सहकारी म्हणाला.

"महे मरत मचमत्तउ महेआ. "परराष्ट्रमंत्र्यांनी सुमितच्या माध्यमातून त्यांना म्हणाला.

ते सर्व वाहनात जाऊन बसले. वाहनात बसण्यासाठी दोन पायऱ्या चढून जावे लागले. वाहन दहा चाकांचे होते. सर्व बाजूंनी खिडक्या होत्या. ते वाहन अल्फाईस नावाच्या धातूकापासून बनवलेले होते. चाके मस्टेन नावाच्या लवचिक पदार्थांनी बनविलेले होते. ते नॅक्रोन नावाच्या इंधनावर चालत होते.

वाहने शहराच्या दिशेने निघाली. या पृथ्वीवासिय पाहुण्यांना पाहण्यासाठी बरेच मंगळवासिय आपापली वाहने घेऊन आले होते. कोणी दुचाकी, कोणी तिचाकी, कोणी चार चाकी तर कोणी बहुचाकी. आपापल्या ऐपतीप्रमाणे. तीही या वाहनांच्या मागे निघाली. मानव, सुमित, सहकारी, परराष्ट्रमंत्री हे सगळे आश्चर्याच्या महासागरात डुंबून बाहेरचे दृष्य पाहू लागले.

तेथील वातावरण तांबड्या रंगाचे होते. वर ढग आणि आकाशही लाल रंगाचे होते. पण पण पर्वत, मृदा,जमिन, पठारे या बाबतीत मात्र

पृथ्वीचा नियम लागू पडतो. पृथ्वीच्या तुलनेत सूर्यापासून दूर असल्याने (सूर्य -बुध-शुक्र-पृथ्वी-मंगळ-गुरू-शनी-युरेनस-नेपच्युन) तेथे हवामान शून्याच्या आसपास होते. पृथ्वीवासिय पूर्व तयारीनिशी गेले होते म्हणून त्यांना थंडीचा विशेष असा त्रास झाला नाही. बाकी प्राकृतिक संपदा पृथ्वीप्रमाणेच होती. फक्त आकार आणि रूप रंगात किंचितसा डोळ्यात भरणारा फरक जाणवत होता.

शहर जवळ आले आली पृथ्वीवासियांचे डोळे विस्फारले गेले. निसर्ग आणि आधुनिक विज्ञान यांचा सुंदर मिलाफ तेथे दिसून आला. निसर्गाच्या कोणत्याही घटकाला हानी न पोहोचवता तेथे पर्तावर, नदीच्या काठी, मैदानात शहरे वसविण्यात आलेली दिसून आली. पर्वतावरील घरेच नव्हे तर उंच उंच इमारती एवढ्या खुबीने बांधलेली होती की ती पर्वताचाच भाग वाटत होती. एके ठिकाणी तर दोन डोंगरावर एकेक प्रचंड मोठी इमारत होत्या. त्या एका प्रचंड पूलाच्या मदतीने जोडण्यात आली होती. खाली खोल दरी. नदी खळबळ वाहत होती. तो पूल तरी कसा? तीन पदरी. सर्वात वरच्या भागातून रस्ते वाहतूक होत होती. दुचाकीपासून बहुचाकीपर्यंत वाहने त्यावरून जात होती. त्याच्या खालच्या भागातून रेल्वगाडीसारखी वाहने जाण्याच्या मार्ग होती. एकदम खालचा मार्ग अत्यावश्यक व्यक्तीसाठी होता. त्या दोन्ही इमारतीत यांचे वेगवेगळ्या मजल्यावर स्थानक होते. अती वरच्या टोकाला रस्सी मार्गही होता. संपूर्ण शहराचा आनंद लूटू पाहणाऱ्या पर्यटकांसाठी ते होते.

"महा मलपू मसईल्फाअ मणिआ मलक्सीबॉ मच्यायां मणाश्रमि मनसूपा मतण्याविनब मलाआ महेआ. मरोजाह मर्षव मलाया मचताणको मकाधो महीना. "मंगळवासियांचा पुढारी म्हणाला.

"मतभूद्अ" मानवाने प्रतिक्रिया दिली.

आणखी पुढे गेल्यावर जसे रक्तकेशिकांचे जाळे असते तसे वाहनांचे रस्ते एकमेकांना गुंतल्यासारखे दिसून येत होते. एकाच प्रचंड अशा गोलाकार खांबाचा आधार त्या दहा-बारा रस्त्यांना देण्यात आला होता. सर्व रस्ते एकाखाली एक होते. कोठेही वर्दळ नव्हती. वाहने आपापल्या मार्गाने शांतपणे जात होती. त्यापैकी एका वाटेवरून जाताना आपण एखाद्या भूलभुलैया मधून जात आहोत असं पृथ्वी वासियांना वाटू लागले.

. तेथील सर्व इमारती बॉक्सील या धातूकापासून बनविलेल्या होत्या. हा धातू उष्णता रोधक, विद्युत रोधक, चमकदार आणि टिकाऊ आहे. एकेका इमारतींचे आयुष्य हजार वर्षे असल्याचे त्यांना सांगण्यात आले.

. शहरात जागोजागी उद्याने, शैक्षणिक संस्था, इस्पितळे, प्रशासकीय इमारती आकर्षक पध्दतीने, कल्पकतेने निसर्गाला कोणतीही हानी न पोहोचवता बनविण्यात आल्याचे दिसून आले.

" मथेई मशकाप्र मनाजयो मशीक मलीके मतेजा?" सुमितने विचारले.

" मकाए मष्टशिवि मतत्रायं मपरूवद्र मतूधा 'मराव्हो' मलारभ मतोजा. मळक मचताबदा मजवी मणर्मानि मतेहो. मतूधा मलापसं मकी मदीरेख मनरूक मचायराभ" एका अधिकाऱ्याने माहिती दिली

"मचीण्यापाडसां मस्थावव्य मयका मतेसअ?" मानवचा प्रश्न.

" मकत्येप्र मततीरमाई मशीअ मणात्रयं मातेसअ मकी मजरोरद मणीपाडसां मकाए मतकीटा ममाज मतेहो. मरवच्यात्या मकाए ' मसरफेलाको' मच्यावाना मचीनायसार मयाक्रिप्र मततारक. मर्णपू मणीपाडसां मतत्या मनलीवि मनवूहो मतेजा. मचहीका मकल्लशि मतहरा महीना. " दुसऱ्या अधिकाऱ्याने उत्तर दिले.

"मत्वा मचरफा मनछा! मणिआ मराचक मनपस्थावव्य मसेक मलेके मनेजा?" परराष्ट्रमंत्र्यांचा प्रश्न सुमितने भाषांतर करून सांगितला.

"मकत्येप्र मतराघ, मकत्येप्र मततीरमाइ मर्णपू मराचक मकाए मतगमीभू मतकीटा मळागो मतोहो. मतच्यात्या मलाईथामि मनटेझाबें मलहोल्कोअचे मनयसार मनकूटा मयाक्रिप्र मततारक. मते मनजूकू मणिपा मतेहो. मते मरतनं मच्याण्यापाडसां मतकीटा मतेये. म:तर्णपू मष्टन मलेके मतेजा. "मंगळवासियांचा अधिकारी हास्यवदन करीत सांगत होता.

पृथ्वीवरून आलेल्या लोकांच्या मनात एकच विचार सुरू होता. तो म्हणजे हे मंगळवासिय पृथ्वीवासियांपेक्षा विज्ञानतंत्रज्ञानात खूपच पुढे आहेत. सांडपाणी, कचरा यांची कायमची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था आहे. पूर्ण शहर निसर्गाच्या सान्निध्यात आहे. प्रदूषणाचा

प्रश्नच येत नसावा. कुठे वाट विशालकाय वृक्षाच्या आधारारून जात होती तर कुठे वृक्षाखालून जात होती. कुठे डोंगरावर आणि नदीच्या कडेला घरं होती तर कुठे पाण्यात तरंगती घरं होती. प्रत्येक घराच्या आसपास रंगीबेरंगी पानाफुलांची वृक्षराजी होती. प्रत्येक घर, प्रत्येक इमारत, वृक्षांच्या जंजाळात शोभून दिसत होते. त्यांचे रंगही प्राकृतिक.

त्यांचे वाहन एका टेकडीच्या पायथ्याशी थांबले. दोन्ही ग्रहावरचे मानव वाहनातून बाहेर पडले. पृथ्वीवासियांनी समोरच्या टेकडीवर नजर टाकली. त्या टेकडीवर लाल संगमरवर पाषाणापासून बनविलेला लाल महाल होता. त्याला शेकडो दालनं होती. महाल आकर्षक अशा नक्षीकाम आणि कोरीवकामाने सुशोभित करण्यात आला होता. इतक्या लांबूनही त्यांना त्याची सुंदरता दिसून येत होती.

"मलाच. मध्येम मऊजा. मलाल्यापआ मत्या मतलाहाम मचेयजा महेआ. " अधिका- याने असं म्हटल्यावर दोन्ही ग्रहवासिय प्रवेशद्वारापाशी गेले . तेथे काही स्त्रिया रेडियम धातूपासून बनविलेली ताटे घेऊन आल्या. ती ताटे डोळे दिपवून टाकत होती. त्यात मंगळग्रहावरची सुगंधित तशीच रंगीबेरंगी फुले होती. ताटात निळ्या रंगाची फूले होती. मिठाई सारखी काहीतरी गोड वस्तू होती. त्या स्त्रियांनी पृथ्वीवासियांना ओवाळले. निळीपूड टिका म्हणून त्यांच्या कपाळी लावली. कसल्याशा वनस्पती तेलात एक धाग्यासारखा पदार्थ टाकून निरांजन सारखे भांडे प्रज्वलित केले होते. स्त्रियांनी पृथ्वीवासियांच्या मस्तकावर फुलं उधळली. परिसर गंधून गेला. हा

आदरातिथ्य पाहून पृथ्वीवासिय भारावून गेले. जणू आपण धरतीवर भारतातल्या कोणत्यातरी प्रांतात असल्यासारखे वाटले त्यांना.

"मच्यामतु मरवथ्वीपृ मचसेअ मचेण्यांहुपा मतगस्वा मततारक मना! मम्हीआ मलेकऐ मतेहो मच्यामआ मजार्वपू मनडूक. " तो अधिकारी म्हणाला.

. "महो,मरबरोब महेआ मते. मलथीये- मलथीते मतर्थादाप मकरफ महेआ मचढेवए. "मानव म्हणाला.

त्या गुहा सदृश्य दारात सर्व मंडळी शिरली. ते एका उद्धारक(लिफ्ट)यंत्राने थेट महालात गेले. आतील दृष्य खरोखरच अवर्णनीय होते. लाल महाल असले तरी विविध रंगांच्या खडकांनी ते सुशोभित करण्यात आले होते. छतावर, भिंतीवर,खिडक्यांवर, तळाला, दाराच्या कमानीला सर्वत्र ऱ़ंगबिरंगी खडे वापरून भव्यतेवर सुंदरता निर्माण करण्यात आली होती.

अतिथीदालन भव्य आणि मंत्रमुग्ध करणारे होते. डोळ्यांचे पारणे फेडणारे होते. धरतीवर जसे समारंभात विद्युत रोषणाई केली जाते तसेच बारीक बारीक दिव्यांची रोषणाईने दालन चमकून गेले होते. कुठेकुठे रेडिअमचा वापर करण्यात आला होता. अनेक प्रकारच्या सुगंधी द्रव्यांनी दालन गंधीत झाले होते. त्यात फुलाफळांनी सजावट सौंदर्यात भर घालीत होती. भरपूर प्रकाश योजना आणि वायूविजनाची व्यवस्थाही तेथे दिसून आली. अतिथींना उब मिळावी म्हणून काही यंत्र गरम हवा फेकीत होती.

पृथ्वीवासियांसाठी खास निळ्या रंगाच्या आसनांची व्यवस्था करण्यात आली होती. मानव आणि इतर मंडळी त्यावर जाऊन बसली तर मंगळवासिय तांबड्या रंगाच्या आसनावर स्थानापन्न झाले. प्रत्येक आसनासमोर एकेक लाकडी मेज होते. काही क्षणात मंगळवासियांचे उत्तमात उत्तम भोजन रेडियम सदृश थाळीत हजर झाले. बॉक्सिलच्या चमकदार पेल्यात प्यायला पाणी आले.

"मनजभो मनहग्र मवेराक. "मुख्य अधिकारी निवेदन करत म्हणाला.

"महे मनजभो मनसूपाशाक मलेलेविनब महेआ?" सुमितने कुतुहलाने विचारले.

"मम्हीआ मसीवाळगमं मत: र्णपू मन्यजतीस्पनव मर्थदाप मतोखा. मम्हीतु मतश्चिंनि मनऊहो मवेखा. मलीपआ मररीश मनाचर मचकए महेआ. मलचेप मलाम्हातु महे. "मुख्य अधिकारी म्हणाला.

मानव, सुमित, सहकारी, परराष्ट्रमंत्री यांनी एकमेकांकडे पाहिले. नजरेनजरेत इशारे झाले. अन्नग्रहण करण्याच्या निर्णय झाला. त्यांनी ताटाला हात जोडले. घास मुखात घेतला.

"ममतिप्रअ! ममतिप्रअ!" परराष्ट्रमंत्र्यांचा मुखातून उदगार निघाले.

"मचलेटवा मतेहो मलाम्हातु मलडेवआ मनणूम्ह. " मंगळवासियांनी पुष्टी जोडली.

धरतीवासियांनी आस्वाद घेत मंगळवासियांसोबत तेथील भोजन ग्रहण केले. तांदूळ, गहू आणि बाजरी सारखा काहीसा दाणेदार पदार्थ

होता तो. सोबत भाकरीसदृश वस्तू होती. आंबट,तिखट, गोड,कडू,खारट,तुरट चवीचे बरेच पदार्थ थाळीत होते. घरगुती जेवणासारखेच ते वाटले. पाणी तर पृथ्वीची आठवण देत होते.

"मतण्यापा महीसाराज मकरफ महीना. "परराष्ट्रमंत्री म्हणाले.

महेआ. मलथीये मतण्यापा मनजक्सिऑ मत्रामा मस्तजा महेआ. "मंगळावरील अधिकारी म्हणाला.

"मनणूम्ह मढीवए मरीतरत मतेटवा. "मानव म्हणाला.

"मम्हीआ मणीपा मतषिदू मऊहो मतदे महीना. "

जेवणं झाली काही प्रमुख अधिकाऱ्यांसह पृथ्वीवासिय चर्चा करीत महालासमोरील निसर्ग न्याहाळीत बसले. एकमेकांच्या ग्रहांवरच्या चर्चा झाल्या. समस्या, रीतीरिवाज, भाषा, इतिहास, आधुनिक विज्ञान यांच्या बद्दल विचारमिमर्श झाला. यातून एक कळले की मंगळावरचे विज्ञान पृथ्वीच्या कितीतरी पटीने पुढे आहे. विशेष म्हणजे पृथ्वीसारखे तेथे विज्ञानाचा दुरूपयोग होत नाही. प्रदूषणाच्या समस्या तेथे नाहीत. प्रत्येक मनुष्य नीतीनियम पाळतो. प्रत्येकजण निसर्गाचे रक्षण करतो. त्यांना वाटते, शेवटी मंगळ हा आपल्या करिता असलेला एकमेव ग्रह आहे. त्याचे रक्षण करावेच.

(२३)

सूक्ष्मातून विश्व

सुमित दुसरी मंगळवारी करून गावी परतला. त्याचे जंगी स्वागत करण्यात आले. ढोलताशाच्या गजरात त्याची मिरवणूक काढण्यात आली. आपल्या गावकऱ्यांचे हे प्रेम पाहून सुमित भारावून गेला. सर्व ग्रामस्थांनी त्याच्या सत्काराच्या कार्यक्रम ठेवला होता.

त्यापूर्वी एके दिवशी महाचमत्कार झाला. सुमितच्या जुन्या घराच्या जागी तीन मजली भलीमोठी इमारत दिसून आली. ती मंगळावरील इमारतीसारखी होती. बॉक्सिल धातूपासून बनवलेले. रेडिअमसदृष्य निळ्या पट्ट्यांनी ती चकाकत होती. खिडक्या, दरवाजे आणि दर्शनी भागावर सिलॅकन धातूपासून बनविलेल्या काचेचे पडदे होते. त्यामुळे इमारत खूपच सुशोभित दिसत होती.

सुमितच्या साध्या बैठ्या कौलारू घराजवळ ती इमारत एका रात्रीत कशी उत्पन्न झाली हे पाहण्यासाठी अख्खा गाव गेला होता. गावक-यांच्या प्रश्नांना उत्तरे देताना सुमितला नाकीनऊ आले. त्याने सर्वांना सत्कार समारंभात याचे उत्तर देण्याचे मान्य केले.

ठरल्याप्रमाणे सत्कार समारंभाला सुरुवात झाली. कधी नव्हे ती अलोट गर्दी दिसून आली. सुमितचे मंगळग्रहावरचे अनुभव ऐकण्यासाठी आणि त्याच्या इमारतीचे रहस्य जाणून घेण्यासाठी सारा गाव आतुरतेने वाट पाहत होता. सुमित एवढी अलोट गर्दी पाहून

चकित झाला. 'एरव्ही विज्ञानाची चर्चा ज्यांना पचनी पडत नाही,तीच माणसं आज विज्ञानाचा माझा अनुभव ऐकण्यासाठी अधीर झाली आहेत. म्हणजेच आता खऱ्या अर्थाने विज्ञानाच्या प्रगतीला सुरुवात झाली म्हणायचे. ' सुमित स्वतः शीच म्हणाला.

सुमित भाषणाला उभा राहिला आणि पूर्ण परिसर चिडीचूप झाला. "सर्व प्रथम सर्व ग्रामस्थांना माझा जय हिंद. मित्रहो, आपण माझ्यासाठी येथे आलात याबद्दल मी आपले प्रथम आभार मानतो. मंगळ हा ग्रह पृथ्वीचा भाऊच आहे. तेथील वातावरण तांबूस रंगाचे आहे. म्हणून आपल्याला तो इथून लालसर दिसतो. पृथ्वीपेक्षा तो किंचितसा लहान आहे. सूर्यमालेत त्याचा चौथा क्रमांक लागतो. पूर्णग्रह आपल्या पृथ्वी सारसाख आहे. प्राकृतिक रचना, नैसर्गिक संपदा, पाणी, पक्षी, मानव सर्व हूबेहूब पृथ्वीप्रमाणे. फरक म्हणाल तर किंचितसा बाह्यांगात दिसून येतो. हा फरक कसा आहे? एखादा चिनी, नेपाळी,कोरीयन मनुष्य भारतात किंवा इतर भागात सहज ओळखून येतो तो चेहऱ्याच्या ठेवणीमुळे. एखादा युरोपीयन पूर्वेकडे सहज ओळखता येतो तर एखादा निग्रो युरोपात उठून दिसतो. मानव एकच पण रूपरंग, चेहऱ्याची ठेवण वेगळी. तसाच फरक पृथ्वी आणि मंगळावरील मानवजात आहे. "

सुमित पुढे सांगू लागला. "हा मंगळ विज्ञान-तंत्रज्ञानात आपल्यापेक्षा हजार वर्षे पुढे आहे. तरीही पर्यावरणाला जराही हानी पोहचू दिली नाही त्यांनी. तेथील मानव शिस्तप्रिय आहे. सर्व जबाबदारी पूर्वक वागतात. नियम कोणीही तोडत नाही. निसर्ग आणि

आधुनिक विज्ञानाचा मिलाफ करून ते राहतात. म्हणून आपल्यापेक्षा खूप सुखी आहेत. तेथे जात,धर्म,वंश असा कोणताही भेदभाव केला जात नाही. त्यांनी प्रेमाची भेट म्हणून आम्ही जेवढे लोक मंगळावर गेलो होतो,तेवढ्यांना ही इमारत भेट दिली आहे. "

"पण सुमित,तू आलास तेव्हा तुझ्याकडे फक्त सामान होते. एवढी मोठ्ठी इमारत कधी आणलीस? तुझे पूर्वीचे घर गेले कुठे?" एका गावकऱ्याने नेमका मुद्द्याला हात घातला.

"तुमचा विश्वास बसणार नाही पण हे सत्य आहे की ही इमारत मी एका पेटीत भरून आणली होती. "सुमित म्हणाला.

"कसं शक्य आहे?" दुसऱ्या गावकऱ्याने विचारले.

"का नाही? या विश्वात सर्व शक्य आहे. या विश्वाचे मूळ सूक्ष्म आहे. ते पुढे जाऊन स्थूळाचे रूप घेते. पहिले मातीचे कण असतात. ते एकत्र येऊन वीटा बनवतात. त्या वीटापासून इमारत बनते. तिच्या मुळाशी ते सूक्ष्मकण असतात. तुमचा-माझा जन्म सुद्धा सूक्ष्मापासून झाला आहे. पुढे ते विस्तारत जाऊन आजचे आपण दिसत आहोत. हे विश्व देखील एका बिंदूपासून विस्तारत आकाराला आले आहे. कोणतेही कार्य आधी घडत नाही. त्यापूर्वी मनात त्या कार्याची सूक्ष्म जडणघडण सुरू होते. आधी सूक्ष्म पातळीवर ते कार्य पूर्ण होते मग ते अस्तित्वात येते. हाच निसर्गाचा नियम आहे. आम्ही मंगळावर जाण्यापूर्वीच तेथील लोकांनी आमच्याकरिता ह्या अशा सूक्ष्म इमारती बनवून ठेवल्या होत्या. त्या आम्ही इथे आणल्या. आपापल्या घरावर ठेवल्या. त्यांना रात्री संपर्क साधला. त्यांनी माझ्या आणि इतरांच्या

घराचे ठिकाण संगणकावर नोंदवून ठेवले होते. ज्या अक्षांश आणि रेखांशामध्ये आमचे घर येते तेथे त्यांनी आपल्या यंत्रणेमार्फत लेझर किरणांच्या माध्यमातून हे घर सूक्ष्मापासून मोठे केले. माझे जुने घर खाली गेले. बस्स! हाच आहे त्या इमारतीचा जन्म इतिहास. "

"अरे सुमित, विश्वास बसत नाही रे?" एकाने विचारले.

"नाहीच बसणार विश्वास. कारण तुम्ही ते प्रत्यक्ष पाहिलेले नाही. हे तर काहीच नाही. यापेक्षा कैक पटीने अविश्वसनीय बाबी या विश्वात आहेत. आता तर मंगळ आणि पृथ्वीत ये-जा सुरू होणार. पुढे व्यवहारही सुरू होतील. तुम्हा सर्वांना मंगळ पाहता येईल. आता तर ऍन्ड्रामेंडा आकाशगंगेत जो सॅट-९ नावाचा ग्रह आहे त्यावर जायची योजना आहे. तेथे तर यापेक्षा आणखी मोठमोठे चमत्कार पहायला मिळणार आहेत. पुढे जो धूमकेतू आपल्या सूर्यमालेत येतो,तो कुठून येतो?कसा येतो? तो नक्की आहे काय? याचे संशोधन होणार आहे. तेही प्रत्यक्ष धूमकेतूवर जाऊन. हे विश्व अफाट आहे. आपल्या आकलन शक्तीच्या पलीकडे आहे. या विश्वाच्या तुलनेत पृथ्वी नगण्य आहे. तेथे तुमच्या आमच्या अस्तित्वाला किंमतच नाही. हा पण दुसऱ्या बाजूंनी विचार केल्यास पूर्ण विश्वात आपण मनुष्यच महत्वाचे आहोत. कारण हे पूर्ण विश्व आपल्यातच सामावलेले आहे. "

"सुमित, हे ऐकून अजब वाटते आहे. या विश्वाची कहाणी सांग. या जगाच्या पसाऱ्याबद्दल सांग. "एकाने निवेदन केले.

सुमित सांगू लागला. "करोडो-अरबो वर्षांपूर्वी विश्व म्हणायला काहीच नव्हते. विद्यमान विश्वातील प्रत्येक बाब एका अती प्रचंड

घनतेच्या एका सूक्ष्म बिंदूत सामावलेले होते. प्रत्येक कण, प्रत्येक बल, प्रत्येक ऊर्जा त्या बिंदूत एकवटलेले होते. एका वेळी या बिंदूचा स्फोट झाला. हा स्फोट असा होता की करोडो ज्वालामुखीचा विस्फोटही त्याच्या पुढ्यात एका विशालकाय प्राण्यापुढे सूक्ष्मजीव ठेवण्यासारखे होते. त्यातून ऊर्जा बाहेर पडली. गुरूत्वबल, विद्युतचुंबकीयबल, अणुकेंद्रीय बल इत्यादी बले मोकळी झाली. त्यांच्या परस्पर पूरक कार्यामुळे अगणित सूक्ष्मातिसूक्ष्म कणांपासून अणुरेणूंची निर्मिती झाली. त्या अणुरेणुपासून पदार्थ झाले. इथर नावाच्या पदार्थांपासून या विश्वाची पोकळी तयार झाली. तेथे पदार्थांची जडणघडण होत गेली. या पोकळीत विविध बलामुळे वाहणारा अदृष्य पदार्थ तयार झाला. हवं तर त्याला हवा म्हणा. हायड्रोजन वायू हा विश्वातील सर्वात जास्त प्रमाणात आढळणारा वायू आहे. याचेच पुढे ढग तयार होऊन त्यापासून प्रचंड अग्नीलोळ निर्माण झाले. हेच विविध ब्रम्हांडात चमकणारे अगणित तारे होत. या ता-यांच्या एकमेकांवर घासून-आपटून द्रवरूप पदार्थ तयार झाले. तो द्रव स्वतः भोवती फिरत फिरत थंड होत गेले. त्याचेच मग विविध ग्रह झाले.

आपल्या पृथ्वीचा विचार करता तिही पूर्वी अग्नीचा तप्त गोळा होती. स्वत: भोवती फिरता फिरता ती गार होत गेली. त्यावेळी तिच्यावर वातावरण तयार झाले. तेव्हा रासायनिक प्रक्रिया होऊन हायड्रोजन आणि ऑक्सिजन यांच्यापासून प्रचंड प्रमाणात पाणी तयार होऊन पृथ्वीच्या खडकांवर पाण्याचे आवरण निर्माण झाले. पुढे लाखो वर्षांच्या प्रक्रियेतून विशिष्ट रसायनांच्या प्रक्रियेतून सूर्यप्रकाशाच्या

सहाय्याने पाण्यात पहिला सूक्ष्मजीव निर्माण झाला. त्याला रूप-रंग-आकार काहीच नव्हते. हजारो वर्षांच्या विकासप्रक्रियेत त्याला स्थूलता प्राप्त झाली. त्यातील काही जीव वातावरणात गेले. काही जमिनीवर गेले. प्रतिकूल वातावरणात जाताना त्यांच्या शरीर रचनेत बदल होत गेला. पुढे अनेक प्रकारे वनस्पती व प्राणी निर्माण झाले. जलचर,स्थलचर,खेचर,उभयचर,स्वेदज,अंडज,उद्भज,जारज असे जीव या सृष्टीत वावरू लागले आणि मग सरतेशेवटी आला तो मानव. या पृथ्वीचे आयुष्य चोवीस तासांच्या घड्याळात बंदिस्त केले तर तिचं आयुष्य संपायला शेवटचे तीन सेकंद बाकी असताना मानव इथे अवतरीत झाला आहे.

या जीवन उत्क्रांतीत धूमकेतूचे महत्वाचे योगदान आहे. शास्त्रज्ञांचा असा अंदाज आहे की धूमकेतू येताना सोबत विविध प्रकारच्या जीवांचे बीज घेऊन येतो. वाटेत त्या त्या ग्रहांच्या वातावरणात ते बीज सोडून देतो. याच पद्धतीने पृथ्वीबरोबरच इतर ग्रहांवर देखील सजीवसृष्टी विकसित झाली आहे. त्यातील दोन आपल्याला भेटली आहे. "

क्षणभर सर्वत्र शांतता पसरली.

"सुमित, हे सर्व अद्भुत आहे रे. तो पहिला जीव तयार होणे. धूमकेतूचे जीवांचे बीज घेऊन येणे हे सर्व अशक्य वाटते. नर आणि मादी असल्याशिवाय जीव निर्माण होऊ शकते का रे?" एका ग्रामस्थाने विचारले.

"हो, शक्य आहे. जीव निर्माण होण्यासाठी नर-मादी असायलाच हवे, असं नाही. पहिला जीव पाण्यात तयार झाला. तेव्हा कुठे नरमादी होते? मुळात तो जीव स्वतः नरमादी या भेदात बसणारा नव्हता. आताच्या घडीला असे असंख्य जीव आहेत की ज्यांच्या निर्मितीला नर-मादीची आवश्यकता नसते. वनस्पतीच्या बाबतीत हे प्रकर्षाने आढळून येते. अशा बऱ्याच वनस्पती आहेत ज्यांची निर्मिती मुळांपासून, खोडापासून, पानांपासून,फूलांपासून,बीजांपासून होत असते. पानफूटी बघा. जास्वंद पाहा. तेव्हा तुम्हाला कळेल. "

"प्राण्यांचे उदाहरण दे ना. "एकाने विचारले.

"अमिबा,स्पायरोगायरा,युग्लीना,किण्व,प्लॅनेरा,हायड्रा असे काही सूक्ष्मजीव आणि साधे जीव आहेत, त्यांच्या पुनर्निर्मितीकरिता नरमादीची आवश्यकता नसते. ते स्वतः पासून नवीन जीव तयार करतात. त्यांच्या शरीराचे तुकडे होऊन नवीन शरीरे तयार होतात. पुढे ते स्वतंत्र जीव म्हणून जगतात. "सुमितने सांगितले.

"ही नावं आम्हाला ठाऊक नाहीत. आमच्या परिचयाची उदा हरणे सांग. "प्रेक्षकातून एकाने प्रश्न विचारला.

"असे कितीतरी जीव आहेत, जे या धरातळावरून नामशेष झाले होते, ते पुन्हा अस्तित्वात आले आहेत. काही नवीन प्रजाती पाण्यात आणि वनात आढळून आल्या आहेत. धूमकेतूने आणलेले बीज कदाचित त्या ठिकाणी पेरले गेले असतील. सध्या सर्वत्र अणुचाचण्या घेतल्या जात आहेत. त्यातून किरणोत्सर्ग होत आहे. तसेच उपग्रह आणि भ्रमणध्वनी यांचे असंख्य किरणोत्सर्ग

वातावरणात आहेत. त्यांच्यामुळे जसे चिमणी सारखे जीव धोक्यात आलेत तसे काही नवीन जीव निर्माण होत आहेत. नामशेष झालेले काळे चित्ते काही जंगलात आढळून आले आहेत. हा निसर्ग बदलत आहे. त. याचे नियम बदलत आहेत. हा बदल कदाचित आपल्याबरोबर इतर बऱ्याच प्राण्यांच्या नाशाला कारणीभूत ठरेल तर कदाचित इतर बऱ्याच नवीन जीवांच्या निर्मितीला पोषक ठरेल. अर्थात,हा केवळ एक अंदाज असला तरी,काहीही घडू शकते. म्हणून आम्ही धूमकेतूची मोहिम आखली आहे. त्यातून सजीवांच्या निर्मितीचे रहस्य उलगडले जाईल. "

सारा गाव प्राण कानात आणून ऐकित होता. असे विचार त्यांनी पहिल्यांदाच ऐकले होते. शाळा-कॉलेजात त्यांच्या विज्ञान शिक्षकानेही असे कधी शिकवले नव्हते. अशी माहिती दिलेली नव्हती. सगळे कसं अद्भुत विचार करायला लावणारे होते. प्रेक्षकवर्ग विज्ञानाची कहाणी ऐकून मंत्रमुग्ध झाले होते. विश्वातील अफाट ज्ञानाची कवाडे त्यांच्यासाठी उघडली गेली होती. सुमितने नागरिकांच्या मनात विज्ञानाची आवड उत्पन्न केली.

"सुमित, तुमच्या सारखी घरं सर्वांनाच मिळतील का?" प्रेक्षकातून एकाने विचारले.

"आमचे वरिष्ठ जसा निर्णय घेतील त्यावर हे अवलंबून आहे. आसाम सारख्या भागात जेथे वारंवार पूर येतो. घरांना क्षती पोहचते. तेथे अशी घरं हवीत. मी प्रस्ताव सादर केला आहे. तूर्त आपला

मंगळग्रहाशी व्यवस्थित संबंध प्रस्थापित होऊ द्या. व्यवहार सुरू होऊ द्या. "सुमितनं उत्तर दिले.

"सुमित, तुमच्या या घराचे वैशिष्ट्य काय आहे?" एकाने सोडले.

"या घरात उन्हाळ्यात गरमी वाटत नाही. गारवा राहतो. हिवाळ्यात ते उबदार राहते. पावसाने ते खराब होत नाही. ध्नवी आणि विद्युत रोधक आहे. या घरात वीजेचा धक्का बसत नाही. घरातील आवाज बाहेर किंवा बाहेरचा आवाज घरात येत नाही. सूर्यप्रकाशाच्या मदतीने घराच्या भिंती भारीत होऊन घरात वीजेची सोय होते. शेगडी वीजेवर चालते. याच वीजेवर भूमीगत पाणी घरात वापरण्यास उपलब्ध होते. मुख्य दिवाणखान्यात बसायला दोन सोफे, एक पुस्तकाचं कपाट, एक भिंतीवरील पातळ कागदासारखा दूरदर्शनसंच,त्यावर हवे ते कार्यक्रम पाहता येतात. या घरात एक स्वयंपाक घर, एक स्नानगृह तर एक शौचालय. सहा शयनकक्ष आहेत. प्रत्येक शयनकक्षात आणखी छोटे छोटे दोन कक्ष. त्यात दोन माणसं झोपतील असा पलंग, एक छोटा कपाट. "सुमितच्या उत्तराने असे घर आपल्यालाही हवे अशी इच्छा तेथे जमलेल्या प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली.

"विज्ञानाचे असे अनेक चमत्कार आहेत. हे विश्वच मुळी अनेक रहस्यांनी भरलेले आहे. ते नियमांनी बांधलेले असतात. आपल्या सारख्या सर्व सामान्य माणसांना हे नियम कळत नाही. मग आपण त्यांना चमत्कार म्हणतो. खरे पाहता प्रत्येक घटनेमागे विज्ञानाचे किंवा आपण त्याला निसर्गाचे नियम म्हणू या, ते असतात. आता हेच पहा

ना. ऊर्जा ही अक्षय असते. ती कधीही संपत नाही. निर्माणही करता येत नाही. फक्त एका ऊर्जेचे दुसऱ्या ऊर्जेत रूपांतर होत असते किंवा आपण मुद्दामहून तसे रूपांतर करून घेतो, हे आपण शाळेत शिकलोय. प्रत्यक्ष पाहिलेही आहे. आज एवढी वर्षे झाली. सागराचे पाणी कमी झाले आहे का? सूर्याचे तेज कमी झाले आहे का? आपल्या पृथ्वीची उत्पादकता घटली आहे का? नाहीच.

या विश्वात काहीच नष्ट होत नाही. आपल्याला वाटतं की एखादा जीव नष्ट झाला. पण तसे नसते. ती एक ऊर्जा असते. ती फक्त रूप बदलते. सजीवांच्या शरीराचा जड भाग सेंद्रिय पदार्थांच्या रूपाने मातीत मिसळून जातो. त्याचा ह्यूमस मध्ये रूपांतर होते. म्हणून आपण 'मिट्टी में मिल जायेगा' असं म्हणतो. वायूचा जो भाग असतो तो वायूंत विलीन होतो. उष्णता अग्नीच्या किंवा सृष्टीच्या उष्णतेत मिसळून जाते. पूर्ण शरीर ईथर नावाच्या काळ्या घटकात या सर्वांचे अणुरेणूंच्या स्वरूपात विलीकरण होते. इतर सर्व रंग हे भास आहेत. काळा रंग हाच वास्वत आहे या ब्रह्मांडाचा.

पुन्हा काही काळाने मिळेल त्या वाटेने (हवा, पाणी, अन्न) हेच अणू रेणू पुन्हा सजीवांत प्रवेश करून नवीन जीव निर्मितीस कारणीभूत ठरतात. ते अणुरेणू ज्या सजीवात जातात तसा रूप, रंग, आकार आणि सजीवाचे शरीर त्याला प्राप्त होते. काही काळ ते व्यक्त राहते. पुन्हा परिसरातील त्या त्या घटकांत विलीन होतात. हिच आहे ऊर्जा. अक्षय ऊर्जा. रूप बदलणारी ऊर्जा. "

गावकरी सुमितच्या विज्ञानाच्या सुमधुर स्पष्टीकरणात गढून गेले.

"सुमित,तू भारी बोलतोस यार. "एकजण भारावून म्हणाला.

"मी काही बोलत नाही. हे निसर्गाचे नियम आहेत. विज्ञानाने ते शोधून काढलेत. तेच मी तुम्हाला सांगतोय. या ठिकाणी मी आपणा सर्वांना एक विनंती करू इच्छितो की कोणीही येईल. प्रलय होणार आहे. त्सुनामी येणार आहे. भूकंप होणार आहे. जगाचा नाश होणार आहे. असे सांगत सुटेल. त्याच्यावर विश्वास ठेऊ नका. हे जग कधीच नष्ट होत नाही. फक्त होणाऱ्या घडामोडींमुळे त्यात स्थित्यंतरे घडत असतात. आज पृथ्वीला करोडो वर्षे झाली. भंकंप, ज्वालामुखी, त्सुनामी, महापूर, वादळ असे प्रकार घडत असतात. त्यामुळे पृथ्वीला काहीच फरक पडत नाही. कोणताही कलाकार आपली कलाकृती नष्ट करण्यासाठी निर्माण करीत नाही, त्याच्या आनंदासाठी करीत असतो. तसेच हे विश्व निसर्गाची सुंदर कलाकृती आहे. ती नष्ट होणार नाही. या अशा भलतेसलते सांगणा-यांच्या नादी लागू नका. उलट या निसर्गाचा आस्वाद घ्या. " सुमितने हात जोडून कळकळीची विनंती केली.

"हो सुमित, आम्हाला कळले आता. सत्याचा उलगडा झाला आहे. आता आम्ही वैज्ञानिक दृष्टिकोन नक्की बाळगू. "एकजण निर्धाराने म्हणाला.

(२४)

वाहतूक कोंडी

भारतात सर्व आलबेल होते. मंगळग्रहावरच्या जीवसृष्टीचा शोध लागल्यापासून तसेच इतर ब्रह्मांडातही जीवसृष्टी असल्याचा उलगडा झाल्यामुळे लोक वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगू लागले होते. बहुसंख्यानी असलेली सामान्य जनता आळस झटकून कामाला लागली होती. निष्ठेने, आपुलकीने आपापली कामे करू लागली होती. एकमेकांच्या कामात ढवळाढवळ करीत नव्हती. सर्वांची आर्थिक प्राप्ती बऱ्याच प्रमाणात वाढलेली होती. कामाचा म्हणावा तसा व्याप नव्हता. सर्व कर्मचाऱ्यांना महिन्यात एक दिवस सुट्टी मिळायची. सहा तास काम असायचे. अटीतटीच्या प्रसंगी क्वचित कामाची वेळ वाढायची. आपल्या देशासाठी आणि मानवतेसाठी आपण काहीतरी ठोस कार्य करतोय ही जाणीव त्यांच्या श्रमाचा परिहार करीत होती. भ्रष्टाचारही जवळपास संपत आला होता. विदेशी बँकेतला काळा पैसा देशात परत आला होता. विश्वकल्याणसंघटनेची सर्व आधुनिक यंत्रसामुग्री देशाविदेशात विक्री करून भरपूर पैसा मिळत होता. दिवसभरात करोडो रूपये कर म्हणून सरकारी तिजोरीत जमा होत होता. शासन तो पैसा गरीबांना अन्न,वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, रोजगार, व्यक्तीमत्व विकास, व्यसनमुक्ती या कामी देत होता. दुर्गम आणि अती दुर्गम भागात सर्व प्रकारचे आधुनिक तंत्रज्ञान पोहचल्याने तेथील रहिवाशांची दैना कमी झाली होती. दुष्काळग्रस्त भागात शासनाने

पाणी दिलेच होते. आता इतर सर्व मूलभूत सेवासुविधा देण्याच्या कामाला सुरुवात केली होती.

तरीही काही समस्या दूर होत नव्हत्या. शहरातील वाहनांची वर्दळ, उष्णतामान,हवेचे प्रदुषण अधूनमधून डोकं वर काढीत होते. दुष्ट प्रवृत्ती कोणत्या ना कोणत्या मनुष्याच्या रूपात वर येत होत्या. त्यांचा बिमोड करताना नाहक हिंसा घडत होती. विश्वकल्याणसंघटनेला हवा होता मनुष्याचा संपूर्ण विकास. म्हणून देशाच्या सर्व बसस्थानके,विमिनतळे,बंदर, रेल्वेस्थानकात ,पहाडात,शेतात जेथे जेथे म्हणून फलकं होती त्यावर सूचना आली.

"तमाम भारतीयांना आमचा जयहिंद. विज्ञानाच्या मदतीने आणि तुमच्या -आमच्या अथक परिश्रमाने आपण आपल्या जवळजवळ सर्वच समस्येवर मात केली आहे. पण म्हणतात ना पहिला क्रमांक मिळवणे सोपे असते, टिकवणे मात्र अवघड. आपण अल्पावधीतच खूपच प्रगती केलीय. ती आपल्याला कायम पुढे न्यायची आहे. आपणा सर्वांना ठाऊक आहे की सर्व समस्येचे मूळ आहे वाढती लोकसंख्या. ही लोकसंख्या आटोक्यात कशी येईल याचा विचार शासनाबरोबरच प्रत्येक नागरिकांनी केले पाहिजे. संतुलित लोकसंख्येमुळे प्रत्येकाच्या गरजा भागवल्या जातात. देशाच्या साधनसंपत्तीचा सर्वांना लाभ देता येतो. देशाचा विकास होतो आणि सर्व प्रकारची असमानता दूर करता येते.

आणखी एक विनंती आहे की प्रवासाकरिता सार्वजनिक वाहनांचा जास्तीत जास्त वापर करा. मेट्रो,बस, रेल्वे,रिक्षा, टॅक्सी

यातून प्रवास करा. तुम्ही कोणीही असा. भारतात सर्व समान आहेत. इथे कोणीही प्रतिष्ठित नाही. सर्वसामान्य नाहीत. आपण सर्व भारतीय आहोत. अत्यंत अटीतटीच्या प्रसंगातच खाजगी वाहनांचा वापर करा. यामुळे काय होईल? रस्त्यावर वर्दळ राहणार नाही. वाहतुक कोंडी होणार नाही. तुम्ही वेळेवर कामाच्या ठिकाणी पोहोचतील. वेळ व इंधन वाचेल. प्रदूषण घटेल. शहरांची वाढती उष्णता कमी होण्यास मदत होईल. आपल्यालाच फायदा होईल. याबाबत आपण सर्व जागरूक राहू या. हा देश माझा आहे. त्याची पूर्ण जबाबदारी माझ्यावर आहे ही भावना जोपासली की देशासाठी छोटेछोटे त्याग सहज घडू शकतात. "

सूचना सर्वांनाच पाळण्यासारखी होती. त्याचा परिणामही हळूहळू दिसू लागला होता. सार्वजनिक वाहनांच्या वापरात वाढ झाली. उत्पनही वाढले.

(२५)

ओझोनची शिलाई

विश्वकल्याण संघटनेनी आता जागतिक तापमानवाढीच्या समस्या निवारण्याचे कार्य हाती घेतले. यापूर्वीच प्रचंड प्रमाणात वृक्षारोपण करून वातावरण थंडगार ठेवण्यास सुरुवात तर केलीच होती. पूर्ण भारतात अशी एकही मोकळीक जागा नव्हती जेथे वृक्ष नावालाही नव्हते. एक चौरस फूट जागाही मोकळी नव्हती. साधे गवतही तेथे दिसेलच. परिसर कसा हिरवागार दिसत होता! चौफेर थंडगार वारा वाहत होता. उन्हाळा सावलीतच जाऊ लागला आहे. रस्त्यावर वाहने आपल्या ध्येयापर्यंत थंड हवेचा आस्वाद घेत, रंगबिरंगी फूलांचा सोहळा पाहून आनंदाने पोहचत होती. जणू ते वनातून विहार करीत आहेत असे वाहन चालकांना वाटत होते.

आता ओझोन वायूला पडलेल्या भगदाडाबद्दल उपाययोजना सुरू झाली. ममध्यमवर्गीय आणि गर्भश्रीमंत मंडळी घरात थंडाव्यासाठी शीतकपाट आणि वातानुकूलित यंत्राचा वापर करतात. त्यात थंडावा निर्माण करण्यासाठी *हायड्रोफ्लोरोकार्बन* आणि *रेफ्रिजरेन्ट R-22* हे

घातक वायू वापरला जातात. हे वायू वातावरणात जाऊन वातावरणातील सर्वात वरच्या थरातील ओझोनला हानी पोहोचवतो. विज्ञानाच्या कोणत्याही आविष्काराचा आजवर दुरूपयोग होत गेला

आहे. विज्ञानाच्या शोधातून ज्या काही उपयुक्त वस्तू निर्माण झाल्या आहेत त्याचा पर्यावरणावर विपरीत परिणाम दिसून आला होता.

पण आता तसे होणार नव्हते. विश्वकल्याण संघटनेने या शीतकपाट आणि वातानुकूलित यंत्राची रचनाच बदलून टाकली. काही घटक पृथ्वीवरचे तर काही घटक मंगळावरचे यांच्या मदतीने हीच उपकरणे पुन्हा निर्माण करण्यात आली. यात कार्बन डायॉक्साईड आणि इतर पर्यावरण पुरक रसायनांचा वापर सुरू झाला. विश्वकल्याण संघटनेच्या वैज्ञानिकांनी यात असे तंत्रज्ञान बसविले होते की कार्बन डायॉक्साईडचे विघटन होऊन ऑक्सिजन हवेत सोडला जाईल आणि कार्बनचे पूर्ण विघटन होईल. ज्याला हिंदीत 'सोने पे सुहागा' म्हणतात तशातला हा हा प्रकार होता. पण यंत्र बाजारात विक्रीसाठी आणले नाही. संघटनेच्या प्रमुखांनी शासनाबरोबर आणि देशातील शीतकपाट व वातानुकूलित यंत्रे बनविणाऱ्या कंपन्यांच्या मालकांशी चर्चा केली. त्यातून चांगलाच निर्णय निघाला. चर्चेचा उद्देश हा होता की देशी कंपन्या पडता कामा नये. संघटनेने हे तंत्रज्ञान शासनाला एका अटीवर विकले आणि ती अट अशी होती की यात कंपन्यांची अर्धी मालकी शासनाची असेल. तीवर पूर्णतः शासनाने नियंत्रण असेल. शासन आणि कंपन्यांनी या अटीला मान्यता दिली. या तंत्रज्ञानाच्या मदतीने ओझोनला हानी न पोहचविणाऱ्या वातानुकूलित यंत्रे आणि शीतकपाटाच्या निर्मितीस सुरूवात झाली.

याच सभेत सौरऊर्जा, गॅस निर्मिती, कचरा व्यवस्थापन, नद्याजोड प्रकल्प हे सर्व शासनाच्या ताब्यात देण्याचा विषय निघाला.

या बद्दल बोलताना विश्वकल्याण संघटनेचे प्रतिनिधी मानव म्हणाला,"हे सर्व देशव्यापी प्रकल्प देशासाठीच आहेत. याची मालकी देशाचीच आहे. हे आम्ही देशाच्या स्वाधीन करुच. पण केव्हा? तर जेव्हा आम्हाला पूर्ण खात्री पटेल की शासन हे प्रकल्प नीट सांभाळू शकते. शासकीय कर्मचारी या प्रकल्पाबाबतचे आपापले कर्तव्य चोख बजावू शकतील. प्रत्येकजण प्रामाणिकपणे काम करतील. कोणीही भ्रष्टाचार करणार नाही. वेळेवर आपापली कर्तव्य पार पाडतील. कामचुकारपणा करणार नाही. तेव्हाच आम्ही हे सर्व प्रकल्प शासनाच्या हवाली करू. आमचे शासनाला आणखी एक निवेदन आहे की सर्व मोठे उद्योग शासनाने ताब्यात घ्यावेत. त्यात खाजगी तीस टक्के मालकी हक्क ठेवावेत. याबरोबरच आजारी किंवा बंद पडलेले उद्योग चालवायला घ्यावेत. कर्मचारी आणि कामगारांना आधुनिक मूल्यांकन पद्धतीने वेतन द्यावे. कंपनी-उद्योगात ठेकेदारी पद्धत कायमची बंद करावी. महिन्याला फक्त एकच सुट्टी हवी. दिवसाला फक्त सहा तास काम. मग कोणीही असो. कामगार असो किंवा कार्यालयीन कर्मचारी असो, त्यांना सर्व सोयी सवलती द्यावे. त्यांचे लाड पुरवितानाच कर्तव्याची पदोपदी आठवणही करून देण्यात यावी. दहावीचा विद्यार्थी शिक्षकांना जोमानत नाही असं म्हणतात. कामांत हेळसांड करणाऱ्या, हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आणि कामगारांना पहिली आणि शेवटची ताकीद देऊन क्षमा करावे. पुन्हा तसे केल्यास त्यांना कायमचा नारळ द्यावा. या प्रगतीशील भारतात आळशी, कामचुकार, हलगर्जीपणा करणाऱ्यांना स्थान नाही. इथे कष्ट करणाऱ्यालाच मान आहे. कामाच्या वेळेला कामावर. इतर वेळेला त्यांच्या ठिकाणी. अशाच व्यक्तीची प्रगती संभवते आहे आणि अशाच व्यक्तीला कामं द्यावीत. पैसे देऊन कामाला लावणा-यांना चांगली अद्दल घडविली जाईल अशी व्यवस्था ठेवा. शेवटी देश महत्वाचा.

देशाची प्रगती महत्वाची. अर्थात सर्व मिळूनच देशाची प्रगती करू शकतात. स्थानिक ठिकाणी स्थानिक लोकांनाच घ्या. वेळ आणि त्रास वाचतो. "

ही बातमी प्रसार देशभर पसरली. ओझोनचे भगदाड आता नक्कीच बुजणार याचा सर्वांना आनंद झाला. पण कर्मचारी आणि कामगार धोरण ऐकून देशभरात संमिश्र प्रतिक्रिया होत्या. ज्यांना देशासाठी काहीतरी ठोस कार्य करण्याची इच्छा आहे त्यांना हे धोरण पसंत पडले. पण ज्यांना फुकट शासनाचा पगार लाटायचा आहे, कामचुकारपणा करायचा आहे, वेळेवर कामावर जायला नको, घरी लवकर पळायला हवं,वर सर्व सोयी सवलती हव्यात त्यांना मात्र हे धोरण पसंत पडले नाही. त्यांची अंत:करणे दुखावली गेली हे ऐकून.

"महिन्याला एकच सुट्टी? काय आहे की नाही जीवाला?" असं कामचुकार मंडळी बोलायला लागली.

"हो पण मजुर महिनाभर विनासुट्टी काम करतात. पोलीस, वाहनचालक, सैन्यबळ यांना कुठे आहे कामाची मर्यादा? तरीही आपल्यापेक्षा कमीच पगार घेतात. मग आपल्याला एकच सुट्टी असेल तर बिघडले कुठे? बरं आहे ना कामं लवकर होतील. मार्च अखेरची दरवर्षीची कटकट तरी राहणार नाही. "सह्यदयी माणसं म्हणायला लागली. अर्थात विश्वकल्याण संघटनेची ही सूचना शासन किती प्रमाणात मान्य करेल यावर सारा कारभार अवलंबून होते.

(२६)

पाणी अडवा पाणी जिरवा

मे महिना सुरू झाला आणि विश्वकल्याण संघटना पावसाच्या स्वागताला सज्ज झाली. शाळा-महाविद्यालयांना सुट्ट्या पडल्याच होत्या. जो तो मामाच्या गावी जाण्याचा बेत आखीत होता. पण विश्वकल्याण संघटनेने वेगळ्याच बेत रचला होता. तो म्हणजे पावसाचे पाणी अडविण्याचा. आपले कार्यकर्ते आणि जनता यांच्या सहकार्यातून जागोजागी खोलगट भागात चर खणायचे. उतरणीवर बांध बांधायचे. त्याच्या मार्फत पाणी अडवायचे. थोडक्यात 'पाणी अडवा पाणी जिरवा ' ही शासकीय योजना त्यांनी या पावसाळ्यापासून अमलात आणायचा चंग बांधला होता.

सूचना फलकावर केलेल्या आवाहनामुळे विद्यार्थी, पालक, इतर मंडळी विश्वकल्याण संघटनेच्या मदतीला आली. गावपातळीवर जेथे डोंगर उतार होते, तेथे श्रमदानातून टप्प्याटप्प्यावर दगडी बांध घालण्यात आला. तेथे चर आणण्यात आले. गावातील खोलगट भागात खड्डे करून कृत्रिम तलाव बनविण्यात आले. नदीचे पात्र उगमाच्या दिशेने खोलगट करण्यात आले, जेणेकरून सर्वच्या सर्व पाणी वाहून जाऊ नये. नदीत दुसऱ्या पावसाळ्यापर्यंत पाणी रहावे. जेथे नदीचा उतार जास्त होता, तो कमी करण्यात आला.

शहरात यापूर्वीच रस्त्यांच्या मधोमध शंभर फूट खोल खड्डा करून त्यात पावसाचे पाणी जाण्याची सोय करण्यात आली होती. पण आता वस्तीच्या आसपास छोटेछोटे कृत्रिम तलाव तयार करण्यात आले. शहरातील मंडळी आपल्या भागातील वातावरण गार रहावे, जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरावे या उद्देशाने धडपडत होती. देशातील लाखो खेड्यात, शेकडो शहरात लोकसहभागातून संपूर्ण मे महिन्यात हे कार्य करवून घेण्यात आले. आता प्रतिक्षा होती पहिल्या पावसाची.

आणि जूनच्या पहिल्या आठवड्यात एके सायंकाळी नभ काळवंडून आले. सुमित सागरकिनारी फिरायला गेला होता. गावक-यांनी गावाचे नंदनवन बनविलेले होते. दोन-दोन,तीन-तीन बगीचे,फिरण्यास योग्य किनारा, बालकांना खेळण्याच्या सर्व सोयी, जेष्ठ नागरिकांना वाचनालय या सर्व कारणांमुळे उन्हाळ्याच्या सुट्टीत गावाबाहेरचा समुद्र किनारा सकाळ-संध्याकाळ गजबजून असायचा. सुमितने कचऱ्यापासून गॅस निर्मिती केंद्राकडे एक नजर टाकली आणि पुढची वाट धरली. सागरकिनारा पर्यटकांनी फूलून गेला होता. सायंकाळी आठ वाजेपर्यंत उजेड असायचा. तेथे ढग भरून आल्याने अंधाराचे साम्राज्य पसरले. आता काही क्षणात प्रचंड मोठे वावटळ होईल हे लक्षात आल्यावर बहुतेकांची पाऊले आसरा शोधण्यासाठी वेगाने पडू लागली. पण काहींना त्याची चिंता नव्हती. उलट वावटळ यावे, गारवा अंगाला लागावा,पावसाचे तुषार झेलावेत, पहिल्या

पावसात न्हाऊन घ्यावे याच विचाराने ते सावकाश पाऊले टाकीत किनाऱ्यावर फिरत होते.

पण वावटळीने कोणालाही आसरा शोधण्यासाठी संधी दिली नाही. प्रचंड वेगाने वारा आला. किनाऱ्यावरील वाळू गगणात भिडली. याबरोबर आकाशात श्यामल मेघ एकमेकांवर आपटून गर्जना करू लागले. तेथे लखकन वीज चमकली. बघणा-यांच्या छातीत धस्स झाले आणि पहिला थेंब धरतीवर पडला-टपटप टपटप. धरती शहारली. थेंबांच्या धारा झाल्या. पाऊस वेडावाकडा वाऱ्यासोबत धरतीच्या प्रत्येक वस्तूला मार देत बरसू लागला. एकगोड सुगंध हवेत दरवळला. थंड वाऱ्याच्या सोबत धरतीतून उष्ण वाफाही निघू लागल्या. समोरच्या सुरूंच्या झाडांच्या काड्या कडाकडा मोडून कोसळू लागल्या.

पर्यटक चिंब भिजले. मिळेल त्या आसऱ्याला गेले. पण काही निसर्गवेडे तसेच उभे राहून अंगावर पाऊस झेलू लागले. त्यात सुमितही होता. डोळे मिटून हात वर करून चेहऱ्यावर पडणाऱ्या पावसाचे दिव्य अनुभव घेऊ लागला.

किनाऱ्यावर झरे फुटले. जमिनीवर ओहोळ वाहू लागले. सुमितने ओळखले. आता काही क्षणात कृत्रिम तलाव, खड्डे,बांध भरून जातील. तेच पाणी मग जमिनीत मुरेल. पाणी अडवा पाणी जिरवा योजना सफल होईल.

(२७)

बहरला निसर्ग

पावसाने चांगलीच हजेरी लावली होती. या पावसाचा आनंद घेण्यासाठी शहरातील सर्व प्रकारचे नागरिक आपापल्या परीने वेगवेगळ्या ठिकाणी सहली आयोजित करू लागले. मुंबई- अंधेरी विभागात राहणारे श्री. जनार्दन पाटील एक बडा प्रस्थ. तो हिशेब तपासणीस होता. निरनिराळ्या कंपन्यांचे,बँकांचे, सहकारी संस्थांचे, सेवाभावी संस्थांचे हिशेब तपासणी करायचा. वर्षभर काम असायचं. जराशीही फुरसत मिळायची नाही. या सुंदर पावसात सर्वजण सहली आयोजित करीत आहेत म्हटल्यावर त्याच्या पत्नीने लक्ष्मीने सहलीला जाण्याचा तगादा लावला. दोन मुलंही हट्ट करू लागली. त्यालाही पावसाळी सहलीला जायचेच होते.

शनिवारी सकाळीच तो आपल्या कारमधून मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून डहाणूच्या दिशेने जाऊ लागला.

"बाबा,आपण काय काय पहायचं?" छोट्या भक्तीने विचारले.

"मनोरजवळ सातवली नावाचे एक स्थान आहे. तेथे गरम पाण्याचे कुंड आहेत. आपण तेथे न्हाऊन घेऊ. पुढे डहाणू येथे विवळवेढे गडाला भेट देऊ. नंतर दापचेरी येथे कुर्झा धरणावर जाऊ. . पावसात धरणावरचे वातावरण मोठे विलोभनीय असते. नंतर जव्हारला 'धाबोसा' धबधबा बघायला जाऊ. गावखेड्यात शेतकरी

भाताची लावणी कशी करतात ते पाहू. स्वत: करू. दोन दिवस मस्त निसर्गाच्या कुशीत जातील. " जनार्दन पाटील गाडी चालवत म्हणाला.

"अहो,हल्ली आपण काय सिमेंटच्या जंगलात राहत नाहीत. आपणही आता निसर्गाच्या कुशीतच राहतोय. सध्या आपल्या इमारतीच्या आसपास किती झाडी झाली आहेत! काही तर आपल्या सहा मजली इमारती पेक्षा उंच आहेत. नावालाही ऊन खाली येत नाही. सर्व कसं गारगार वाटतं. ताजेतवाणं वाटतं. " त्यांची पत्नी लक्ष्मी म्हणाली.

"हो बाबा, पूर्वी आपली कार जागा नसल्याने उन्हातच उभी करून ठेवावी लागायची. आता कोठेही उभी करा. सावलीच मिळते. " छोटा संदेश म्हणाला.

"विश्वकल्याण संघटनेची कृपा आहे ही. त्यांनी शहरात वृक्षारोपण केले नसते तर आपण उन्हाने करपून गेलो असतो. आता तर वातानुकूलित यंत्राची गरजही भासत नाही. निसर्गत: आता गारवा मिळतो आहे. हल्ली इतकं काम करतो आपण पण थकायला होत नाही. ताजेतवाने वाटते. ताण पडत नाही. काम म्हणजे जणू खेळच वाटते. विश्रांत होऊन पूर्ण करतो. हा माझा एकट्याचा अनुभव नाही तर शहरातील प्रत्येक कार्यालयातील प्रत्येक कर्मचाऱ्याचा अनुभव आहे. पर्यावरणाचा -हास थांबल्यामुळे हल्ली आजारही बरेच कमी झालेत. एखादा सर्दी,तापासारखा छोटा आजार येतो. मोठे आजार दिसेनासे होऊ लागले आहेत. " जनार्दन पाटील म्हणाला.

"हो. ही सर्व ह्या हिरव्या मित्रांची कृपा. पण म्हणतात ना म्हशीला कितीही आंघोळ घाला, तिला चिखलाचीच ओढ असते. " लक्ष्मी रागाने म्हणाली.

"काय झालं असं रागावयाला?"

"अहो, आपल्या इमारतीतले काही रहिवासी म्हणायला लागले, नुसतीच ही झाडे लावली आहेत. ऊन येत नाही. कपडे वाळत नाहीत. कचरा होतो. मच्छर झालेत पावसाळ्यात झाडे गाड्यांवर, अंगावर पडण्याचा धोका. खिडक्यातून पलीकडचे काहीच दिसत नाही. पाहावे तेथे समोर ही झाडेच दिसतात. जंगल करून ठेवलं आहे एका छान अशा शहराचं. " लक्ष्मी इतरांचे म्हणणं म्हणाली.

"कमाल आहे बुवा लोकांची. खिडकीतून काय बघायचे आहे यांना? म्हणावे झाडेच पहा. डोळे शाबूत तरी राहतील. कचरा होतो तर आहेत ना सफाईवाले. मच्छरांवर उपाय आहेच की. कशाला उगाच या वृक्षांची निंदा करताय? या वृक्षांमुळे हेच नव्हे तर सर्व शहरे भाजण्यापासून वाचलीत. वाटेवाटेवर पूर्वी मरणासन्न गरमी असायची. उष्णतेच्या लाटा यायच्या. आता किती गार वाटतंय बघ. "जनार्दन म्हणाला.

"हे तर काहीच नाही. एकाने तर काही वेली घराला शोभत नाहीत म्हणून तोडून टाकल्या. " लक्ष्मी उदाहरण देत म्हणाली.

"ते म्हणतात ना, वेड्याला धन मिळते तर खाता येत नाही. तशी गत आहे ही. पर्यावरण आहे तर आपण आहोत. झाडे आहेत तर

पर्यावरण आहे. मंगळावरचे जीवन पाहिले नसेल यांनी. " जनार्दन म्हणाला.

गाडी दहिसरच्या पुढे गेली. समोरचा महामार्ग एखाद्या हिरव्यागार गुहेतून जातोय असा भास देणारा होता. हिरवीगार पानं, रंगबिरंगी सुगंधी फुलं, फळे,पक्षी हे येणाऱ्या प्रत्येक वाहनाचे स्वागत करीत होते. सोबतीला खट्याळ वारा आणि रिमझिमता पाऊस होताच. हे सर्व दृश्य पाहून मन ताजेतवाने झाल्याशिवाय राहिल काय?

जनार्दन पाटील,त्याचे कुटुंबीय निसर्गाचा हा आस्वाद घेत पुढे निघाले होते. आता टोलनाके बंद झालेले. त्याऐवजी प्रत्येक दहा किमीवर एक तपासकक्ष दिसत होते. प्रत्येक केंद्रांवर अत्याधुनिक शस्त्रास्त्रे बाळगणारी दहा प्रशिक्षित सुरक्षा अधिकारी होते. सोबत अत्याधुनिक संदेशवहन यंत्रणा,जी. पी. एस. , प्रशिक्षित कुत्री. कोणाची बिशाद त्यांच्या समोरून अपराध करून निघून जाईल. शिवाय जी. पी. एस. यंत्रणेमुळे संशयास्पद वाहनांची त्वरीत माहिती त्यांना मिळते. त्यामुळे अपराध्यांना या मार्गावरून जाणे म्हणजे मृत्यूच्या दाढेतून जाण्यासारखेच होते.

"लक्ष्मी, ह्याला म्हणतात सुरक्षा व्यवस्था! चोवीस तास एका केंद्रावर चाळीस सुरक्षा अधिकारी तैनात असतात. आपल्या सुरक्षिततेसाठी. आता काय भ्यायचे कोणाला?" जनार्दन म्हणाला.

"हो ना. काय पण डोकं आहे त्या सात अज्ञात लोकांचं! सर्वांना रोजगार दिला. अंतर्गत व बाह्य सुरक्षाही मजबूत केली. आता कसले दहशतवादी नि दरोडेखोर येतात हो. " लक्ष्मीने आशावाद प्रकट केला.

परंतु त्यांचा आनंद पुढच्या एका केंद्रावर भंग पावला. एका केंद्रांवरील सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्यांना अडवले.

"काय झालं? काही चुकलं का आमचं?" जनार्दनने भीतभीत विचारले.

"बाहेर ये आधी. " एका अधिकाऱ्याने बंदूक पुढे करून दरडावले.

जनार्दन कारमधून बाहेर आला. "

"पैसे काढ. " तो अधिकारी निर्लज्जपणे म्हणाला.

"कसले पैसे?" जनार्दनला काही आकलन होईना.

"आम्ही इथे काय मच्छर मारायला बसलोय? आम्ही तुम्हाला सुरक्षा पुरवितो. त्याचे पैसे दे. " अधिकारी उर्मटपणे म्हणाला.

"पण तुम्हाला पगार मिळतो ना?" जनार्दनने विचारले. यावर तो अधिकारी भडकला. जनार्दनच्या कानाखाली दोन-तीन लगाऊन दिली.

"बोल देतोस की नाही पैसे?की इथेच खल्लास करू? आम्ही तू अपराधी होता. पळून जात होता, असे सिद्ध करू. आम्हाला कोणीच काही करू शकत नाही. " दुसरा अधिकारी म्हणाला. दहाहीजण त्याला हसू लागले. जनार्दनच्या डोळ्यात अश्रू आले. आपले स्वप्न भंग पावले याची त्याला जाण झाली. पैसे काढू लागला.

दरम्यान संदेशनं त्वरीत जवळच्या इतर दोन केंद्रांना लिखित संदेश गुपचुप पाठवून त्यांना परिस्थिती लक्षात आणून दिली.

त्याबरोबर पुढच्याच पाच मिनिटांत दोन्ही केंद्रावरून पाच-पाच अधिकारी असलेली दोन जीपा येऊन ठेपल्या. त्यातून गोळीबार झाला. या दहाही सुरक्षा अधिकाऱ्यांना काही कळायच्या आत त्यांना यमसदनी धाडण्यात आले.

जनार्दनचे कुटुंबीय बघतच राहिले.

"यांना का मारले?" समज देऊन सोडवायचे होते. " जनार्दन म्हणाला.

" ही अशी माणसं समजण्याच्या पलीकडची असतात. त्यांना हीच लाथेची नि बंदूकीची भाषा समजते. यांना जीवंत ठेवून काय फायदा? पूढे इतरही तसेच वागले मग? आपण जनतेच्या सेवेसाठी आहोत, त्यांना त्रास देण्यासाठी नव्हे. हे कळायला हवं सर्वांना. विश्वकल्याण संघटना सर्वांसाठी आहे पण कडक आहे. तेथे कोणाचीही हयगय केली जात नाही. आज्ञा न पाळणा-यांना हीच शिक्षा. यापुढे इतर अधिकारी धडा घेतील. जनतेशी कसं वागावं? कसं वागू नये? हे कळू दे. चांगलं कळू दे सर्वांना. "असं म्हणत त्या दहाही अधिका-यांनी केंद्राचा ताबा घेतला. एकाने वर अहवाल कळवला. बाकीच्यांनी मृतदेहाची विल्हेवाट लावली.

(२८)

भूमी व ध्वनिप्रदूषण

जागोजागी प्रचंड प्रमाणात वृक्षारोपण करून आणि वाहनातून तसेच कारखान्यातून उत्सर्जित होणाऱ्या धुरावर प्रक्रिया करून हवेच्या प्रदूषणावर जवळजवळ नियंत्रण झालेच होते. जनता जागृत झाली. विश्वकल्याण संघटनेची प्रत्येक सूचना ती आवर्जुन पाळू लागले होती. कोणीही अत्यावश्यक गरजेशिवाय खाजगी वाहन वापरीत नव्हते. जवळच्या अंतरावर पायी आणि सायकलने तर दूरच्या अंतरावर रिक्षा,बस आणि रेल्वेने प्रवास करू लागले. त्यामुळे रस्त्यावर वाहने कमी झाली. गर्दी घटली. धूर कमी झाला. वाहनांचा कर्णकर्कश आवाजही कमी झाला. जलप्रदूषणावरही कठोर उपाययोजना कार्यान्वित झाली होती. त्यामुळे जलप्रदूषणही पूर्णतः घटले. आता वेळ होती भूमी प्रदूषण व ध्वनिप्रदूषण रोखण्याची. यासंदर्भात एक सूचना फलकावर झळकू लागली.

"तमाम भारतीयांना आमचा जय हिंद. आता आपण सर्व मिळून भूमी प्रदूषण व ध्वनिप्रदूषण रोखू या. जमिन शेतीची असो वा कशाचीही असो, तिच्यावर कोणत्याही प्रकारचे रसायन पडू देऊ नका. इमारत बांधकाम करणाऱ्यांनी रेती, सिमेंट,खडी, पाणी यांचा योग्य वापर करावा. उर्वरित साहित्याची योग्य ती विल्हेवाट लावावी. ते

साहित्य असंच पडून देऊ नये. भारत हा शेतीप्रधान देश आहे. आजही ७०% च्या आसपास लोक शेतीवर उपजीविका करतात. आम्ही शेतीसाठी सर्व नद्या जोडून पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था लावून दिली. शेतक-यांना निवेदन आहे की शेतात जास्तीत जास्त कंपोस्ट खताचा वापर करावा. रासायनिक खतांचा वापर करताना ते कमीच कमी कसं जाईल ते पहा. चांगल्या प्रतीची रासायनिक खते वापरा. जोडधंदा म्हणून गुरे पाळा. हवे तेवढे कंपोस्ट खत उपलब्ध होईल. हल्ली सर्वत्र झाडेच झाडे आहेत. हवा तेवढा पालापाचोळा उपलब्ध आहे. त्याचा वापर करा. रासायनिक खतांची तुम्हाला आवश्यकता पडणार नाही. आम्ही रासायनिक खते कमी हानिकारक कशी होतील यावर संशोधन सुरू केले आहे. त्याचा परिणाम येईपर्यंत भूमीची खबरदारी घ्यावी.

शासनाच्या कृषी मंत्रालयाला आम्ही कळवले आहे की वर्षभर शेतकरी आपल्या शेतात उत्तमोत्तम नगदी आणि अन्नधान्य पिके घेऊ शकतील अशी धोरणे आखा. यासंदर्भात आमची समुपदेशक केंद्रे प्रत्येक गावात उघडण्यात आली आहे. शेतक-यांनो आता आपली संकटे संपली आहेत. जे जे शेतकरी कर्जबाजारी आहेत त्यांची कर्जे आम्ही फेडू. कृपया आत्महत्येचा, शहरात पळून जाण्याचा विचार आणू नका. शेतात घाम गाळा. आम्ही सांगतो तशी पिकं घ्या. शहरातल्या लोकांपेक्षा तुमची आर्थिक प्रगती जास्त होईल. आजवर लोक खेड्याकडून शहरात जात होते. उद्या अशी परिस्थिती येईल की लोक शहरातून खेड्याकडे जाऊ लागतील. आजवर इमारतीच्या

बांधकामासाठी शेतजमीन खरेदी करावी लागायची. उद्या अशी परिस्थिती येईल की इमारतीची जमीन शेतीसाठी खरेदी करावी लागेल. आम्ही तुम्हाला शाश्वती देतो. चला खेड्याकडे. भूमीचे संगोपन करू या.

ध्वनिप्रदूषण आपण पूर्णतः कमी करू शकतो. सण-उत्सवात, विवाह समारंभात ध्वनी वर्धकाचा आवाज कमी ठेवता येईल. आवश्यकता नसेल तेव्हा बंदच ठेवा. घरी संगीत साहित्य आपल्याला ऐकायला येईल एवढ्याच क्षमतेचे ठेवा. इतरांना त्रास होता कामा नये. शांत मधूर संगीत आजाराला बरे करते आणि डी. जे. चा कर्णकर्कश आवाज बऱ्याला आजारी पाडते. आपली वाहने कमी गतीत हाकावीत. कर्णे वाजवू नयेत. फटाके उडवू नयेत. या ध्वनिप्रदूषणामुळे डोकेदुखी,ताण, अस्वस्थता, अनिद्रा असे त्रास संभवतात. रात्रीच्या वेळी तर कोणताही प्रकारचा आवाज करू नये. गल्लोगल्ली भुंकणाऱ्या कुत्र्यांना आता त्यांच्यासाठीच्या अभयारण्यात ठेवण्यात येणार आहे. प्राणी मित्रांनो आणि जनतेने अशा भटक्या कुत्र्यांची माहिती शासनाला द्यावी. विमानतळ, रेल्वेस्थानक, बसस्थानक अशा ठिकाणचे ध्वनिप्रदूषण रोखता येणार नाही. शांतता आरोग्याला आवश्यक आहे. आरोग्य हीच धनसंपदा आहे. तेव्हा ध्वनिप्रदूषण रोखणे केवळ आपल्याच हाती आहे. "

सूचना वाचून काहींच्या कपाळावर आठ्या पडल्या.

"अरे यार,यांचा आणखी एक फतवा आला. गतीशिवाय वाहन चालवायला मजा ती काय? कर्णे नाही वाजवले तर कोणी बाजूला तरी

होईल काय? आणि काय,डी. जे. ला कायमस्वरूपी तिलांजली द्या म्हणे. डी. जे. शिवाय लग्नसमारंभाला मजा ती काय? नाचणार कशी लोकं?डी. जे. नाही तर उत्सवाचा बट्ट्याबोळ होईल. कायपण बोलतात ही विश्वकल्याणवाली मंडळी. शेतक-यांना ज्ञान देतात. यांच्यापासून सावध रहायला हवे. अन्यथा हे करा,ते करू नका सांगून आपल्याला गुलाम बनवतील हे. "

यावर चांगल्या विचारांच्या माणसांनी प्रतिक्रिया दिली.

"विश्वकल्याणवाल्यांची प्रत्येक सूचना आपल्या भल्यासाठीच असते. ते म्हणतात ते प्रत्येक शब्दन शब्द सत्य आहे. ध्वनीप्रदूषणामुळे कित्येकजणांना वेड लागले आहे. कित्येकजण मानसिक स्वास्थ्य गमावून बसलेत. कित्येकजण बहिरे झालेत. शासनाने, न्यायालयाने दवाखाने, शाळा, वाचनालय, विद्यापीठ, बगीचे ध्वनिप्रदूषणमुक्त का घोषित केले आहे? शांत वातावरणातच आरोग्य लाभते. एकाग्रहता वाढते. अभ्यास होतो. मानसिक स्वास्थ्य टिकते. आपले प्रत्येकाचेच कर्तव्य आहे की आपण ध्वनिप्रदूषण रोखले पाहिजे. इतरांसाठी नव्हे तर स्वतः च्याच आरोग्यासाठी. कारण शेवटी त्याचा परिणाम आपल्यावर होतोच. "

"नाही रे,डी. जे. शिवाय नाच काय? आवाजाशिवाय संगीत काय?" विरोधक म्हणाला.

"नाचून कोणते दिवे लावणार आहेत आपण? उलट नाचून पायांचे सांधे खिळखिळे करून ठेवतो. मग जातो काठी वापरायला. धांगडधिंगा संगीत ऐकण्यापेक्षा हळू आवाजातील शांत संगीत ऐकावे.

त्यानेच मनाला शांती मिळते. मौन ही शक्ती आहे. शांतता हीसुद्धा शक्ती आहे. सर्व समस्येवर शांतता हाच उपाय आहे. " ध्वनिप्रदूषणाला विरोध करणारा म्हणाला.

"आम्हाला पटत नाही. तसे असेल तर डी. जे. चा शोध लावलाच कसा?" विरोधक विरोध दर्शवत म्हणाला.

"ऍसिड (आम्ल) उपयुक्त आहे म्हणून तू ते पिशील का रे?"

त्याचा आवाज बंद.

"राहिला प्रश्न गुलामीचा तर त्यांच्याकडे एवढं सामर्थ्य आहे की त्यांनी कधीच आपल्याला गुलाम केले असते. आपल्या,मनुष्यजातीच्या सुखासाठी ते हे सर्व करतात. उगाच काहीबाही बडबडू नकोस. "

सूचनेवर जनतेने अंमलबजावणी मात्र सुरू केली. ध्वनीप्रदूषण रोखण्यास सुरुवात झाली.

(२९)

तो येतोय

सागरतळाशी असलेल्या आपल्या केंद्रांवर मानव, सुमित, कुलदीप, इब्राहिम, जेम्स, रामण्णा मोकळ्या वेळात सुमितच्या कक्षेत गप्पा करीत बसले होते. सर्वांच्या पुढ्यात लिंबूचे सरबत होते. समोरील दूरदर्शनच्या पडद्यावर नियंत्रण कक्षाचे दृश्य दिसत होते.

" मानव, तुला काय वाटतं? हा येणारा धूमकेतू किती काळाने सूर्यमालेच्या कक्षेत येईल?"सरबतचा घोट घेत रामण्णाने विचारले.

"मला वाटतं वीस-पंचवीस दिवस तरी जातील. "मानवने उत्तर दिले.

"आपले हे काम करायला खूप बरं वाटते. चोवीस तासात फक्त सहा तास विश्रांती. तेही काम नसेल तरच. सुट्टी अशी नाहीच. कधी सागरतळाच्या या केंद्रावर काम करायचे. कधी भूमी अंतर्गत तर कधी अवकाशात काम करायचे. कधी वेगवेगळ्या ग्रहांच्या संशोधनार्थ संचार करायचे. कधी ईथर नावाच्या पोकळीत फिरायचे. कधी माणसात जाऊन सामाजिक कामे करायची. स्वप्नात सुद्धा असे काही काम मिळेल असा मी विचार केलेला नव्हता. "कुलदीप सिंह हर्ष प्रकट करीत म्हणाला.

"हो हे काम अतिशय आनंद देणारे आहे. विज्ञानातून आंनंदच मिळतो. गेल्या चार-पाच वर्षात आपण त्वरीत किती मोठी वैज्ञानिक

प्रगती केली आहे! आपण आता जवळपास महासत्ताक झालोच आहोत. सर्वच बाबतीत आता आपण नंबर वन आहोत. " सुमित हर्षाने म्हणाला.

"विदेशी वैज्ञानिकांना आपल्या या केंद्रात का सामील करून घेतले जात नाही?" जेम्स ने विचारले.

"त्यांनाही सामील केले जाईल. ते त्यांच्या त्यांच्या देशात संशोधन करीत आहेत. ते आपल्याशी संलग्न आहेत. फक्त या मुख्य नियंत्रण केंद्रांवर केवळ भारतीय हवेत असा आपल्या वरिष्ठांचा आग्रह आहे. "मानव स्पष्ट करीत म्हणाला.

"का? त्यांना इथे प्रवेश का नाही?" इब्राहिमने विचारले.

"ते आपल्या वरिष्ठांनाच ठाऊक. "मानवने उत्तर देण्याचे टाळले.

"मानव,खरंच या धूमकेतूमुळे विविध ग्रहांवर जीवसृष्टी निर्माण होतेय?" रामण्णाचा प्रश्न.

. "आतापर्यंत झालेल्या संशोधनानुसार सध्यातरी काही वैज्ञानिक एवढाच निष्कर्ष काढू शकले आहेत. आपण प्रत्यक्ष धूमकेतूवर जाऊन या बाबत अधिक संशोधन करू. तेव्हाच खरं काय ते कळेल. " मानव सरबत घेत म्हणाला.

"पृथ्वी व्यतिरिक्त मंगळग्रहावर आणि जवळच्या ऍन्ड्रामेंडा आकाशगंगेत सॅट-९ या ग्रहावर जीवसृष्टी आढळली आहे. मग बाकीच्या ग्रहगोलावरही जीव असू शकतात. " कुलदीप सिंह अंदाज वर्तवित म्हणाला.

"हो नक्कीच. आपल्याच आकाशगंगेत असलेल्या हजारो ग्रहांवर जीवसृष्टी असण्याची शक्यता आहे. शनीच्या 'टायटन' या चंद्रावर, गुरूच्या काही चंद्रमावर जीवसृष्टी प्राथमिक अवस्थेत असण्याचे पुरावे मिळाले आहेत. मानव असण्याची शक्यता फारच कमी आहे. "

"कारण?" इब्राहिमचा प्रश्न.

"मानव किंवा सस्तन प्राण्यांच्या निर्मितीस पोषक वातावरण पृथ्वी, मंगळ यांच्या अवकाशातील स्थानावर, सूर्यापासूनच्या अंतरावर, त्या त्या ग्रहावरील वायूमंडळावर तसेच पाणी आणि इतर धातू व क्षारांवर अवलंबून आहे. अशी अनुकूलता इतर ग्रहांवर आढळत नाही. " मानव पडद्यावर नजर रोखत म्हणाला.

"मग इतर जीवांचे काय?" जेम्सचा प्रश्न. "इतर जीव कोठेही असू शकतात. अवकाशात सुद्धा. आपल्याला ही पोकळी वाटते. पण हे सुद्धा ईथर नावाचे द्रव्य आहे. साहजिकच त्यातही जीव असू शकतात. "मानवचा अंदाज आला.

"मग सूर्याचे काय म्हणणे आहे?" सुमितने विचारले.

"सूर्यावर सुद्धा जीव असू शकतात. कारण सजीव निर्माण व्हायला ईथर ही पोकळी म्हणजे आकाश, पाणी, अग्नी, वेगळा प्रकारचे वायू आणि अनेक धातू व क्षार म्हणजेच जड वस्तू कारणीभूत आहेत. पृथ्वी आणि मंगळ हे पाणीवाले ग्रह आहेत. म्हणून येथे पाण्यापासून जीव तयार होतात. जीवाचा जन्म पाण्यापासून होतो. जगण्यासाठीही त्याला पाणीच लागले. तसेच सूर्यावर अग्नीपासून

निर्माण होणारे जीव असू शकतात. हा माझा एक अंदाज आहे. एवढ्या मोठ्या ब्रम्हांडात आपण एकटेच असणे आणि फक्त पाण्यातून जीव उत्पन्न होतात असे म्हणणे हे जरा संकुचित वाटते. हे विश्व अनेक रहस्यांनी भरलेले आहे. इथे काहीही असू शकते. आपल्या पृथ्वीवरचे नियम पृथ्वीवरीलच काही ठिकाणी लागू पडत नाहीत तर ब्रहमांडाची बातच निराळी. " मानव खोल शून्यात बघत म्हणाला.

"हो. या विश्वात प्रत्येक गोष्ट शक्य आहे. " जेम्स म्हणाला.

"हा धूमकेतू कोठून येत असावा?" कुलदीपने जिज्ञासेने विचारले.

"बहुतेक दुसऱ्या आकाशगंगेतून किंवा अन्य ब्रह्मांडातून. " मानवने उत्तर दिले.

"अशी किती ब्रम्हांडे असतील?" माहीत असूनही इब्राहिमचा प्रश्न आला.

"अनंत! अगणित! अमर्याद! संपणार नाही. " मानव म्हणाला.

"मग हे विश्व किती मोठे असेल?" सुमितचा बाळबोध प्रश्न आला.

"कल्पनेच्या पलीकडे. "मानवचे उत्तर.

"मग या एवढ्या विश्वाचा अभ्यास कधी करायचा? संशोधन करायचे?" जेम्सने विचारले.

"त्यासाठी इतर साहित्याचा आधार घ्यावा लागेल. प्रत्यक्षात विश्वात संचार करणे शक्य नाही. आपले मिनिटाला ४२०० किमी

वेगाने जाणारे यानही जास्तीत जास्त जवळपासच्या एखाद्या आकाशगंगेपर्यंत जाऊ शकते. अन्य ब्रम्हांडात भौतिक साधनांनी जाणे केवळ अशक्य. " मानवने त्यांच्या मर्यादेचे स्पष्टीकरण केले.

"मग धूमकेतूचे संशोधन कसे करायचे?" रामण्णाने विचारले.

"तो काय आपल्या सूर्यमालेतच्या कक्षेत येईल काही दिवसांनी. आपले यान धूमकेतू पर्यंत जाण्यास सक्षम आहे शिवाय या कामी आपण ओमेगाची मदत घेणार आहोत. "

"आमेगा येणार आहे?" कुलदीप आश्चर्याने म्हणाला.

"हो. मीच त्याला निमंत्रण दिले आहे. त्याच्याकडे आपल्यापेक्षा भारी तंत्रज्ञान आहे. सेकंदाला लाख किमी जाईल अशी याने त्याच्या ग्रहावर आहेत. तिही विशालकाय. शंभरेक आसन क्षमतेची. आपल्याला धूमकेतूचा अभ्यास करायला बरीच माणसं न्यावी लागतील. त्याचा प्रत्येक कोपऱ्याचा अभ्यास करायचा आहे. ओमेगाला म्हटले,तू पृथ्वीचा पाहुणा म्हणून ये आणि आम्हाला धूमकेतू संशोधनात सहाय्य कर. "मानव माहिती देत म्हणाला.

"अरे,पाहुण्यांकडून काम करवून घेतोस. कसा यजमान असशील तू?" सुमितने त्याची चेष्टा केली आणि सर्व हसून पडले.

"या अफाट विश्वाचे रहस्ये उलगडण्यासाठी आपल्याला प्रत्येकाचे सहकार्य लागेल. आता आपल्या एकट्याने ते होणार नाही. " मानव म्हणाला.

"हा धूमकेतू म्हणजे एक अजब वस्तू आहे ना!" रामण्णा म्हणाला.

मानवने संगणकाच्या पडद्यावर येऊ पाहणाऱ्या धूमकेतूचे चित्र आणले.

"हे बघा. हा दिसतो एवढासा. पण याची नुसती शेपटीच लाख किमी लांबीची असेल. " मानव म्हणाला.

"आपण जाणताच की हा धूमकेतू गोलाकार बर्फ आणि वायू मिश्रित गोळा आहे. एखाद्या ताऱ्याच्या कक्षेत गेल्यावर हे वायू उष्णतेमुळे प्रसरण पाऊन बाहेर पडतात, तेव्हा ही शेपटी दिसते. काही दिवसांनी हा किती तेजस्वी दिसेल बघा. "

"आमेगा कधी येतोय? मी तर या दोघांची आतुरतेने वाट पाहीन. कसा असेल तो धूमकेतू आणि कसा असेल तो ओमेगा? सॅट-९ वरचा रहिवासी?" सुमित पडद्यावर पाहत म्हणाला.

"ओमेगा परवा येतोय. त्याच्या महाशक्तीशाली यानातून. थरच्या वाळवंटात त्याला उतरायला सांगितले आहे. " मानव माहिती देत म्हणाला.

"पण कधी? दिवसा की रात्री?" इब्राहिमचा प्रश्न आला.

"अर्थातच रात्री. राजस्थानमधील आपल्या सहकार्यांनी आणि प्रशासनाने त्याच्या स्वागताची जय्यत तयारी सुरू केली आहे. बघायचीय?" असे विचारत मानवने संगणकावरील काही बटणं

दाबली. याबरोबर थरचे वाळवंट पडद्यावर दिसू लागले. तेथे ओमेगाच्या तयारीसाठी झटणारे कर्मचारी दिसू लागले.

"व्वा! छान! ओमेगा आपले आदरातिथ्य पाहून खुश होईल. परंतु आपण असू का तेथे?" जेम्सने विचारले.

"अर्थातच. आपण सर्व ओमेगाच्या स्वागताला तेथे हजर असू. " मानव आश्वस्त करीत म्हणाला.

"आणि केंद्र कोण कोण सांभाळणार?" सुमितने विचारले.

"आहेत आपले बरेच तंत्रज्ञ. आता सध्या कोण सांभाळत आहेत? तेच नियंत्रण करतील. "

"तो ओमेगा दिसतो कसा रे? त्याचा फोटो वगैरे आहे का रे?" कुलदीपने विचारले.

"मी त्याच्याकडे फोटो मागितला होता पण त्याने दिला नाही. प्रत्यक्षात बघा म्हटले. तो ग्रह आपल्या पृथ्वीच्या सात पट मोठा आहे. साहजिकच तेथील जीव आपल्या पेक्षा मोठे असतील. " मानव म्हणाला.

"म्हणजे सात ते दहा फूट एवढे उंच असतील. " सुमितचा प्रश्न.

"हो असू शकतात. "

"हो या विश्वात काहीही शक्य आहे. " इब्राहिम एवढं बोलून गप्प झाला.

संगणकाच्या पडद्यावर त्यांना आता धूमकेतू दिसू लागला. त्या धूमकेतूवर स्वार होऊन ओमेगा येतोय असं चित्र ते रेखाटू लागले.

पुढच्या वर्षभर चर्चेत राहिल अशा दोन घटना येणाऱ्या काळात घडू पाहत होत्या.

(३०)

ओमेगाचे स्वागत

मानवाच्या इतिहासातील एक अविश्वसनीय घटना घडायला जात होती. राजस्थानच्या थरच्या वाळवंटाला केवळ अणुचाचणी करिता उपयुक्त जागा म्हणून पाहिले जात होते. तेथे आता माणसांची अलोट गर्दी लोटलेली . देशाविदेशातील पर्यटक आपापला बोझा बिस्तरा घेऊन वाळवंटातील सुमेरपूर या खेड्यात गोळा झालेले. क्रिकेटच्या मैदानाच्या पाचपट मोठे रिंगण तयार करण्यात आले. तेथे मधल्या भागात ओमेगाचे यान उतरणार होते. जवळपास प्रशासनातील आणि विश्वकल्याण संघटनेच्या महत्त्वाच्या व्यक्तींसाठी आसन निर्माण करण्यात आले होते. त्यांच्या मागे प्रेक्षकांना बसण्यासाठी व्यवस्था होती. मागे मोठा पंडाल होता. प्रेक्षक वरूनही रिंगणातील दृश्य बघू शकतील अशी सोय करण्यात आली होती. हारतुरे, सरबत,फरसान यांची व्यवस्था करण्यात आली होती. प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आपापल्या साहित्यासह या ऐतिहासिक क्षणाचे चित्रीकरणात सज्ज झाले होते. कोणालाही झोप म्हणून येत नव्हती. सर्व उपस्थितांना एलियन म्हणजेच परग्रहवासी ओमेगाला पाहण्याची उत्सुकता लागली होती. वाळवंटातील भयंकर थंडीत पर्यटक, सामान्य नागरिक, प्रशासकीय मंडळी आणि या प्रसंगामागचे खरे प्रेरक विश्वकल्याण संघटनेची माणसं(ती सात अज्ञात लोकं वगळून)आकाशाकडे डोळे लावून बसले होते. आश्चर्य म्हणजे

आजपर्यंत वेळेला महत्त्व न देणारी सर्वच मंडळी वेळेपूर्वीच सदर स्वागत समारंभास आवर्जून हजर राहिलेली होती. विश्वकल्याण संघटना आणि खुद्द ओमेगा वेळेबद्दल शिस्तप्रिय होते. वेळेबाबत ते अती आग्रही होते. प्रत्येक गोष्ट वेळेवर व्हावे असा त्यांचा कटाक्ष होता. म्हणून सर्वचजण वेळेचे भान ठेवून वेळेपूर्वीच हजर झाले होते.

रात्री दहा वाजता संगणकावर संदेश आला ओमेगाच्या यानाने आपल्या आकाशगंगेत प्रवेश केल्याची सूचना दिली. मानवने हा संदेश ध्वनीवर्धकावरून उपस्थित जणांना ऐकविला. जागोजागी लावलेल्या पडद्यावर आपली आकाशगंगा दिसू लागली. ओमेगाचे यान दिसू लागले. अवकाशातून त्यांच्या केंद्रातून हे दृश्य पृथ्वीवर पाठविले जात होते. मानवने सर्वांसमक्ष ओमेगाशी संपर्क साधला.

"ओमेगा,तुमचे आमच्या आकाशगंगेत स्वागत आहे. " मानव म्हणाला.

"धन्यवाद! मी पुढच्या क्षणातच पृथ्वीवर पोहचेन. " ओमेगाच्या म्हणण्याचे मानवने भाषांतर करून प्रेक्षकांना सांगितले.

"आमच्या आकाशगंगेत प्रवेश करताना कसं वाटते?" मानवने विचारले.

"खूपच रोमहर्षक! काळ्याकुट्ट अंधारात गरगर फिरत स्वतः भोवती फिरणारे एक तेजोमय चक्र असावे. त्यात आपण डुंबत जातोय असं वाटते. प्रचंड अशा दैदिप्यमान दिपांचा तेज डोळ्यात गेला माझ्या. " ओमेगा सांगत होता. "आता मी तुमच्या आकाशगंगेच्या आत प्रवेश केला आहे. माझ्या यानाच्या समोर आसपास तारे, ग्रह, इतर

गोल,उल्कापाषाण आणि हो तो तुमच्याकडे माझ्या सारखाच येऊ पाहत असलेला धूमकेतूही दिसतो आहे. त्याची प्रखरता आता वाढली आहे. मी आणि तो पृथ्वीशी काटकोनात आहोत. "

"तू थेट आकाशगंगेच्या केंद्रातून आमच्या सूर्यमालेत येशील काय?" मानवचा प्रश्न.

"नाही. मी तसं करणार नाही. केंद्रात प्रचंड घनत्व असते. मी वर्तुळाकार प्रदक्षिणा घालून तुमच्या सूर्यमालेत येईन. " ओमेगाने उत्तर दिले.

प्रेक्षकवर्ग कान टवकारून मानव आणि ओमेगाचे संभाषण ऐकत होता. याच प्रेक्षकांत काही विघ्नसंतोषी लोकही सामील झाली. त्यापैकी एक म्हणू लागला," हे सर्व खोटं आहे. बनावट आहे. जनतेला मूर्ख बनविण्याचा भाग आहे हा. प्रसिद्धीचा स्टंट आहे हा. यांचेच यान कोठून तरी येईल. यांचाच माणूस मेकअप करून आत बसलेला असेल. इतर ग्रहांवर जीवसृष्टी आहे हे सर्व बनाव आहे. "

"तू कशावरून सांगतोस हे खोटं आहे म्हणून?" दुसऱ्याने विचारले.

"खोटे नाही तर काय? पृथ्वीशिवाय या विश्वात अन्यत्र कोठेही जीवसृष्टी नाही. मंगळावरची सृष्टी,एन्ड्रामेंडावरची सृष्टी हे सर्व झूट आहे. बनाव आहे. तसे जर असेल तर यांनाच त्यांची भाषा कशी काय समजते?"

"त्यांच्याकडे भाषा जाणणारे यंत्र आहे. " तिसऱ्याने पुष्टी दिली.

"काही यंत्रबिंत्र नाहीये. यांनीच रचलेला हा सारा खेळ आहे. विज्ञानाच्या नावाने, संशोधनाच्या नावाने शासनाकडून पैसे उकळायचे. भोळ्याबाभड्या जनतेला फसवायचे हेच धंदे आहेत यांचे. " तो म्हणाला.

"ए बाबा, तुला नाही पटत तर जा येथून. कशाला इथे आलाय?" चौथा म्हणाला.

"यांची पोल खोलायला. येऊ दे ओमेगाला. बघू कसा दिसतो तो. आज मी दूध का दूध पाणी का पाणी करणार आहे. या विज्ञानामुळे वाट लागलीय लागलीय माणसांची. लोक अश्रद्ध झालेत. "

"डोळसपणामुळे तुमचे नुकसान झालं म्हणून तू विज्ञानाला दोष देतो आहेस असं बोल ना. " पाचव्याचा बोलण्यावर विघ्नसंतोषी गप्प राहिला.

"ओमेगाने आपल्या सूर्यमालेत प्रवेश केला आहे. " मानव ध्वनीवर्धकावरून म्हणाला.

"मी आता पहिल्या ग्रहाजवळून जातोय. "

"तो प्लूटो आहे. पुढे तुला युरेनस, नेपच्यून भेटतील. " मानव ओमेगाला म्हणाला.

"हो आणि नंतर शनि, गुरु आणि पृथ्वी होय ना?" ओमेगाने विचारले.

"हो, बरोबर. "

जमलेले श्रोतेगण मानव आणि ओमेगाचे संभाषण ऐकत होते. पूर्ण पंडाल खचाखच भरलेला. हवा शिरायलाही जागा शिल्लक नव्हती. श्वास रोखून ओमेगाची वाट पाहिली जात होती. समोरच्या पडद्यावर ग्रहमंडळ दिसत होते. त्यावर ओमेगाचे यान लाल दिव्यांच्या स्वरूपात पुढे सरकत असल्याने दिसत होते. त्या यानाने युरेनस, नेपच्यून पार केला आणि शनिच्या वातावरणात प्रवेश केला.

"वाव! काय दृश्य आहे! एक भला मोठा ग्रह. त्याच्या भोवती करोडो पाषाणखंड रांगेत घिरट्या घालीत आहेत. माझ्या उजवीकडे हा शनि दिसतो आहे. " ओमेगाचा आनंदीत झालेला आवाज ऐकू आला. प्रेक्षकांना आपण स्वतः त्या यानात बसलेत असा भास झाला. त्यांची उत्सुकता ताणली जात होती.

"खरंच शनि खूप सुंदर दिसतोय का?" मानवने विचारले.

"होय,अती सुंदर! थोडासा फिक्कट पिवळसर. हलकासा सोनेरी. "

"गुरू कुठे दिसतोय रे?" मानवचा हा प्रश्न जणू प्रेक्षकांचा प्रश्न होता.

"हा काय माझ्या डावीकडेच. प्रचंड विशाल आहे. आमच्या सॅट-९ पेक्षा मोठाच आहे. त्याच्या एवढी पाच-पन्नास गोल मावतील या गुरूत. "ओमेगा म्हणाला.

संगणकाच्या पडद्यावर गुरूच्या छायेतून लालबत्ती पुढे सरकत असताना दिसत होती. म्हणजेच ओमेगाचे यान गुरूग्रह पार करीत होते.

"एवढा मोठा ग्रह! इथे जीवसृष्टी आहे का रे!" ओमेगाने विचारले.

"काही कल्पना नाही. संशोधन व्हायचे बाकी आहे. हा वायूरूप ग्रह आहे. त्याच्या चंद्रावर आम्ही जीवनाचा शोध घेता आहे. हा पण मंगळ ग्रहावर आहे. मी त्यांना कळविले आहे,तू पृथ्वीच्या भेटीला येतोय म्हणून. ते तुझे स्वागत करू इच्छितात. " मानव म्हणाला.

"नक्कीच. मला त्यांचे स्वागत स्वीकारायला आवडेल. बाकी तुम्ही दोघे शेजारी शेजारी. नाही का? आम्ही मात्र पाहुणे. "ओमेगा मस्करी करत म्हणाला.

"आता आपण जास्त काळ पाहुणे राहणार नाहीत. आपण एकमेकांच्या ग्रहांवर ये-जा करणार. संबंध दृढ होतील. अवघे विश्वची माझे घर होऊन जाईल. " मानव उत्तर देत म्हणाला.

"हो, तेही खरंच. अरे हे काय?"

"का? काय झालं?" मानवने भीतभीत विचारले.

"मंगळाच्या अवकाशात मला कसलीशी अक्षरें दिसताहेत. "

"त्याचे फोटो पाठव. "

ओमेगाने फोटो पाठवले. मानवने त्याचा अर्थ ओमेगाला कळवला. "हा मंगळवासियांचा संदेश आहे. ओमेगाचे आमच्या

मंगळवासियातर्फे स्वागत आहे. तुम्ही पृथ्वीवर चालला आहात. वेळ मिळाल्यास नक्की आमच्या ग्रहाला भेट द्या. "

संदेशाचा अर्थ जाणून ओमेगा प्रसन्न झाला.

"नक्कीच. मी परतीच्या प्रवासात मंगळला नक्कीच भेट देईन. "

आता पडद्यावर स्पष्ट दिसू लागले की यान पृथ्वीच्या कक्षेत येत आहे. पृथ्वीपासून हजार किमी अंतरावर असताना ते यान एखाद्या ताऱ्यासारखा आकाशात दिसू लागले. याबरोबर मानव जाहीर करत म्हणाला,"ते बघा यान. ओमेगा आला. ते तेथे उत्तरेकडे बघा. एक तारा आपल्या दिशेने सरकत आहे. "

प्रेक्षकांच्या माना वर गेल्या. त्यांना तारा सदृश वस्तू चमकत खाली येताना दिसले. सर्वांचे श्वास रोखले गेले. प्रसारमाध्यमांचे कॅमेरे आकाशाच्या दिशेने वळले. जगभरातील करोडो लोक उपग्रह वाहिन्यांवर हे दृश्य तहानभूक विसरून बघत होते. एन्ड्रामेंडा आकाशगंगेतील सॅट-९ या पृथ्वी सदृश्य ग्रहावरील एक प्रगत जीव ओमेगा यानातून पृथ्वीच्या भेटीला येत होता. आता बस काही क्षणांचा अवकाश.

ताऱ्याने यानाचे रूप घेतले. ते दशकोनी यान सर्व बाजूंनी वीजेच्या प्रकाशाने झळकत होते. आवाज नाही. धूर नाही. एक प्रचंड वर्तुळाकार तबकडी भूमिवर उतरती झाली. सप्तरंग यानाच्या काचेतून झळकू लागले. मानव बसल्या जागेवरुन उठत म्हणाला,"ओमेगा पृथ्वीवर तुझे स्वागत आहे. "

"अरे हो,पहिले मला यानातून बाहेर तर येऊ दे. "

यानाचे दार वरच्या दिशेला उघडले गेले. देशाची प्रमुख मंडळी ज्या दिशेला बसली होती तेथेच ते दार उघडले . सर्वांच्या नजरा दाराकडे. ज्यांची पाठ दाराकडे होती ते पडद्यावर बघत होते आणि ओमेगा बाहेर पडला.

क्षण जणू तेथेच थांबला. श्वास रोखलेले. पापण्यांची फडफड थांबलेली. काहीच हालचाल नाही. आठफूट उंच मानव सदृश आकृती यानातून बाहेर पडली. काळीकुट्ट. हिममानव किंवा यती वाटावा तशी. अंगावर चंदेरी कपडे. हाती एक भला मोठा खोका. केस राठ. अगदी निग्रो लोकांसारखे. पण निग्रोलाही कोसो दूर मागे टाकेल असे रूप. पद जिराफा सारखे उंच व हत्ती सारखे जाड. मनगट जणू सिंहाचे बाहू. वक्ष तर गोरीलाच्या छाती सारखे. बोटे ससाण्याच्या बोटांसारखी. डोळे लाल भडक पण घारी सारखे भेदक. पायात कोणत्यातरी चिवट प्राण्याच्या कातडीचे बूट. नाक उभट. दात पांढरेशुभ्र पण भक्ष्याला फाडून खाणाऱ्या वाघासारखे.

"मानव,मी आलो. " ओमेगा यानातून खाली उतरला.

मानवाने धावत जाऊन त्याला मिठी मारली. मानव त्याच्या छातीपर्यंत येत होता.

"तुझे पथ्वीवर स्वागत आहे. " मानव ओमेगाला पुढे घेऊन गेला. देशा-विदेशातील प्रमुख व्यक्ती त्याच्या स्वागताला होती.

"हे आमच्या देशाचे राष्ट्रपती श्री. अभिजीत मुखर्जी. हे प्रधानमंत्री श्री. राजीव चौधरी. हे संरक्षणमंत्री श्री. अतुल कांबळे. हे

अमेरिकेचे.... , हे चीनचे.... , हे रशियाचे..... "मानवने एकेकाची ओळख ओमेगाशी करून दिली. कोणी हातात हात घेऊन, कोणी हात जोडून, कोणी मिठी मारून ओमेगाचे स्वागत केले. ठरल्याप्रमाणे काही स्त्रिया आरतीचे ताट घेऊन पुढे झाल्या.

"ही पाहुण्यांचे स्वागत करण्याची आमची भारतीय पद्धत आहे. " मानव ओमेगाला म्हणाला.

स्त्रियांनी ओमेगाला ओवाळले. कपाळी गंधाक्षता लावले. साखर देऊन तोंड गोड केले.

"तुमचे हे प्रेम,तुमचा हा पाहुणचार पाहून मी भारावून गेलोय. " ओमेगा हर्षभरीत होऊन म्हणाला. मानव त्याचे म्हणणे भाषांतर करून सांगत होता. "घरून निघताना मनात अनेक शंका -कुशंका होत्या. माझ्या कुटुंबियांनी आणि सहकाऱ्यांनी मला तुमच्याबद्दल भय दाखविले. तुम्ही मला पृथ्वीवर बोलावून माझा घात करतील अशी त्यांना शंका होती. मलाही थोडं तसेच वाटले. पण तुमचे हे अपार प्रेम पाहून माझ्या शंका दूर झाल्या. "

"आम्ही भारतवासिय शरण आलेल्याचा,पाहुण्यांचा आणि दूताचा कधीही घात करीत नाही. संपूर्ण विश्वाला प्रेमाचा, शांतीचा संदेश देतो. " मानव म्हणाला.

"ही एवढी माणसं माझ्या स्वागताला आली आहेत?" ओमेगाने विचारले.

"हो तर. तहानभूक, झोप सर्व विसरून ही मंडळी गेली चार-पाच तास तुझ्यासाठीच ताटकळत बसून आहेत. बाकीचे तुला

दूरदर्शनच्या पडद्यावर बघत आहेत. या क्षणाला असे क्वचितच एखादे घर असेल जेथे दूरदर्शन सुरू नसेल. प्रत्येक उपग्रह वाहिन्यांवर तूच झळकतो आहेस. कारण तू आहेस खरा हिरा. एक परग्रहवासी. पृथ्वीच्या आणि संपूर्ण मानवजातीच्या इतिहासातील ही एक अभूतपूर्व घटना आहे. " मानव म्हणाला.

"हो नक्कीच. यापूर्वी आम्हालाही वाटत होतं की या संपूर्ण विश्वात मानव फक्त आम्हीच आहोत. संशोधनाअंती कळले की इतर बऱ्याच ग्रहांवर मानववस्ती आहे. जवळपास तुमच्याकडे आणि मंगळावर. त्यात तुमचा संदेश मिळाला. यापूर्वी तुम्ही काहीतरी पाच वस्तू बाहेर पाठविल्या आहेत. त्यातील एकावर पिवळसर तबकडीवर मानवसदृश्य आकृती आहेत. ते आम्ही दूरून पाहिले. दूधात साखर पडली. इतर ग्रहांवरही जीवसृष्टी,मानववस्ती असल्याला पुष्टी मिळाली. " ओमेगा म्हणाला.

"ते व्हायजर-१ व व्हायजर-२ आहेत तसेच पायोनियर १०/११ व न्यू होरायझन्स आहेत.. तुम्हाला पृथ्वीची माहिती मिळावी याच उद्देशाने हे यान अवकाशात सोडण्यात आले होते. आपण गप्पा नंतर करू. पहिले अल्पोपहार करू या. "

यानाजवळच टेबल मांडले गेले. सर्व देशांचे प्रतिनिधी,मानव, ओमेगा खुर्चीत बसले. टेबलावर भारतीय पद्धतीचा फराळ होता. कांदेभजी, डोसा, इडली, पुरणपोळ्या, पराठे, लस्सी, सरबत, श्रीखंड, खमंग,फळे,सुका मेवा.

"ओमेगा,तू पृथ्वीच्या भारतभूमीवर आला आहेस. म्हणून तुझ्यासाठी भारतातल्या विविध प्रांतातील हा फराळ. मजेत खा. हवे तेवढं खा. आमचे इतर देशांचे पाहुणेही खातील. "

ओमेगाने एक इडली उचलली. वर चटणी टाकली. इडली तोंडात टाकली. चावली. चघळली. त्याचा चेहरा खिळला. "व्वा! अती स्वादिष्ट!"

सर्वांचे चेहरे खुलले. परग्रहवासियला पृथ्वीचे जेवण रूचलेले पाहून सर्वजण आनंदाने फराळ करू लागले. रात्रीचे अकरा वाजता बाकीचे प्रेक्षकही त्यांना बघून सोबत आणलेला डबा खाऊ लागले. राहून राहून प्रत्येकाचे लक्ष ओमेगाकडे जात होते. त्या वेगवेगळ्या रंगांच्या पृथ्वीवासियांमध्ये ओमेगा उठून दिसत होता. मोठ्या आवडीने नाश्ता घेत होता. त्याला बघून असे वाटत होते की टेबलावरचा सर्व नाश्ता तोच लंपास करील काय?

अल्पोपहार झाल्यानंतर ओमेगा भाषणास उभा राहिला. त्या शेकडो लोकांच्या रिंगणात काळाकुट्ट, उंच धिप्पाड ओमेगा चंदेरी वस्त्रात शोभून दिसत होता. त्याचे भाषण मानव रूपांतरीत करून देत होता.

"सर्व पृथ्वीवासियांना माझा मनापासून धन्यवाद! खरोखरच हा माझ्यासाठी परमोच्च आनंदाचा क्षण आहे. मला बालपणापासून आकाशाचे वेड होते. तारे,ग्रह, उपग्रह,लघूग्रह,ईथर,उल्कापिंड, धूमकेतू हे जणू माझे सर्वस्व होते. पुढे खगोलविज्ञानालाच माझे कार्यक्षेत्र म्हणून निवडले. आमच्या ग्रहावरील खगोल संशोधन केंद्रावर

कामाला लागलो. बरेच संशोधन केले. तुमचा पृथ्वीवरचा संदेश मी अधिग्रहण करून त्याचा अर्थ लावून इतर ग्रहावरही जीवसृष्टी आहे हे आमच्या ग्रहावरच्या लोकांना कळवले. हे जाणून सर्वांना अत्यानंद झाला आणि पृथ्वीवर जाण्यासाठी माझी निवड झाली. मी इथे येण्यास उत्सुक होतो. बाकीचेही होते पण वातावरण भिन्नतेमुळे येथे येण्यास कचरत होते. मी बिनधास्त आलो. थोडी शंका होती. पण तुमच्या प्रेमाने मी गदगदीत झालो आहे.

एव्हाना तुम्हा सर्वांना ठाऊक झाले असेल की मी कोठून आलोय ते. या तुमच्या आकाशगंगेच्या अगदी जवळ २. ५ प्रकाशवर्ष दूर माझी आकाशगंगा एन्ड्रामेंडा आहे. तेथील एका तारामंडळात माझा ग्रह आहे. त्याला सॅट-९ हे नाव आहे. तुमच्या या पृथ्वीपेक्षा आकाराने सातपट मोठा आहे. परिस्थिती हूबेहूब पृथ्वीसारखीच आहे. हवा, पाणी,खडक, मृदा,ऋतूचक्र,जीवमात्र हूबेहूब पृथ्वीसारखेच. फरक फक्त आकाराचा आहे. पृथ्वीपेक्षा तेथील जीव आकाराने विशाल आहेत. प्रेम,आपुलकी, क्रूरता यातही अग्रेसर आहेत. शिवाय तेथील विज्ञान खूप प्रगत आहे. हे माझे यानच बघा ना! सेकंदाला एक लाख किमी एवढी त्याची सरासरी गती आहे. तुमच्या पृथ्वीवरील जवळपास ७. ५ वर्षांनी मी येथे पोहचायला हवे. पण फक्त तीन महिन्यांत पोहोचलो आहे. या करीता आमच्या अन्ड्रामेंडा आकाशगंगेच्या गुरूत्वाकर्षणाचा वापर केला आहे. आमच्या ग्रहावर छत्तीस तासांचे दिवस असतात. शंभाला या ताऱ्याभोवती प्रदक्षिणा घालण्यासाठी सहाशे दिवस लागतात. या ताऱ्यापासून आम्हाला ऊर्जा मिळते. त्या

ऊर्जेच्या वापर करूनच आम्ही हे विविध उपकरणे,वाहने,विमाने,याने बनविली आहेत. आमच्या ग्रहावर शालेयजीवनापासूनच विज्ञान - तंत्रज्ञान शिकवले जाते. फार थोडी माणसं सोडली तर बाकीची सर्व कसल्या ना कसल्या संशोधनात गर्क असतात. आमची काही संशोधक माणसं आमच्याच आकाशगंगेत संशोधनास विहार करीत आहेत. मी इथे आलो मंदाकिनी (मिल्कीवे) मध्ये.

मला मानवकडून असं कळले की तुमचे खगोलतज्ज्ञ असं म्हणतात, ब्लॅक होल प्रमाणे आमची एन्ड्रामेंडा जवळच्या सर्व आकाशगंगेला गडप करून टाकेल. याकरीता ते चक्कीचे उदाहरण देतात. चक्कीत धान्य जसे भरडले जाते तसे म्हणे ग्रह,तारे भरडले जातील. तर हे खरं नाही. जसे आपण एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातो, तसेच हे ग्रहता-यांचे एका आकाशगंगेतून अन्य आकाशगंगेत स्थलांतर असते. कधीकधी दोन आकाशगंगा एकमेकांत मिसळतात. आपल्याही दोन्ही आकाशगंगेचेही तसेच होणार आहे. परंतु त्याला अरबो-खरबो वर्षं लागतील.

ब्लॅक होल हे सुद्धा दुसरे तिसरे काही नसून असेच काहीतरी डार्कमॅटर ईथररूपी एखादी प्रचंड घनतेची आकाशगंगा असू शकते. त्याच्या जवळून जाणाऱ्या तारे, ग्रह यांना ती गिळंकृत करते. पण एक लक्षात ठेवा. विश्वातील एकूण ऊर्जा कायम असते. तारे, ग्रह ब्लॅक होल मध्ये नष्ट झाले असे वाटते पण ते रूप बदलत असतात किंवा स्थलांतरित होत असतात. जेथे शेवट असतो तेथे सुरुवातही असते. ग्रह,तारे,खगोलीय पिंड, आकाशगंगा एका ब्लॅक होल किंवा

आकाशगंगेत विलीन झाले असे वाटते पण दुसऱ्या टोकाला ते अन्य विश्वात असतात. तुमच्या पृथ्वीवर वाळूचे घड्याळ म्हणून एक उपकरण असते बघा. वरची वाळू खालच्या भागात पडते. काही वेळाने वरचा भाग रिकामा होतो. खालचा भाग भरतो. पुन्हा हे घड्याळ उलट केले की वाळू स्थळांतराची प्रक्रिया सुरू होते. विश्वात हे असेच सुरू आहे. अंत नाहीच. "

ओमेगा थोडा वेळ शांत झाला. प्रेक्षकांत चौफेर नजर फिरवली. पुढे तो बोलू लागला. ",मानवची अवकाश संशोधन संस्था आता धूमकेतूवर संशोधन करणार आहे म्हणे. एक धूमकेतू तुमच्या सूर्यमालेच्या कक्षेत शिरला आहे. प्रत्यक्ष त्यावर जाऊन जीवसृष्टी उगमाचे संशोधन करणार आहात. खूप चांगली बाब आहे. मी या कामी तुम्हाला मदत करणार आहे. जीवसृष्टी बद्दल आमचे जे संशोधन झाले आहे ते इथे तुम्हाला सांगू इच्छितो.

कोणत्याही जीवाचा उगम पाच मूळ द्रव्यांपासून होतो. पहिले आहे ईथर. हे आपल्या आसपास काळाकुट्ट भाग दिसतो ना हेच आहे ईथर. काहीजण त्याला डार्क मॅटर म्हणतात. ही एक प्रचंड मोठी पोकळी असते. म्हटले तर अदृश्य असे काळे कण असतात ते. विविध प्रकारच्या बदलामुळे त्या कणांना गती मिळते आणि त्या गतीमुळे वायू(मुख्यतः हायड्रोजन व नायट्रोजन) तयार होते. आकर्षण आणि प्रतिकर्षण या प्रचंड बदलामुळे त्या वायूला वेग प्राप्त होतो. त्याच्या ईथरवरील घर्षणामुळे अग्नी म्हणजेच तेज अर्थात उष्ण पदार्थ तयार होतात. हेच तारे आहेत. याच प्रक्रियेतून हे ग्रह,तारे, ब्रम्हांड तयार झाले

आहे. वायूरूप गुरूत्वाकर्षण शक्ती त्यांची या विश्वात हालचाल घडवून आणत असते. जेव्हा या तेजांचे काही अवशेष ईथरमध्ये भटकत भटकत थंड होऊ लागतात आणि त्यांचे आकारमान कमी होऊन घनता वाढते, तेव्हा त्यापासून द्रवपदार्थ तयार होते. तेच पाणी किंवा इतर तरल पदार्थ असतात. मग याच द्रव आणि उष्णता यांच्या संयोगातून खडक आणि मृदा बनते. त्यातच जीवांचे बीज असतात. अनुकूल वातावरणात ते बीज रूजतात. जीव अस्तित्वात येतात. प्रत्येक जीवांच्या शरीरात पाणी, उष्णता,कठीणपणा,, वायू आणि ईथर हे प्रमुख पदार्थ असतात. जीव मृत झाल्यानंतर त्याचे विघटन होऊन ते पुन्हा मूळ स्वरूपात जातात. जीवाच्या निर्मितीस नर-मादीच हवे असा काही निसर्गाचा नियम नाही. जीव हवा, पाणी, जमीन, शरीर कोठेही तयार होऊ शकतात. आता हा धूमकेतू कोठून येतोय? खरोखरच तो जीवांचे बीज घेऊन येतोय का? याचे संशोधन आपण करणारच आहोत. त्याची निष्पत्ती पुढे होणारच आहे.

प्रत्येक ग्रहावरील वातावरण,हवा, पाणी किंवा इतर रसायनांमुळे त्या त्या ग्रहावर जीवसृष्टी निर्माण होत असते. पण ती आपल्याला का सापडत नाही? याचे उत्तर आहे की एक तर ती प्राथमिक स्वरूपाची असावी किंवा ती खूप दूरवर असावी,माझ्यासारखी. अथवा ती सृष्टी एखाद्या ग्रहावरून नष्ट तरी झालेली असावी. आता तुमचे असे मत आहे की धूमकेतू हा सृष्टीचा उगम असावा. तो जीवांचे बीज वेगवेगळ्या ग्रहांवर घेऊन जात असेल. पण मला असे वाटते की हा ईथर नावाचा जो काळाकुट्ट मूलकणांचा पदार्थ आहे, जो आपल्या

चौफेर आहे तोच खरा बीज आहे. डार्कमॅटर म्हणून हा पदार्थच जीवांच्या उत्पत्तीचा मूळ स्त्रोत आहे. आपले मन हे सुद्धा एक डार्कमॅटर किंवा ईथरच आहे. म्हणूनच ते विश्वात सर्वत्र संचार करू शकते. तुमच्या या पृथ्वीवर वीज तयार होते. ती कोठेतरी दूर तयार होते आणि तुमच्या घरापर्यंत काही सेकंदात वाहून आणली जाते. हे कसं होतं? विद्युत प्रवाह म्हणजे धातूमधील इलेक्ट्रॉनचे वहन असते. जेथे वीज तयार होते तेथून धातूतील इलेक्ट्रॉनला ऊर्जा पुरविली जाते. ते ते इलेक्ट्रॉन विशिष्ट दिशेने गतीमान होतात. पुढच्या इलेक्ट्रॉनला आपली ऊर्जा देतात. असे करता करता त्या ऊर्जेचे वहन होत असते. बस्स,हा ईथर देखील मनाच्या विचारांच्या वहनाचे माध्यम आहे. म्हणून तर बसल्या जागेवरुन आपण विश्वात कोठेही ज्ञात-अज्ञात ठिकाणी जाऊन येतो. आपल्या शरीराच्या अंतर्बाह्य पसरलेला ईथरच्या माध्यमांमुळे हे शक्य होते. म्हणून जीव मरतो पण विचार मरत नाही असे म्हणतात ते यामुळेच. म्हणून एखादा मनकवडा आपल्या मनातील विचार जाणू शकतो असे म्हणतात.. त्याचा मन आणि ईथरचा अभ्यास झालेला असतो. तो सहज आपले मन जाणू शकतो. "

थोडा थांबून ओमेगा पुढे म्हणाला,"या ईथरनेच हे ब्रह्मांड धरून ठेवले आहे. पण हे नक्की काय आहे याचे सखोल संशोधन सुरू आहे. ईथराचे मूलकण अद्याप सापडलेले नाहीत. ते खूपच सूक्ष्म आहेत. अणुरेणूंचेही ते अणुरेणू आहेत. तुम्ही-आम्ही त्या ईथरमध्येच आहोत. विश्व अफाट आहे. आज विज्ञानामुळे, तंत्रज्ञानामुळे आपण एकमेकांना

भेटू शकतो. आज तीन ग्रहांवर जीवसृष्टी आहे हे ज्ञात झाले आहे. म्हणजेच विश्वात इतरत्रही जीवसृष्टी असेलच. आपण सॅट-९ , पृथ्वी आणि मंगळ ग्रहावर मानव राहतो ही तर फार मोठी उपलब्धी आहे. इतर ग्रहांवर मानव असू शकतात. असतीलच. आपण आता मुक्तहस्ते या विश्वात संचार करणार आहोत. धूमकेतू आला आहे. बघू या त्यावर काय आहे ते. यातून फार मोठे रहस्य उलगडले जाणार आहे एवढे नक्की. तूर्तास एवढे पूरे. "

ओमेगाने सर्वांचे आभार मानले. मानव, सुमित आणि मंडळी ओमेगाला जवळच्या गावातील एका घरात घेऊन गेले. प्रसारमाध्यमे आणि विविध देशांचे गुप्तहेर त्यांच्या मागावर होते. पण त्याच घरातून दरवाजा तयार करून ही मंडळी ओमेगासहित त्यांच्या केंद्रांवर गेले. तो दरवाजाही बंद झाला. पुढच्या संशोधनाबाबत गुप्तता पाळण्यासाठी ही खबरदारी घेण्यात आली होती. शिवाय ओमेगाच्या संरक्षणाची धास्ती होतीच.

(३१)

धूमकेतूवर स्वार

धूमकेतूवर जाण्याची तयारी पूर्ण झाली. ओमेगाच्या यानात शंभरापर्यंत संशोधक तयारीत बसले होते. संशोधनाला लागणारे सर्व साहित्य भरून घेण्यात आले होते. विश्वकल्याण संघटनेची इतर दहा याने ओमेगाच्या यानाला जोडण्यात आली होती. समोर एक,मागे एक आणि आजूबाजूला प्रत्येकी चार याने जोडलेली होती. अवकाश संशोधन करणाऱ्या प्रमुख देशांचे खगोलतज्ज्ञ त्यात बसलेले होते. भारतीय वेळेनुसार सकाळी सात वाजता यानांनी धूमकेतूच्या दिशेने उड्डाण केले. हा सोहळा पूर्ण विश्व आपापल्या दूरदर्शनच्या पडद्यावर पाहत होते. प्रत्येक यानात स्वयंचलित कॅमेरे असल्याने यानाच्या आतील तसेच बाहेरील घडामोडी पृथ्वीवर दिसत होत्या. तसेच मंगळावर आणि सॅट-९ वरही हे दृश्य पाहिले जात होते.

पृथ्वीवर रस्ते निर्जन झाले होते. पाववाला, दूधवाला,पेपरवाला, फेरीवाले हे कोणीही रस्त्यावर दिसत नव्हते. गाव, खेडी, शहर, महानगर ओस पडलेली होती. रेल्वेही रिकामी ये-जा करीत होत्या. चतुसुत्री महामार्ग तर बंदच झाला होता. ट्रक चालक ढाब्यावर बसून हा अपूर्व सोहळा पाहण्याचे भाग्य अनुभवत होते.

घरातील रांगत्या बाळासहित मरणासन्न वयोवृद्धही या मोहिमेत सहभागी झाले होते. त्यांनी चांद्रवारी पाहिली. मंगळवारी पाहिली. आता धूमकेतूवारी पाहण्याचे भाग्य अनुभवत होते. एकावर एक आश्चर्याचे धक्के लोकांना मिळत होते. गेली कित्येक शतके अशीच गेली होती. दहा-पंधरा वर्षात एखादी मोहीम निघायची. एखादे संशोधन समोर यायचे. चीन, अमेरिका, जपान, रशिया, युरोप आदी देशांनी अवकाश संशोधनात मक्तेदारी निर्माण केली होती. २००८ साली भारताची चांद्रमोहिम पार पडली. मंगळयान व्यवस्थितपणे मंगळाच्या कक्षेत प्रस्थापित केले होते आणि नंतर बऱ्याच प्रतिक्षेनंतर विश्वकल्याण ही वैज्ञानिक संशोधन संघटना आली. एकावर एक शोध घेऊन आली. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडवली, तिही अल्पावधीतच. आता केवळ पाच वर्षे झाली होती. अल्प काळात चंद्रपार केला. मंगळ हिंडून झाले. आता धूमकेतूवर झेंडा फडकावयाला निघाले. आता अटकेपार नव्हे तर धूमकेतूपार तिरंगा फडकविला अशी म्हण रूढ व्हायला जात होती.

यान धूमकेतूच्या दिशेने निघाले आणि यानात ओमेगा व मानव यांच्या चर्चा सुरू झाल्या. समोरील पडद्यावर दिसणाऱ्या धूमकेतू कडे पाहत ओमेगाने विचारले,"तुला काय वाटते? हा धूमकेतू खरंच दंडगोलाकार असेल का? मला तर इतर ग्रह गोलासारखा तो गोल वाटतोय. "

"असू शकते. पण तुम्ही कशावरून सांगता? काही प्रमाण?" मानवचा प्रश्न.

"हे बघ. हा धूमकेतू सूर्याच्या प्रकाशाच्या कक्षेत आल्यामुळे त्याला शेपटी फुटली आहे. हा खगोल बर्फाचा बनलेला असून त्यात अमोनिया आणि कार्बन डायऑक्साइड वायू मोठ्या प्रमाणात आहेत. सूर्यप्रकाशामुळे ते वायू धूमकेतूच्या विरुद्ध बाजूस गतिमान झाले आहेत. त्यापायी आपल्याला तो तुमच्या पृथ्वीवरच्या खराटा झाडू सारखा दिसतोय. एखादे विमान किंवा यान आकाशात उडताना जसा मागून धूर निघत असतो तसेच हे आहे. "

"हे सुद्धा तुला ठाऊक आहे!

आतापर्यंतचे संशोधन तरी असे सांगतेय की हा धूमकेतू दंडगोलाकार खगोलीय वस्तू असून बर्फाचा बनलेला आहे. हा बर्फ सुद्धा या वायूपासूनच बनलेला आहे. मधला भाग खडकाळ आहे. सूर्याच्या कक्षेत आल्यावर तो बर्फ वितळून वाफेच्या रूपात मागच्या दिशेने वाहू लागतात. त्यात बरेच वायूही असतात. आता तुम्ही म्हणता की तो गोल आहे. असू शकते. " मानव म्हणाला.

"ते बघ ना. धूमकेतूच्या मुखाकडे बघ. तो काळसर वर्तुळाकार कडा दिसतेय. मागे पिसारा आहे. "ओमेगाने निर्देश केला. मानव निरखून पाहू लागला.

"शक्य आहे. पण काहीही असो. धूमकेतूचे संशोधन तुमच्या-आमच्यासाठी फार उपयुक्त ठरणार आहे. हा कोठून येत असावा?" मानवने विचारले.

"आपल्या चौफेर विश्व पसरलेले आहे. अनंत ब्रम्हांड आहेत. बहुतेक ग्रह तारे गोल आहे. हे विश्वही वाटोळे असावे. प्रत्येक

खगोलाची भ्रमणकक्षा लंबवर्तुळाकार असते. यापैकीच एखाद्या ब्रम्हांडातून हा धूमकेतू येत असावा. "ओमेगाने उत्तर दिले.

यान पुढे पुढे जात होते. आता धूमकेतू यानाच्या टप्प्यात आला होता. ओमेगाने जाहीर केले,"आता अर्ध्या मिनिटांत आपण धूमकेतूवर पोहचणार आहोत. तयार रहावे. "

प्रत्येक यानातील संशोधक श्वास रोखून धूमकेतूवर स्वारी करण्यासाठी सज्ज झाले. यानाने गती वाढवली. समोरचा काळा अंधार मिटू लागला. वातावरण पांढऱ्या मेघांनी भरून गेले. धूळ,वायू यांच्या आवरणातून यान बरोबर अर्ध्या मिनिटांत धूमकेतूवर उतरते झाले. नजरेला काहीच दिसत नव्हते. सर्वत्र बर्फाळ भूमी आणि वातावरणात पांढरे ढग.

"आपण अंटार्क्टिकावर तर आलो नाही ना?"सुमितने विचारले.

"हूबेहूब तसेच वाटते ना! पण ही पृथ्वी नाही म्हणजे अंटार्क्टिका नाही. हा आहे धूमकेतू. कॉमेट. चला तो थंडी रोधक आणि वायू रोधक पोषाख परिधान करा. त्याला विशेष चष्मा आहे. तो डोळ्यांवर नीट बसवा. त्यातून धूमकेतूचा पृष्ठभाग स्पष्ट दिसू शकेल. प्रत्येकाला दिलेल्या जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडा. शुभेच्छा!" मानव सूचना देत म्हणाला.

यानातील संशोधकांनी खास तयार केलेला पोषाख परिधान केला. त्यांच्या जबाबदारीची शास्त्रीय उपकरणे घेतली. पंधरा मिनिटांत यानाचे दार उघडले गेले. एक भली मोठी वाफ यानात शिरली. सर्वांचे अंग शहारले.

"अरे बापरे, हे बाहेर वातानुकूलित यंत्र आहे की काय? किती गारवा हा! "एक कुडकुडत म्हणाला.

"पूर्ण गोलच वातानुकूलित आहे. "मानव म्हणाला.

"चला बाहेर निघू या. "ओमेगा असे म्हणत बाहेर पडला. त्याच्या मागे इतर संशोधकही आपापली उपकरणे घेऊन बाहेर पडले. थंडीरोधक वस्त्रे घालूनही अंग कुडकुडत होते. विशिष्ट चष्म्यामुळे धूमकेतूचा पृष्ठभाग व्यवस्थित दिसत होता. पण दूरवर पांढऱ्या धूराचा लोटचा लोट दिसत होता.

"बघ मानव, काय म्हणणे आहे तुझे?" ओमेगाने विचारले.

"संशोधन होऊ दे. मी त्या धूराच्या उगमाजवळ जाऊ इच्छितो. "

"चल मग यानात बस. "ओमेगाने सुचवले. एका छोट्या यानात बसून ते धूराच्या दिशेने निघाले. जेथे धूराचा उगम होतो तेथे दोन मिनिटात पोहचले ते.

"बघ आता. "

. मानवने आपली संशोधनाची उपकरणे बाहेर काढली. धूमकेतूच्या भूमीवर उतरला. तो फार धोकादायक भाग होता. तेथून प्रचंड गतीने वाफ, इतर वायू निघून जात होते. मानवने उपकरणे सज्ज केली. भूमीचा नमुना घेऊन तपासणी केली. कोणते वायू आहेत ती चाचणी केली. काही मिनिटांत उलगडा झाला.

"हा बर्फाचाच बनलेला आहे. तुमच्या मतानुसार आणि इतर संशोधनानुसार यावर हेलियम, अमोनिया हे वायू आहेतच शिवाय अत्यल्प प्रमाणात ऑक्सिजन, निऑन, हायड्रोजन हे वायूही आहेत. इथे जीवन असण्याची संभावना नाकारता येत नाही.. "मानव अंदाज वर्तवित म्हणाला.

"झालं समाधान. आता जीवांचे बीज इथं आहेत की नाही हे तपासू या. तत्पूर्वी ह्या वायूची शेपटी बघ. लाखो किमी लांब आहे. माझ्या अंदाजानुसार याची लांबी दहा ते पंधरा लाख किमी आहे. "ओमेगा म्हणाला.

"आणि धूमकेतूचा व्यास किती असावा?" मानवचा प्रश्न.

"मूळ खडकाळ भूमिचा व्यास १०/१५ किमी इतका असतो. मोठ्यात मोठ्या धूमकेतूचा व्यास १२५/१३० किमी एवढा असू शकतो शेपटी धरून हा व्यास लाखो किलोमीटर पर्यंत असू शकतो, असं मी माझ्या यानातील यंत्रावर तपासून माहिती मिळवली आहे. "ओमेगाचे उत्तर.

छायाचित्रणयंत्र हे दृश्य पृथ्वीवर पोहोचवत होते. धरतीवरील लोकं डोळे फाडून हे पाहत होते. धूमकेतू आला की काही विपरीत घडते. वादळ, भूकंप, त्सुनामी,अतीवृष्टी, रोगराई असे काहीतरी घडते असा गैरसमज असलेली मंडळी भीतभीत हे दृश्य पाहत होती. ते तर बोलूही लागले.

"मरायला तेथे गेलेत. येताना काय घेऊन येतील? आपत्ती - संकट-रोगराई. हे स्वतः तरी जीवंत परत येतील याची शाश्वती आहे काय? म्हणे विज्ञान. विनाश, सत्यानाश करणार हे. "

त्यांची ही बडबड काहींना आवडतील नाही. त्यांनी अशा घाब-यांना फटकारले,"चला निघा इथून. नाही जमत तर बघता कशाला?"

इथे धूमकेतूवर संशोधकांनी सर्व घटकांचे परिक्षण केले. बर्फ,वायू,खडक,वाफ यांचे नमुने घेतले. बर्फात खड्डे पाडून आतील भागाचे शक्तीशाली सूक्ष्मदर्शकाखाली निरीक्षण केले.

त्यांनी सर्व नमुने गोळा केले. त्यांची पावले यानाच्या दिशेने निघाली होती की यानातून धोक्याची सूचना देणारा लाल दिवा जळू लागला. भोंगा वाजू लागला. यानातील स्वयंचलित वैमानिक हा संदेश देत होता.

"ओमेगा, काय झालं रे?" मानवने विचारले.

"बहुतेक या धूमकेतूवर काहीतरी विपरीत घडणार आहे. म्हणून ही धोक्याची सूचना आहे. चला यानात बसा पटकन. " ओमेगाची सूचना मानवने सर्वांना दिली. संशोधक सावधगिरीने उपकरणासहीत यानात बसू लागले आणि तेव्हाच धूमकेतूची भूमी थरथर कापू लागली. कंप पावू लागली ती. पायात काटेरी जोडे असूनही संशोधकांना घसरायला होऊ लागले. धूमकेतूमधून भयंकर आवाज येऊ लागले. क्षणात प्रचंड विस्फोट झाला. धूळीचे लोटच्या लोट उठले.

ओमेगाने यानात जाऊन परिस्थितीचा अंदाज घेतला.

"अरे,त्वरा करा. धोकादायक दर्शक स्पष्ट सांगतोय की या धूमतेतूने गुरूच्या कक्षेत प्रवेश केला आहे. त्याच्या प्रचंड गुरूत्वाकर्षण बलामुळे तो वेगातिवेगाने गुरू ग्रहाच्या दिशेने जात आहे आणि या गतीत झालेल्या गडबडीमुळे तो आता फूटू पाहतोय. त्याचे तुकडे व्हायला सुरुवात झाली आहे. लवकर यानात बसा. "

ओमेगाचे शब्द ऐकून भर थंडीत घाम फुटला सर्वांना. थरकाप उडाला देहाचा. प्रत्येकजण जीव वाचवण्यासाठी यानात येऊन बसू लागले. अर्धे अधिक यान भरून झाले होते. बाकीची मंडळी संशोधनासाठी यानापासून दूर गेली होती. त्यांचा पत्ता नव्हता.

"चला निघू या. गुरूच्या प्रचंड आकर्षणामुळे आपले यान टिकाव धरणार नाहीत. या धूमकेतू सोबत हेही गुरूवर जाऊन आदळतील. "ओमेगा म्हणाला.

"बाकीची माणसे यायची आहेत. " मानव चिंतीत होऊन म्हणाला.

"ती आता मिळणार नाहीत. त्यांची वाट पाहत बसलो तर आपण सर्वच नाश होऊ. चला निघू या. " ओमेगाने जोर देत म्हटले.

"अरे,पण ती आपलीच माणसं आहेत. त्यांना असं मृत्यूच्या खाईत टाकून जाणे पटत नाही. शोभतही नाही. "मानव मानायला तयार नव्हता.

"काही मिळविण्यासाठी काहीतरी गमवावे लागते. या असल्या गोष्टी प्राप्त करताना जीवीत आणि मालमत्तेची हानी सोसावीच लागते. " ओमेगा समजावित म्हणाला.

"नाही. मी हा विचारच खोडून काढेन. काही मिळविण्यासाठी काहीही गमवावे लागत नाही. "मानवचा निर्धार पक्का होता.

"मग ठीक आहे. मी यानात दहा हजार किमी दूर नेऊन अधांतरी तरंगत ठेवतो. मग दुसऱ्या यानाने आपण बाकीच्यांना घ्यायला येऊ. "

मानवला हा विचार पटला.

ओमेगाच्या यानाने बाकीच्या दहा यानांसह उड्डाण केले आणि त्याच क्षणी प्रचंड विस्फोट झाला. पांढऱ्या धुळीचा लोट अवकाशात पसरला. धूमकेतू मुखाकडून मूळ भागापासून तुटून वेगळा पडला. तो भाग गतिमान होऊन गुरूच्या दिशेने गेला. काही वेळातच गुरूच्या पृष्ठभागावर तो आदळला. प्रचंड स्फोटाचे तरंग अवकाशीय वातावरणात दिसून आले.

ओमेगाचे यान दहा हजार किमीवर जाऊन अधांतरी थांबले आणि धूमकेतूवर दुसरा स्फोट झाला. यानाला त्याचा धक्का बसला. यान हादरले.

"पाहिलेत. त्या धूमकेतूपासून दहा हजार किमी दूर आहोत. तरीही त्याच्या स्फोटाने यान हादरले. ध्वनीच्या प्रसारणाला माध्यमाची गरज असते. अवकाशात हवा, पाणी,स्थायू असे काहीच माध्यम नाही.

मग हा स्फोटाचा तरंग आपल्यापर्यंत कसा पोहोचला? याच ईथर नावाच्या काळ्याकुट्ट माध्यमातून. "

बोलता बोलता ओमेगा आणि मानव दुसऱ्या छोट्या यानात आले. इतर दोघा-तिघांना सोबत घेऊन त्यांनी धूमकेतूच्या दिशेने कूच केली. धूमकेतूवर प्रचंड गदारोळ माजलेला होता. काहीच दिसत नव्हते. प्रचंड बर्फाळ तुफान उठले होते तेथे. अशाही परिस्थितीत धूमकेतूवर यान उतरवून ते सहका-यांच्या शोधाला लागले. ते जोरजोरात हाका मारत होते पण तुफानाच्या आवाजापुढे त्यांचा आवाज किंकर वाटत होता. धूमकेतूच्या थरथरत्या पृष्ठभागावरून चालताना काही माणसं हाताला लागली. ती जीवित आहेत की मृत हे न बघताच त्यांना यानात ठेवले गेले. मानव आणि ओमेगा या वादळात शिरून सोबतींचा शोध घेत होते. एकेक-दोनदोन करून पंधरा-वीस सहकारी हाती लागले. पलीकडे एक किमी अंतरावर त्यांना काही संशोधक उपकरणे सांभाळत धडपडताना दिसले. या दोघांनी त्यांच्या दिशेने धाव घेतली. पण तेवढ्यात पुन्हा एक स्फोट झाला आणि इतर मंडळी असलेला भाग तुटून वेगळा पडला. हे दोन्ही भाग गुरूच्या दिशेने जाऊ लागले.

"मानव पळ. यानात चल. आता प्रयत्न संपले. स्वत:चा जीव वाचव. "

दोघे यानात आले. यानाने धूमकेतू भूमी सोडली. ते सुखरूप मूळ यानात परतले. तीस सहकारी त्यांच्या हाती लागले नाहीत. जे वीस

सापडले त्यातही पाचच जीवंत होते. मानव आणि इतर सहकाऱ्यांचे डोळे पाणावले. ओमेगाने सर्वांना धीर दिला.

"हे काय झालं ओमेगा? कोणत्या मुखाने परत पृथ्वीवर जाऊ?ही जी मृत झाली,जी धूमकेतूच्या तुकड्याबरोबर गुरूवर वाहून गेली,ती कोणाची तरी मुलं होती,पती होते,बाप होते, नातलग होते. यांचे सर्व परिवारजन मोठ्या आतुरतेने यांच्या परतण्याची वाट पाहत असतील. एव्हाना त्यांनी हे विदारक दृश्य दूरदर्शनच्या पडद्यावर पाहिलेच असेल. त्यांना काय वाटले असेल? ही आमची पहिलीच मोहीम होती ज्यात जीवीत व मालमत्तेची हानी झाली. उपकरणे गेली त्याचे दु:ख नाही पण असे कर्तव्यदक्ष सहकारी पुन्हा मिळतील कोठे? माझेच चुकले. "मानव शोक करू लागला.

"तुझं नाही माझंच चुकलं. आपण जेव्हा धरतीवरून येथे यायला निघालो तेव्हाच मला माहित झाले होते की हा धूमकेतू थेट पृथ्वीला टक्कर देण्यासाठी येत आहे. पण नंतर कळले की पृथ्वी व धूमकेतूच्या आड गुरु येतोय हे कळलं. म्हणजेच पृथ्वीला काहीच धोका नव्हता. पण हा इतक्या लवकर गुरूच्या कक्षेत प्रवेश करील याची कल्पना नव्हती मला. एवढी जीवाभावाची माणसं गेली ही माझी चूक आहे. "

"हो, पण तू मला याबाबत सांगितले का नाही?" मानवने विचारले.

"तुमची ही महत्त्वाकांक्षी मोहीम होती. पूर्ण जग या मोहीमेवर डोळे लावून बसले होते. जर मी तुम्हाला याबाबत सांगितले असते तर कदाचित ही मोहीम रद्द झाली असती. धूमकेतू गुरूवर जाऊन नाश

पावला असता. मग पुन्हा दुसरा धूमकेतू येईपर्यंत वाट पाहावी लागली असती. म्हणून मी गप्प राहिलो. " ओमेगाने स्पष्ट करीत म्हणाला.

"ते बरं झालं असतं रे,पण ही माणसं गेली हे खूप वाईट झाले. "मानव खेद प्रकट करीत म्हणाला,"१९९७ सालच्या जुलै महिन्यात अशीच घटना घडली होती. एक धूमकेतू थेट पृथ्वीला टक्कर देण्यासाठी येत होता. खगोलतज्ज्ञांना हे कळले. मग अवकाशात जाऊन अणुबॉम्बच्या वापर करून त्याचे तुकडे तुकडे करण्याचा निर्णय झाला. त्यानंतर जे नुकसान होईल ते कमी होईल असा विचार झाला. पण प्रकृती चमत्कारीक आहे. गुरूग्रह आडवा आला. धूमकेतूचे सात तुकडे झाले. एकामागून एक ते गुरूच्या पृष्ठभागावर पडले. ते पाहण्यासाठी खास यान गुरूच्या कक्षेत त्यावेळी पाठविले गेले होते. तशीच घटना आज पुन्हा घडली. या गुरूने पृथ्वी आणि इतर ग्रहमंडळाची या अपरिचित गोलांपासून आजवर रक्षण केले आहे. म्हणून त्याला व्हॅक्यूम क्लिनर अर्थात, अवकाशातील स्वच्छता यंत्र म्हणतात. "मानव जुन्या आठवणी पाजळत म्हणाला.

"याचा अर्थ असा की नजिकच्या भविष्यात पुन्हा अशी घटना घडू शकते. "ओमेगा तर्क करीत म्हणाला.

"हो, आणि म्हणून जेथे जेथे म्हणून मानववस्ती आहे, तेथे तेथे सावधगिरी बाळगावी लागेल. "मानव म्हणाला.

"एक लक्षात घे. सृष्टीच्या उत्पत्तीपासून ते आजवर तुझ्या-माझ्या ग्रहावर अवकाशातून असे अनेक गोल येऊन पडलेत. कधी अग्नीचे गोल आलेत. कधी उल्कापिंडे आलीत. कधी या धूमकेतूसारखे बर्फाचे

खंडही येऊन पडले असतील. त्यांनीच येताना आपल्या सोबत जीवांचे बीज आणले असतील. "ओमेगा म्हणाला.

"हो आणि त्यामुळेच आपल्या तीन ग्रहावर मानवसहीत इतर जीवसृष्टी आढळते. "मानव थांबला.

"ओमेगा,तू म्हणतोस ते खरे आहे. पण एक प्रश्न असा राहतो की हे ग्रहगोल अग्नीच्या रूपाने, बर्फाच्या रूपाने जीवांचे बीज आणतात कोठून? त्यांचे मूळ कोठे आहे? शिवाय हे बीज एवढ्या प्रचंड तापमानात आणि प्रचंड थंडीत जगतात कसे? शिवाय आपण म्हणतो की हा धूमकेतू विविध जीवांचे बीज घेऊन येतो, हे सुद्धा किती खरं असेल?" मानवने विचारले.

"ही सृष्टी अग्नी, द्रव, वायू,वेगवेगळी मूलद्रव्ये, खनिजे आणि ईथर नावाच्या मूलकणापासून बनलेली आहे. तेच या बीजांचे रक्षण करीत असतील. ब्रम्हांडात असा एखादा भाग असेल तेथे अग्नीचे प्रचंड लोळच्या लोळ असतील. आकर्षण किंवा प्रतिकर्षण बलामुळे ते दूरवर फेकले जात असतील. त्यातच जीवांचे बीज असतील आणि मग ते मार्गात येणाऱ्या ग्रहगोलावर फेकले जात असतील. जेथे अनुकूल वातावरण असेल तेथे जीवन फुलत असेल. तसेच ब्रम्हांडात एखाद्या कोपऱ्यात द्रवाचा किंवा वायूचा प्रचंड साठा असेल. त्यापासून हे धूमकेतू सारखे गोल तयार होऊन इतरत्र बीज पेरत जात असतील. "

मानव विचार करू लागला. भविष्यात आपल्याला काय करायचे आहे याचा विचार त्याच्या मस्तकात घोळू लागला. नदीचे मूळ सूक्ष्म असते पण तीच पुढे जाऊन सागर बनविते. तसेच या विश्वाचे मूळ सूक्ष्म

आहे. ते विस्तारत जाऊन हे विराट विश्व बनवते. ते मूळ आता नक्कीच हाती लागेल

(३२)

मनसामर्थ्य

धूमकेतू मोहीमेचा परिणाम संमिश्र होता. त्यावरील पदार्थ अधिक संशोधनासाठी पृथ्वीवर आणले गेले. एकंदर मोहीम पृथ्वीच्या आठशे करोड जनतेनी आणि मंगळ तसेच सॅट-९ वरील मानवाने प्रत्यक्ष अनुभवला होता. पाहिला होता. याचे एक अपूर्व समाधान होते. तसेच जे संशोधक या मोहिमेत गमावले गेले, त्याचेही दु:ख होतेच. त्यांच्या परिवारजनांना शासनातर्फे आणि विश्वकल्याण संघटनेच्या वतीने भरघोस आर्थिक मदत देण्यात आली. विश्वकल्याण संघटनेने प्रत्येक घराच्या सदस्यांच्या नावे बॅकेत प्रत्येकी एक एक कोटी रुपये ठेवले. त्यांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची, रोजगाराची पूर्ण जबाबदारी घेतली. त्यांची माणसं परत येणार तर नव्हती. पण एका धाडसी मोहिमेत ती कामी आली याचा अभिमानही होता. शिवाय समाजाकडून सर्व प्रकारे मदत मिळत होती. त्यामुळे गेल्या माणसांचे विशेष असे दु:ख त्यांना जाणवले नाही.

एकीकडे धूमकेतूवरून आणलेल्या पदार्थांचे संशोधन सुरू झाले आणि दुसरीकडे ओमेगा आपल्या ग्रहावर जाण्याच्या तयारीला लागला. सर्वांचा निरोप घ्यावा म्हणून त्याचे एक चालू(लाईव्ह)व्याख्यान ठेवले गेले. मानव ते भाषांतरित करून सांगत होता. भारतात ते हिंदी, इंग्रजी तसेच प्रादेशिक भाषांमधून सांगितले जात होते तर इतर देशांत त्यांच्या भाषेत रूपांतरित करून ऐकवले

जात होते. उद्देश हाच होता की शेवटच्या व्यक्तीपर्यंत ओमेगाचा संदेश पोहचावा.

ओमेगा बोलू लागला,"सर्व मानवजातीला आणि तमाम पृथ्वीवासियांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा! मी आता घरी परततोय. वाटेत मंगळावर थांबेन. तुमच्यात एवढे दिवस राहिलो. खूप बरे वाटले. घरच्यासारखे वाटले. मी अन्य ग्रहावर आहे असे वाटलेच नाही. खरे म्हणजे मी या ठिकाणी विश्वकल्याण संघटनेच्या त्या सात अज्ञात लोकांचे आभार मानू इच्छितो, ज्यांनी विज्ञानाचा हा एवढा मोठा व्याप उभा केला. अल्पावधीतच पृथ्वीवरील मानवी जीवनातील सर्वच क्षेत्रात क्रांती घडवून आणली. त्यांच्या प्रयत्नामुळेच तुम्ही-आम्ही भेटू शकलो. आता काय,येणे-जाणे होईलच.

मित्रहो,मानवी जगात प्रत्येक चांगल्या गोष्टींचा दुरुपयोग हा होत असतो. विज्ञान हे चांगलेच आहे. पण ते आपल्या हातातील शस्त्र आहे. त्याचा वापर भल्यासाठी करावा की वाईटासाठी हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो. विश्वकल्याण संघटनेने विज्ञानाचा वापर भल्यासाठीच केला म्हणून त्यांना यश आले. त्यांचा हेतू उदात्त होता आणि आहे. सर्व मानवजातीचे कल्याण हेच त्यांचे ध्येय आहे. त्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. विज्ञानाच्या मदतीने त्यांनी मानवासाठी बरेच काही केले आहे. त्यांच्या या थोर कार्यासाठी त्यांना पुरस्कार देऊ शकणारी एकही पात्र अशी संस्था या पृथ्वीवरच काय पण आमच्या ग्रहावरही नाही. स्तुतीच्या पलीकडे यांचे कार्य आहे. "

एक नजर समोरच्या प्रेक्षकांवर टाकून ओमेगा म्हणाला,"मित्रहो,जाता जाता एक सुखाचा, मोलाचा मूलमंत्र देऊन जातो. या विश्वात जे काही आहोत ना ते आपणच आहोत. आपल्या दु:ख, सुखाला केवळ आपण आणि आपणच जबाबदार आहोत. जेव्हा दु:ख येते तेव्हा आपण आकाशाकडे पाहतो. पण वर काहीही नाही. जे काही आहे ते सर्व आपल्यातच असते. हे विश्व ईथर नावाच्या पदार्थांपासून बनलेले असून त्यातच पसरलेले आहे. या विश्वात अशी एकही जागा नाही जेथे ईथर नाही. कोणतीही पोकळी, मोकळी जागा ही ईथरनेच भरलेली असते. मी मागे सांगितले होते की आपले मन देखील ईथरचेच बनलेले असते. म्हणून ते बसल्या जागेवरुन दृश्य-अदृश्य विश्वास कोठेही जाऊन येते. याबाबत मी तुम्हाला वीजेचे उदाहरण दिले होते. ही वीज शेकडो किलोमीटर दूर अंतरावर तयार होते. आपल्यापर्यंत ती काही क्षणात पोहचते. हीच वीज माझा आवाज या ध्वनीवर्धकाच्या माध्यमातून तुमच्यापर्यंत पोहवते. हीच वीज तुमच्या पृथ्वीवरच्या, मंगळावरच्या आणि माझ्या सॅट-९ वरच्या माणसांना माझे दृश्य दाखवित आहे. जरासा सुद्धा वेळ लावत नाही. क्षणात इकडचे तिकडे घेऊन जाते.

आपल्या मनाचे कार्य सुद्धा तसेच आहे. मित्रहो, या जगात कोणतीही गोष्ट प्रथम सूक्ष्म पातळीवर घडते. मग दृश्यात येते. आधी आपण ठरवतो. मनात ती प्रतिमा तयार झाल्यावर त्याला मूर्त रूप येते. आपण ह्या मोठमोठ्या इमारती पाहतो. पूल पाहतो. ह्यांची जडणघडण आधी मनात झाली. मनातून कागदावर. कागदावरून जमीनीवर

प्रत्यक्षात आली. हे अफाट विश्व सुद्धा एका सूक्ष्म बिंदूपासून तयार झाले आहे. आपण मनात जसा विचार करतो तसा बाहेर त्याचा प्रभाव पडतो. मनातील ईथरवर सतत ती प्रक्रिया सुरू राहते आणि काही काळाने बाहेरचा ईथर त्याला दृश्य रूप देते. आपण दु:खी आहोत,याचा अर्थ आपल्या पासून आपल्या मागच्या कित्येक पिढ्यांनी चांगला सकारात्मक विचार केलेला नाही. केला तर त्या दृष्टीने प्रयत्न केलेला नाही. मी सुखी आहे. वैभवसंपन्न आहे. रूपवान, गुणवान,कीर्तीवान आहे. सर्व सुखे मजजवळ आहेत. मी निरोगी आहे. माझ्या कुटुंबात, समाजात, परिसरात सर्व काही उत्तम आहे. सर्व चांगलेच घडत आहे. सर्वत्र प्रेम,माया, बंधुभाव, आपुलकी आहे. या जगाचा कारभार निसर्ग नियमानुसार व्यवस्थित चालू आहे. सर्वजण प्रामाणिकपणे, जबाबदारीपूर्वक आपापली कामे करीत आहेत. सर्व माझे मित्र आहेत. माझी कामं विनासायास चटकन होत आहेत. सर्वत्र समतोल आहे. असा विचार करा. सतत करा. करत रहा. यातून आपोआपच आपल्या सभोवतालची परिस्थिती बदलून जाईल. मी यशस्वी आहे. माझ्या आसपास परिस्थिती अनुकूल आहे. माझे मन आनंदीत आहे. मी समाधानी आहे. असे सतत विचार करत राहिल्यास तशीच आपली वृत्ती होऊन जाते. मग ते बाहेर अस्तित्वात येतेच. तुम्हाला माझे म्हणणे कदाचित पटणार नाही. पण तुम्ही प्रयोग करून बघा. आपण बाहेरील परिस्थितीबाबत सतत कुरकुर करत असतो. हा तसा,तो तसा. परिणाम बाहेरील परिस्थिती सुधारत नाही. बहुसंख्य लोक हाच नकारात्मक विचार करतात म्हणून परिस्थिती सुधारत नाही.

जर बहुसंख्य लोक चांगला विचार करू लागले,तसा प्रयत्न करू लागले तर नक्कीच परिस्थिती पालटणार आहे.

मी बोलतो यामागे शास्त्र आहे. कसे ते पहा. तुमच्या या सूर्याच्या एका किरणात एखादा पदार्थ जाळण्याची क्षमता नसते. पण आपण भिंगातून तीच किरणं एकत्र केली तर त्या किरणांची सर्व शक्ती एका बिंदूत एकवटली जाते. त्याची घनता वाढते. उष्णता वाढते. त्यात आपल्याला चटका बसतो. एखादा पदार्थ जाळताही येतो. तसेच आपल्या मनाचे आहे. आपले मन या सूर्याच्या किरणांसारखे सामर्थ्यवान आहे. ते सारखे एकच विचार करू लागले तर त्यात प्रचंड ऊर्जा जमा होते. मग हवा तो बदल आपण नक्कीच करू शकतो.

आपल्या मनात प्रचंड ताकद आहे. आपण जे ध्यान करतो तेच प्राप्त होत असते. ज्याचा आपण ध्यास करतो ते आपल्या समोर येत असते. आपण हीन दर्जाचे विचार करतो म्हणून दु:ख आपल्या वाट्याला येत असते. सुखी राहण्याचा एकच मंत्र आहे. विचार चांगला करा. काम चांगले करा. तुमच्या वाट्याला चांगलेच येईल. "

क्षणभर शांतता. ओमेगाचा प्रेक्षकांवर एक बारीक कटाक्ष. प्रेक्षकांच्या मनातील कालवाकालव त्याने अचूक हेरली.

"या आपल्या विश्वकल्याण संस्थेनी हाच सकारात्मक विचार केला. म्हणून ते यशस्वी झाले. निरनिराळे मानवोपयोगी आणि पर्यावरणपूरक शोध लावले. आणखी संशोधन करीत आहेत. तसेच आम्हीही मानवी शरीराचे, त्याच्या रचनेत,कार्यात कोणताही बदल न करता त्याचे अणुमध्ये रूपांतर करायचे. त्या अणुंचे ईथरमध्ये बदल

करायचा. ईथरच्या माध्यमातून हवे तेथे जाऊन पुन्हा ईथरचे अणुत आणि अणु पासून शरीर तयार करायचे. तेही क्षणात. थोडक्यात तुमच्या पृथ्वीच्या भाषेत गायब होणे. प्रयोग अवघड आहे. अशक्य मात्र नाही. हो पण, आम्ही त्याचा सदुपयोगच करणार आहोत. ज्या यंत्राच्या माध्यमातून हे होईल ते यंत्र मानसिक तरंगावर कार्य करणारे असेल. वाईट तरंग असतील तर यंत्र प्रतिसाद देणार नाही. परंतु एखाद्याला तातडीने मदत देणे आहे, कोणी संकटात आहे, नैसर्गिक आपत्ती आहे, त्यांना मदत करायला जाताना जे तरंग मनात असतात त्यावर हे यंत्र कार्य करेल. साहजिकच त्याचा दुरूपयोग होणार नाही. अर्थात, हे यंत्र तयार व्हायला बराच अवधी जाईल. पण मानवी इतिहासात 'न भूतो न भविष्यति' असा शोध ठरणार हा.

शेवटी एक सांगतो. विज्ञानाची कास धरा. त्याचा चांगला उपयोग करा. चांगले रहा. सुखी रहा. समाधानी रहा. निरोगी रहा. सर्वांशी मिळून मिसळून रहा. सर्वांचे कल्याण चिंता. या जगातून अस्त्र-शस्त्र जाऊन फुलांच्या बागा कशा फुलतील ते बघा. सारखे देत रहा. पोटासाठी निसर्ग आहे. मानवसमाजासाठी आणि निसर्गासाठी तुम्ही असावे. अश्रू पुसणे, हास्य निर्माण करणे,मदत करणे हेच पुण्य आहे. त्रास देणे, स्वार्थ साधणे, लबाडी हे पातक आहे. हे सर्व आपल्यापाशी आहे. सर्वांना शुभेच्छा! जय जगत!"

ओमेगा आपले भाषण बंद करून यानात जाऊन बसला. यान आकाशात झेपावले. उपस्थितांचे नेत्र पाणावले.

(३३)

असंभव ते संभव

चंदन नावाचा एक युवक गेल्या काही वर्षांपासून अमेरिकेत नोकरीला होता. त्याचे स्वप्न होते परदेशात जायचे. मोठ्या पगाराची नोकरी करायची. खूप नाव कमवायचे. त्याचे हे स्वप्न पूर्ण झाले. परंतु तो आईवडीलांचा एकुलता एक मुलगा असल्याने त्याचे मातापिता भारतात एकटे पडले. चंदनला त्यांच्याकडे लक्ष देता येईना. मातापित्यांची सेवा करायची त्याची खूप इच्छा होती. पण कामाच्या व्यापामुळे जमत नव्हते. मातापित्याचे होणारे हाल त्याला पाहवत नव्हते. विवाह करावे तर पत्नी सुद्धा त्याच्या सोबत राहील. आईवडीलांना काय फायदा?

विश्वकल्याण संस्थेचे कार्य जगभर वाढत गेले. त्यांच्याकडे काम करायची त्याची इच्छा झाली. त्याने अर्ज केला. तो मंजूर झाला. त्याला भारतात सामाजिक जबाबदारी देण्यात आली. चंदन खूश झाला. आपल्या अमेरिकेतील नोकरीचा राजीनामा देऊन तो विमानाने भारतात यायला निघाला. विमान भारताच्या दिशेने झेपावले. मुंबईच्या सहारा विमानतळावर त्याचे मातापिता त्याची आतुरतेने वाट पाहत होते. विमान वेळेवर आले. परंतु उतरताना विमानात बिघाड झाला. त्याची चाकं फाटली गेली. विमान पलटी खाऊन दूरवर फेकले गेले. त्यात स्फोट झाला. अग्नीच्या मुखात गेले ते. विमानतळावर एकच

हाहाकार माजला. चंदनच्या मातापित्यांसाठी आभाळ जणू कोसळले. ते वेड्यासारखा धावपट्टीवर धावले.

विमान पूर्ण बेचिराख झाले होते. एकही प्रवासी जीवंत सापडण्याची शक्यता मावळली होती. मात्र आश्चर्य की चंदन जीवंत सापडला. परंतु त्याचे शरीर पूर्णपणे क्षतीग्रस्त झाले होते. मानेपासून,कंबरेपासून हातापायांची हाडे मोडली होती. उदर फाटून आतडी आणि इतर अवयव इतस्ततः विखुरलेले होते. फुफ्फुस आणि ह्यदयालाही मोठी हानी पोहचली होती. बरेच रक्त वाहून गेले होते. मास अंगावर नावापुरतेच होते. अशाही अवस्थेत तो बेशुद्धावस्थेत बडबडत होता,"मला मातापित्याची सेवा करायची आहे. "

चंदनला मुंबईच्या एका नावाजलेल्या रुग्णालयात नेले गेले. देशातील मोठ्यात मोठे डॉक्टर बोलावले गेले. चंदनचे प्रकरण गेल्यात जमा होते. पण तो बडबडत होता. हे सर्वांकरिता आश्चर्याची बाब होती. दुर्मिळात दुर्मिळ असे हे प्रकरण डॉक्टरांसाठी होते.

"काय करायचे,बोला?" रूग्णालयाच्या डीनने विचारले.

"त्रेलोक्यचिंतामणी रसायन वापरले तर?" डॉक्टर रिगेलने सूचवले.

"अहं, काही उपयोग नाही. एक मस्तक वगळले तर बाकी अवयव आहेतच कुठे? खाटिकखान्यात मासाचे तुकडे असतात तसे हे काही अवयव आहेत. पूर्ण क्षतीग्रस्त. "डॉक्टर शर्मा म्हणाले.

"मग आता?" डीनचा गंभीर प्रश्न.

आता एकच उपाय आहे, क्लोनिंग तंत्रज्ञान. प्रो. बाबूराव आरेकर यांना बोलवावे लागेल. ते जनुक विज्ञान, पेशी तंत्र, जैवतंत्रज्ञान आणि क्लोनिंग यातील तज्ज्ञ आहेत. विश्वकल्याण संस्थेचे प्रमुख वैज्ञानिक आहेत. तेच काही करू शकतील. "डॉक्टर मुखर्जी म्हणाले.

निरोप मिळताच प्रो. बाबूराव आरेकर रुग्णालयात हजर झाले. चंदनचे निरिक्षण केले. विचार करू लागले.

"सर, काय करायचे?" डीनने विचारले.

"चला, कामाला लागा. शस्त्रक्रिया करायची. "प्रोफेसर म्हणाले.

"पण कसली?" डॉक्टरांना प्रश्न पडला.

"प्रत्येक अवयवाची. " प्रोफेसर म्हणाले.

"पण हे शक्य आहे काय?" डॉक्टरांची शंका.

"प्रत्येक गोष्ट शक्य आहे. या मुलाची आपल्या आईवडिलांची सेवा करायची जबरदस्त इच्छा ह्याला जीवंत ठेवत आहे. मानसिक पातळीवर हा सुदृढ आहे. ह्याला काहीही झालेले नाहीय. ह्याचे मनच ह्याला बरं करेल. बाकी काम आपले. चला प्रत्येक अवयवांचे क्लोनिंग करू या. शक्य तेथे अवयव रोपण करू या. हा बरा होईल. "

प्रोफेसरांचा आत्मविश्वास सर्व तज्ज्ञ डॉक्टरांमध्ये शिरला. पूर्ण हार झाल्याशिवाय कधीही हार मानायची नाही हे त्यांना उमगले. ते कामाला लागले. ह्रदयाचे प्रत्यारोपण केले गेले. मासाचे क्लोन करून ते अंगावर चढविण्यात आले. नसा आपोआप तयार होत गेल्या. आतडी शक्य तेथे शिवून आणि क्लोन करून उदरात बसविण्यात

आली. क्षतीग्रस्त यकृत काढून टाकले गेले. त्याचे क्लोन करून तेही कार्यान्वित करण्यात आले. हाडे जोडण्यात आली. मान, कंबर,मणका, हातपाय यांची हाडे जोडली गेली. शरीरभर मास पसरले. रक्ताभिसरण सुरळीत चालू झाले. आता शुद्धीवर यायचा अवकाश होता.

"सर, आपण कमाल केलीत. गेल्या सहा महिन्यांत होत्याचे नव्हते केले. खरं पाहायला गेल्यास मासाच्या एका तुकड्यापासून पूर्ण शरीर तयार केलेत. " डॉक्टर खूश होत म्हणाले.

"कमाल आपण नाही, या मुलाने केली आहे. याचा नुसता शीर जीवंत होता. त्याने आपल्याला बाकी शरीर तयार करायला प्रयुक्त केले. थोडी बुद्धी,थोडे तंत्रज्ञान,थोडे कौशल्य,थोडी आस्था याच्या बळावर आपण या चंदनचे शरीर पूर्ण केले. " प्रोफेसर म्हणाले.

"पण सर,हा शुद्धीवर कसा येईल?"

"येईल. ह्याच्या मातापित्याला बोलवा. " चंदनचे मातापिता आले. "हे बघा,हा तुमचा मुलगा आता स्वस्थ झालाय. त्याला हाक मारा. शुद्धीवर येईल तो. "

"चंदन बाळ,उठ. आम्ही आलोत बघ. चंदन. " दोघांनी बऱ्याच हाका मारल्या. अगदी पोटतिडकीने हाका मारल्या आणि खरंच चमत्कार झाला. चंदनला शुद्धी आली. प्रोफेसर बाबुराव आरेकरांचा विश्वास जिंकला. चंदन उठून बसला. आईवडीलांना मिठी मारली. वातावरण भावनामय झाले. सर्वांच्या डोळ्यांत पाणी आले.

"डॉक्टर साहेब, आपण महान आहात. आमच्या मुलाला मृत्यूच्या कराल दाढेतून बाहेर काढलेत. आम्ही आपले फार आभारी आहोत. " चंदनचे वडील अश्रू पुसत म्हणाले.

"आम्ही कसले महान,तुमचा मुलगा महान आहे. तुमची सेवा करण्याची त्याची जबरदस्त इच्छा त्याला मरू देत नव्हती. त्याच्या ह्याच इच्छेने आम्हाला बळ दिले. बाकी काम या विज्ञानाची आहे. आज विज्ञानात असे असे शोध लागलेत की माणूस आता काहीही करू शकतो. "

चंदन मातापित्यासह घरी गेला. प्रोफेसरांचे हे क्लोनिंग तंत्र साऱ्या जगाला कळले. प्रोफेसर इतर डॉक्टरांना म्हणाले,"मी आता व्याखाणे आणि प्रात्यक्षिके घेणार आहे. सर्व प्रयोग स्वतः वरच करायचे आहेत. तुम्हीही हे तंत्र शिका आणि सेवा करा या जनतेची. या मानवाची. या मानवतेची. "

"नक्कीच. आम्ही जरूर शिकू. " सर्व डॉक्टरांनी होकार भरला.

प्रोफेसर आपल्या केंद्रांवर परतले.

(३४)

वेगवान यान

विश्वकल्याण संघटनेच्या अवकाशातील केंद्रांवर तांत्रिक विभागाची सभा सुरू होती. तांत्रिक विभाग प्रमुख प्रो. मेहेर आपल्या सहकार्यांना पडद्यावरील प्रक्षेपकावर दाखवित माहिती देत होता. "आपल्यासाठी आजची सभा खास आहे. आपण विज्ञानात फार मोठी झेप घेतली आहे. आता आपल्याला फार मोठी जबाबदारी पार पाडायची आहे. सध्याच्या आपल्या पृथ्वीवरील सर्वांत वेगवान वाहनाचा वेग मिनिटाला ४५००० किमी एवढा आहे. नुकताच येऊन गेलेल्या ओमेगाच्या यानाचा वेग सेकंदाला एक लक्ष किमी एवढा होता. आपल्याला विश्वात सर्वत्र संचार करण्यासाठी यापेक्षा गतिशील यानांची आवश्यकता भासणार आहे. "

"पण सर, एवढी वेगवान वाहने बनविण्यासाठी फारच गुंतागुंतीची यंत्रे बनवावी लागतील. त्यासाठी जास्त क्षमतेचे धातू लागतील. इंधनही भरपूर लागेल. " एका सहाय्यकाने शंका उपस्थित केली.

"हो,ते तर आहेच. आपण मंगळग्रहावरील बॉक्सिल हे शक्तीशाली धातू वापरून आणि आपल्याकडील अल्युमिनियम

वापरून संमिश्र बनवू. त्यापासून ही यंत्रे बनवू. सॅट-९ वरील इंधन या यंत्राकरिता वापरू. " प्रो. मेहेरने उपाय सुचवला.

"सर, आपण प्रकाशाच्या वेगाने जाणारे यान बनवू शकलो तर?"

"हे तर तंत्रज्ञानातील सर्वात मोठी झेप ठरेल. अरे,काळ थांबेल आपल्यासाठी. आहात कुठे?" प्रो. मेहेर म्हणाला.

"काळ कसं काय थांबेल,सर?" एका सहकाऱ्याने विचारले.

"आपल्याला ठाऊक आहे की वेळ =अंतर ÷वेग. जसजसा वेग वाढेल तसतसा तेच अंतर पार करायला वेळ कमी लागेल. आपण एक उदाहरण पाहू या. "प्रो. मेहेर पडद्यावर दाखवत सांगू लागले,"पृथ्वी आणि सूर्य यातील अंतर १५ कोटी किलोमीटर आहे. प्रकाशाचा वेग सेकंदाला तीन लाख किमी आहे. या वेगाने जाणारे यान बनवले तर सूर्यापर्यंत आपण आठ मिनिटे आणि वीस सेकंदात पोहचू. यानातील व्यक्तीसाठी तर काळ जणू थांबून जाईल. पुढेही जाणार नाही आणि मागेही जाणार नाही. सूर्यापर्यंत क्षणात पोहचलो असं त्यांना वाटेल. "

"आणि सर,मग यापेक्षा जास्त वेगाने जाणारे यान बनवले तर?"

"तर काळ मागे पडेल आणि आपण भविष्यात जाऊ शकू,आईन्स्टाईन म्हणून गेलेत. " प्रो. मेहेर उत्साहित होऊन म्हणाला.

"पण सर , हे शक्य आहे काय?" एकाने विचारले.

"का नाही? या विश्वात ठरविले तर सर्व शक्य आहे. आपण अशा प्रचंड वेगाने जाणारी याने बनवली तर विश्वात सर्वत्र संचार करू शकूच पण भविष्यातही जाऊ शकू. "

"व्वा! मग तर छानच होईल. "

"पण यात एक अडचण आहे. काळवेळ फक्त ग्रहांवर असते. तेही वेगवेगळ्या ग्रहांवर वेगवेगळी असते. आपण ही सर्व वेळ-काळ पृथ्वीच्या वेळेला ग्राह्य धरून सांगत असतो. पृथ्वीला सूर्याभोवती फिरायला ३६५/३६६ दिवस लागतात तर सॅट-९ ला त्याच्या ताऱ्याभोवती फिरायला ९०० दिवस लागतात. हा कालावधी आपल्या पृथ्वीच्या वेळेनुसार आहे. त्या ग्रहावर हा कालावधी २१० दिवस आहेत. अवकाशात तर वेळकाळ काहीच नसते. घनता, जडत्व, गुरूत्वाकर्षण काहीच नसते. तेथे तर काळ शून्यच असतो. आपण तर आता या क्षणाला अवकाशात आहोत. इथे पृथ्वीवरील साधे घड्याळ असते तर थांबले असते. "प्रो. मेहेर म्हणाला.

"मग सर, वेळ थांबते तर आपले वय सुद्धा थांबत असेल. " एकाने विचारले.

"नाही, तसं होत नाही. कारण आपण पृथ्वीसारख्याच वातावरण असलेल्या या केंद्रावर आहोत. इथे वय वाढणारच. पण कमी प्रमाण. "प्रोफेसराने स्पष्टीकरण दिले.

"शी! वय थांबले असते तर आपण म्हातारेच झालो नसतो. "एक निराश होत म्हणाला. याबरोबर सर्वांना हसू फुटले.

"अर्थात, या वेगवान यानात आपण प्रवास केला तर नक्कीच वय थांबेल. आपण कायमस्वरूपी जर या केंद्रावर राहिलो तर वीस वर्षांत दोन वर्षे वय कमी वाढेल. या वेगवान यानात तर वय आहे तेच राहील. "

"मग चला सर, असे यान बनविण्याच्या कार्याला लागू या. "तरुण सहाय्यक म्हणाला.

प्रो. मेहेर गालात हसले.

(३५)

शिक्षणाचे सुदिन

वरिष्ठांच्या आदेशानुसार मानवने दिलेल्या निर्देशानुसार देशाच्या प्रत्येक गावातील, प्रत्येक खेड्यातील प्रतिनिधी शैक्षणिक सुधारणा कार्याला लागले. प्रत्येक खेड्यात पाचेक मजली इमारत शाळेसाठी बांधण्याचे काम सुरू झाले. या कामी मंगळावरचे सूक्ष्मापासून विश्व बनते या तंत्राचा वापर करण्याचे ठरले. सर्व साहित्य मंगळावरचे मागविण्यात आले. काही खेड्यातील पंचायती आणि सरपंचांना हे शाळेचे प्रकरण पटेनासे झाले.

"इथे ही शाळा असताना ही पाच मजली शाळेची इमारत कशासाठी?" असा प्रश्न ते गाव प्रतिनिधीला विचारू लागले.

"तुमच्या या शाळा आहेत काय? गुरांच्या गोठ्यात मुलांना बसवितात. आम्ही बनवलेली शाळा आधुनिक पद्धतीची आहे. यात विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयी आहेत. सर्व प्रकारचे शिक्षण आणि प्रशिक्षण येथे दिले जाईल. गरमीत ही इमारत थंड राहील. थंडीत यात ऊब राहील. पावसाचा एक थेंबही आत प्रवेश करणार नाही. आतील आवाज बाहेर जाणार नाही. बाहेरचा आवाज आत जाणार नाही. निसर्गाच्या कुशीत विद्यार्थी आनंदाने शिक्षण घेतील. पूर, वादळ,भुस्खलन या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी विद्यार्थ्यांचे रक्षण करेल. " प्रतिनिधी समजावित म्हणाला.

"तुम्ही म्हणता ते ठीक आहे. पण गावात विद्यार्थी आहेतच किती? जेमतेम चाळीस-पन्नास. त्याकरिता पाच मजली इमारत बांधण्याची आवश्यकता काय?"

"आहे आवश्यकता. म्हणून तर बांधतोय ना! आज काही वाटत नाही. पुढच्या काळात गावाची लोकसंख्या वाढेल. सर्व मुलं शिक्षण घेतील. आता शहरातून लाकं गावात परततील. त्यांच्या मुलांना सामावून घेण्यासाठी शाळा नको का? पुढच्या काळात खेडे स्वयंपूर्ण होणार आहेत. तेथील पर्यावरणाला जराही धक्का न लावता सर्व सुविधा खेड्यात, गावात मिळणार आहेत. लोकं शहराच्या गर्दीतून अशा खेड्याकडे वळतील. म्हणून या एवढ्या मोठ्या शाळा बनविल्या जात आहेत. तुम्हीही तुमच्या मुला-मुलींना या शाळेत पाठवा. " प्रतिनिधी मधूर शब्दात समजून देत म्हणाला.

"आम्ही मुलींना शिकवत नाहीत. त्या शिकत बसल्या की घरची कामं कोण करणार? शिवाय मुली शिकल्या की अहंकारी बनतात. कुणाचंही ऐकत नाहीत. " सरपंच म्हणाला. यावर प्रतिनिधी भडकला," का?तुमचे असे कसे विचार?तुमचे हातपाय मोडलेत का? शहरात स्त्री-पुरूष दोघेही काम करतात. घर सांभाळतात. बहुसंख्य गावात स्त्री-पुरूष दोघेही कष्ट करून संसाराला हातभार लावतात. मग दोघेही सुशिक्षित असलेले केव्हाही चांगलेच नाही का?म्हणून तर त्यांची प्रगती होते. या खेड्यातील प्रत्येक मुला-मुलीला शिक्षण मिळायलाच हवे. तीन वर्षांपासून ते पंचवीस वर्षापर्यंत त्यांना इथे शिक्षण दिले जाईल. आम्हाला ठाऊक आहे, तुम्ही बुरसटलेल्या

विचारांचे लोकं मुलींना शाळेत पाठवणार नाहीत. म्हणून आम्ही शिशुंच्या नामकरणाच्या दिवशीच मुला-मुलींची नावे हजेरी पटावर घेणार आहोत. तुम्ही मुलींना मारत तर नाहीत ना?"

"नाही साहेब. आम्हाला मुलींचे महत्त्व पटलंय. आता आमच्याकडे मुलींच्या जन्माचा आनंदोत्सव साजरा केला जातो. " सरपंच म्हणाला.

"उत्तम! आता शिक्षणाचेही महत्त्व पटवून घ्या. मध्ययुगात जगू नका. आजच्या काळात जगा. इथे कोणताही भेदभाव नाही. सर्वांना समान हक्क,समान संधी आहे. शिक्षणामुळे विचार सुधारतात. प्रघल्भता येते. सदसदविवेकबुद्धी जागृत होते. सामाजिक जाणीव येते. कसे जगावे हे कळते. " प्रतिनिधी म्हणाला.

एकीकडे खेडेगावात शैक्षणिक सुविधा देण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते तर दुसरीकडे शहरातील शैक्षणिक अनागोंदी दूर करण्याचे कार्य हाती घेण्यात आले. शाळा-कॉलेजातील जे शिक्षक क्लासेस घेतात, त्यांना तसे न करण्यास विनंती करण्यात आली. जे ऐकत नव्हते त्यांच्या करिता थोडा सक्तीचा मार्ग अवलंबला गेला.

"तुम्ही शाळा-कॉलेजातून पगार घेतात. तेथे नीट शिकवत नाहीत आणि शिकवणी वर्ग चालवितात. हा भ्रष्टाचार आहे. गुन्हा आहे. विद्यार्थ्यांची केलेली फसवणूक आहे. समाजाची फसवणूक आहे. याची शिक्षा तुम्हाला मिळायलाच हवी. "

शिक्षकांनी चालविलेले शिकवणी वर्ग बंद झाले. आता शैक्षणिक संस्थेत प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणावर दान द्यावे लागते. पैसेवाले पैसे

देऊन प्रवेश निश्चित करतात. जे पैसे भरू शकत नाहीत,त्यांचे उच्च शिक्षण थांबून जाते. भविष्य अंधारात राहते. शिवाय ज्यांनी पैसे देऊन प्रवेश घेतला आहे त्या विद्यार्थ्यावर चुकीचे संस्कार होत आहेत. त्यांच्यावर असे बिंबवले जाते की पैशाशिवाय कोणतीही कामे होत नाहीत. मग पुढे जाऊन तेच विद्यार्थी पैशाशिवाय काहीही करत नाहीत. मग समाजात भ्रष्टाचार वाढतो. ही घाणेरडी व्यवस्था बदलण्याच्या कामाला सुरुवात झाली. साम-दाम-दंड-भेद या नितीचा अवलंब करून ही घाण सफाईचे काम जोरात सुरू झाले. बहुतेक शैक्षणिक संस्थांनी आढेवेढे घेतले. त्यांना चांगलीच समज देण्यात आली. शिवाय सरकारी नोकरी करिता विशिष्ट विद्यापीठातील पदवी हवी, इतर विद्यापीठाची चालणार नाही अशी अट घालणाऱ्या आस्थापनांना चांगलेच खडसावले गेले. "तुम्हाला परदेशी विद्यापीठाची पदवी चालते. मग देशातल्या विद्यापीठाची का नाही चालत? जे आस्थापना असं करेल त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. "

या प्रकारामुळे बहुतेक शिक्षण सम्राटांची आणि आस्थापनकर्त्यांची मने दुखावली गेली. "ही सर्व हूकूमशाही चालवलेय या विश्वकलयाणवाल्यांनी. सरकार काय करते? लोकशाही आहे की नाही या देशात? किती बंधने ही? मनापासून काहीच करता येत नाही?"

शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानापेक्षा पैशाला जे महत्त्व आले होते ते कमी करण्याचा पूरेपूर प्रयत्न सुरू झाला. विद्यार्थी,पालक,सुज्ञ मंडळी या

सर्वांना कळले की प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक क्षेत्रात शुद्ध ज्ञान दिले गेले पाहिजे. तरच शुद्ध चारित्र्याचे,समाजहीत पाहणारे, भ्रष्टाचारमुक्त पिढी तयार होईल. नैतिकता येईल. गुणवत्तापूर्ण ज्ञानाला प्राथमिकता मिळायलाच हवी. पैशाला दुय्यम स्थान आहे.

भारतभर कानाकोपऱ्यात, दुर्गम भागातही नव्या शिक्षणाचे वारे वाहू लागले. दूरदर्शन, रेडिओ आणि इतर माध्यमांद्वारे शुद्ध शिक्षणाचे महत्त्व लोकांच्या मनावर बिंबवले जाऊ लागले.

(३६)

दुर्गम भागाचे नंदनवन

विश्वकल्याण संस्थेच्या वैज्ञानिक आणि सामाजिक भरीव कार्यामुळे बहुतेक गैरव्यवहार करणाऱ्यांची दुकाने बंद झाली होती. दहशतवाद्यांचे तर कंबरडेच मोडले गेले होते. या सर्वांचीच मने दुखावली गेली होती. त्यांचा धंदा बसला होता. केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण विश्वावर विश्वकल्याण संस्थेने दबदबा निर्माण केला होता. आपल्या निवासस्थानी बसून काही अतृप्त आत्मे आगपाखड करीत बसलेले.

"आपण काहीच करू शकत नाही का?. त्यांनी कायद्याच्या रक्षकांना त्यांच्या हातात ठेवलेय. कायद्याचा वापर करून विदेशातील सर्व काळा पैसा भारतात आणला त्यांनी. त्यात माझे अरबो रूपये होते. आता साफ कंगाल झालो आहे. शेतीवाडी आहे म्हणून जगतोय. " एकजण म्हणाला.

"पण मी म्हणतो, या देशात लोकशाही म्हणून आहे की नाही? हे विश्वकल्याणवाले हूकूमशाही गाजवतात. सरळसरळ आज्ञा सोडतात. कायद्याची पायमल्ली करतात. अपराध्याला त्या तेथे मंगळावरील वनात पाठवितात. " तिसरा संताप व्यक्त करीत म्हणाला.

"मागच्या काही वर्षांपासून भारतातील तुरूंग रिकामीच आहेत. न्यायालयात प्रकरणेही कमीच आहेत. खून करणारे,स्त्रियांवर अत्याचार करु पाहणारे, दहशतवादी, दरोडेखोर,आपल्यासारखे असे लाखभर तरी माणसं तेथे मंगळावर पाठवली असतील. " चौथा म्हणाला.

"ही क्रूरता आहे. अमानवीय आहे हे. याच्या विरोधात आपण आवाज उठवायला हवा. " पाचवा दात ओठखात म्हणाला.

"अहं,आपण काहीच करू शकत नाही. " सहावा म्हणाला.

"मग आपण करायचे काय? असे हातावर हात देऊन बसायचे काय? अशाने आपण रस्त्यावर येऊ. सात पिढ्यांची सोय केलीय ती आपल्यालाच पुरवणार नाही. " सातवा म्हणाला.

"आपल्यापुढे एकच उपाय आहे. आपण चुपचाप बरं वागायला शिकले पाहिजे. मिळते त्यात भागविले पाहिजे. " पहिला शहाणा होत म्हणाला.

"त्यांना असे फंदफितुरी करून संपविता नाही का येणार?" आठव्याने विचारले.

"काय बोलतोयस हे? असा विचारही करू नकोस. ते विश्वकल्याणवाले पूर्ण विश्वावर लक्ष ठेवून असतात. कोण, कुठे, काय करतोय त्यांना सर्व ठाऊक असते. या क्षणाला आपल्यावरही त्यांचे लक्ष असेल. त्यांच्यापासून काहीच लपविता येत नाही. त्यांच्याकडे अशी यंत्रे आहेत की त्यांना त्वरीत धोक्याची सूचना देतात. वाईट

विचार सोडून द्या. अन्यथा मंगळावरील नाहीतर त्या सॅट-९ वरील ग्रहावर शिक्षा भोगायला जायला तयार रहा. "

"मग आता आपले भवितव्य काय? " एकाने विचारले.

"त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालावे. ते सांगतील तसे वागणे हेच आपले भवितव्य आहे. यातच आपले भले आहे. " पहिल्याचे म्हणणे न पटण्यासारखे होते पण ते स्विकारण्याशिवाय गत्यंतरही नव्हते. तेल तूप दोन्हीही जाऊन हाती धूपाटणे राहण्यापेक्षा चांगले वागणेच श्रेयस्कर आहे हे त्यांनी स्विकारले.

याचवेळी मानव, सुमित, इब्राहिम,मनींदर ही मंडळी अफगाणिस्तानात उपस्थित होती. दहशतवाद आणि अमेरिकी सैनिकी कारवाईनी अफगाणिस्तान बेचिराख झाला होता. तेथे मानव वन्यजीवासारखा जगत होता. त्यांच्या जीवनात पुन्हा सौख्य आणण्यासाठी, त्यांना मानवाचे सर्व अधिकार देण्यासाठी ही विश्वकल्याणची माणसे अफगाणिस्तान हजर होती. त्यांनी अफगाणिस्तानातील सर्व प्रमुख नेत्यांची, तज्ज्ञांची,विद्वानांची सभा घेतली.

"आम्ही तुमच्या कोणत्याही श्रद्धेला ठेच पोहचविणार नाही. तुमचा आत्मसन्मान मारणार नाही. उलट तुम्हाला निर्भिड बनवायला आम्ही आलो आहे. एका मनुष्याला सुखी राहण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते इथे निर्माण करणार. तुम्हाला दहशतवादमुक्त, शांत, सुखी वातावरण उपलब्ध करून देणार. इथे प्रत्येकाला संधी मिळेल. तुम्हालाही आमच्या विधायक कार्यात सहभागी करून घेतले

जाईल. इथले आमचे निर्माणाचे काम पूर्ण झाले की ते तुमच्या ताब्यात दिले जाईल. त्याची देखभाल तुमच्याच हाती देणार. फक्त तुम्ही आमच्यावर विश्वास ठेवा. आम्हाला सहकार्य करा. "

अफगाणिस्तानातील जनता अशांती, अस्थिरता याला कंटाळलेली होती. त्यांना बदल हा हवाच होता. त्यांनी त्वरीत विश्वकल्याण संस्थेच्या प्रकल्पाला मान्यता दिली.

प्रथमतः अफगाणिस्तानातील प्रत्येक परिवाराला चांगली घरे देण्याचे कार्य सुरू करण्यात आले. तेथील वातावरण, संस्कृती, परंपरा यानुसार घरांची रचना करण्यात येऊन एका सुनियोजित पद्धतीने ती सूक्ष्मापासून विश्व बनते या तत्वाने उभारण्यात आली. गाव,खेडे, शहर याचाही यात विचार केला गेला. शहरात लोकसंख्या वाढून बकालपणाची समस्या निर्माण होऊ नये म्हणून ग्रामीण पातळीवर हवामानानुसार शेती,फळ उद्योग, प्रकिया उद्योग, कारखाने, खाणकाम, तेल संशोधन अशा रोजगार निर्मितीवर भर देण्यात आला तसेच वाळवंटातील प्रचंड उष्मा वापरून वीजनिर्मिती करण्यात येऊ लागली. सोबत सौरऊर्जा होतीच. ज्या काही थोड्याफार नद्या होत्या, त्या एकमेकींना सांधून पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्याचा प्रयत्न सुरू झाला. पाईपलाईन टाकून इतर देशांच्या सहकार्याने सागराचे पाणी दुष्काळग्रस्त भागात वळवून,ते शुद्ध करून तेथे नंदनवन फुलविण्याचा विचार अग्रेसर झाला.

अर्थातच, अफगाणिस्तानाची होणारी ही प्रगती काही स्वार्थी मंडळींना नको होती. जर लोक सुखी झाले, संपन्न झाले तर ज्ञान

प्राप्तीच्या मार्गाला लागतील. त्यांना खरे ज्ञान प्राप्त होईल. मग आपले कोण ऐकणार? आपले महत्त्व जाणार. असे भय तेथील काही संधीसाधू मंडळींना जाणवू लागली. म्हणून त्यांनी या अफगाणिस्तानच्या होणाऱ्या कायापालटाला विरोध केला. लोकांच्या भावनेला हात घालून आपला स्वार्थ साधण्याचा यत्न सुरू केला. पण जनता हुशार होती. ती अशा ढोंग्यांना जुमानली नाही. मानवला हे असेच काहीतरी होईल याची पक्की खात्री होती. म्हणून त्याने आपल्या मधूर भाषणाद्वारे जनतेला सांगितले होते,"किती दिवस आपण मेंढराचे व्रत स्विकारणार? आज शेकडो वर्षे झाली, ते हाकलतात तसे आपण हाकलले जातो. खरे काय? खोटे काय? याचा निवाडा नाही. तुमची स्वतः ची काही मतं आहेत की नाही?तुमचे स्वतः चे वैयक्तिक असे जीवन आहे. ते तुमच्या इच्छेनुसार जगण्याचा तुम्हाला पूर्णतः नैसर्गिक अधिकार आहे. इतर कोणी स्वतः च्या स्वार्थासाठी ते नियंत्रित करू पाहील तर ते अनुचित आहे. जागे व्हा. खऱ्या जगाकडे डोळे उघडून पाहा. आपल्याला सांगितले जाते, भासवले जाते त्यापेक्षा जग वेगळे आहे. हे जग सुंदर आहे. इथे आनंद भरलेला आहे. इथे कोणी कोणाचा शत्रू नाही. हे अशा बुरसटलेल्या विचारांचे लोक आपली मती गुंग करतात. आग लावून देतात आणि स्वतःच्या पोळ्या भाजतात. जरा विचार करा. एवढी वर्षं झाली, जगातील बाकीचे देश प्रगती करताहेत. मग का आपली प्रगती होत नाही? का प्रगती रोखली गेलीय? प्रत्येकात वैज्ञानिक दृष्टिकोन हवा. एखादी बाब कोणी

सांगतोय म्हणून खरी किंवा खोटी मानू नये. आपल्या सदसद्विवेकबुद्धीला पटते का ते पहावे. "

अफगाणिस्तानातील सर्वसामान्य जनतेला ते पटले. आपली प्रगती करवून घेण्याची हिच खरी वेळ आहे हे त्यांनी जाणले. जनतेच्या सहभागामुळे कार्य लवकर पूर्णत्वास जाऊ लागली. ही बाब ज्यांना सलत होती, त्यांनी विश्वकल्याणाच्या सर्व कार्यकर्त्यांना ठार करण्याची योजना आखली. अर्थातच,त्यांच्यावर हे लक्ष ठेवून होतेच. त्यांनी या विघ्नसंतोषीना रातोरात अफगाणिस्तानातील पहाडात गायब करून टाकले. वाऱ्याच्या एका झोक्याने झाडाची काही खराब पाने गळून पडली. विश्वाला त्याचा पत्ता लागला नाही.

अफगाणिस्तानात सुखशांती निर्माण करण्याचे कार्य प्रगतीपथाला लागले. जनता मोठ्या उत्साहाने त्यात सामील झाली. जवळच्या इतर मागासलेल्या देशातही हा प्रयोग करण्याचे ठरले गेले. पण बुरसटलेल्यांना आधुनिक जीवनशैली नको होती. डोकी सडलेली त्यांची. मध्ययुगातीलच विचार त्यांना पटत असलेला. त्यांनी भारतात, अफगाणिस्तान आणि आसपासच्या इलाख्यात दहशतवादी हल्ले करण्याची योजना आखली. पण त्यावरही केंद्रावरून लक्ष होतेच. त्या सर्व दहशतवाद्यांना जेरबंद करण्यात आले. जगाच्या नकळत त्यांची योग्य ती सोय करण्यात आली. दहशतवादी कुठून आले? कुठे गेले? कुठे होते? काही पत्ता लागला नाही. विश्वात कोठेही कंपनीचा साधा बॉयलही फुटला नाही की सिलिंडरची टाकी फुटली नाही. एवढी सुरक्षा व्यवस्था विश्वकल्याणाच्या जवानांनी ठेवली होती.

अफगाणिस्तान प्रमाणे आफ्रिका, अमेझॉनचे दुर्गम खोरे आणि पृथ्वीच्या इतर दुर्गम भागात विश्वकल्याण संघटनेच्या वतीने तेथील पर्यावरणाला कोणताही धक्का न पोहोचवता विकास कामे हाती घेण्यात आली. तेथील गरीबी, अनारोग्य, अशिक्षितपणा दूर करण्यावर भर देण्यास सुरुवात झाली.

(३७)

गुप्त व्हायचे तंत्रज्ञान

विश्वकल्याण संस्थेचे आपले अखिल भारतीय कल्याणाचे कार्य विश्व पातळीवर नेले. विश्वात सर्वत्र त्यांची स्तुतीसुमने गायली जाऊ लागली. पण भारतात काही कोपरे असेही होते की तेथील काही माथेफिरू मंडळी विश्वकल्याण संस्थेला शिव्या घालत होते.

"वेड लावलेय माणसांना यांनी. विज्ञान विज्ञान घेऊन बसलेत लोक. आपला धंदा चौपट व्हायची वेळ आली आहे. लोकं ज्ञानी झाली. शिक्षित झाली. स्त्री-पुरूष शिक्षण घेतात. सर्व जातीधर्माची लोकं शिकतात. आता या संस्थेने शिक्षणाची अशी सोय केलीय की माणसाची जात ओळखता येत नाही. धर्म ओळखता येत नाही. " एक विद्वान इतरांना सांगत होता.

"यावर आपण काही उपाय योजायला हवेत. " दुसरा राग प्रगट करीत म्हणाला.

"*फोडा आणि राज्य करा* ही इंग्रजांची नीती इथे वापरू शकतो आपण. मनुष्याचे मन फार कमजोर असते. त्यात भारतीय लोक फार भोळे!अडाणी! त्यांना काहीही सांगा,चटकन विश्वास ठेवतात. आपण या लोकांना सांगू, हे विश्वकल्याणवाले तुमची फसवणूक करीत आहेत. यांनी पूर्ण पृथ्वी त्या मंगळवासियांना आणि सॅट-९ वरील माणसांना दिली आहे. तेथे तुमच्यावर विविध प्रकारचे

प्रयोग केले जातील. तेथे तुमची खांडोळी केली जाईल. या पृथ्वीवर फक्त यांचेच राज्य राहील. मग हे तुम्हाला गुलाम करतील. जनता काय, मूर्ख असते. त्वरीत विश्वात ठेवते. आपले कार्य साध्य होईल. " तो अतृप्त आत्मा राक्षसी हास्य करीत म्हणाला.

"पण त्या ओमेगाच्या ग्रहावर म्हणे गुप्त व्हायचे तंत्रज्ञान विकसित करताहेत. "

"कसले तंत्रज्ञान घेऊन बसला आहात? सामान्य लोकांना भुलविण्याचे काम आहे हे सर्व. आजवर कोणी गुप्त झाले आहे का? हे सर्व कथा-कादंबऱ्यातील कल्पना. लोकांना भुलवून आपल्याकडे वळविण्याचा डाव आहे त्यांचा. " तो तडतड करीत म्हणाला.

"या विश्वकल्याणवाल्यांना ना चाबकाचे फटके मारले पाहिजेत. " एकजण असे म्हणाला आणि त्याचक्षणी त्यांच्या पुढ्यात हवेतील काही कण एकत्र होताना दिसले. ते कण एकत्र आले. जाड झाले. त्या कणांनी आकृतीचे रूप घेतले. थोड्या वेळात एक मानवाकृती तेथे उभी राहिली.

"कोण? ओमेगा.... ?" ती उपस्थित सर्व मंडळी थरथर कापत इथस्थ पळू लागली. ओमेगाने त्यांना आपल्या मजबूत बाहूत जखडून ठेवले.

"पळताय कुठे? काय बोलत होता तुम्ही? गायब व्हायचे तंत्रज्ञान हे कल्पोकल्पित बाब आहे? हा बघा मी सॅट-९ वरून गायब होऊन क्षणात इथे अवतरीत झालो. हे गायब व्हायचे तंत्रज्ञान आम्ही विकसित केले आहे. बोला आता. "

"काय उपयोग आहे त्याचा? जगात अराजकता निर्माण होईल त्याने. विज्ञानाने आजवर काय केले? विविध प्रकारचे शोध लावले. मनुष्य उलट संकटात चालला आहे. एक तरी शोध चांगला लावला का? बॉम्ब काय? विष काय? विविध जीवघेणे रसायन काय? हे विज्ञान म्हणजे विनाश आहे विनाश! दानव आहे तो. " एकजण हिंमत करून म्हणाला.

"असं? विज्ञान हे विनाशक आहे? मग विज्ञानाचा वापर करून बनविलेल्या वस्तू कशाला वापरतात? विज्ञानाने बनवलेल्या वाहनामध्ये का फिरतात? ध्वनीवर्धकावरून का बोलतात? दूरध्वनी, भ्रमणध्वनी का वापरतात? हे सर्व विज्ञानानेच आणले ना?" ओमेगाने सर्वांच्या मानगुट्या पकडल्या.

"ए माकडा, आम्हाला सोड. आमच्याशी वैर महागात पडेल. " एकजण चिडून दमदाटी करत म्हणाला.

"बापरे! खूप धोकादायक आहात तुम्ही! पण मीही काही कमी नाही. तुमचे मोठमोठे पर्वत एका दिवसात उखडू शकतो एवढी ताकद आहे माझ्यात. तुम्ही या धरतीवर जगण्याच्या लायकीचे नाहीत. तुम्हाला मी आमच्या ग्रहावर घेऊन जातो. तेथे आम्ही तुमच्या मेंदूवर अभ्यास करू. एवढा कपटीपणा, धूर्तपणा, स्वार्थीपणा, ढोंग तुमच्यात मेंदुच्या कोणत्या भागातून येतो ते शोधून काढू आम्ही. "ओमेगा करड्या आवाजात म्हणाला.

"ए नको. आम्हाला इथेच राहू दे. इथे विश्वकल्याणवाले आहेत ना संशोधन करायला. "

"अरे व्वा! मघाशी त्यांना चाबकाने फटके मारण्याची भाषा करीत होते. आता एकदम त्यांचा पुळका कसा आला? लबाड लांडग्याची भाषा कळते मला. "

ओमेगा सोबत भाषांतर यंत्र घेऊन आला होता म्हणून हा संवाद शक्य झाला.

ओमेगा सर्वांसहीत अणुरूप झाला. ते अणु ईथरमध्ये विलीन झाले. परिसरात दिसेनासे झाले. एक इसम लांबून हे सर्व पाहत होता. ओमेगा त्यांच्याशी स्थानिक भाषेत बोललाच कसा याचे त्याला गायब होण्यापेक्षा जास्त आश्चर्य वाटले.

(३८)

नम्र निवेदन

हे महिन्याच्या कडक उन्हात आता सृष्टी भाजत नव्हती आणि देशभरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या फलकावर सूचना झळकू लागली.

"सर्व देशवासीयांना जय हिंद! जय जगत! आम्ही-आपण एकमेकांच्या सहकार्याने गेल्या पाच-सहा वर्षांपासून विज्ञान क्षेत्रात फार मोठी घोडदौड केली. अनेक समाजोपयोगी शोध लावले. विज्ञान क्रांती केली. परग्रहावर गेले. तेथील मानवांशी संबंध प्रस्थापित केले. धूमकेतूवर संशोधन केले. आमच्या या सर्व खटाटोपाचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे मानवाचे सर्वांगीण कल्याण. तो आम्ही बहुतांशी साध्यही केला आहे. यापुढेही आम्ही नवनवीन शोध लावीतच जाऊ. मानवाचे जीवन सुखकर बनविण्यास आम्ही वचनबद्ध आहोत परंतु विज्ञानाने भौतिक प्रगती होते. चांगला दृष्टिकोनही येतो. पण काही अज्ञानी मंडळी याचा विरोध करतात किंवा याचा गैरवापरही करतात. विज्ञानाच्या मदतीने समाज सुधारण्याचा आमचा अखंड प्रयत्न आहे पण तुम्हा प्रत्येक व्यक्तीच्या सहकार्याशिवाय हे शक्य नाही. सांस्कृतिक जडणघडणीसाठी चांगल्या विचारांची गरज आहे. सामाजिक वातावरण निकोप राहण्यासाठी प्रत्येकाकडे त्याची जाणीव हवी. नैतिकता, शुद्ध आचरण, प्रामाणिकपणा, सचोटी,सत्यवादीपणा,कष्टाची तयारी, बंधुभाव, प्रेम, इतरांच्या

दु:खाबद्दल तळमळ, सर्व सुखी राहण्याची तीव्र इच्छा हे उदात्त गुण शुद्ध ज्ञान झाल्याने मिळतात. हे ज्ञान ग्रंथातून मिळते. समाजसुधारणेच्या अमोघ वाणीतून भेटते. त्यांच्या शिकवणीतून भेटते. आम्ही प्रत्येक शाळा, महाविद्यालयातून मूल्यवर्धित शिक्षण देण्याची शिफारस शासनाकडे केली आहे. अभ्यासक्रमात तसा बदल होतो आहे. शिक्षण परिक्षार्थी न राहता ज्ञानार्थी व्हावे असा प्रयत्न आहे. गरज आहे ती प्रत्येकाने तळमळीने हे स्वीकारण्याची. केवळ हा देशच नव्हे तर अवघे विश्व माझे आहे आणि मी विश्वाचा आहे. मग माझ्या जगात मी वाईट कसे बरे करीन? ही जागृती यायला हवी.

आम्ही विज्ञानाच्या शोधाबरोबरच सामाजिक दृष्ट प्रवृत्ती दूर करण्याचाही प्रयत्न केला. गर्भलिंग निदान, स्त्रीभ्रूणहत्या, स्त्रियांवरील अत्याचार,हुंडापद्धती रोखण्याचा प्रयत्न केला. गेल्या पाच-सहा वर्षात एक लाख स्त्रियांची हत्या रोखली गेली. पंचवीस हजार स्त्रियांवर अत्याचार होण्यापूर्वीच रोखले गेले. हुंडापद्धती जवळजवळ नष्टच केली आहे. या सर्व खटाटोपात दोन लाखाच्या वर अपराध्यांना पकडण्यात आले. आपल्या कायद्यातील पळवाटा शोधून ते निसटून गेले. पुन्हा येरे माझ्या मागल्या. नाईलाज म्हणून चाणक्य नीतीचा वापर करावा लागला. पुन्हा असे स्त्रियांशी आणि दुर्बलांशी अभद्र वर्तन करणाऱ्यांना आमच्या पद्धतीने शिक्षा दिल्या. विश्वास ठेवा. त्यांना शिक्षा देताना आम्हाला हौस वाटत नव्हती. मानवाधिकारवाले आणि इतर बऱ्याच जणांना वाटते की आम्ही हूकूमशाहीने वागतो. फतवे काढतो. शासनाला खेळण्यासारखे वापरतो. पण लक्षात घ्या.

आम्हाला कोणावरही हूकूम गाजवायचा नाही. तुम्हाला खरोखरच आमचे कार्य चुकीचे वाटत असेल तर आमच्या कार्यकर्त्यांना कळवा. आम्ही सर्व कार्यकर्त्यांसह ही पृथ्वी सोडून मंगळावर किंवा सॅट-९ वर कायमस्वरूपी जाऊ. अहं, दुष्ट प्रवृत्त्यांनो तुम्ही आनंदी होऊ नका. घाण साफ करणे हे आमचे कार्य आम्ही करणारच. घाण साफ करताना हातपाय माखतात. बस,तेच माखलेले हातपाय तुम्हाला दिसतात आणि तुम्ही दोष देतात.

ही घाण झालेली सामाजिक प्रणाली साफ करण्याचा आम्ही विडा उचलला आहे. भ्रष्टाचार बंद करविला. विदेशातील काळा पैसा देशात आणला. राजकारण, अर्थकारण आम्ही रूळावर आणला. बिघडलेल्या लोकप्रतिनिधींना त्यांच्या कर्तव्याची जाण दिली. पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी या सर्वांना वठणीवर आणून देशहितासाठी त्यांना कर्तव्यदक्ष केले. जाती-धर्मावरून तुमच्यात भांडणे लावून देणा-यांना चांगलाच धडा शिकवला आहे. तुमच्या अन्न,वस्त्र, निवारा,शिक्षण, आरोग्य, प्रवास, संदेशवहन, रोजगार, श्रद्धा या गरजा भागविण्याचे मार्ग अधिक सुलभ केले. तरीही आपल्या भारतीय समाजात अपप्रवृत्ती आढळणे म्हणजे काय? का ते सुधारायला मागत नाहीत? भारतीय लोकहो, तुम्ही जागे व्हा! समाज सुधारणा हे एकट्या दुकट्याचे काम नाही. आपण सर्व मिळून ते करायचे आहे.

आम्ही गरीब-श्रीमंत हा भेद सुद्धा ठेवला नाही. धर्म-जात तर आम्हाला नकोच आहे. आम्ही जगाच्या राजकारणावर आणि

अर्थकारणावर जी काही राष्ट्रांची मक्तेदारी होती ती काढून टाकली आहे. आता भारताची मक्तेदारी सुरू झाली आहे. मात्र मक्तेदारी कोणाचीही योग्य नाही. 'अवघे विश्वचि अमुचे घर' ही भावना महत्त्वाची आहे. आमचे कार्य काहींना नको आहे. म्हणून ते आमचे शत्रू झालेत. काहींना आमचे राजकारणात,अर्थकारणात हस्तक्षेप नकोच आहे. त्यांना आमचे समाजकारणात,धर्मकारणात,जातीपातीत हस्तक्षेप नको आहे. का म्हणून? तुम्ही सुज्ञ आहात. सांगा, आम्ही चुकतो का? तुम्ही सत्य जाणतात. आम्हाला अखिल मानवजातीचे कल्याण करायचे आहे. आमच्या या उद्देशाच्या आड जे येईल ते आम्ही मूळासहीत उपटून काढू. आम्ही अपप्रवृत्ती विरूद्ध लढताना कोणालाही भीत नाही. लक्षात ठेवा, ज्यांना विज्ञान आणि समाजशास्त्र कळते आणि ज्यांनी ते आत्मसात केले आहे तेच खरे ज्ञानी आणि सुखी प्राणी. "

सूचना भारतवासियांच्या अंतःकरणात शिरली तर काहींना मिरच्या झोंबल्यासारखे झाले.

(३९)

सॅट-९ वर आगमन

दोन वर्षांच्या अथक प्रयत्नानंतर विश्वकल्याणच्या तंत्रज्ञान विभागाने आपले ध्येय गाठले होते. त्यांना सेकंदाला जवळपास दोन लाख किमी वेगाने जाणारे यान बनविण्यात यश आले होते. खरे म्हणजे त्यांचे ध्येय प्रकाशाच्या वेगाबरोबर जाणारे यान बनविण्याचे होते. त्यांचा थोडासा हिरमोड झाला. वरिष्ठांनी त्यांना समजावले,"ही उपलब्धी सुद्धा काही कमी नाही. याच्या मदतीने आपण दुसऱ्या आकाशगंगेत तर नक्कीच जाऊन येऊ शकतो. तुमचे यत्न तुम्ही चालू ठेवा. तेही ध्येय नक्कीच प्राप्त होईल. "

वरिष्ठांच्या शब्दाने तंत्रज्ञान विभागाला हूरूप आला. तयार याने त्या त्या विभागाला सोपवून ते पुन्हा नव्या संशोधनाला लागले.

इथे ओमेगाचे निमंत्रण स्वीकारण्याची वेळ आली होती. त्यानुसार त्यांची सॅट-९ वर जाण्याची तयारी सुरू झाली. मानव, सुमित, जोगिंदर सिंह, सुब्रमण्यम,पेल,थापा,सॅम अशी मंडळी यानात स्वार होऊन अन्ड्रामेंडाच्या दिशेने निघाली. यावेळी मोहिमेची पूर्ण तयारी करण्यात आली होती. यानाच्या आत-बाहेर शक्तीशाली कॅमेरे बसविण्यात आले. उद्देश हाच की या संपूर्ण मोहिमेत सामान्य जनतेला ब्रम्हांडातील एकूण एक हालचाली पाहता यावी. यानात काय चालले

आहे? यानाबाहेर कोणत्या घडामोडी होताहेत हे जनता दूरदर्शनच्या पडद्यावर पाहण्यात मग्न झाली.

यानाचा वेग सेकंदाला दोन लाख किमी एवढा प्रचंड असल्याने क्षणात पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण तोडून ते वर झेपावले. पृथ्वी चेंडूसारखी होऊन पुढे एका बिंदूत परावर्तित झालेली यानाच्या मागच्या कॅमेऱ्यातून अवघ्या विश्वाला दिसले. एक अद्भुत दृष्य होते ते!तर पुढच्या भागातून आपण अखंड अंधारातून प्रवास करत असून त्यात तारे चमकत असल्याचे दिसत होते.

यानात मानव सतत ओमेगाच्या संपर्कात होता.

"आमच्या यानाच्या गतीनुसार मला पृथ्वीवर यायला तुमच्या पृथ्वीवरचे तीन महिने लागले होते. तुमचे यान दुप्पट वेगाचे आहे, त्याअर्थी तुम्ही थोड्या लवकर इथे पोहचायला हवेत. आमची तुमच्या स्वागताची पूर्ण तयारी झाली आहे. आम्ही तुम्हाला भेटण्यास उत्सुक आहोत. "ओमेगा म्हणाला.

"आम्हीही. हा एक अवर्णनीय क्षण आहे. ब्रह्मांडातील दोन वेगवेगळ्या आकाशगंगेत राहणारे जीव एकमेकांना भेटणार आहेत. पहिली भेट पृथ्वीवर झाली. दुसरी भेट सॅट-९ वर होईल. पृथ्वीवरील आठशे कोटी माणसं तहानभूक विसरून ह्या क्षणाची प्रतिक्षा करत आहेत. "मानव वॉकीटॉकी सदृश संपर्क साधनावर म्हणाला.

"आमच्या सॅट-९ वरील जनताही पृथ्वीवासियांना प्रत्यक्ष पाहण्यास उत्सुक आहे. या क्षणाला तुम्ही संगणकाच्या पडद्यावर

दिसत आहात. पण प्रत्यक्ष भेटीची मजा काही औरच असते, नाही का?" ओमेगा म्हणाला.

"हो नक्कीच. "

यान तीन तासांच्या आसपास आकाशगंगेच्या टोकाशी पोहोचले. तेथे तारे विरळ प्रमाणात दिसत होते. सर्व आकाशगंगा एका स्थिर बिंदू भोवती वर्तुळाकार फिरतात अशी मान्यता आहे किंवा दुर्बीण तसे दाखवते. पण यांना आकाशगंगेच्या टोकाकडून मिल्की वे बद्दल असे काहीच दिसत नव्हते. पण दूरची अन्ड्रामेंडा मात्र केंद्रातून जळती ऊर्जा बाहेर फेकत वर्तुळाकार फिरत असल्याचे स्पष्ट दिसत होते. त्यातील ता-यांचे तेजही प्रचंड जाणवत होते. अंधाऱ्या वनात असंख्य काजवे चमकताहेत तसे ते दृश्य वाटत होते. दूरवर आणखी काही आकाशगंगा धूसर दिसत होत्या.

मानव पृथ्वीवर जनतेला म्हणाला,"ती पहा ओमेगाची अन्ड्रामेंडा. किती सुंदर दिसते ना! पुढच्या सहा - सात तासांत आपण तेथे असू. "

लोकं पडद्यावर अन्ड्रामेंडाला पापणी न लवता पाहू लागले. खुद्द अन्ड्रामेंडावरील जनतेनेही स्वतः ची आकाशगंगा अशी पाहिलेली नव्हती. आजवर फक्त खगोलतज्ज्ञांना जी संधी मिळत होती ती तिन्ही विश्वातील (पृथ्वी -मंगळ-सॅट-९) वरील मनुष्याला ही संधी मिळाली होती. डोळ्यांचे पारणे फिटले सर्वांचे.

यानाने 'मिल्की वे' नावाची स्वतः ची आकाशगंगा सोडली आणि यानातील प्रत्येकाला कसल्यातरी बंधनातून मोकळे झाल्यासारखे वाटले. यानाचा वेग एकदम वाढला. शरीर हलके हलके वाटू लागले.

"मानव,हा अनुभव कसला रे?" थापाने माहीत असूनही विचारले.

"या विश्वातील प्रत्येक वस्तूत आकर्षण बल असते. त्या बळावर ती वस्तू इतर वस्तूंना आपल्याकडे ओढत असते. सहसा सोडत नाही. जसे ग्रहगोल करतात तसेच ह्या आकाशगंगाही एकमेकांना ओढीत असतात. त्यांच्यातील गुरूत्वाकर्षण शक्तीच्या प्रभावातून आपण बाहेर पडलो आहोत. आता फक्त सूक्ष्म रूपांत सर्वच्या सर्व आकाशगंगेच्या प्रभाव आपल्यावर आहे. म्हणून हा अनुभव येतो आहे. आता आपण केवळ काळ्याकुट्ट ईथर नावाच्या अदृश्य पदार्थातून जात आहोत. कोणतेही आकर्षक बल नाही. जडत्व नाही. "

विश्वाचे हे रहस्य पहिल्यांदाच ऐकायला आणि पहायला सामान्य जनतेला मिळत होते. असेही असू शकते,हा विचार प्रत्येकाच्या डोक्यात होता.

आणखी एक तासाच्या प्रवासानंतर 'मिल्की वे' आकाशगंगेचा फेर स्पष्ट दिसू लागला. एखाद्या वाहनाच्या चातकाप्रमाणे शांतपणे ती स्वतः भोवती गिरकी घेत असल्याचे दिसत होते. "ती पहा आपली आकाशगंगा!" जोगिंदर सिंह पृथ्वीवासियांना म्हणाला.

पृथ्वीवरच्या सोळाशे कोटी डोळ्यांचे एकीकडेच लक्ष होते ते म्हणजे आपली आकाशगंगा. खुद्द त्यात राहून तिला तिच्या बाहेरून पहायला मिळत होते. किती अद्भुत देखावा!

"पृथ्वीवरून आपल्याला फक्त वर आकाशात पाहिले असता दक्षिणोत्तर ता-यांचा पट्टा दिसतो. हाच पट्टा आता बघा लांबून कसा मोहक दिसतो आहे!" प्रत्येकजण एकमेकांना हेच सांगत होता.

आता यानाच्या मागेपुढे दोन्ही आकाशगंगा स्पष्ट दिसत होत्या. डावीकडे-उजवीकडे,वर- खालीही इतर आकाशगंगाही एखाद्या ढगासारख्या दूरवर दिसत होत्या. बाकी आसपास केवळ अंध:कार. या विश्वात त्याचेच तर साम्राज्य आहे.

"मानव,प्रकाश सत्य आहे की अंध:कार?"पटेलने विचारले.

"तूच बघ सभोवती आणि ठरव. "मानव म्हणाला.

"मला तर हे सर्व पाहून अंधार सत्य आहे असे वाटते. "पटेल अंदाज घेत म्हणाला.

"मग. हा अंधार म्हणजे ईथर आहे हे आपणास ठाऊक आहेच. हेच विश्वाचे मूळ आहे. या ईथरमध्येच ही अनंत ब्रह्मांडे प्रकाशाच्या रूपाने निर्माण होतात आणि पुन्हा त्यात विलीन होतात. आपल्या नेत्रांना जे दिसते तो केवळ एक भास असतो. सत्य त्याहून निराळे असते. भास म्हणजे सत्याची उलट प्रतिमा असते. अंधाराच्या उलट काय तर प्रकाश. बघा सर्वत्र. तुम्हाला काय जास्त दिसते? प्रकाश की अंधार?" मानवने विचारले.

"अंधार. "

"हो. या अंधारात हे तारे, ग्रह जन्म घेतात. ऊर्जा आणि इतर तप्त वायूमुळे प्रकाशमान होतात. सभोवतालच्या ग्रहगोलांना निर्माण करून त्यांना प्रकाश देतात. ऊर्जा संपली की पुन्हा याच अंधारात विलीन होतात. थोडक्यात आपल्याला जी सावली वाटते तोच खरा प्रकाश असतो आणि दिसणारा प्रकाश हा त्या खऱ्या प्रकाशाचे प्रतिबिंब असते. भास असतो. "

हे ऐकून पृथ्वीवरची करोडे मने चाट पडली. आजवर आपण अंधारात काय काय केले हे डोळ्यासमोर उभे राहिले त्यांच्या.

आणखी काही तासांनी यान अन्ड्रामेंडाजवळ पोहचले. आता ती चक्राकार न दिसता त्यातील तेज: पुंज दिसू लागले.

"आता आपण अन्ड्रामेंडामध्ये प्रवेश करणार आहोत. अन्ड्रामेंडाचे गुरूत्वाकर्षण बल आपल्यावर प्रभाव टाकायला सुरुवात करेल. " मानव आपल्या सहकार्यांना म्हणाला.

आणि पुढच्या दोन-तीन मिनिटांत यानातील अंतराळवीरांना जडजड वाटू लागले.

"आपण अन्ड्रामेंडामध्ये प्रवेश केला आहे. "हे ऐकताच सर्वांच्या चेहऱ्यावर आनंदाची एक लहर झळकली. तेवढ्यात ओमेगाचा संदेश आला.

"तुम्ही आता यान डावीकडून ४५° तून वळवा. थेट या. तुम्हाला काही मिनिटांत सॅट-१ भेटेल. मग सॅट-१ ते सॅट-९ ही मालिका सुरू होईल. शेवटी तुम्ही सॅट-९ वर पोहचाल. "

"धन्यवाद, ओमेगा. "मानवने त्याचे आभार मानले.

यान चालकाने अचूक वेळेत यान४५° तून डावीकडे वळवले. यानाची पूर्ण हालचाल तिन्ही ग्रहावरील मानवांना दिसत होती. आता पुढे काय? पुढे काय? ही उत्सुकता सर्वांना लागून राहिली.

ओमेगाच्या म्हणण्यानुसार बरोबर काही मिनिटांच्या अंतरावर समोरच सॅट-१ दिसला. अमावास्येच्या चंद्रमासारखा काळसर. जणू तो ईथरमधून नुकताच जन्म घेत असावा.

"ओमेगा,यावर जीवसृष्टी नाही का रे?" मानवने विचारले.

"नाही. फक्त सॅट-९ वर जीवसृष्टी आहे. "

पुढे रांगेत सॅट-२ ते सॅट-८ भेटत गेले. कोणी तांबड्या रंगाचा, मंगळ सारखाच. कोणी चंदेरी रंगाचा, कोणी हिरवा, कोणी निळा, कोणी पिवळा, कोणी जांभळा, कोणी नारंगी, कोणी पांढरा. जणू इंद्रधनुष्य.

"हे ग्रह आहेत की रंगबिरंगी फुगे?" सुब्रमण्यम विचारता झाला.

"सृष्टीची ही सृजनशीलता आहे. कल्पनेच्या पलीकडची. "सुमित म्हणाला.

शेवटी दिसला सॅट-९. फुटबॉलच्या चेंडूसारखा गोलगोल. पृथ्वी सारखा निळाशार. जणू दुसरी पृथ्वीच.

"हा तर पृथ्वीसारखाच दिसतो आहे. आपण पृथ्वीवर तर नाही ना जात?"

"नाही. आपण सॅट-९ वर जात आहोत. "

सारेजण दृश्य पाहत होते. यान सॅट-९ च्या वातावरण शिरले. यानाची गती कमी करण्यात आली. यान कुठे उतरवायचे याचे निर्देश ओमेगाने दिले. वरून सॅट-९ वरील पाणी आणि खंड दिसत होते. सॅमने खंड मोजले. नऊ खंड आढळून आले.

"मानव, आपल्या पृथ्वीवर सात खंड आहेत. इथे नऊ खंड दिसतात. "सॅम म्हणाला.

"हो आणि आपल्या पृथ्वीपेक्षा सातपट विशाल. आपल्या पृथ्वीवरच्या प्रत्येक मानवाला कमीत कमी दहा गुंठे जागा अशीच प्राप्त होईल एवढी प्रचंड जमीन आहे ही. " मानव म्हणाला.

"हो,आपली पृथ्वी सुद्धा पूर्वी नऊ खंड होती. न्यूझीलंडच्या आग्नेय दिशेला झीलॅन्डीया म्हणून एक खंड होता आणि हिंद महासागरात भारताच्या दक्षिणेला कुमारी कंदम नावाचा विशाल खंड होता. हे आता पाण्याखाली गेलेत. यांचा फक्त न्यूझीलंड आणि श्रीलंका हेच भाग शिल्लक आहेत. " . पटेल माहिती देत म्हणाला.

"मला वाटतं,अरिस्टाटलने त्याच्या ग्रंथात *अटलांटा* म्हणून एका भागाच उल्लेख केला आहे. तो तर खंड नसावा?" थापाने विचारले.

"नाही. ते ग्रीक मधील एक प्राचीन शहर होते, आपल्या द्वारकेसारखे. जशी द्वारका पाण्याखाली गेली तसा अटलांटा ही गेला. "मानव म्हणाला.

"द्वारका पाण्याखाली गेली आणि कोकणभूमी पाण्यातून वर आली. आपल्या पृथ्वीवर काय काय घडामोडी घडत असतात. " पटेल म्हणाला.

"निसर्ग आहे. बदलत राहणारच. " सुमित म्हणाला.

यान सॅट-९ च्या धरतीवर उतरते झाले.

सॅट-९ वरील जनता त्यांच्या स्वागताला सज्ज होती. ती माणसं पाहून यानातील मंडळी विचारात पडली.

"मानव,ही माणसं बघ. आपण नक्की सॅट-९ वर आहोत का? मला तर पृथ्वीवर आहोत असे वाटते. "पटेल समोर बघत म्हणाला.

"अरे हो रे,ही मंडळी आपल्या पृथ्वीवरच्या माणसासारखीच आहेत. ओमेगा यांच्यापेक्षा थोडा निराळा होता. "सुब्रमण्यम म्हणाला.

"नाही. ही सॅट-९ वरीलच माणसं आहेत. "मानव समजावित म्हणाला,"नीट बघा त्यांच्याकडे. आपल्यापेक्षा जास्त उंची आहे त्यांची. हातपाय मगगटे बघा. किती पिळदार आहेत! आपल्या पृथ्वीवरच्या एकाही माणसाची आहेत का तशी?"

सर्वांनी सूक्ष्म निरीक्षण केले.

"हो रे, ही तर सॅट-९ वासीय मंडळी आहेत. " सर्वांना ते पटले.

यानाचे दार उघडून मानवसहित सर्व मंडळी बाहेर पडली. त्यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. एक मनुष्य पुढे होऊन म्हणाला,"तुमचे आमच्या ग्रहावर स्वागत आहे. " भाषांतर यंत्राने संभाषण सुलभ केले.

या माणसात ओमेगा त्यांना कुठेही दिसत न्हवता.

"ओमेगा कुठे आहे?" मानवने विचारले.

"त्याची तब्येत बरी नाही. तो उपचार घेतोय. "त्या पुढे असलेल्या माणसाने सांगितले.

. प्रत्येकाच्या गळ्यात फुलांच्या माळा घालण्यात आल्या. जाई-जुई,मोगरा,चाफा यांच्या पासून बनवलेले माळ शरीराला गंधीत करीत होती. माळ जड वाटत होती. फुलांचा आकार पृथ्वीवरील फुलांपेक्षा तीन ते चार पट मोठा होता.

"चला,आपण आमच्या शासकीय अतिथीगृहात जाऊ. तेथून आमच्या प्रयोगशाळेत जाऊ. "ती व्यक्ती म्हणाली.

तेथे जमा झालेल्या लोकांनी त्यांच्या भाषेत एक स्वागत गीत गायले. ढोल,ताशा सारखी वाद्ये वाजवून जल्लोष केला. पृथ्वीवासियांना बघण्यात त्यांनी गर्दी केली होती. त्यांच्या पद्धतीने नृत्य करून पृथ्वीवासियांचे मनोरंजन केले. त्यांना बक्षीस म्हणून पृथ्वीवासियांनी त्यांच्या सोबत छायाचित्रे काढून घेतली. चित्रीकरण तर सुरू होतेच. या भेटीने दोन्ही ग्रहावरच्या माणसांची मने आनंदाने भरून गेली. त्यानंतर बस सदृश्य वाहनात पृथ्वीवासिय बसले. वाहने

आरामदायी होती. त्याला काचसदृश्य पारदर्शक वस्तू होती. त्यामुळे वाहनातून सभोवतालचे सर्व काही स्पष्ट दिसत होते.

वाहने विश्रामगृहाकडे निघाली. पृथ्वीवासिय मंडळी सभोवतालच्या निसर्गाचा आस्वाद घेत प्रवासाचा आनंद घेत होती. पटेलला जवळच्या भ्रमणध्वनीवर वातावरणातील प्राणवायूचे प्रमाण तपासले. बरोबर २१% निघाले. दूषितपणा अजिबात नाही. 'मंगळ आणि सॅट-९ प्रगतीपथावर असूनही जराही प्रदूषण नाही. पृथ्वीवर दूषितपणा का वाढतो?' त्याच्या डोक्यात विचार चमकून गेला.

आणखी पुढे गेल्यावर पर्वत शिखर दिसू लागले. काळे, पिवळे,मरूम,खडक, गगनभेदी पर्वत. वृक्षराजींनी नटलेले. हिरवाई त्यांची शोभाच जणू होती. पर्वतश्रृंखला,दऱ्या,खोऱ्या,वनराई, हिरवापट्टा, प्राणी,पक्षी, वातावरण,मानवीवस्ती हूबेहूब पृथ्वीसारखेच. आकार थोडासा मोठा. किंचितसा फरक सर्वात दिसून येत होता.

"महोदय,हा परिसर, हे वातावरण हूबेहूब पृथ्वीसारखेच आहे. याबाबत आपले काय मत आहे?" मानवने त्या व्यक्तीला विचारले.

"सृष्टीची निर्मिती होण्याच्या प्रक्रियेत कदाचित योगायोगाने ग्रहांचा हा सारखेपणा निर्माण झाला असावा. जसे दोन व्यक्तींमध्ये कोणताही संबंध नसतो. ते खूप दूर राहणारे असतात तरी हूबेहूब एकसारखे दिसतात,तसलाच हा प्रकार आहे. "ती व्यक्ती म्हणाली.

"हो तथ्य आहे. "मानव दुजोरा देत म्हणाला.

"तुमच्या पृथ्वीचे आयुष्य किती आहे?" त्या व्यक्तीचा प्रश्न.

अंदाजे ४५० कोटी पृथ्वीचे वर्ष. "मानवचे उत्तर.

"आमच्या सॅट-९ चे आयुष्य ६७० कोटी वर्षे आहे. "त्याचा प्रतिसाद.

"म्हणजे आमच्या पृथ्वीपेक्षा २०० कोटी वर्षे मोठा आहे तर. म्हणजे पृथ्वीच्या मोठा भाऊच की. "मानव म्हणाला.

"हो,पृथ्वीचा मोठा भाऊच आहे आमचा ग्रह. म्हणून आकाराने मोठा आहे. इथल्या प्रत्येक वस्तू पृथ्वीपेक्षा आकाराने मोठ्या आहेत. तंत्रज्ञानातही आम्ही पुढे आहोत. "ती व्यक्ती म्हणाली.

"नाही बरं. तंत्रज्ञानात आम्ही पुढे आहोत. तुमचे यान सेकंदाला एक लाख किमी जाते. आमचे यान सेकंदाला दोन लाख किमी जाते. " मानव त्याचे विधान खोडत म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर हास्य उमटले.

"प्रयोगशाळेत पोहचल्यावर कळेलच तुम्हाला. तूर्तास हा वाहनाचा नमुना बघा. ह्याला तुम्ही बस म्हणतात. आम्ही ई. स. टी. म्हणतो. यात बसण्याची -झोपण्याची सोय आहे. हे आसन हवे असल्यास पलंगात रूपांतर करता येते. यात विविध कप्पे आहेत. यात हवे असलेले थंड-गरम पेय असतात. या ग्रहावरचे नाश्त्याला उपयोगी पडणारे दोन-चार अन्नपदार्थ असतात. ते महिनो टिकतात. उष्ण तर उष्ण. गार तर गार. ही ई. स. टी. पाण्यावरही चालते. गरज भासल्यास हिला पंख फुटून विमानासारखी उडूही शकते. अपघात झाला तर रबरासारखी आखूड होऊन इतर वाहनांचा आघात सहन करते.

आतील प्रवाशांचे रक्षण करते. संभाव्य धोक्याची सूचनाही देते. "ती व्यक्ती म्हणाली.

"अरे व्वा! हे तंत्र पृथ्वीवर न्यायला हवे. "मानव म्हणाला.

"तुमच्या पृथ्वीवर मानव कधी अवतरला?" त्या व्यक्तीचा प्रश्न.

"साधारणपणे दहा लाख वर्षांपूर्वी, अभ्यास असे सांगतो. वेगवेगळ्या अभ्यासकांचे वेगवेगळे उत्तर आहे. अंदाज असा सांगतो की पन्नास लाख ते सात कोटी वर्षे ही मानवाचे अस्तित्व या पृथ्वीवर असू शकते. आधुनिक मानव(होमो सेपियन) हा तीन लाख वर्षांपूर्वी आला हे मात्र निश्चित. " मानव म्हणाला.

" आम्ही या ग्रहावर दहा कोटी वर्षांपासून आहोत. " तो म्हणाला,"तुम्ही वानरा(एप)पासून तयार झाला आहात हे खरे आहे का?" त्याचा प्रश्न.

"नाही. आम्ही मानव एप(लेमूर) नावाच्या वानरसदृश्य प्राण्यापासून विकसित झालो आहोत. खरे पाहता हा जीव माकड किंवा वानर नव्हता. पण दिसायला तंतोतंत वानर म्हणून सुरूवातीचे संशोधन तसे म्हणते. आम्ही जर माकडापासून विकसित झालो असतो तर आज बाकीच्या माकडांची मी उत्क्रांती व्हायला हवी होती. पण तसे झाले नाही. मनुष्य ही अस्सल प्रत आहे. "मानव रोखठोकपणे म्हणाला.

"आमच्याकडेही मानवसदृश्य प्राणी आहेत. वनात राहतात. प्रचंड क्रूर आहेत. मानवाला फाडून टाकतात. मानवाची स्त्री दिसली

की तिच्यावर अत्याचार केल्याशिवाय राहत नाही. इथे कायदा आहे, दिसताक्षणी त्यांना मारण्याचा. पण कधीच समोर येत नाहीत. आजवर एकही असा प्राणी आमच्या हातून मारला गेलेला नाही. पण त्याने आम्हाला खूप त्रास दिला आहे. "ती व्यक्ती म्हणाली.

"कदाचित असा कायदा आमच्या पृथ्वीवर असता तर स्त्रियांवर अत्याचार झाले नसते. " मानव खेदाने म्हणाला.

"का? तुमच्याकडेही असे प्राणी आहेत?"त्याचा प्रश्न.

"हो आहेत ना! ओळखणारपण नाही त्यांना तुम्ही. मनुष्यासारखे मनुष्य दिसतात. आमच्यातच राहतात. पण असं काही करतात ना की त्यांच्यातील हैवान जागा होतो. " मानव वेगळाच म्हणाला, ती व्यक्ती वेगळेच समजली.

बोलता बोलता विश्रामगृह आले. उंच अशा कड्यावरून सुंदर असा धबधबा कोसळत होता. त्याच्या मधोमध एक गुफा होती. त्यात हे विश्रामगृह होते. त्या व्यक्तीच्या मागोमाग मानव आणि मंडळी जाऊ लागली. ती माणसं डोंगरात बनविलेल्या पायरीवर चालू लागली. त्याला विशिष्ट धातूचा कठडा बनविलेला होता. मागे-पुढे,वर-खाली वळणे घेत ते सर्व गुफेपर्यंत आले. गुफेच्या दारातून धबधबा खाली राजरोसपणे पडत होता. समोर कित्येक मैलापर्यंत सुंदर असा निसर्ग मनवेधून घेत होता. रंगबिरंगी डोंगराची रांग. हिरवेगार वन, रंगबिरंगी फुले,पाने,टेकड्यांचा वेधून घेणारा अरूंद दबधब्याकडून दूरवर वाहत जाणारे पाणी,नभातील विहग,नभाची विविध रंगछटा सारे काही मोहून घेत होते.

"तुम्ही धबधब्याच्या पाण्यातून समोरचे दृश्य बघा. " ती व्यक्ती म्हणाली. मानव आणि मंडळींनी पाण्यातून पलीकडे पाहिले. तो समोरचा वेधक निसर्ग पाण्याबरोबर वाहतोय असे भासत होते. त्या पाण्याचे तुषार अंगावर उडून भिजायला होत होते.

"व्वा! अती सुंदर! अप्रतिम!! अवर्णनीय!!! डोळ्यांचे पारणे फिटले. "प्रत्येकजण म्हणू लागला.

तेथून ते गुफेत शिरले. दोन-चार पावलावर एक भव्य महाल त्यांच्या पुढ्यात उभा होता. विस्तृत दालन, उंच घुमट, जाळीदार नक्षीकाम, रेखीव-भडक रंगकाम. पायघड्या,आसन,परदे सर्व मखमलीच्या वाटाव्यात अशा.

"तुम्ही तर कमालच केली बुवा. गुफेच्या आत हा भव्य महाल!"मानव आनंदाने म्हणाला.

"मग मानतात की नाही,आमचे तंत्रज्ञान प्रगत आहे ते?"त्या व्यक्तीने विचारले.

"मानतो. पण हे महाल कोणासाठी निर्मिले गेले आहे?"मानवचा प्रश्न.

"बड्या अधिकाऱ्यांसाठी. प्रशासनाचे कर्तेधर्ते त्यांच्यासाठी. अर्थात सामान्य नागरिकही येथे बिनधास्तपणे येऊ शकतात. आतून पूर्ण डोंगरावर हा महाल आहे. यात खाण्यापिण्याची, राहण्याची पूर्ण सोय आहे. स्वप्नातही अशा महालाची तुम्ही कल्पना केली नसेल. फक्त

याला खिडक्या नाहीत एवढेच. दरवाजा आहे तोही आपण आलो तेच. दारात पाणी वाहतेय. "

"खूप सुंदर आहे. स्वर्गनगरीच आहे ही. इथे विश्राम करायला आम्हाला नक्कीच आवडेल. "मानव हर्षित होऊन म्हणाला.

सर्व मंडळी आसनस्थ झाली. नाश्ता पुढ्यात आला. दूध, थंड पेये, उष्ण पेये, फळे, फराळ आणि तेथील वेगवेगळे पदार्थ. ते पृथ्वीवासियांच्या तोंडाला पाणी सुटले.

"काहीच फरक नाही. पृथ्वीप्रमाणेच हे खाद्यपदार्थ आहेत. "

"मग करा सुरुवात. "त्या व्यक्तीच्या सूचनेनंतर दोन्ही ग्रहावरच्या चर्चा करीत नाश्ता होऊ लागला आणि गुफेत मुखाशी कोणीतरी किंचाळल्याचा आवाज झाला. आवाज हत्तीसारख्या प्राण्याचा वाटला.

"मग महोदय,हा आवाज कसला?" मानवने विचारले.

"प्राण्याचा. अजस्त्र अशा प्राण्याचा. "ती व्यक्ती म्हणाली.

"बघू. "

सर्वजण गुफेच्या मुखाशी गेले. खाली पाहतात तर विश्वास बसेना.

"अरे हे तर डायनॉसॉरस. "सुमित ओरडला,"तुमच्या या ग्रहावर अद्याप डायनॉसॉरस जीवंत आहेत?"

"हो. तुम्ही यांना डायनॉसॉरस म्हणतात? आम्ही पॅरॉक म्हणतो. "सोबत असलेली व्यक्ती म्हणाली.

"हे बहुतेक शाकाहारी असावेत. या धबधब्याखाली पाणी प्यायला येतात. तुम्हाला यांच्यापासून त्रास होत नाही का?" सॅमचा प्रश्न.

"नाही. आम्हाला यांचा काहीच त्रास होत नाही. आम्हीही यांना त्रास देत नाही. मनुष्य आणि वन्यप्राण्यांचे अधिवासक्षेत्र ठरलेले आहे. हे एक प्रकारचे नैसर्गिक अभयारण्यच आहे. येथून हे प्राणी बाहेर पडू शकत नाहीत. कोणताही मानव इथे येऊ शकत नाही. ही बस हवेत प्रवास करून आली. म्हणून आपण इथे येऊ शकलो. "

"काय म्हणता? येताना तसे वाटले नाही. पण काहीही म्हणा, हे सुंदर विशालकाय जीव आज प्रत्यक्ष बघायला मिळाले. नेत्र तृप्त झाले. पृथ्वीवर अशा प्राण्यांची हाडे तपासून वैज्ञानिक कंटाळून गेलेत. यांची कल्पनाचित्रे बनवली गेली. आपले वैज्ञानिकपण हुशार बुवा. त्यांनी जशी कल्पनाचित्रे बनविले तसेच हे प्राणी आहेत. "

धबधब्याच्या खाली शाकाहारी अजस्त्र प्राण्यांचा समूह पाणी प्यायला, पाण्यात डुंबायला शेकडोंच्या संख्येने आले होते. परिसर त्यांनी फूलून गेला होता. ते आपल्याच धुंदीत होते. धबधब्याच्या पलीकडे असलेल्या गुफेतून कोणीतरी आपल्याकडे पाहतेय यांची त्यांना पुसटशीही कल्पनाही नव्हती.

"सुब्रमण्यम, कॅमेरा चालू आहे ना? दाखव हे जीव आपल्या पृथ्वीवरच्या माणसांना खरेखुरे डायनॉसॉरस. "

सुब्रमण्यम यानातून उतरल्यापासून प्रत्येक टप्प्याचे चित्रीकरण करीत होता. पृथ्वीवर ही दोन-तीन दृष्ये गेली नि पृथ्वीवासिय स्वतः ला

विसरून त्या निसर्गाला, धबधब्याला, महालाला आणि अजस्त्र जीवांना बघत होती.

"मी पण तेथे असल्या पाहिजे होतो. "जो तो म्हणू लागला.

पाणी प्यायल्यावर ते सुंदर जीव आपापल्या मार्गाने निघून गेले. मंडळी महालात परतली. नाश्ता पूर्ण केला. त्यांना प्रत्येकांना दिलेल्या खोलीत ते विश्रांतीसाठी गेले.

काही तासांच्या अवधीनंतर मानवसहीत इतर पृथ्वीवासियांचा क्षीण मिळालेल्या विश्रांतीमुळे नाहीसा झाला. गार पाण्याने सर्वांनी आंघोळी केल्या. त्यांनी तेथील खास वस्त्र परिधान केले. दिवाणखान्यात अधिकारी मंडळी त्यांची वाट पाहत बसलेले.

"बोला, आता कोठे निघायचं?" मानवने विचारले.

"या महालाच्या मागे आमची प्रयोगशाळा आहे. ती पाहू या. तेथेच भोजन घेऊ. पुन्हा इथे येऊन विश्रांती घेऊ. मग आमच्या प्रमुखांशी भेटीगाठी. "ती व्यक्ती म्हणाली.

"चला तर. निघू या. "

ते पायी पायी एका कोपऱ्यातून मागच्या दिशेला गेले. काही अंतर चालून गेल्यावर ते प्रयोगशाळेत दाखल झाले. तेथील एकंदर वातावरण तशीच जाणीव देत होते.

"हे आमच्या प्रयोगशाळेचे मुख्य दालन. येथे फक्त बौद्धिक कामं होतात. कागदी घोडे नाचवले जातात. खरे संशोधन इतर विभागात होत असते. "

ती व्यक्ती त्यांना एका विभागात घेऊन गेली. तेथे बरीच लहान-मोठी यानं दिसली. शंभरेक तंत्रज्ञ कामं करीत होते.

"हे यान विभाग. इथे दोन माणसापासून शंभर माणसांपर्यंतच्या बसण्याची क्षमता असलेली याने बनवली जातात. त्यांची गती वाढविण्यासाठी वेगवेगळे प्रयोग केले जातात. ही अती शक्तीशाली याने आहेत. ओमेगा घेऊन गेला होता त्यापेक्षा कैकपटीने ताकदवान याने आहेत ही. ब्रह्मांडात कोठेही विचरण करू शकतात. "

पृथ्वीवासिय यानांजवळ जाऊन त्याचे निरीक्षण करू लागले.

"अरे, ते बघा ओमेगाचे यान. "सर्वांचे लक्ष निर्देशित केलेल्या यानाकडे गेले.

"ह्याला इथे का ठेवलेय?" मानवने विचारले.

. "तुम्ही धूमकेतू मोहीमेवर गेला होता. तेव्हा या यानाला क्षती पोहचली होती. थोडी दुरूस्ती करायची आहे आणि क्षमताही वाढवायची आहे म्हणून ठेवलेय. " ती व्यक्ती उत्तर देत म्हणाली.

"पण ओमेगा कोठे आहे? आल्यापासून त्याची भेट नाही. "मानव थोड्या तक्रारीच्या सुरात म्हणाला.

"इथे एका रूग्णालयात उपचार घेत आहे. होईल त्याची भेट. "

पुढच्या टप्प्यात जनुकीय तंत्रज्ञान विभाग, भूगर्भशास्त्र विभाग, ग्रहगोल विभाग, पदार्थ विज्ञान विभाग,वस्त्र विभाग, मानसोपचार विभाग,मेंदू विभाग,जीव विभाग, परग्रहवासी विभाग, रेडिओ लहरी प्रक्षेपण-अधिग्रहण विभाग, नियंत्रण विभाग इत्यादी भाग

पृथ्वीवासियांना दाखविण्यात आले. मानव आणि मंडळी हे सर्व पाहून अचंबित झाली.

"आपल्या केंद्रांवर सुद्धा एवढे विभाग नसतील. "सुमित म्हणाला.

"पण ओमेगा कोठे आहे?" मानव चिंतीत होऊन म्हणाला.

"चला रोबो विभागात. दाखवतो. "

ती व्यक्ती त्यांना यंत्रमानव विभागात घेऊन गेली.

"तुम्ही आम्हाला रोबो विभागात घेऊन आलात. इथे रोगी कुठे आहेत? ही सर्व माणसंच दिसताहेत. तिही स्थिर. " मानवाने त्या व्यक्तीला विचारले.

"ही माणसं नाहीत,रोबोच आहेत. "

"काय?" जवळ जाऊन त्यांनी स्पर्श करून खात्री करून घेतली.

"तो बघा ओमेगा. "

सर्वजण ओमेगा जवळ गेले.

"म्हणजे ओमेगा यंत्रमानव आहे तर?" सुमित नवल व्यक्त करीत म्हणाला.

"होय. "

"पण आमच्या सोबत असताना तसे काही वाटले नाही. त्याचा स्पर्श,त्याची भावना पूर्णतः मनुष्यासारखीच होती. "मानव म्हणाला.

"हो. तसे तंत्रज्ञान आम्ही विकसित केले आहे. यंत्रमानवात आम्ही मानवी भावभावना स्थापित करू शकतो. "ती व्यक्ती आश्चर्याचे धक्के देत म्हणाली.

"पण हे मानव समाजासाठी खूप घातक आहे. माथेफिरू या यंत्रमानवाचा चुकीचा वापर करू शकतात. "मानव शंका घेत म्हणाला.

"नाही, तसं होणार नाही. आम्ही तंत्रज्ञान विकसित करताना या बाबीचा पूर्ण भान ठेवले आहे. याचा वाईट वापर कोणीही करू शकत नाही. ओमेगा जेव्हा पृथ्वीवर गेला होता तेव्हा ओमेगा बोलत नव्हता, तर त्याच्यातून मी बोलत होतो. इथून ओमेगावर मी नियंत्रण ठेऊन होतो. " ती व्यक्ती म्हणाली.

"अविश्वसनीय! तुमचे म्हणणे खरेच वाटत नाही हो. "मानव चकीत होऊन म्हणाला.

"विज्ञानाने शोध पहिल्यांदा कोणाला खरे वाटतात?"

"मग तुम्ही पृथ्वीवर यंत्रमानव असलेल्या ओमेगाला पाठवले. तुम्ही स्वतः का आले नाही?" मानवाने विचारले.

"इतर ग्रहांवर जाताना खबरदारी म्हणून आम्ही प्रथम यंत्रमानव पाठवले. सर्व सुरक्षित वाटले की मग स्वतः जातो. तुम्हीही तसेच करता ना?"

"हो. " मानव होकार देत म्हणाला.

"बरं झालं ना माणसाच्या जागी हा यंत्रमानव गेला होता. धूमकेतूवर आमचा निभाव लागला असता का? तुमची किती माणसं

गेली. यानाला क्षती पोहचली. हा थोडा कमजोर झालाय. धूमकेतू हा सहसा आमच्या आकाशगंगेत दिसत नाही. दिसला तरी या आमच्या ताऱ्याच्या कक्षेत येत नाही. त्याचा विशेष असा अभ्यास आम्ही केलेला नव्हता. म्हणून रोबो पाठवलेला होता. "

"यातून एक सिद्ध झाले की प्रत्येक गोष्टीचा अभ्यास हवा. लहानात लहान बाबही महत्त्वाची असते. "

सर्व पृथ्वीवासिय ओमेगाला पाहत राहिले.

"तुमचे नाव?"

"ह्युमन बिइंग. "त्या व्यक्तीने उत्तर दिले.

(४०)

दिगंतराच्या प्रवासाला

सुमित,मानव आणि इतर निवडक मंडळी दीर्घकालीन सुट्टीवर जाऊन आपल्या केंद्रांवर परतली. त्यांची निवड झाली होती ती दिगंतराच्या प्रवासाला निघण्याची. ही मोहीम होती वीस ते पन्नास वर्षांची. इतर आकाशगंगा आणि ब्रह्मांड धांडोळ्याची. परत यायची शाश्वती नव्हती. त्यांनी सॅट-९ वरील गुप्त व्हायचे तंत्रज्ञान वापरण्याचे नाकारले होते. खरं म्हणजे गुप्त व्हायचे तंत्रज्ञान यांनीही कधीच विकसित केले होते. त्याच्या बळावरच सूचनाफलक आणि इतर अनेक बाबी पार पाडलेल्या होत्या. पण त्याचा दुरूपयोग होण्याचे भय जास्त. वर या गुप्त होण्याच्या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास मोहीमेला, विज्ञानाला काहीच महत्त्व राहिले नसते आणि त्या यंत्राची शाश्वती नव्हती. ते प्राथमिक स्वरूपात होते. अजून त्याचे बरेच परिक्षण बाकी होते. ते सर्व घरच्या मंडळींना अखेरचे भेटून परतले होते.

विश्वकल्याण संशोधन केंद्राने वाहन क्षेत्रात कमालीची प्रगती केलेली. त्यांच्या तंत्रज्ञान विभागाने प्रकाशाच्या वेगाने जाणारी याने बनवलेली. आता ब्रह्मांडातून कमीत कमी वेळात विचरण करणे शक्य होणार होते. खरे म्हणजे यानात बसून जाणा-यांसाठी वेळ थांबणार होती. ना मागे ना पुढे. ते अवकाशात सहा महिने राहतील परंतु पृथ्वीकरिता जवळपास वीस वर्षांचा कालावधी जाईल. पन्नास वर्षात

ते फक्त दीड ते दोन वर्षच अवकाशात राहतील. याबाबत चर्चा करीत ते आपल्या केंद्रांवर बसले होते.

"सुमित,तुझा विवाह झाला आहे का?" इब्राहिमने विचारले.

"नाही. लग्न करून काय करतो? मी वीस वर्षांनी परत येईन. माझे वय आहे तेच राहील. माझी पत्नी वीस वर्षांनी म्हातारी होईल. शिवाय परत येऊ याची शाश्वती नाही. लग्न करून स्वतःला नि पत्नीला कशाला दुःखात लोटायचे?तसे मी मातापित्यांच्या संदर्भात असलेले माझे मुलाचे कर्तव्य पूर्ण केले आहे. भावंडाशी संबंधित भावाचे कर्तव्य देखील पूर्ण केले आहे. "

"बरोबर आहे तुझं. "मानव म्हणाला," म्हणून मीही विचार केलेला नाही. आपला जन्म या अशा बाबींसाठी झालेला नाही. काहीतरी भव्यदिव्य करण्यासाठी झालेला आहे. "

"आणि हो,आपण परत येणार नाहीत असे बोलू नका. आपण नक्कीच परत येऊ. "मुखर्जी म्हणाला.

"परत येऊन जर आपण विवाह करण्याचे ठरविले तर आता जी मुलगी जन्माला येईल किंवा जी पहिली-दुसरीत शिकते आहे तिच्याशी विवाह करावा लागेल. विचित्र नाही वाटत का हे?" सुमितचा प्रश्न.

"आहे खरं विचित्र. पण त्याला उपाय नाही. "मानव.

"बरं झालं आता कोणत्याही मुलीला मागणी नाही घातली किंवा पसंत केली नाही. त्या मुलीचं आयुष्य वाईट झालं असतं. पण मानव आपण परत येऊ. पण एवढा वेळ अवकाशात राहिल्यावर आपल्या

शरीरावर परिणाम तर होणार नाही ना?" सुमितने शंका उपस्थित केली.

"होईल. पण तो सूक्ष्म असेल. काळजी करण्याची गरज नाही. "

अचानक त्यांच्या समोर संगणकाच्या मोठ्या पडद्यावर सूचना आली. त्यांच्या समोर सात एकसारख्या दिसणाऱ्या पांढऱ्या आकृत्या दिसू लागल्या.

"आमच्या प्रिय सहकार्यांनो,जय हिंद! जय जगत! आम्ही या सर्व वैज्ञानिक घडामोडीचे प्रमुख सूत्रधार आहोत. आमचा चेहरा,आमचा पेहराव,आमची भाषा आणि आमच्याशी संलग्न बाबी तुम्हाला जाणून घेण्याची आवश्यकता नाही. आम्ही फक्त मनुष्य आहोत. या केंद्राचे जनक आहोत. विज्ञानाचे पुरस्कर्ते आहोत. पृथ्वीवरच्या सात खंडाचे सात प्रतिनिधी आहोत. एवढी आमची ओळख पुरेशी आहे. आम्ही त्या सात दिवसासारखे आहोत,जे सज्जनांना सारखेच वाटतात. कोणताही दिवस वाईट नाही. चांगलाच आहे. तसे आम्ही आहोत.

पुढच्या काही क्षणानंतर तुम्ही दिगंतराच्या प्रवासाला निघणार आहेत. हा प्रवास खरं म्हणजे आपल्या मनुष्याच्या दृष्टीने मृत्यूचा प्रवास आहे. पण आपण असामान्य माणूस आहात. सर्वसामान्य विचार करायचा नाही. तुम्ही नक्कीच परत येतील. हे अवघे ब्रम्हांड पादाक्रांत करून येतील अशी आम्हाला शाश्वती आहे.

आपले मुख्य ध्येय मानवाचे सुख हे आहे. विज्ञानवाद जोपासणे हा आहे. तुम्ही सर्व घरादारावर तुळशीपत्र सोडून या मोहीमेवर जाण्यास तयार झालात. याबद्दल तुमचे अभिनंदन! काहीतरी भव्यदिव्य करताना हा असा मोठा त्याग करावाच लागतो. पण आमच्यावर विश्वास ठेवा. तुम्हाला काहीच सोडावे लागणार नाही. तुम्ही नक्कीच परतणार. तुम्हाला नाही जमले तर आम्ही घेऊन येणार तुम्हाला. तुम्हा सर्वांना खूप खूप शुभेच्छा!"

संगणकाच्या पडद्यावर काहीही दिसेनासे झाले.

सर्वांनी एकमेकांचा निरोप घेतला. काही मंडळी गुरू या ग्रहावर तर काही मंडळी शनी या ग्रहावर निघाली. लेटेस्ट गतीच्या यानात बसून ते निघाले. कोणी प्लूटो, युरेनस, नेपच्यून यावर संशोधनाकरिता जायला निघाले. काही अन्ड्रामेंडाला प्रदक्षिणा घालून त्यातील प्रत्येक ग्रह- ताऱ्याची माहिती आणायला सज्ज झाले. काही स्वतः च्या आकाशगंगेतला प्रदक्षिणा करायला उत्सुक होते. मानव आणि सुमित निघाले तिसऱ्या आकाशगंगेत. ती अन्ड्रामेंडापेक्षा शेकडो प्रकाशवर्ष दूर होती. कोणाला धूमकेतूच्या उगमाकडे पाठवले गेले. काहींना ध्रुवताऱ्याकडे पाठविले गेले. काहींना ओरायन नक्षत्रात (व्याध) सप्तर्षी येथे पाठवले गेले. या नक्षत्रातील किमान दोन- तीन ग्रहावर जीवसृष्टी असण्याची दाट शक्यता होती. कोणाला तो विश्वाचा केंद्र शोधून काढण्यास पाठविले गेले जेथून हे प्रचंड विश्व निर्माण होऊन विस्तार पावत गेले.

सर्व यानांनी उड्डाण केले. आपापल्या दिशेने ती निघाली. मानव आणि सुमितच्या यानाने अन्ड्रामेंडाच्या दिशेने झेप घेतली.

"सुमित,कसे वाटते आहे?" मानवचा प्रश्न.

"बरे वाटते. या अंधाऱ्या वाटेतून प्रकाशाच्या शोधात निघणे. खूपच रोमांचक!"

"असेही काही दिवस आपल्या वाट्याला येतील असा विचार तरी केला होता का आपण?"

"अजिबात नाही. मला तर साध्या दहा हजार रूपयांच्या पृथ्वीवर एखाद्या कार्यालयातील नोकरीची अपेक्षा नव्हती. तेथे आज दिगंतराच्या प्रवासाला जातोय. कल्पनातीत!"सुमित म्हणाला,"मी तुझ्या सोबत त्या स्मारकाच्या बिळात आलो नसतो तर हा दिवस पहायला मिळत नसता. "

"माणसाने मोठे ध्येय ठेवावे. आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी, देशासाठी, संपूर्ण सृष्टीसाठी. बघ आनंद कसा चिरकाल मिळतो ते. "

"अरे,ती उल्का बघा कशी दिमाखात जात आहे. तिच्या्वर कोणीतरी रवाना झाले आहे असे वाटते. "

"तिच्यावर आपली महत्त्वाकांक्षा स्वार झाली आहे. ती उल्का जेथून निघाली आहे आणि जेथे जात आहे, तेथे आपण जाऊ आता. "

दोघे समोर दिसणाऱ्या प्रचंड विश्वाकडे पाहत एका अवर्णनीय आनंदाची अनुभूती घेत होते.

आणि एके दिवशी देशभरातील सूचना फलकावर एक दु:खद सूचना झळकली.

"मित्रानो,जय हिंद! जय जगत! आज आम्ही विश्वकल्याण संशोधन संघटनेचे अज्ञात सात मुख्य सूत्रधार या सूचनेच्या माध्यमातून आपल्या पुढ्यात शेवटचे अवतीर्ण झालो आहोत. आमचं आणि आमच्या सहकार्यांचे जीवन हे विज्ञान आणि मानव याला समर्पित आहे. आम्ही विज्ञानाच्या मदतीने देशासाठी, मानवतेसाठी जे केलं ते बहुतेकांना आवडलं दिसत नाही. त्यांना वाटतं की आम्ही हूकूमशाहीने वागतो. तुम्हाला बंधनात ठेवतो. लक्षात घ्या,आमचा उद्देश कसा कधीच नव्हता. समाजाचा रहाटगाडा व्यवस्थित चालण्यासाठी नियम,कायदेकानून, काही बंधने ही आवश्यक असतात. आम्ही तेच केलं जे योग्य होतं.

आता आम्ही सातही जण देखील दिगंतराच्या प्रवासाला निघालो आहोत. कदाचित आम्ही अन्य समांतर ब्रह्मांडात जाऊ, जेथे आपल्या सारखेच माणसं आहेत. आमचे बाकी सहकारी यापूर्वीच एकेक करून पुढे गेले आहेत. आमची भूमीगत,अवकाशस्थ,सागर तळाची प्रयोगशाळा जगभरातील शास्त्रज्ञांच्या स्वाधीन केली आहे. आमचे सर्व प्रकल्प शासनाच्या आधीन आहेत. आता यापुढे आम्ही तुम्हाला त्रास देण्याकरिता पुन्हा येणार नाहीत. हे सूचना फलकही उद्यापासून तुम्हाला दिसणार नाहीत. आम्ही जी सुधारणा केली आहे, जे काही

चांगले निर्माण केले आहे त्याचे तुम्ही रक्षण कराल अशी अपेक्षा आहे. अर्थात, आम्ही नाही म्हणून तुम्ही पुन्हा मूळ ट्रॅकवर जाऊ नका म्हणजे झालं. आमच्यापैकी कोणी वर्षांनी, कोणी पाच वर्षांनी, कोणी दहा वर्षांनी, कोणी वीस ते पंचवीस वर्षांनी तर कोणी पन्नास वर्षांनी परत येणार आहेतच. तसा ओमेगा अधूनमधून येत जाईल.

बरं. चुकलं माकलं क्षमा करावी. आम्ही निघतो आता. जय जगत!"

(ही कादंबरी वाचल्याबद्दल धन्यवाद! आपल्या प्रतिक्रिया ८०८७८१०१८० या व्हॉटस्एप नंबरवर लिहून पाठवा. सोबत आपले नाव, गांव/शहर आणि व्यवसाय/नोकरी ही माहिती लिहायला विसरू नका!) – लेखक

चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता या जगात नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे.

माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे.

प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा.

वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www. esahity. com

esahity@gmail. com

9987737237

ई साहित्य प्रतिष्ठान. एक प्रसन्न अनुभव.